॥ श्रीः ॥

ई/300

आडिवऱ्याची श्रीमहाकाली

चिं. कृ. दीक्षित

श्रीमहाकाली प्रसन्नास्तु

आडिवऱ्याची श्रीमहाकाली

[आवृत्ति पहिली]

लेखक

वेदमूर्ति चिंतामण कृष्ण दीक्षित लिमये,

ज्योतिषी

शक १८५७

इ. सन १९३६

किंमत एक रुपया

प्रकाशक —
वे. शा. सं. चिंतामण कृष्ण दीक्षित लिमये, ज्योतिषी,
५१२ सदाशिव पेठ, पुणें २

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें :—

(१) वे. शा. सं. चिंतामण कृष्ण दीक्षित लिमये,
ज्योतिषी, आश्रित, संस्थान पर्वती,
५१२ सदाशिव पेठ, पुणें २
अगर — मु. पो. आडिवरें, जि. रत्नागिरी

(२) वे. शा. सं. भास्कर कृष्ण दीक्षित लिमये,
१२३ शनिवार पेठ, नेनेघाट, श्रीराममंदिर,
पुणें २

[सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन]

मुद्रक —
लक्ष्मण नारायण चापेकर,
' आर्यसंस्कृति मुद्रणालय ',
टिळक-रस्ता, पुणें २

ई/30

प्रास्ताविक दोन शब्द

महाराष्ट्राच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचीं नानाविध साधनें शोधून तीं प्रसिद्ध करण्याचें इष्ट कार्य आज गेलीं पन्नाससाठ वर्षें चालत असून त्याचें व्याप्तिक्षेत्र झपाट्यानें नसलें तरी बऱ्याच समाधानकारक गतीनें वाढत आहे. ह्या इतिहासग्रंथप्रसिद्धीच्या व्याप्तिक्षेत्राचें, स्थलपरत्वें, काल-दृष्ट्या व विषयभेदानें मापन केलें असतांहि हें कार्य चढतें वाढतें असल्याचेंच निदर्शनास येतें. व ह्याचाच प्रस्तुत पुस्तक हा एक पुरावा होय.

ह्या ग्रंथाचें नांव पहातांच हा देवस्थानाविषयक ग्रंथ आहे व म्हणून श्रीदेवी महाकाली, तीहि आडिवऱ्याची, ज्यांची कुलस्वामिनी किंवा ग्रामदेवता आहे, अशा भाविक व श्रद्धालु भक्तांच्याच करतां हा ग्रंथ आहे असें वाटेल; पण केवळ तसें नाहीं. अशा भक्तांच्या भावनांचें परिपोषण ह्या ग्रंथानें होईलच पण त्या देवीबरोबर आडिवऱ्यांतील इतर सर्व देवता, मठ, समाधी, इत्यादि इतर पवित्र स्थानांचीहि माहिती ह्या ग्रंथांत आली असल्यामुळें व ती माहितीहि त्या त्या कालचीं सनदापत्रें, याद्या, आख्यायिका, जुन्या चालीरीतीचीं टिपणें व चालू वहिवाटीचे दाखले इत्यादि साधनांच्या द्वारेंच मुख्यतः सांगितलीं असल्यामुळें, हा ग्रंथ महाराष्ट्रेतिहासाचे कामींहि एक प्रकारें उपयुक्त असा झालेला आहे. ग्रंथाचें स्वरूप संग्राहक व वर्णनात्मक पद्धतीचें आहे. जसा एखाद्या घराण्यापुरता जुन्या नव्या कागदपत्रांचा साधनात्मक भाग जोडून माहिती देणारा ग्रंथ प्रसिद्ध करावा त्याप्रमाणें ह्या महाकालीप्रमुख आडिवऱ्यांतील सर्व देवस्थानांचें एक घराणें कल्पून त्या संबंधींचें जें लहान-मोठें, प्राचीन अर्वाचीन उपयुक्त चिटोरें, जवळ जवळ अडीच तपाइतक्या प्रदीर्घ परिश्रमानें, ग्रंथकर्त्यास उपलब्ध झालें तें सर्व ह्या ग्रंथांत संग्रहित केलें आहे. अर्थात् देवधार्मिकपण हें जें समाजाच्या इतिहासाचें एक प्रमुख

अंग त्या दृष्टीनें हा ग्रंथ महाराष्ट्राच्या इतिहासास म्हणजे सामाजिक इतिहासास विशेष साहाय्यक होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सामाजिक इतिहासापेक्षां खरें म्हटलें तर देवधार्मिक इतिहास हा स्वतंत्र व महत्त्वाचा भाग आहे. देवधार्मिकतेकडे ऐतिहास दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं शंकर, गणपती, देवी, मारुती, दत्त, शनि, खंडोबा ह्या देवतांच्या उपासना भिन्नभिन्न कालीं महाराष्ट्रांत प्रचलित झाल्या आहेत. त्यांचे काल, उगम, कारणें, उपचार, प्रसार व ग्रंथ हीं लक्ष्यांत घेणें फार मनोरंजक आणि उद्बोधक होणारे आहे. पैकीं प्रस्तुत ग्रंथांत महाकाली देवीसंबंधानें प्रतिदिनीं, प्रतिमासीं व प्रतिवर्षीं आणि प्रतिप्रसंगीं म्हणजे अकस्मात् उद्भवणाऱ्या निमित्तानें, होणाऱ्या पूजाविधींची व यात्रोत्सवाची चालू व गत सर्व प्रकारची माहिती आली आहे. ह्याचप्रमाणें व महाकालीं ह्या नांवानें असलेल्या इतर ठिकाणच्या ह्या देवींची माहिती प्रसिद्ध होणें इष्ट आहे. त्यावरून स्थलभेदामुळें रोजची पूजादि कृत्यें विशेषतः वार्षिक यात्रा, मिरवणुकी ह्यांमधील पूजाभेद असल्यास ते लक्ष्यांत येतील; तसेंच सर्वसामान्य असा एक विधि कोणता तेहि समजून येईल. आणि मग साकल्यैकरून उद्बोधक असें कांहीं निश्चत विधान करणें सुगम होईल. महाकाली व महालक्ष्मी ह्या देवींचीं स्थानें जितकीं ठिकठिकाणीं आढळतात तितकी महासरस्वतीचीं दिसून येत नाहींत. विष्णुलक्ष्मी किंवा लक्ष्मीनारायण, रामसीता ह्या दंपतीदेवता आहेत व त्यांतील लक्ष्मी ही येथील महालक्ष्मी नाहीं. आदि पुरुष किंवा प्रसंगोपात्त अवतीर्ण झालेल्या पुरुषदेवता जशा तशाप्रमाणें ही आदि शक्ति स्त्री-देवता आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश उत्पत्तिस्थितिलयकर्ते देव होत. पण मध्येंच भिन्न प्रसंग पडला तेव्हां त्या साठीं इतर स्वतंत्र देवता अवतरित झाल्या. शंकर, गणपती, देवी, मारुती, दत्त, खंडेराय ह्यांतील कांहीं उपास्यें नेहमींचें अवश्य तें कार्य करविणारीं आहेत. पण देवी, दत्त ह्या देवतांची गोष्ट भिन्न आहे. ह्यांचें मुख्य वैशिष्ट्य संकटनाशन, बाधापरिहार हें समजलें जातें व म्हणून नवस, कौल, अंगारे, गंडे इत्यादि प्रकार जसे ह्या देवतासंबंधीं जितके रूढ आहेत तितके

शंकर, राम, गणपती, मारुती ह्या देवतांचे नाहींत. शनि ही देवता फलज्योतिषशास्त्राच्या वाढीची निदर्शक आहे. तीहि बाधापरिहारक म्हणून उपास्य मानली. सामान्यतः देवतासंबंधांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे

य एव देवा हंतारस्ताँ ल्लोकोऽर्चयते भृशम् ।
हन्ता रुद्रस्तथा स्कन्दः शक्रोऽग्निर्वरुणो यमः ॥ —...
एतान् देवानुपर्णंस्यन्ति प्रतापप्रणता जनाः ।
न ब्रह्माणं न धातारं न पूषाणं कथंचन ॥

तात्पर्य, प्राप्तप्रसंगीं संकटमोचनार्थ ह्या देवता अवतीर्ण होतात. दत्त हें दैवत ज्या कालांत प्रसार पावलें तेव्हांच्या संकटाचे पोटीं तें अवश्यंभावी झालें. ह्याच्या प्रसाराचा काल सामान्यतः मुसलमानी अमदानी हा दिसतो. त्याविषयींच ग्रंथ, उपचार, भक्त व परिवार पाहून ह्या दैवताचा विचार फार स्वतंत्र व मनोरंजक आहे. संकटाप्रमाणेंच त्यावर संकटग्रस्त लोकांकरवीं आपल्या बुद्धिशक्तनुसार निघालेली ही तोड आहे. ह्याप्रमाणें श्रीदेवी ह्या दैवताविषयींहि आहे. महाराष्ट्रापुरतें पाहतां हिच्या उपासकांत अर्धवट मुसलमान किंवा हिंदु नाहींत. हिचें वाङ्मय हिंदींत नाहीं. ही देवता मूसलमानपूव आहे. त्रैवर्णिक हिंदूंत अठरापगड हिंदूंची भर पडली तेव्हांची म्हणजे फार प्राचीन ही देवता आहे. हिचे मंत्रतंत्र व संस्कृतप्राकृत कथावाङ्मय लक्षांत घेतलें असतां वाटतें कीं, ही देवता पौराणिक कालच्या आर्यांची आहे. हिचें वाङ्मय वर्णनप्रधान आहे, तत्त्वज्ञानप्रधान नाहीं. वेदान्तांतील माया व ब्रह्म किंवा सांख्यांची प्रकृतिपुरुष ह्यांपैकीं मायेशीं अथवा प्रकृतीशीं ह्या देवतेच्या उगमकल्पनेचा संबंध कांहीं ग्रंथांत जोडला आहे. उगमकालचेंच स्वरूप उपासनापद्धतींत आतांहि राहिलें आहे असें नाहीं. त्यांत कसें बदल होत आलें आहे तें प्रस्तुतसारख्या ग्रंथावरूनकळणार आहे आणि त्यासाठींअसल्या ग्रंथांची आवश्यकता फारच आहे. श्री. कुलकर्णी ह्यांनीं तुळजापूरच्या देवीसंबंधानें असेंच एक पुस्तक कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलें. त्यानंतरचें हें पुस्तक दिसतें.

देव-धार्मिक-वृत्तान्तांतहि कुलाचार व कुलदैवतें, जाती अथवा पंथ

यांच्या देवता व मठ, आणि ग्रामदेवता असे तिनचार प्रमुख व क्रमानें वरचे वृत्तान्ताचे भाग आहेत. पैकीं ग्रामदेवता ही सर्वांत वरची व प्रमुख श्रेणी आहे. आणि तीच समाजाच्या इतिहासास बहुंशानें व निकटत्वानें अधिक उपकारक आहे. कारण सर्व गांवकऱ्यांचा म्हणजे ग्रामस्थ सर्व जातींचा कमजास्त प्रातिनिधिकत्वानें ह्या श्रेणींत अंतर्भाव झालेला असतो. म्हणून अशा प्रकारचे ग्रामदेवतांचे नित्यनैमित्तिक पूजाउत्सवाचे वृत्तान्त, गांव व त्यांतील लोक ह्यांचा इतिहास दिग्दर्शित करणारे असतात. गांव बसविला कोणीं, देवता स्थापन कोणाच्या हातून झाली, नित्य पूजाऊर्जेची व्यवस्था व तींतिल वर्षिलदार, उत्सवप्रसंगींचे मानपानक्रम, देवता भिरवणूकींतील विविध प्रकार व ते पार पाडणारे ज्ञातिमेहेते, आपत्प्रसंगानें म्हणजे आजाराची उद्भवलेली सांथ किंवा अवर्षणाचें अस्मानी संकट, अथवा राज्यक्रांतीमुळे बसलेला धक्का इ० आकस्मिक विपत्तीमुळें होणारे, अनेक देवस्थानांतील भिन्नभिन्न व्रतविधी किंवा देवस्थलांतरें वगैरे वगैरे बऱ्याच दीर्घ काळांतील संपत्तिद्विपत् प्रसंगांच्या बऱ्याच खुणा ह्या वृत्तान्तांत दिसून येतात. विशेषतः त्या लोकांच्या विचारांचा विकास व खोली, आणि परस्परांतील संबंध व समजुती, ह्यांचीहि ओळख ह्या माहितींत आपणास होते. ह्या दृष्टीनें असली ग्रामदेवताविषयक पुस्तकें अभ्यसनीय होत. आणखीहि एका प्रकारें म्हणजे भाषेच्याहि दृष्टीनें हे ग्रंथ उपयुक्त होतात. प्रस्तुत पुस्तक ह्या दोन्ही तिन्ही प्रकारांनीं महाराष्ट्रेतिहासाच्या व्यासंगीयांना आदरणीय आहे.

आर्यांचा देवधार्मिक इतिहास अखिल मनुष्य प्राण्याच्या इतिहासांत फार प्राचीन व श्रेष्ठ आहे. त्याचें कारण त्यांचे वेद हे ग्रंथ होत. इतक्या प्राचीन काळीं आपण यज्ञयागादि श्रौतकर्में करणारे असून कालान्तरानें पौराणिक म्हटलें जाणारें दैवतोपासन आपण करूं लागलों आणि सांप्रत त्यांत तांत्रिक देवतांची भर पडली आहे. अग्नि, वरुण, सोम, उषा, मरुत, इंद्र इ० वैदिक देवता होत. नंतर शिवपार्वती, कृष्ण, राम, हनुमान, इ० पौराणिक देवता आल्या आणि सध्यां नवलाई, पावणाई, जाखाई, ह्या तांत्रिक देवता समाविष्ट झाल्या आहेत. ह्या देवतांच्या बदलाबरोबर किंवा भरी-

बरोबर 'आपण' ह्या संज्ञेनें समजले जाणारे जे, त्यांतहि निरनिराळ्या समाजांच्या संगतीची व शेजाराची भर पडली आहे हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. वेदींचें देवालय झालें, यज्ञमंडपाच्या जागीं देवालयाचा प्राकार आला, आणि सामगायन कथेच्या रूपानें अवतरित झालें. एकाच्या जागीं दुसरें नवें आलें म्हणजे पहिलें अजिबात सुटलें किंवा नष्ट झालें असें नाहीं. अवशेषानें व रूपांतरानें जुनें थोडेंसें राहून नवीनाचा शिरकाव झाला इतकेंच. हा नूतनाचा स्वीकारहि येथूनतेथून सर्वांच्या ठिकाणीं झाला असें नाहीं. तर तीनहि प्रकार 'आपणांत' समयानुसार चालू आहेत. प्राधान्येंकरून नवा प्रकार अधिक प्रमणांत विद्यमान असतो व आहे. हल्लीं तांत्रिकाबरोबर पौराणिक दैवतोपासन आपण मुख्यतः करतों तरी देवताप्रतिष्ठापनेस वेदमंत्रोच्चार अवश्यच मानला आहे. हें सर्व एखादें दैवत व त्याचें देऊळ, आणि त्यासंबंधीचे आचार व कथा हीं आपण विचारांत घेतलीं तर सहज प्रत्ययास येईल. प्रस्तुत ग्रंथांतहि ह्याचा नमुना आपणांस आढळतो.

गांवानें करावयाच्या ग्रामदेवतेच्या पूजाउत्सवांत झाडून सर्व गांवच्चे लोक हौसेनें व मानानें समाविष्ट होतात. वार्षिक होणाऱ्या यात्राप्रसंगीं तर परगांवीं गेलेलेहि तेव्हां उपस्थित व्हावयाचे. हा प्रसंग गांववाल्यांना मोठा आनंदाचा व अभिमानाचा वाटत असून आपण ह्या गांवचे प्राचीन हक्कदार आहों ह्यामुळें आपआपल्या मानाच्या जागीं बसून मानाचें खरोखर पानच पण मान ताठ करून व जगाकडे किंचित् आढ्यतेनें पाहात जेव्हां तो स्वीकारतो तेव्हां त्याला इहलोकचा सर्व आनंद आपण उपभोगीत आहों असें क्षणैक कां होईना वाटत असतें. ' यद्भुक्त्वा नेह भूयोन्यत् भोक्तव्यमवशिष्यते' ह्या कोटींतीलच तो आनंदोपभोग होय. अशा त्या उत्साहप्रसंगांतील विविध प्रकार व त्यांतील कामकरी व मानकरी समजून घेण्यांत सामाजिक, ऐतिहासिक मूळपीठिका आपल्या ध्यानांत येतात. ह्या दृष्टीनें ह्या ग्रंथांत दिलेले होलिकोत्सव, गांवगुंडी, मासकृत्यापैकीं कांहीं विशेष कृत्यें, देवीची मिरवणूक, देवस्की, शिकारींतील व सभाबैठकींतील मानकऱ्यांचा क्रम पाहण्यासारखा, नव्हे, अभ्यास करण्यासारखा आहे. आणि त्यावरून हें ध्यानांत येईल कीं, देवधार्मिक, राजकीय व सामाजिक असा

चढता क्रम समावेशनाचा म्हणजे सात्म्य पावण्याचा आपल्या ग्रामसंस्थेनें मान्य केला आहे. धर्माचा समानपणा हा पुष्कळदां एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेलाहि मागें टाकतो म्हणजे राष्ट्रभाव कितीहि गौरविला तरी राष्ट्राच्या चतुःसीमेच्या टोपणाहून धर्माचें टोपणच अद्याप जगामध्यें विशालपणानें शोभून आहे. समाजांतील प्रारंभाची राशी म्हणजे जसें दंपती किंवा कुटुंब तसें देशांतील किंवा राष्ट्रांतील मूलभूत राशी म्हणजे गांव होय. अशा भरल्या गांवानें म्हणजे गांवकऱ्यांच्या अठरापगड जातींनीं शूद्र, ब्राह्मण, मराठा, जैन, महार इत्यादींची लावलेली व्यवस्था पाहून समावेशनांतील समानधर्मीयत्वाचा पाया पूर्वजांनीं मागेंच घातला आहे असें स्पष्ट दिसून येतें. महारांच्या ढोलांचें गुरवाकडून होणारें पूजन, शृंगारपूरकरराजे सुर्वे यांनीं (महारवाड्यांतील दिवा सायंकाळीं पाहूं नये, तो पाहिल्यामुळें जो) महारवाडा उठवून दुसरीकडे दूर वसविला त्यांतीलच महारमंडळींनीं महाकालीच्या सभामंडपांत उभे राहून ढोल बाजविण्याची परिपाठी, त्यांना देवीचें होणारें सहज दर्शन, महाराचा मान म्हणून गुरवाकडून आमंत्रण देण्याचा शिरस्ता; महालक्ष्मीच्या गर्भागारांतील 'जैन ब्राह्मण,' महाकालीचे जैन गुरव, होलिकोत्सवांत होलवृक्षाकरतां वैश्य ज्ञातीयांनींच केलेला खळगा; आणि इतर धर्मकृत्यांतील किंवा स्वारींतील सर्व हिंदुमात्राचा ह्या नाहीं त्या रूपानें सन्मानपूर्वक ठेवलेला प्रवेश पाहिला म्हणजे समावेशनांतील पहिली पायरी जो देवधार्मिकांतील समानपणा तो उत्पन्न करण्याचा पायंडा पाडून वाटचालहि आतांपर्यंत आपण बरीच केली असल्याचें निदर्शनास येतें. संतसाधु-मंडळींनीं हरिनामाचे अधिकारी सर्वांना केलें तर इकडे त्याहिपेक्षां सान्निध्यानें व आचारानें ह्या ग्रामदेवतांना साक्षी ठेवून यात्रा-उत्सवसणादिकांत हिंदुमात्र तेवढा अधिक जवळ केला आहे. देवधार्मिक बाजूंतील विचारात्मक व आचारात्मक अशा दोन्ही बाजूंनीं तें समावेशन पूर्ण होण्यासाठीं प्रगतिपथावरच आहे. हें औत्सविक व तेंहि एक ग्रामसंबंधक समावेशन आहे. ह्याच्या पुढली पायरी ज्ञातिबद्ध धार्मिक समावेशनाची. म्हणजे जातिजातींतील धार्मिक समावेशनाची व ती बाब स्वतंत्र आहे. हें देवधार्मिक समावेशन होय.

देवधार्मिक दृष्ट्या लोकसमजुतींचें रूप कोणत्या प्रकारचें आहे हेंहि अशा ग्रंथांत अजमावयास सापडतें. ह्या रूपांत, जसे लोक तसे त्यांचे देव व व त्यांचे उपचार, ह्या न्यायानें लोकांच्या ज्ञानाची इयत्ता कळून येते. प्रस्तुत ग्रंथांत ह्या दृष्टीनें बराच तपशील लक्ष्यांत घेण्याजोगा आहे.पर्जन्याकरतां गांवोगांवच्या देवतांना उदकपूरित करण्याबद्दलचें सरकारी अधिकाऱ्यांकडून सुटलेलें आज्ञापत्र, ब्राह्मणादि सर्व जातींतील व्यक्तींच्या ठिकाणीं होणारा अवसर म्हणजे शिवकळा म्हणजे देव अंगांत येणें; गुरांच्या रोगमुक्तेकरतां देवाचा अंगारा व कौल; नवीन घर बांधलें त्यांत प्रथम दिवशीं निद्रा केली तेव्हां देवीच्या नांवें नारळ काढून ठेवून तो पाठवणें, तसेंच आगंतुक आला होता त्याच्या उपद्रवापासून संरक्षण होण्याकरतां देवीची राखण मागणें, आणि हें सारें राजघराणें जें भोर सं०चे पंतसचीव त्यांचेकडचें वृत्त; स्थानिक व आसपासच्या गांवच्या अशा गोष्टी किती तरी आहेत. पैकीं अगदीं जुजबीच पुस्तकांत संग्रहीत केल्या आहेत. कुणब्यांनीं पाऊसकाल संपल्यानंतर पहिल्यांदा वाण धरण्यापूर्वी म्हणजे पाग (जाळें) टाकून मासे धरूं जाण्यापूर्वी वेताळास परडीचा नैवेद्य करणें; कुभारानीं भट्टी लावण्यापूर्वी लांवसट ह्या आपल्या भूतदेवतेची, शेतकऱ्यांनीं आपलें उन्हाळी पीक काढण्यापूर्वी तें निर्विघ्नपणें पदरीं पडावें म्हणून पौषांत वायंगण्याची करावयाची समाराधना; गुरामाणसांना वाघरूं इत्यादि श्वापदापासून त्रास होत असलेल्याची शिकार करण्यास जावें न जावें हें सावजीमार्फत देवीस विचारणें; [सावजाविषयीं सांगणारा तो सावजी]; गांवगुंडी म्हणजे सर्व देवतांस नैवेद्य करून सर्व मानकरी व इतर गोरगरीब यांस प्रसाद वांटणें व ती केल्यावरहि देवीस 'गांवगुंडी मानली काय' म्हणून विचारणें; तसेंच श्रीमहाकालीची भिरवणूक काढून झाल्यानंतर 'स्वारी मानली काय' म्हणून विचारणें; होळिकोत्सवाबद्दल देवीची आज्ञा, अनुकूल उत्तर येईपर्यंत पुनःपुनः कौल लावून घेणें; मुंग्या, चाचड किंवा उवा नाहींसें करणारी देवता माणकाई किंवा माणी हीस पीडादूरीकरणार्थ नैवेद्य करणें; गुराख्यांचा देव ओढ्याकांठीं असलेला ओढया-वडया; महारांचा पुरूख; दुसऱ्याचें अनिष्ट करणाऱ्या देवता जांबरा, डावरा; इतर देवतांना

कौल लावावयाचा कीं नाहीं हें देखील श्रीमहाकालीस कौल लावून विचारणें; इ. इ. धार्मिक म्हणून म्हणावयाचे प्रकार पाहिले म्हणजे लोकमनावर येथूनतेथून प्रत्येक हालचालींत देवधर्माचा किती पगडा होता हें दिसून येतें. प्राचीन कालीं अशाच व्यावहारिक गोष्टींसाठीं इष्टी करीत. पौराणिक कालीं व्रतें अथवा शांति करीत व सांप्रत हे तंत्रप्रधान आचार व नवस कांहीं ठिकाणीं रूढ आहेत. व्रतें आणि नवस त्यांत विशेष असा दिसतो कीं, इष्टकार्यपूर्त्यर्थ आधीं देव प्रसन्न करून घेणें तें व्रत व कार्य यशस्वी होईल तर अमुक देईन अथवा करीन असें म्हणावयाचें तो नवस. देवता व मानवप्राणी ह्यांमधील हा करारच होय. ज्या सुखदुःखाच्या, विशेषतः दुःखाच्या, गोष्टींचे उगम, घटणा, वृद्धि व परिणती कळत नव्हत्या त्या दैवी शक्तीच्या प्रसादानें वा कोपानें प्राप्त झाल्या असा अर्थ प्रथम मनुष्यानें केला असें सर्वत्र व सर्वदा दृष्टीस पडतें. त्यांतील हे नवस इत्यादि व्रताविधि होत. उत्तरोत्तर ह्यांत वजाबाकी होऊन निरनिराळीं शास्त्रें कंशीं बनत गेलीं तें साक्षेपी मनुष्यांस विदितच आहे.

राजकीय व व्यावहारिक दृष्ट्या ह्या ग्रंथांत वरच्या मानानें कमी गोष्टींचा निर्देश आला आहे. कारण हें दैवत शिखर शिंगणापूर, तुळजापूर, जेजुरी, सिद्धटेक, त्र्यंबकेश्वर, चाफळ, चिंचवड, धावडशी, पंढरपूर अशा ठिकाणच्या दैवताप्रमाणें तितकें प्रसिद्ध किंवा राजदैवत नाहीं. तथापि एक दोन गोष्टी ज्या घडल्या आहेत त्या जरूर विचारांत घेण्याजोग्या आहेत. त्या त्यांतील अवशिष्ट जें स्मरणरूप चैत्रबलीचें अथवा सत्येश्वराच्या स्थापनेचें कृत्य त्यावरून वास्तव आहेत हें निश्चित. तावडे कदम यांची कत्तल झाली तेव्हां त्यांच्या स्त्रिया सती गेल्या ह्या गोष्टीचें स्मरण म्हणून चैत्र महिन्यांत एक बलि देण्यांत येतो. पूर्वी ह्या बलिदानाकरितां चार बकरे खर्ची पडत असत. अलीकडे बकऱ्याऐवजीं चार नारळ फोडून तें कृत्य उरकण्यांत येतें. ह्यास 'सांगड तोडणें' म्हणतात. ही सांगडतोड देवळांत गुरवाकडून खोत करवितात. ह्या बलिदानावरून तावडे व भिडे यांच्यांत झालेला भलाबुरा संग्राम हा वस्तुसत्य म्हणण्यास हरकत नाहीं. केव्हां तें निश्चित सांगणें आज अशक्य आहे. येथें वास्तविकता व ऐतिहासिकता हा भेद स्पष्ट होतो.

शिवाजी, शाहू, आंग्रे, पेशवे ह्यांच्या कारकीर्दीतील देणग्यादिकांच्या सनदा पुस्तकांत दिल्या आहेत. त्यांत शिवाजीराजांच्या पहिल्या धामधुमींत देवाचें चीजवस्त देवळांत ठेवूं लागले असें म्हटलें आहे; म्हणजे शिवसैन्याकडून लूटमार झाली तरी ती देवालयावर होणार नाहीं ही लोककल्पना व्यक्त होते. स. माधवराव पेशवे यांच्या जन्मप्रसंगानें १० हजार रु. लक्ष्मीनारायण-मंदिरास दिले; मिरवणूकप्रसंगीं व दर शुक्रवारीं तोफांचे आवाज काढले जात असत. हल्लीं हे बंद आहेत हे न लिहितांहि समजण्यासारखें आहे. व्यावहारिक दृष्ट्या शिरोळी हें माप, चिरा म्हणजे घोंडा त्याचें माप हीं येथें विशेष दिसतात. हें देवस्थान म्हणजे एक संस्थानासारखें असे. म्हणजे देवालाचें सर्वांनीं द्यावयाचें असें नाहीं. देवस्थानांतून गांवांत कोणी सती गेली तर त्यासाठीं व अग्निहोत्री यास देणगी म्हणून खर्च मिळत असे. उत्सवप्रसंगीं दशावतारांचें नाटक, शेटयेपणाचे हक्क, ग्रामस्थ जोशी ह्यांनीं पंचांगें आपलें गांवकीतलें काम म्हणून तयार करावयाचीं व मान म्हणून तीं देवी शेट्ये यांस द्यावयाचीं इ. इ. गोष्टी दिसून येतील. भाषा या दृष्टीनें त्या ग्रंथांत कांहीं शब्द व परिभाषा नवीन आढळते. आड– डोंगराच्या उतारावरील गवतारू जमीन, हिला वरकस जमीन असेंहि म्हणतात. पृ. १३९, १४७. अर्ज– मुळवस म्हणजे मूळ वसती करतांवेळच्या जामिनीनंतर मागाहून संपादिलेली जमीन. उजवणें– दुरुस्त करणें, तेजस्वी करणें, दिवे लावणें (१४४, १४८). कटवे–गडवे तांब्ये. कांजळें– प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वीची देवतामूर्ति. अन्यत्र कांदळें, कांदळ असा शब्द येतो, व त्याचा अर्थ जवळ जवळ असाच आहे. राजवाड्यांनीं ह्याची कंदरस्थ इदं कांदरं अशी शब्दसिद्धी एके ठिकाणीं दिली आहे. र चा ल व, ळ होऊन, कांदळ शब्द रूढ होणें शक्य आहे. हा शब्द वाल्मीकी रामायणांत आलेला आहे. कांदळावरील चित्राचें खोदकाम पाहिलें तर बौद्धाशीं झालेल्या झगड्यांत लिंगपूजकांचा जय झाला त्याचें सूचक हे अर्धमूर्ति दगड कंदरस्थ असलेल्या आपल्या पूर्वजांनीं बनविले. दगडांची प्राणप्रतिष्ठा मुळांत उद्दशीत नाहीं. पण पुढें ज्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा झालेली नाहीं त्या मूर्तीशिला ह्याच शब्दानें ओळखूं लागणें असंभवनीय नाहीं. बावराव–बेभाटा. प्रयोगविशेषांत–

धुमाळ वाजवून होता (मृदंगच, पण धुमाळ तालापुरतेंच, वाजविणारा.), खांद मारणें-- पालखीस खांदा देणें. देवा पाया साध्य केला-- देवळाचा पाया० इत्यादि. चाक उतरणें = दृष्ट काढणें; (११०); चौकडें = संबळ वाजविण्याची लहान वांकडी काठी (पृ. १४९); हा शब्द भुत्या गोंधळ्याची निशाणी सांगतांना आला आहे. जावजें-डें = गुलाल घातलेलें पाणी. जमिनीवरील, विशिष्ट हक्कासह जमिनीचा प्रकार सांगणारा, ' नमसी जमीन' असा शब्द ह्या ग्रंथांतील ऐ. कागदपत्रांत आला आहे. त्यांतील नमसीचा अर्थ संपूर्ण उत्पन्नासह असलेली इनामी जमीन असा आहे. शक ११३४ च्या माडी (जि. सोलापूर) येथील शिलालेखांत 'सर्वनमस्यस्य क्षेत्रस्य' असा उल्लेख आला आहे. ज्या आडिवरें गांवच्या देवस्थानासंबंधीचें हें प्रस्तुत पुस्तक आहे त्याच आडिवरें गांवाचा उल्लेख असलेल्या व पृ. २ वर निर्दिष्ट केलेल्या ताम्रपत्रांतहि हा शब्द आला आहे. दोन्ही ठिकाणीं, राजभाग वगैरे कसल्याहि अन्य हक्कापासून निवृत्त करून, असा त्याचा अर्थ ध्वनित आहे. ' सर्वनमस्य ' संज्ञा जमीन अथवा द्रव्य म्हणजे स्थावरजंगमालाहि लावलेली आहे. ह्यांतील प्रारंभींचा सर्व प्रत्यय गळाला व नमस्य शब्द नमसी रूपानें जमिनीला चिकटून राहिला. चालू अर्थाच्या दृष्टीनेंहि पाहतां पूर्ण इनामी जमीन असाच नमसी शब्दाचा अर्थ आहे. तेव्हां सर्वनमस्यपैकींच ही नमसीसंज्ञक जमीन व संज्ञा असावी. नमसी म्हणजे न वसलेली, नवसी जमीन, असा अर्थ पृ. ६६ मध्यें टीपेंत दिला आहे; पण तो वरील विवेचनानुसार अयुक्त होय. ह्याशिवाय अंगरस किंवा स्वरस म्हणजे नारळांतील पाणी किंवा खोबऱ्याचें दूध; पाठार्णे= आळ्यावर घालण्याचें मोठें कौल, पुरुषांतर = वंशावळ; वजा = सुताराला लावावयाचें उपपद. सोनवजा, गोंदवजा इ. माड उतरावयाचें ठरविलें म्हणजे माडावरील माडी काढण्याचें गाडगें उतरावयाचें ठरविलें; भोंवतीनंतर–देवालयाभोंवतीं प्रदक्षिणा झाल्यानंतर, इ. इ. वाक्प्रकार आढळतात. मुखशाळा = स्वयंपाकघर.उन्हाळी पिकाप्रमाणें सर्दपीक = पावसाळी पीक; पुढा करून–दक्षिणेस पूर्वेस पुढा करून बसणें = तोंड करून बसणें; पेक = थांब; घाटांबा = गप्पागोष्टी घांटत–करीत बस-

ण्याची आंब्याखालील जागा; गोत शब्द साथ करणारा, साहाय्यक ह्या अर्थी आला आहे (६१, १२६). उच्चारवैशिष्ट्यहि कांहीं शब्दांचें दिसून येतें. पेलाप्रमाणें पहिल्याप्र०; लेलाव=लिलाव; वार्षिल म्ह. पालटवाटा, पालखांरूढ इ. इ. सामासिक शब्दहि आले आहेत. आठवडी, मासवडा असेहि शब्द नवीन वाटतात. पोस्त ह्याचा अर्थ येथें चांगला स्पष्ट होतो. पोस्त म्हणजे खेळे किंवा भोयी इ. लोकांस मादक द्रव्य पिऊन मजा करण्याकरतां दिलेले स्वतंत्र पैसे. अपभ्रंश किंवा लघुरूप पावलेले शब्द ह्या कागदांत बरेच आहेत. महाजनी–माजनी–मानी, नारमानी भिडे. म्हाडदोळकर—म्हाडा, महासरस्वती–मानुबाई, मानमोडी. एथवर केलेल्या विवेचनावरून प्रस्तुत ग्रंथ महाराष्ट्राचा एक भाग जो अपरान्त म्हणजे कोंकण त्यांतील एका गांवच्या देवस्थानांच्या माहितीबरोबर सामाजिक, धार्मिकहि इ. इतिहासकथन करणारा कसा आहे तें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. असले ग्रंथ महाराष्ट्राच्या इतिहासवाङ्मयांत थोडेच आहेत. महात्म्यवजा ग्रंथ पुष्कळ आहेत. पण तशा ग्रंथांत व प्रस्तुतसारख्या ग्रंथांत ऐतिहासिक दृष्टीनें फार अंतर आहे. असा महत्त्वाचा व उपयुक्त ग्रंथ भिक्षुकी वृत्तीच्या एका साध्या गृहस्थानें प्रकाशित करावा हें अभिमान धरण्याजोगें अर्थात् अभिनंदनीय होय. महाराष्ट्राच्या घरचें असलेलें हें अनेक प्रकारचें इतिहासवाङ्मय पुष्कळच प्रसिद्ध झालें आहे तरी व्हावयाचें काम अतिशय आहे. त्याला हात अशा मायभूमीच्या अभिमानानें कोणी दिला तर त्यापलीकडे आपल्या गांवासंबंधानें निराळा उतराई तो भिक्षुक कसा होणार ?

ग्रंथकर्ते दीक्षित लिमये ह्यांची मूळची वृत्ति कोणती तें सांगितलेंच, पण त्यांचा प्रसिद्ध व्यासंग ज्योतिषाचा आहे. ते ज्योतिर्विद् कै. व्यं. बा. केतकर ह्याचे शिष्य. लिमयांनीं ज्योतिषसंमेलनांत वेध घेऊन त्यांवर शोधनिबंध लिहून वाहवा मिळविलेली आहे. सं० पर्वतीवरचे ते वंशपरंपरेचे सनदी वतनदार पुजारी आहेत. असें असतां त्यांचा ह्या शाखेंतील प्रयत्नहि कौतुकावह आहे. ह्यांनीं आडिवरें गांवच्या इतिहासाबद्दलहि ऐ. कागदपत्रें व इतर माहिती बरीच जमविली आहे. तिकडील जवळ जवळ ५०, ६०

गांवांची माहिती त्यांनीं फावल्या वेळांत हिंडून फिरून संग्रहित केली आहे. त्या संग्रहांतील एक फल हा ग्रंथ होय. ह्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'परांजपे घराण्याच्या इतिहास' ग्रंथांत उपयुक्त कागद व माहिती पुरविलेली ह्या ग्रंथांत दिसून येते. ह्या कामीं त्यांनीं जवळ जवळ २९ वर्षें वेंचिलीं आहेत व हें सारें मनाच्याच आवडीनें त्यांनीं केलें व चालविलें आहे. भूतविज्ञान शास्त्रावरहि त्यांचा एक ग्रंथ आहे. सारांश, अशांच्याकडून प्रस्तुत संग्रहात्मक ग्रंथ प्रसिद्ध झाला ह्याबद्दल पुनः एकदां अभिनंदन करून त्यांनीं जमविलेलें साहित्य प्रकाशित व्हावें हें इच्छितों.

श्री. दीक्षितांनीं ह्या पुस्तकाचें काम मजकडून अगदीं चिमुट लावून करवून घेतलें ह्याबद्दल त्यांचे आभार मानून व पुनः एकदां त्यांचें अभिनंदन करून हे दोन शब्द पुरे करतों.

मकरसंक्रांत
श. १८५७

शंकर नारायण जोशी वांईकर,
भा. इ. सं. मं., पुणें.

निवेदन

माझे परमपूज्य वडील बंधु व सार्वजनिक कार्यकर्ते तीर्थस्वरूप **बापू कृष्ण दीक्षित** लिमये यांच्या इच्छेला अनुसरून ते परलोकवासी झाल्यानंतर आजपर्यंत म्हणजे सतत एकोणतीस वर्षे परिश्रम करून, मौजे आडिवरे गांवच्या इतिहासलेखनास उपयोगी पडतील असे कागदपत्र मीं जमा केले. त्यांपैकीं मौजे मजकूरच्या देवस्थानाचा इतिहास हा एक स्वतंत्र भाग करून तो प्रस्तुत स्वरूपांत वाचकांच्यापुढें येत आहे.

माझे वृद्ध मातापितर तीर्थरूप रुक्मिणीकृष्ण यांचे पूर्ण आशीर्वादानें व श्रीजगदंबा श्रीमहाकालीप्रसादानें सिद्ध झालेलें हें पुस्तक शक १८५७ युवनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुा ९ रोजीं (ता। ४ डिसेंबर इ. सन १९३५ बुधवारीं) माझे एकूणपन्नासावे वाढदिवसानिमित्त श्रीमहाकालीचे सेवेसीं अत्यंत नम्र भावानें मी सादर करीत आहें.

या पुस्तकांत स्थानिक हक्क, मानपान, चालीरीति, प्राचीनपासून आज-पर्यंत अव्याहत चालत असलेल्या वहिवाटी इ० गोष्टी जितक्या स्पष्ट करून सांगतां आल्या, तेवढ्या स्पष्ट सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत हस्त-दोष, मुद्रणदोष, चुकींच्या समजुती, माहितीचा अपुरेपणा इत्यादि जे प्रमाद कोणाच्या आढळण्यांत येतील त्यांनीं ते आम्हास कळविण्याचें करावें. त्याचे आम्ही आभारी होऊं.

विशेषतः ग्रंथास निर्दोषत्वाचा गुण येण्यास त्यांचें हें कळविणें फार उपयोगी पडणार असल्यामुळें ग्रंथदेवताहि त्यांस धन्यवाद देईल. अर्थात् पुढील आवृत्तींत हे प्रमाद काढले जातील हें लिहिणें नकोच.

या पुस्तकाच्या लेखनाच्या कामांत ज्यांनीं मला मनःपूर्वक साहाय्य केलें त्यांचे आभार मानणें हें माझें पवित्र कर्तव्य होय.

हा ग्रंथ सामान्यतः इतिहासाचा आहे. अर्थात् त्याचीं साधनें म्ह. ऐ. कागदपत्र पुरविणारे हे त्याचे प्रमुख साहाय्यक होत.

श्रीमंत सरदार **दाजीसाहेब पटवर्धन**, पुणें; श्री. रा. भिकाजी गणेश भिडे, आडिवरें; शिवराम भाऊ वांकडे; समशेट हरशेट शेट्ये यांनीं आपले संग्रहीं असलेले कागदपत्र व समक्ष माहिती देऊन वेळोवेळीं मदत केल्यामुळें प्रस्तुत कार्य मला सुलभ झालें.

श्री. रा. **महादेव विनायक आपटे**, आडिवरें, यांनीं निरनिराळ्या प्रसंगांचीं छायाचित्रें देऊन या पुस्तकांत अपूर्व शोभेची भर घातली.

श्री. रा. **शंकर नारायण जोशी** (वांईकर), संशोधक, पुणें येथील भारत इतिहाससंशोधक मंडळाचे आजीव सदस्य व इतिहाससंशोधक, यांनीं आपला अमोल वेळ खर्ची घालून हें पुस्तक लिहिण्याचे कामीं सर्वस्वी एकजीव होऊन लेखन व शुद्धीकरणादि सर्व कार्य करून पुस्तकाची सजावट मजकडून करवून घेतली.

हा इतिहास छापण्याचें कार्य द्रव्याचे अभावीं पुष्कळ दिवस थांबून राहिलें होतें. त्याकरितां तीनचार वेळीं केलेले प्रयत्न फुकट गेले. परंतु श्रीमहाकालीच्या कृपेनें या वेळीं अशी आश्चर्यकारक गोष्ट घडून आली कीं, ज्यांचा या गोंवाशीं किंवा देवतेशीं विशेष संबंध नाहीं अशांच्या हातून हें कार्य व्हावें. 'श्रीजगदंबेची इच्छा.' ते गृहस्थ म्हणजे आमचे परम स्नेही श्री. रा. **भाऊसाहेब साठे** ऊर्फ **भाऊ गंगाधर साठे** कंट्राक्टर यांनी हें पुस्तक छापण्याविषयीं प्रोत्साहन देऊन आम्हास प्रवृत्त केलें; इतकेंच नव्हे तर, सर्वथा मुद्रणाकरितां लागणारें द्रव्य, विनव्याजी पुढें करून व तें परत देण्याविषयीं यावच्छक्य सवलत दिली.

प्रस्तुत पुस्तक हें माझे लेखनव्यवसायांतील पहिलेंच कार्य होय. या कामीं उपरिनिर्दिष्ट सर्व सद्गृहस्थांनीं आपापलेपरी वेळोवेळीं जी जी मदत करून माझा प्रयत्न यशस्वी करण्यास हातभार लाविला त्या सर्वांचा मी सदैव ऋणी असून त्यांचे धन्यवाद गाइल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

चिं. कृ. लिमये

आडिवऱ्याची श्रीमहाकाली

अनुक्रमणिका

प्रास्ताविक दोन शब्द १-१२

निवेदन १-२

आडिवरें गांव पृ. १-५. (प्राचीन उल्लेख २, रेखाचित्र ३, आडिवरें प्रांत ५).

श्रीदेव नगरेश्वर पृ. ७-९. (श्रीनगरेश्वर ७, वारुळ ९).

श्रीमहालक्ष्मी पृ. १० ते १३, (श्रीमहालक्ष्मी १०, योगेश्वरी १०, श्रीरवळनाथ ११, कदम तावडे ११, नाना भिडे १३).

श्रीमहाकाली पृ. १४ ते ४०. (श्रीमहाकाली १४, श्रीमहासरस्वती १६, महाकालीपुढील सभामंडपांतील चित्रांची यादी १६, नव्या मूर्ती १७, मंदिरांतील नित्य कृत्यें १८, अभ्यंगस्नान १९, नित्य अलंकार १९, पूजेचा क्रम १९, नैवेद्य १९, देव ओंवळे करतात २०, कौल लावीत नाहींत ते दिवस २०, सायंकाळचें कृत्य २१, मासकृत्य २१, नैमित्तिक कृत्यें — ध्वजपूजा २२, पंचांगपूजा २२, पेटकर यांचें वार्षिक कृत्य २३, चैत्र बळी २३, बलिदानकृत्यानंतरचे मान २४, संक्रांतीवाचन २४, नागपूजा २४, पोवर्ती विहणें २४, गणेशपूजा २५, ज्येष्ठा गौरी २६, नवरात्रोत्सव २६, अश्मंतकपूजा २८, काळेबुवाचा मान २९, राजापूरकर शेटयांकडून साला-बाद जिन्नस येतात ते २९, नरकचतुर्दशी ३०, तुळसीविवाह ३०, त्रिपुरी पौर्णिमा ३०, देवांची दिवाळी ह्मा० घबाड ३१, मार्गशीर्षबळी ३३ गांवगुंडी होलिकोत्सव ३७, होळीची यादी ४०, श्रीचे स्वारीची व्यवस्था ४१).

श्रीवाळेश्वर पृ. ४५.

श्रीसत्येश्वर पृ. ४५ ते ५३. (मंदिरानजिकची माहिती ४६, नित्यकृत्यें ४८, अभ्यंगस्नान ४८, नैमित्तिक कृत्यें:-वसंतपूजा ४९, पुराण ४९, कर्क-

संक्रमण, नागपूजा, पोंवर्ती, गणेशपूजा, अश्मंतकपूजा, कोजागिरी–दीप-पूजा, नरकचतुर्दशी, उत्सव, स्वारीची माहिती ५०, तुळशीविवाह, वैकुंठ-चतुर्दशी, त्रिपुरी पौर्णिमा ५१, त्रिपुरांची माहिती ५२, शिवरात्रीचा उत्सव ५२, वायंगण्याची समाराधना, घामीची समाराधना, होलिकोत्सव ५३).

श्रीदेवशंकरेश्वर पृ. ५४.

श्रीदेवी कालिका पृ. ५४ ते ५८. (श्रीकालिकेचें वर्णन व ध्यान ५५ मासकृत्यें ५६, नवरात्रोत्सव कनकादित्यांचे भेटीला जाणें ५६, फाल्गुन मासीं पाध्ये यांची पूजा ५८).

श्रीलक्ष्मीनारायण पृ. ५९ ते ६०. (श्रीलक्ष्मीनारायणाचें वर्णन, मासकृत्यें, कार्तिकोत्सव ५९; स्वारी व त्या वेळचे मानकरी, मंदिराची माहिती वगैरे ६०, दशवतार व दशावतारी यांचा इतिहास ६०).

परिशिष्ट

श्रीदेव नगरेश्वर ६४ ते ७६. (सहाशें वर्षांची नेमणूक ६४, प्राचीन जमीन ६५, देवाचा बाग ६६, जमिनीचा पहाणखर्डा ६७, प्राचीन देणगीचें रूपांतर ६९, पोंवळबांधणी ७०, देवालयबांधणी ७०, जुना उल्लेख ७१, नवा गुरव ७१, पुराणासंबंधीं व्यवस्था ७२, समाराधनेची यादी ७२, वाराभिषेकाची नेमणूक ७३, देवाची चीजवस्त ७४, नैमित्तिक कृत्यें ७५, नंदादीप ७६).

श्रीमहाकाली वगैरेविषयीं पृष्ठ ७६ ते ११८ पर्यंत. श्रीमहालक्ष्मीला कौंडे व मठदेणगी ८०, श्रीमहाकालीचे स्थापनाकर्ते ८१, आख्यायिका ८१ ते ८२, शुध्यर्थ अर्चा ८३, पोंवळबांधणी ८४, आलिंदबांधणी, सभामंडपाकरितां देशमुखांची देणगी ८४, इतर बांधकामें ८५, दास्तान ८६ श्रीचे दास्तान-च्या जुन्या जागा, दास्तानचे लेखक ८७, दास्तानचे कबुलायतपत्राचा नमुना, सतीला देणगी ८८, अग्निहोत्रास देणगी, खाजण पांगरीविषयीं देवस्की ८९, नित्य खर्चाची नेमणूक ९१, कौल ठि. पांगरी ९२, देणगी पालखी ९२, वाडानवेदरकरांची पाटाचें पाणी नेतेवेळची वार्षिक देणगी श्रीफल, महाकालीपट्टी ९३, जुनी देणगी, जकातींतून नेमणूक ९४, नेमणूक

पावती ९५, नेमणूक यादी ९६, इंग्रज सरकारनें ज्यांच्या नेमणुका बंद केल्या त्या ९९, सावजाचे मानाचा तपशील, कचेरींत बसण्याचा क्रम १००, भगत (शिवकळा) १०२, श्रावण मासाभिषेकाची नेमणूक, पुराणिकासंबंधी निर्णय १०३, नैवेद्य १०४, सेवेकरीण-भाविणींची पोटगी १०५, नवरात्र खर्च यादी, आरती १०६ साक्षात्कार कथा १ ली १०८ कथा २ री ११० कथा ३ री १११; सचिवांची देवस्की ११३ भंडार माड दिल्यामुळें करावी लागलेली देवस्की ११५, अवर्षणामुळें देवास उदकपूरत करणेबद्दलचा सरकारी हुकूम ११६, गुरवांची माहिती ११७-११९).

श्रीसत्येश्वर पृ. १२० ते १३६. (पुराणाची नेमणूक १२०, नित्य-पूजेबद्दल नेमणूक १२१, नेमणुकी मंडपांचे झांपाची १२५, दशावतारी १२६, तुळसीविवाहीं नारळाची व्यवस्था १२७, होलिकोत्सवाची व्यवस्था १२७, होळीसंबंधीं ठराव-वाडानवेदर १२८, देवालयबांधकाम यादी १२९, श्रीबाळेश्वराकडील नंदीची प्रतिष्ठा (नूतन नंदीची) १३०, अद्भूत शांति श्री-बाळेश्वरलिंग भिन्न झाल्यावेळची, सत्येशाष्टकम् १३०, बाळेश्वर आरती, सत्येश्वराची आरती १३१, नवा गुरव ठेवण्याबद्दल सनद, गुरवास जामीन १३२, गुरवकींचा ठराव, गुरवांचे चाकरीबद्दल करार १३५, नूतन मुखवटा, सत्येश्वर दास्तान १३६).

श्रीशंकरेश्वर पृ. १३८ बाराभिषेकाची नेमणूक.

श्रीदेवी कालिका पृ. १३९ (सरकारी नेमणूक, जत्रा करोळी १३९).

श्रीलक्ष्मीनारायण पृ. १४१ ते १४७. (श्रीलक्ष्मीनारायणाची स्थापना १४२, त्रिपुर १४३, पेशव्यांची देणगी, पापडींचें बांधकाम १४४, सरकारी उत्पन्न १४५, सरकारी देणगी १४६, मिळकतीचें वर्णन १४७).

श्रीभगवती पृ. १४८. (श्रीभगवतीची स्थापना, सरकारी नेमणूक).

श्रीगणपति इत्यादि इतर देवता पृष्ठ १४९ ते १६०. (श्रीगणपति-भिडे यांचा १४९, श्रीभद्रकाली १४९ वाडानवेदर येथील तलावानजी-कची जोशी यांची समाधि, समर्थमठ १५०, श्रीवडया, महार पुरुख, खामदा १५१, डावरा व जांबरा १५२, वेताळ, श्रीदत्तपादुका वाडा कोंडसर-खुर्द येथील रानडे यांचे येथील १५३, मौजे आडिवरें येथील भुतांची यादी

१५३, गणपति–कुळकर्णी यांचा १५५, समाधि–भिडे, ब्रह्मदेव–बेंदगी, समाधि–वाडारुंदे, माणूबाई १५६, श्रीसीतारामचंद्र १५७ वाडा मोघरे येथील भुताचा बंदोबस्त १५८, वाडा पेठ येथील भुताचा बंदोबस्त १५९, भूत–कालिका वाडी १६०).

यात्रेची माहिती १६५, नैवेद्य १६६, राखण १६७, कुलस्वामिनी व प्रवास-वर्णन १६७, स्थानिक माहिती १६८-६९, अभिप्राय १७०, १७१.

चित्रांची अनुक्रमणिका

१ श्रीमहाकाली १
२ आडिवरें गांवचें रेखाचित्र ३
३ होलिकेचा मंदिरप्रवेश ३९
४ होलिकापूजन ३९
५ श्रीमहाकालीची स्वारी ४१
६ वेदशाळा कमिटी व विद्यार्थी ४७
७ श्रीमहाकालीमंदिराचा सभामंडप ८४
८ वाडानवेदर येथील तलाव १५०
९ श्रीमहाकालीमंदिर व प्राकार यांचा नकाशा १६२

श्रीदेवी महाकाली



[पृ. २

॥ श्री ॥

आडिवऱ्याची महाकाली

॥ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

जन्मदात्री माता व जन्मापासून धारणपोषण करणारी धरित्री यांची थोरवी मनुष्यमात्रास स्वर्गाहूनहि गुणाआगळी वाटते; असा हा मायभूमी-विषयींचा आदर मनुष्याला सहजच आहे. तसा तो नसेल तर खेदाश्चर्य होय; आणि असेल तर ती गोष्ट विशेष व कौतुकाची नव्हे; कारण, मनुष्याचा तो स्वभाव आहे. हा आदर, हें प्रेम, कोणाचें मुग्ध, कोणाचें प्रकट, कोणाचें वृत्तिनिमित्त, कोणाचें कसें, कोणाचें कसें असूं शकेल; सद्यःकालोचित तें देशभक्त्यंतर्गत असल्यास तें 'अधिकस्याधिकं फलं' या न्यायानें सर्वोत्कृष्टच होय. पण आपला म्हणून जो गांव असेल, त्याविषयींचा आपलेपणा कोणत्याहि कारणानें व रूपानें मनुष्याला असतोच असतो. कांहीं कारणामुळें म्हणजे घर, जमीन, दैवत, उद्योग, पूर्वजांचा संबंध, भावी आशा, अशा एखाद्या कारणाचे अभावीं जर कोणा व्यक्तीस असा स्थावरविशेष लागाबांधा नसेल तर त्याचें जीवित कष्टाचें व असमाधानी असतें. व्यक्तिमात्राची धडपड कोणत्या का प्रकारांतरानें होईना, पण आपण अमक्या एका 'आपल्या' म्हणतां येईल, अशा स्थानचें व्हावें यासाठीं चाललेली असते. स्थिर हा शब्द स्थावर या शब्दाशीं जोडून आपण वापरतों, जंगम शब्दाशीं नाहीं; स्थिरस्थावर असें म्हणतों; ह्याचाहि अर्थ असाच कीं, स्थिरता ही स्थावरोत्पन्नच खरी आहे. सारांश, आपला गांव व त्या विषयींचें प्रेम हीं माता व तिजसंबंधींचा आदर आणि पूज्यभाव, ह्यांशीं तुल्य व सहज लेखून त्याचें थोरपण प्रारंभींच्या उक्तींत ध्वनित केलें आहे. प्रस्तुत आडिवरें गांवासंबंधीं आम्ही अशाच प्रेमांशानें येथें माहितीचे चार शब्द

लिहिण्यास प्रवृत्त झालों आहों. हे विचार त्या गांवच्या देवस्थानांसंबंधींचे असून इतिहासप्रधान आहेत. प्रथम आडिवरें गांवासंबंधीं थोडी माहिती देणें इष्ट आहे.

आडिवरें हा गांव सांप्रत मौजा म्हणून संबोधिला जातो, आणि तो रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यांत अंतर्भूत आहे. आडिवरें यथ पोस्ट आहे. त्याची लोकसंख्या इ. सन १९३० च्या शिरगणतींत सुमारें ५७६१ असून क्षेत्रफळ साडेपांच चौरस मैल आहे. याचे हल्लीं चौदा विभाग म्हणजे वाडे म्हणजे पेठा असून त्यांत सात प्रकारचे जातींचे लोकांची वस्ती आहे. सुमारें १२२९ घरें आहेत. या गांवांत मुसलमानांचें प्राचीन एकहि घर नाहीं.

अशा ह्या सध्यांच्या आडिवरें गांवचा जुन्यांत जुना उल्लेख एक हजार शकवर्षाइतका प्राचीन आढळतो. जेथें नुसता प्राचीनपणा किती एवढेंच पाहावयाचें आहे, तेथें एवढें पुरातनत्व दृष्टोत्पत्तीस आलें हीहि गोष्ट अभिमानास्पद आहे. पण वर्धित वयोमानाबरोबर गुणश्रेष्ठताहि जर दिसून आली तर, सौंदर्ययुक्त फुलास सुगंधाची जोड लाभल्याप्रमाणें, तें खरें अभिमानाचें व आनंदाचेंहि वाटेल ह्यांत संशय नाहीं. आणि त्याप्रमाणें आडिवऱ्याच्या ह्या हजार वर्षांइतक्या प्राचीनपणाच्या उल्लेखाबरोबर हेंहि दिसून येतें कीं, हा गांव म्हणजे पुर अथवा नगर तेव्हां असून अभिलषणीय अशा वैभवाच्या स्थितींत होता. इतिहासकाळांतील ह्या जुनेपणाचा व मोठेपणाचा भाग, दोन आधारांनीं सांगतां येतो; पैकीं पहिल्या आधारास दुसऱ्या आधारानें पुष्टि येत्ये म्हणून तोच पुरावा प्रथम देणें इष्ट वाटतें व तो असाः शकवर्ष १११३ मधील शिलाहारांचें एक ताम्रपत्र भा. इ. सं. मं. शक १८३५ च्या इतिवृत्तांत पृष्ठ २२० ते २२६ वर इतिहासभीष्म राजवाडे यांनीं छापिलें आहे. हें ताम्रपत्र म्हणजे भोजराजानें कशेळी गांवच्या बारा ब्राह्मणांना प्रतिदिन-भोजनार्थ, त्याच गांवचें उत्पन्न दान दिलें, तें दानपत्र आहे. तेथें कशेळी गांवचा निर्देश करतांना 'अट्टविरे कंपण मध्यवर्ती कसेलिग्रामे' असा वाक्यशेष आला आहे. या वाक्यांतील 'कंपण' शब्द कानडी आहे. कंपण किंवा गंपण म्हणजे प्रांतविशेष, देशविभाग. 'अट्टविरे संज्ञक प्रांतांत समाविष्ट होणाऱ्या कशेळी गांवांतील,' असा या वाक्याधाचा


नकाशा
मौजे आडिवरें
ता. राजापूर जि. रत्नागिरी.

अर्थ आहे. म्हणजे आजचा आडिवरें गांव हा (पेठ, वाडा म्हणतात तो भाग मुख्यतः) हजार वर्षांपूर्वी आसपासच्या बऱ्याच भूप्रदेशाचें मध्यवर्ती व मुख्य ठाणें असून एक प्रांत होता. या प्रांताची चतुःसीमा–उत्तरेस पूर्णगडची खाडी; दक्षिणेस जैतापुरची खाडी; पूर्वेस राजापूर–कोतापुरची हद्द; पश्चिमेस अरबी समुद्र ही असावी. आडिवरें ह्या अभिधेनें ओळखल्या जाणाऱ्या प्रांतांत कशेळीप्रमाणें इतर अनेक गांवें होतीं. राजवाडे ह्यांच्या ह्या गांवच्या, किंवा आतां प्रांताच्या म्हणावयाचें, उल्लेखांत थोडा भेद दिसून येतो; म्हणजे प्रत्यक्ष ताम्रपत्रांतील ओळींचें वाचन जेथें दिलें आहे तेथें (पृष्ठ २२५,) ४४ वी ओळ 'थै अट्टविरे कंपण मध्यवर्ति कसेळिग्रामे प्रतिदिनं द्वादशब्राह्मणभोजनार्थं' अशी दिली आहे. आणि ताम्रपत्रासंबंधीं प्रास्ताविक म्हणून केलेल्या स्पष्टीकरणांत 'अट्टवेर' असें नांव गृहीत धरून विवेचन केलें आहे (पृष्ठ२२१).म्हणजे मुळांत अट्टविरें असून विवेचनप्रसंगीं अट्टवेर ही संज्ञा, ताम्रपत्रांतील म्हणून उध्दृत केली आहे. अट्टविरें अथवा अट्टवेर ह्यांपैकीं कोणतेंहि रूप असलें तरी त्याचें अडिवरें ह्या रूपांत रूपांतर होतें, हें निःसंशय. ह्याच ताम्रपत्रांत अंबेवेरिक असें ४७ व्या ओळींत दुसरें स्थलनाम आलें आहे. हल्लींच्या आंबेरूख त्या नांवाचें अंबेवेरिक पूर्वरूप असावें, (ही अंबेरूख या नांवाची वाडी कशेळींत आहे.) असें राजवाडे ह्यांनीं म्हटलें आहे. ह्या रूपसिद्धीविषयीं अधिक विचार व्हावयास हवा असला तरी, तशी गोष्ट आडिवरें ह्या ग्रामनामासंबंधीं नाहीं. अट्ट म्हणजे बाजार व अट्टचें आट आड, असें रूप होतें. नगरवाचक नांवाची ज्या उत्तर अवयवांनीं म्हणजे प्रत्ययांनीं, घटना होते असें पाणिनीनीं सांगितलें आहे त्या उत्तरपदांत, वेर प्रत्ययाचा समावेश नाहीं. रामायणांत शृंगवेरनामक नगराचा उल्लेख आला आहे. म्हणजे 'वेर' असाच प्रत्यय लागून ग्रामनाम घटित होतें. अथवा 'वेर' ह्या संस्कृत शब्दाचा वरें हा अपभ्रंश. अन्ती लागून तसेंहि गांवाचें नांव बनतें; आणि ह्यांतील दुसऱ्या प्रकारानें अट्टवेर हें मूळ असल्यास त्याचें आडिवरें हें रूप सिद्ध होईल. किंवा अट्टविरें असा मूळचा शब्द असल्यास अट्टचें–आट, नंतर आड, व विरें यांतील वेलांटीचा विपर्यय मागील वर्णाशीं होऊन आडिवरें ही रूपसिद्धि साध्य होईल. (अट्टवेर किंवा अट्टविरें यांपैकीं मूळ ताम्रशासनांत कोणतें

रूप आहे व मुद्रणदोष कोणता हें शासनपट पुनः पाहीपर्यंत अनिश्चित राहील.)

स्वतःप्रमाण अशा ताम्रपत्राधारें आडिवरें हा प्रांत होता व तो शक ११११३ मध्यें होता, ही निर्णित गोष्ट कळल्यानंतर दुसरा म्हणजे पहिला आधार जो, तो आतां देण्यास हरकत नाहीं. हा आधार आडिवऱ्याचे गोरे उपनामक जे महाजन त्यांच्या वंशावळींतील आहे. वर दिलेंच आहे कीं, आडिवऱ्याचे चवदा विभाग आहेत, व तसे तेथील खोतहि चवदा असून महाजन या प्रत्येक विभागांत तीन तरी आहेतच. कोकणांत खोत व महाजन असे दोन अधिकारी प्रत्येक गांवांतून असतात. हे दोन्ही वंशपरंपरेनें अधिकार चालवीत असतात. तरी त्यांतल्या त्यांत सांगावयाचें झाल्यास खोत हा राजसत्तानिर्मित व महाजन हे ग्राम किंवा प्रजानिर्मित अधिकारी व मानकरी होत. आडिवरें येथील वाडा नवेदरची महाजनकी जोशी, काळे, गोरे या घराण्यांत चालू आहे. सर्वांत प्राचीन घराणें जोशी यांचें होय. हे सर्व वत्सगोत्री, त्रिप्रवरी आहेत. यांचा कुळस्वामी श्रीक्षेत्र काशी येथील काळभैरव आहे. त्याचा कार्तिकमासांत कालाष्टमीला तीन दिवस उत्साह करण्याचा, त्यांचा कुलाचार आहे. त्याचेनंतर क्रमानें काळे, गोरे व भिडे हे महाजन व खोत म्हणून आहेत. या चौघांनाहि प्राचीन लेखलें जातें. आडिवऱ्याच्या वसाहतकर्त्यांत ह्यांचा समावेश आद्य म्हणून केला जातो. काळे व गोरे दोन्ही वत्सगोत्रीच आहेत. यावरून असें अनुमान बांधण्यास प्रत्यवाय वाटत नाहीं कीं, मूळचे वत्सगोत्री जोशी त्यांच्यांतील ह्या दोन शाखा कालांतरानें वेगळ्या निघाल्या असाव्या. त्यांपैकीं गोरे यांची वंशावळ २८ पिढ्यांची आहे. वंशावळीचा कागद नकलेची नकल असा आहे व म्हणून तो ताम्रपत्रानंतर विचारांत घेतला आहे. अशा वंशावळी ठेवण्याचा प्रघात कोकणांत बहुत दिसून येतो. व त्याची सयुक्तिकता थोडा विचार केला असतां लक्षांत येते. कोकणांतील जीं घराणीं आपल्या शाखाविस्तारानें व वस्तीविस्तारानें कोकण सोडून व कोकणांतहि पसरलीं आणि सामान्यतः जीं वतनदार व उत्पन्नदार असून मानकरी आहेत, अशा मूळ घराण्यांत वंशावळी, घराण्याच्या उत्पन्नासंबंधींचे जुने कागद म्हणजे सनदा इत्यादि ठेवण्याचा शिरस्ता असणें सहज आहे. उलट त्याच

घराण्यांपैकीं जी मंडळी अन्यत्र उद्योगधंद्यांसाठीं गेली ती तेथें उपरी म्हणूनच संबोधिली जाणार, व अशांचा जुने धागे संभाळण्याचा कल कमी आढळतो. कारण एका दृष्टीनें जुन्यावरचा संबंध सोडूनच ते बाहेर निघालेले असतात. अशांपैकीं कित्येकांचीं आडनांवेंहि बदलतात. कोकणांतील मूळ गांवाला 'कर,' 'ए' इत्यादि प्रत्यय लावून गांवाचेंच आडनांव होतें. म्हणजे फक्त मूळ गांवाचा आडनांवापुरताच संबंध त्यांचा जुन्याशीं राहिलेला असतो. मूळ घराणें व गांव यांचा प्रत्यक्ष संबंध त्यांना दुरावतो. ज्यांची सर्वच कमाई नवी, अशांची प्रकृति साधारणतः मूळ घराण्यांतल्याप्रमाणें, जुनें तें संभाळून ठेवण्याकडे, राहात नाहीं. जुनी स्मृति ठेवण्यांतहि व्यक्तिमात्राचा एक प्रकारचा स्वार्थ असतो तो कोणत्याहि कारणानें साध्य अवस्थेंत राहिला नाहीं म्हणजे ऐतिहासिकांत मोडलें जाईल इतक्या जुन्या साधनांचें महत्त्व प्रथम कमी, व नंतर लोप पावण्याच्या बाटेला लागून नष्ट होतें. तीर्थोपाध्यांच्या जवळ किंवा जुन्याचा नादी अशा एखाद्या गृहस्थाजवळ असे कागद असले तर, त्यांचीं कारणें वेगळीं. आपल्या पूर्वजांविषयीं आदर व्यक्तिमात्रासच असतो, पण तो निर्गुण व निराकारी असतो. सगुण व साकार प्रेम हें कार्यकारी असतें आणि त्या प्रेमाचे पोटीं, वर म्हटल्याप्रमाणें मनुष्याची स्वार्थदृष्टी असते व ती हें संग्रहकार्य करविते. कोकणांतल्याप्रमाणें देशावरहि जीं घराणीं आहेत त्यांकडेहि असे जुने कागदपत्र, वंशावळी इ. असतात. पाहिलें तर सर्वांचींच घराणीं जुनीं आहेत पण कागदपत्र ज्यांकडे असतात तीं घराणीं लक्षांत घेतलीं, व असतात ते कागदहि ध्यानीं आणले तर वरील दृष्टीच प्रधान दिसून येते. ऐतिहासिक म्हणून सांपडणाऱ्या कागदांत म्हणजे ठेवलेल्या कागदांत, जमाखर्ची, पत्रव्यवहारी, कागदांपेक्षां जमिनींच्या सनदा, मानापानाचे किंवा वडिलकीचे अथवा हाडभाऊपणा सिद्ध करणारे महजर अधिक सांपडतात. त्याचेंहि कारण हेंच होय. सारांश, अशा प्रकारें गोरे महाजन यांजकडे वरील जुनी माहिती देणारी वंशावळी मिळाली. या वंशावळींत मूळ अर्जक पुरुष याचा काळ शकसंख्येनें दर्शवून संवत्सर नांवानें त्याची निश्चिती केली आहे. असें कालदर्शन त्या वंशावळींत ठिकठिकाणीं आहे. वंशावळीचा प्रारंभ "यादी पुरुषांतर शक १००३ दुर्मति नामसंवत्सरे चैत्र शु।। १३ गुरुवार" (ता. २५ मार्च इ. स. १०८१) असा असून त्यांतील

कारणापुरताच भाग येणेंप्रमाणें–

"मूळ पुरुष विश्वनाथ भट गोरे ग्रामोपाध्ये व घरउपाध्ये, मौजे गांव खाडी ता॥ पांवस यांचे पुत्र कृष्णभट विन विश्वनाथ भट गोरे उपाध्ये व ग्रामोपाध्ये यांनीं मौजे आडिवरें वाडा नवेदर येथील ठिकाण व महाजनकीचें वतन मिळविलें."

या वंशावळींतील उल्लेखावरून आडिवरें गांवाचा काळ आणखी शंभर वर्षें मागें जातो. आडिवरें या नांवाच्या अर्थासंबंधीं किंचित् वर दिग्दर्शन झालें आहे. तेथें तेव्हां व्यापारप्राधान्य असल्यामुळें बाजार या अर्थाचा अट्ट हा शब्द ग्रामनामांत आदि व मुख्य आहे. म्हणजे हें ठिकाण बाजाराचें त्या काळीं असल्यामुळें सहजच त्यास पुर, नगर म्हणून जनपदांत मान्यता आली होती. त्यामुळें येथील पहिलें दैवत नगरेश्वर असें जें आढळतें तें युक्तच होय. म्हणून प्रथम आडिवरें गांवासंबंधीं किंचित् माहिती दिल्यानंतर उद्देशानुसार देवतांपैकीं पहिलें दैवत जें **नगरेश्वर** त्याविषयीं लिहिणें क्रमप्राप्तच आहे.

श्रीनगरेश्वर

१. ही देवता आडिवरें गांवांतील सर्व देवस्थानांत आद्य दर्शनीय म्हणून सर्व प्रसंगीं मानिली जाते. कारण, सर्वांत जुनी म्हणून पहिली हीच देवता होय. किती जुनी, हें तिच्या नांवावरूनच लक्षांत येण्यास मदत होते. आधीं नगर मग तेथील नगरेश्वर. नगर किती जुनें तें वर आलेंच आहे. म्हणजे आठशें वर्षांची प्राचीन देवता ही आहे. वस्तुतः अनाद्यनंत अशा सर्वनियन्त्या 'परमेश्वराचा काल' व 'त्याचें अमुक नांव' ही परिभाषाच चूक आहे. पण भक्तिमान् मनुष्यांकरितां परमेश्वरानें सगुण साकारत्व पत्करिलें, सर्वेच मानवाची परिभाषा त्यास लागू झाली. असो. नगरेश्वर ही देवता स्वयंभू आहे. स्वयंभू देवाची स्थापना, हाहि शब्दप्रयोग वास्तविक पाहतां अयुक्तच. मूर्तीची स्थापना हें बरोबर. स्वयंभू देवतेचें प्रकटीकरण होतें; तसें ह्या नगरेश्वराचें आडिवरें येथील प्राचीन नगरस्थळीं आविष्करण आठशें वर्षांपूर्वी झालें. हें स्वयंभू लिंग सुमारें चार अंगुळ उंचीचें व काळ्या डोंगरी शिळेचें आहे.

त्या वेळीं वाडा नवेदर येथील वत्सगोत्री जोशी महाजन घराण्यांतील पुरुषांनीं हें देवस्थान उर्जावस्थेंत आणिलें, असें दंतकथेवरून समजतें.

हें स्थान स्वयंभू असल्यामुळें येथें श्रीचंडाचें स्थान नाहीं. श्रीचें देवालय पूर्वाभिमुख असून याचें आवार स्वतंत्र आहे. देवालयाचे उत्तरेला आवारांतच (पोंबळींत) एक विहीर व ईशान्येला एक आड (वाटोळी विहीर) आहे. श्रीचेसमोर एक मोठा जुनाट आश्वत्थ वृक्ष आहे. तो वृक्ष व देवालय यांमध्यें एक त्रिपुर म्हणजे दीपमाला आहे. त्याचप्रमाणें पूर्व-दिशेला परंतु साधारण ईशान्येच्या कोपऱ्याकडे आणखी दोन त्रिपुर आहेत. श्रीचे उत्तरेला एक व दक्षिणेला एक अशीं दोन तुलसीवृंदावनें आहेत. श्रीचें देवालयाचे वायव्य कोपऱ्यांत एक मोठें वारुळ देवालयाचे कौलांना लागेल इतकें उंच आहे. मंदिराची घुमटी दगडी आहे. त्यावर घुमटी आंत समाविष्ट होईल अशी देवालयाची लांकडी कौलारू इमारत आहे. श्रीपुढें बाहेरील सभामंडपांत नंदी, उजवीकडे श्रीगणेश मूर्ति आहे. महाद्वारांत कीर्ति-मुख आहे, श्रीचे पाठीमागें धातूची पार्वतीची मूर्ति कोनाड्यांत ठेविलेली आहे. व तांब्याचा नाग ठेविला आहे. श्रीचे दक्षिणेकडे प्रदक्षिणेच्या वाटे-वर एक लांकडी पेटी आहे तींत श्रीच्या चीजवस्ता ठेवितात. ह्या देवाल-याचा जीर्णोद्धार मध्यंतरीं भिडे यांनीं केला तो उल्लेख पुढें आला आहे.

आडिवरें गांव उत्तरोत्तर बाजार पेठेमुळें अधिकाधिक भरभराटीस येत चालला त्याबरोबरच वाडे विभाग होऊं लागले आणि नवे खोत, महाजन इत्यादि अधिकारीहि निर्माण होऊं लागले होते. पहिल्यानें नवेदर वाड्यांत वत्सगोत्री व श्रीकाळभैरव ज्यांचा कुळस्वामी आहे अशीं घराणीं तीन आलीं. हीं तीनहि घराणीं थेट काशीक्षेत्रांतूनच आलीं असलीं पाहिजेत असा तर्क आहे. आडिवरें, कशेळी व गांवखाडी कोंतापूर या गांवची वस्ती शालिवाहनाच्या अकरावे शतकापासून आहे. या वेळीं या प्रांतांत जैनधर्मीय पुष्कळ लोक राहात होते. त्यामुळें अकरावे शतकांत आडिवरें प्रांतीं येऊन श्रीशंकराचार्यांनीं जैन मताचें खंडण करून वैदिकधर्मियांच्या देवता श्रीमहालक्ष्मी व योगेश्वरी ह्यांची स्थापना केली आणि आर्यांची जी मूळ व हाडची प्र त्ति कीं, स्वेतरांना नष्ट न करतां आत्मसात् करून अथवा शेजार देऊन संग्रह करावयाचा; आणि अवधियांसह सुपंथ धरावयाचा; त्या प्रवृत्त्यनुसार जैनांना स्वमतानें

कुंठित केलें तरी त्यांनाहि स्थान दिलें; इतकेंच नव्हे, तर जैनांचे देवतांची पूजा व आपले देवतांची पूजा जैन गुरूचेच स्वाधीन केल्या. त्याचें दर्शक म्हणून सांप्रत 'जैन ब्राह्मण' नांवाचा जैनांचा देव तेथें आहे. तसेंच जुन्या अवशेषाचें चिन्ह म्हणून म्हणतां येईल अशी आणखी एक तेथें 'अंधार-गल्ली' या नांवाची आळी आहे.

श्रीदेव नगरेश्वराला इ. सन १३२४ म्हणजे शालिवाहन शके १२४६ पासून मुसल्मान बादशहांकडून नक्त नेमणूक ११ रु. ७५ रेंसची आहे. ती आजपर्यंत चालत आहे. या देवतेसंबंधी माहिती पुढें परिशिष्टांत क्रमानें दिली आहे.

वारूळ—हें केव्हांपासून आहे असें कोणाला माहीत नाहीं. परंतु त्यांत मोठा सर्प असून तो केव्हांतरी आढळतो असें सांगतात. हा नागराज साक्षात्कारी आहे. गांवांत कोणाला सर्पासंबंधीं भय उत्पन्न झाल्यास या नागराजाची प्रार्थना करावी व भयनिवारण झाल्याची खात्री झाल्यावर एक शेर तांदूळ, एक यज्ञोपवीत व एक नारळ असा श्रीपुढें आणून ठेवावा व प्रार्थना करावी.

या नागराजाची प्रतिवर्षी नागपंचमीला वारुळावरच लोक येऊन पूजा करतात.

श्रीचे पोंवळींत येण्याचे दरवाजे दोन आहेत. एक उत्तरेला व दुसरा दक्षिणेकडेच परंतु नैर्ऋत्य कोपऱ्यांत आहे.

आडिवरें गांवीं देवदर्शनार्थ गेलेल्याला ज्याप्रमाणें आधीं व नंतर कोणाचें दर्शन घ्यावें ह्याविषयीं कांहीं ठरीव क्रम सांगितला जातो त्याप्रमाणें ह्या ग्रंथांतहि देवतांची माहिती क्रमानें देण्याचें केलें आहे. आनंदाची गोष्ट कीं, ऐतिहासिकदृष्ट्या येणारा क्रम व सांप्रतचा चालू क्रम एकच आहे. श्रीनगरेश्वरानंतर आतां आपण श्रीमहालक्ष्मी व श्रीयोगेश्वरी यांजविषयीं माहिती पाहूं.

श्रीमहालक्ष्मी व श्रीयोगेश्वरी

या देवी पुष्कळ कोकणस्थांच्या कुळदेवता आहेत. व त्यांपैकीं पुष्कळ घराणीं आडिवरें येथील आहेत असें आढळतें. श्रीमहा-

लक्ष्मीचें देवालय पूर्वी होतें तेवढेंच आहे. यांपैकीं श्रीमहालक्ष्मीला वाडा नवेदर येथील लोकांनीं, पाटाचें पाणी नेलें त्या वेळीं म्ह. शक १५५३।५४ साली, कौंडें व मठ दिला आहे.

श्रीमहालक्ष्मीचें वर्णन

२. श्रीमहालक्ष्मीचें देवालय पश्चिमाभिमुख असून ही देवताहि पश्चिमाभिमुख आहे. ही देवता श्रीमहाकालीचे पंचायतनांतील क्रमानें दुसरी मानिली जाते. हिची स्थापना आद्य शंकराचार्यांनीं केली. ही मूर्ति उभी, चतुर्भुज, साध्या काळ्या डोंगरी शिळेची कोरलेली आहे. कोणताहि अवयव सुटा नाहीं. हिची उंची सुमारें ३८ अंगुळें आहे. हिचे मागचे डावे हातांत शंख व मागचे उजवे हातांत गदा आहे. पुढचे उजवे हातांत मोदक व पुढचे डावे हातांत कमलपुष्प आहे. हिचे शेजारीं जैनांचा देव 'जैनब्राह्मण' म्हणून तांब्याचा टोप आहे. त्याची पूजा नैवेद्य वगैरे श्रीमहालक्ष्मीबरोबर होते. श्रीमहालक्ष्मीचे देवालयांत श्रीमहाकाली संस्थानचे कचेरीची बैठक होत असते. हिची नित्यपूजा भविक गुरवाकडून केली जाते. पुढें येणारें उत्पन्न चाकरीचा गुरवच घेतो.

श्रीयोगेश्वरी

श्रीजुगाई–हिला जोगेश्वरी किंवा योगेश्वरी म्हणतात. हिची स्थापना श्रीमहालक्ष्मीबरोबरच आद्य शंकराचार्यांनीं इ. सनाचे ११ वे शतकांत केली आहे. ही ज्यांची कुलस्वामिनी आहे अशीं घराणीं गांवांत व बाहेरहि पुष्कळ आहेत. ही देवी श्रीचे शेजारीं, डावे बाजूस, साध्या काळ्या शिलेची आहे. हिला पूजा-नैवेद्य श्रीबरोबरच होतो.

पूर्वी श्रीयोगेश्वरीचें देवालय लहान होतें त्याची खूण वेतकर खोत यांचे बसण्याचे जागीं मागील अंगास खांबाचे उथळ्याचा दगड आहे ती. त्याजला 'स्तंब' असें म्हणतात व पूजा करितात. उपरिनिर्दिष्ट स्तंभ म्हणजे मूळ देवालयाची मुहूर्तशिला बसवून त्याच ठिकाणीं उथळें ठेवून त्यावर मुहूर्तस्तंभ स्थापन केला. तो आग्नेय दिशेचा मुहूर्तस्तंभ तेथेंच होता; पुढें देवालय वाढविलें परंतु मूळच्या मुहूर्तस्तंभाचें उथळें हालविलें नाहीं. तो पूज्य म्हणून त्याची रोज पूजा करतात. या गांवांत पुराणोक्त अशाच

देवता आहेत. कोकणप्रांतीं इतरत्र जाखाई, पावणाई, नवलाई इ. आहेत तशा देवता येथें नाहींत. मौजे आडिवरें येथें श्रीदेवीचें महास्थान असलेमुळें गांवांत लोकांचे येथें नवरात्रसंबंधींचीं कृत्यें विशेष करणेंत येत नाहींत.

श्रीदेव रवळनाथ

३. **श्रीदेव रवळनाथ**–हा भैरवाचा अवतार आहे. ही पंचायतनांतील तिसरी देवता असून, श्रीमहाकालीचे उजवे बाजूस, दक्षिणाभिमुख, उभी, चतुर्भुज, साध्या काळ्या शिलेची, दृष्टि सरळ समोर असलेली अशी आहे. हिची उंची सुमारें ३४ अंगुलें आहे. मागचे उजवे हातांत डमरू व डावे हातांत त्रिशूल आहे. पुढचे उजवे हातांत खड्ग व डावे हातांत 'पानपात्र' आहे. मार्गशीर्ष शुा १ चे दिवशीं दुपारीं हिचेपुढें येणारें उत्पन्न "जुनगरी" घराण्यांतील पुरुषांनीं घ्यावयाचें असतें.

कदम तावडे

अकरावे शतकाचे आरंभापासूनच जैनांचें वर्चस्व व मत कमी होऊं लागलें व त्या ठिकाणीं वैदिक धर्माचा उदय पुनः होऊं लागला. म्हणजे त्याबरोबरच ब्रह्मक्षत्रयुक्त जो ईश्वरभाव म्हणजे सत्ताप्रधान ज्ञानमय जीवित याचा पुन्हा प्रादुर्भाव झाला. आणि ह्यांतूनच पुढें कदम तावडे लोकांचा उदय होऊं लागला. तो शेंपन्नास वर्षांत फार झपाट्यानें झाला; इतका कीं, ते लोक राज्यकारभारांतहि अडचण करूं लागले. हे लोक लढवय्ये असून नेहमीं सशस्त्र राहण्याचा त्यांचा बाणा असे. त्यांच्या धार्मिक भावना उत्तम होत्या. हे लोक जमावानें राहात असत. आजूबाजूचे प्रांतांत दंडेलीपणा करीत. राजाकडून करभार-वसुलीकरतां कोणी आला तर त्याला हांकून लावीत.

एकदां असें झालें कीं, आडिवरें प्रांताचा वसूल सरकारकडे गेला नाहीं. त्यामुळें तो वसूल करणेकरतां सरकारकडून पुढीलप्रमाणें तजवीज करण्यांत आली. मु. सड्ये येथील राहणारे नाना भिडे या नांवाचे गृहस्थ पुणें सुभ्यांत सरदारीचे कामावर होते. त्यांना बादशहानें आज्ञा केली कीं, तुम्ही सरंजामसुद्धां कोंकणप्रांतीं जाऊन, जिकडून वसूल येत नसेल तेथें असलेल्या बंडखोर लोकांचें पारिपत्य करावें व करभार सुरळीत

येईल असें करावें. ह्या हुकुमाप्रमाणें भिडे हे तेथें बंदोबस्ताकरतां कांहीं सैन्यासह येऊन तावडे यांस न कळत एकीकडे विचार करीत राहिले. ह्या नाना भिड्यांचें व तावडे कदम मंडळींचें मूळचें वांकडें असण्याचें कांहींच कारण नाहीं. पण एका प्रसंगीं तावडे यांजकडून एक चूक झाली. त्यायोगें भिडे इ. मंडळी विरुद्ध व रुष्ट झाली. भिडे घराण्यांतील एक प्रौढ स्त्री देवदर्शनार्थ गेली असतां तेथें ह्या कदमांचेकडून तिची अप्रतिष्ठा झाली. हें तिनें घरीं गेल्यावर नानांना सांगितलें व तेव्हांपासून भिड्यांचे मनांत तावड्यांविषयीं संताप उत्पन्न झाला व ते ह्या अपमानाचे प्रतिकारार्थ संधि पाहूं लागले. स्त्रियांचा अपमान ही गोष्ट कोणाहि माणसाला चीड उत्पन्न करणारी गोष्ट आहे. पैसा, शरीरबल, सत्ता इ. कोणत्याहि बलाच्या जोरावर ह्या अपमानास मनुष्य प्रवृत्त होतो, पण त्याच्या ह्या दंड्यकृत्याचा परिणाम त्यास दुगुणींनें भोगावा लागतो. तसाच प्रकार येथेंहि झाला. भिडे यांस आतां बंदोबस्ताबरोबर पारिपत्यहि करण्याचें काम स्वीकारावें लागलें. पण तें काम उघड्या मार्गानें होण्यासारखें नाहीं असेंहि त्यांचे लक्षांत आलें. पुढें गांवांतील शिष्ट मंडळींच्या भेटी घेऊन खलबतें सुरू झालीं. त्या वेळीं वाडा कोंडसर येथें नान प्रभू मंडलीक म्हणून एक गृहस्थ व जगन्नाथपंत परांजपे या नांवाचे दुसरे गृहस्थ असे राजकारस्थानें करणारे होते. त्यांनीं अशी सल्ला दिली कीं, हे कदम लोक धार्मिक भावनेचे आहेत तेव्हां त्याच मार्गानें त्यांचें पारिपत्य होईल. तेव्हां कपिलाषष्ठीचा योग (भाद्रपद वद्य ६) आला आहे, या वेळीं हे लोक समुद्रस्नानाला वेत्याचे समुद्रावर एका बाजूला नेऊन कत्तल करून टाकावी. ही मसलत पसंत पडली. नंतर पेठेंत जाऊन कदम लोकांत जे मुख्यमुख्य होते त्यांच्या भेटी घेतल्या व स्नेह जमविला. कपिलाषष्ठीचे दिवशीं समुद्रस्नानाचें महापुण्य आहे असें सर्वश्रुत केलें. त्यामुळें ते लोक पर्वणीचे दिवशीं हत्यारें वगैरे घेऊन समुद्रस्नानास निघाले. वाटेंत त्यांचेवर हल्ला करण्याचें धाडस होईना. इकडे आपले बरोबरीचे आणिलेले लोकांना हा पर्वणीचा दिवस व वेळ सांगून कदम समुद्रांत स्नान करून परत येतात तोंच सर्वांनीं समुद्रकांठीं झाडांझुडुपांच्या आड सशस्त्र राहावें आणि जे लोक स्नान करून परत येतील त्यांना कापून काढावें याप्रमाणें ठरवून ठविलें होतें.

कपिलाषष्ठी दिवशीं सकाळीं सर्व लोक समारंभानें समुद्रस्नानास जाण्याकरतां तयार झाले व सशस्त्र असे समुद्रतीरीं पोंचले. स्नानाचे संकल्प करून सर्व लोक स्नानाकरतां समुद्रांत उड्या टाकूं लागले व स्नानें करून पोहून बाहेर येऊं लागले.

इकडे पूर्वदिवशीं ठरलेल्या संकेताप्रमाणें सर्व सिद्धता होतीच. स्नान करून परत येत तसतसे त्यांना शस्त्रांनीं कापून काढिलें. याप्रमाणें अत्यल्प काळांत सर्व मृत्युमुखीं पडले. सर्वत्र हाहाःकार उडाला. ही बातमी क्षणांत पेठेंत येऊन पोंचली. जिकडे तिकडे बायका मुलांचा आक्रोश, कल्होळ झाला. तों नाना भिडे तेथें येऊन त्या स्त्रियांचें शांतवन करूं लागले. कोणी सती जाणार होत्या त्यांची तशी तयारी करून दिली. एक स्त्री सगर्भ माहेरीं होती ती मात्र चुकून राहिली. तिला पुत्र झाला. तिचा वंश आहे. याप्रमाणें कामगिरी करून यशस्वी नाना भिडे पुण्यास येऊन बादशहास आनंदाचें वर्तमान सांगितलें. बादशहानें खूष होऊन त्यांना आडिवरें गांवीं खोतीचें वतन दिलें.

कदमांचा नाश झाल्यानंतर नवे राजवटीस शेट्यांनीं संगमेश्वराहून येऊन शेटकीपणाचा हक्क व वाडापेठ येथील खोतीचा हक्क संपादन केला. शेटकी म्हणजे बाजारांत धान्याचें माप सरकारी शिक्क्याचें मानलें जातें, तें तपासणें, पेठेंत व्यवस्था ठेवणें इ. काम करावयाचें व ह्या कामाबद्दल दुकानदाराकडून येणाऱ्या मालावर शेट्यांस हक्क व उत्पन्न असे. तो हक्क म्हणजे शेटकीचा हक्क. मणामागें पाव आणाप्रमाणें व्यापारी शेट्या जो असेल त्याला जकात द्यावी लागे. ती शेट्ये यांनीं वसूल करावयाची असे. खुषकीचे मार्गानें बैल येत त्यांस दर बैलास पाव आणा व जलमार्गानें महागिऱ्या येत त्यांस प्रत्येकीं आठ आणे अशी जकात द्यावी लागे. शेट्ये येण्यापूर्वीपासून येथील बाजार चांगला नांवारूपास आला असून शेट्यांनीं त्याची भरभराट केली व आपलें ठाणें व्यापाराचे मिषानें स्थिर केलें.

इतकें झालें तरी, परकीय राजाज्ञेनें केलेला स्वधर्मीय लोकांचा नाश, ही गोष्ट नानांच्या मनाला लागून राहिली. शेवटीं सर्वसंगपरित्याग करून श्रीलक्ष्मीची सेवा करून कालक्षेप करावा असें त्यांनीं ठरविलें.

नाना भिडे यांनीं कदमांचा नाश केला त्या वेळीं त्यांतील कांहीं लोक

शरण आले होते. त्यांनी विनंति केली कीं, श्रीलक्ष्मीचे देवालयीं आमचा मान असावा. ही मागणी त्या वेळचे कार्यकर्त्यांनीं मान्य केली व आज्ञा केली कीं, तुम्ही देवीस दरसाल एक पोषाख नेसवून त्याजवर राखणेचा कौल घेत जावा व तुम्हीं देवास नैवेद्य करून जावें. देवळांतील खरकटें तुम्हीं काढूं नये-जो नवा खोत येईल त्यानें काढावें. ही वहिवाट विद्यमान आहे. पुढें नाना हे आडिवरें येथें आले. इतर वाडयांतील जाणत्या लोकांना खोतीच्या व महाजनकीच्या सनदा आणून दिल्या. श्रीनगरेश्वराचे देवालयाचा जीर्णोद्धार केला व श्रीयोगेश्वरीचें देवालय मोठें बांधून श्रीमहाकालीची स्थापना करविली.

श्रीमहाकाली

श्रीमहालक्ष्मी व श्रीयोगेश्वरी यांच्या स्थापना झाल्यास पुष्कळ काळ लोटला होता. मूर्ति जीर्ण झाल्याकारणानें, नूतन मूर्ति करून प्रतिष्ठा करावी अशी परिस्थिति प्राप्त झाली होती. व या मूर्तीचे स्थापनेचे वेळीं पूर्वीप्रमाणेंच दोन मूर्ति स्थापाव्या असें त्या वेळच्या कार्यकर्त्यांना वाटेना. म्हणून त्यांनीं श्रीमहाकाली, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वती, श्रीरवळनाथ अशा मूर्ति स्थापून **श्रीपंचायतन** करावें असें ठरविलें. हा श्रीशंकराचार्यांच्या मतप्रसाराचाच एक परिणाम होय.

मूर्ति तयार झाल्यानंतर त्या कोठें स्थापन कराव्या याबद्दल पुष्कळ भवती न भवती झाली असावी असें दिसतें. वाडा वेत्यें येथें (खांबाची बाउळ) किंवा पाणेरें येथें (नाटयाचे तळयानजिक) किंवा चांदेलचे रानांत (जामशेंडा) किंवा राजवाडीस स्थापना करावी असे मतभेद होते. शेवटीं सर्वानुमतें वाडापेठ येथें बाजारांत श्रीनगरेश्वर स्वयंभू महाजागृत स्थान आहे त्याचे सन्निधच पूर्वीचें श्रीमहालक्ष्मी व श्रीयोगेश्वरीचें देवालय होतें त्याच ठिकाणीं प्रतिष्ठा करावी असें ठरून शेटयांचे हातून श्री-**महाकालीची स्थापना** झाली. ज्यानें स्थापना केली त्याला आकारी म्हणतात. त्याचे नांवची एक वाटोळी शिला श्रीमहाकालीचे उजवे हातास ठेविली आहे.

या तीन मूर्ति तयार करवून वांकडे व शेट्ये यांनीं वाडा वेत्यें

येथें गलबतावरून आणून उतरल्या व गोविंद येसनाक भंडारी वेतकर यांचेकडून पेठेंत आणविल्या. त्या दुसरीकडे जाणार म्हणून स्वाभाविकच वेतकरांना आपलेपणा उत्पन्न झाला व त्यांनीं आपण होऊनच 'ज्याप्रमाणें मुलीला सासरीं पोंचवितात त्यासारख्या प्रेमानें' पालखींत घालून वेत्यांतून पेठेंत आणून पोंचविल्या. या कार्याबद्दल त्यांना पारितोषिक काय द्यावयाचें, असें वेतकरांस विचारतां त्यांनीं सांगितलें श्रीचे संस्थानांत आम्हांस मान असावा. हें म्हणणें सर्वत्रांना पटलें व असें सांगितलें कीं, ज्याप्रमाणें मुलगी माहेराहून सासऱ्यास पोंचवितात त्याप्रमाणें तुम्हीं पोंचविलीत म्हणून तुम्हीं चोळीपातळ श्रीला आपली माहेरवाशीण म्हणून दरसाल देत जावें व ज्या वेळीं श्रीची स्वारी गांवांत जाईल त्या वेळीं वेत्याचे सीमेंत गेल्यावर तिची पालखी वेतकरांनीं घेऊन मिरवणूक दुसरे सीमेपर्यंत आणून पोंचवावी. याप्रमाणें ही वहिवाट आजपर्यंत आहे.

पूर्वी लिहिल्याप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं स्थापना करावयाची योजना केल्या होत्या पण त्या त्या ठिकाणीं स्थापना झाली नाहीं त्या जागांचें विस्मरण हाऊं नये, या भावनेनें त्या ठिकाणीं श्रीची स्वारी सरंजामासह जाते. तिला श्री रुसून गेली असें म्हणतात.

श्रीमहाकालीची स्थापना कधीं झाली याबद्दल ज्या लेखकथा किंवा दंतकथा आहेत त्या परस्परविरोधी आहेत. त्यांवरून निश्चय करणें कठिणच आहे. परंतु सदाशिव कृष्ण भिडे यांची जबानी व दुसरा जगन्मित्र पत्रांतील लेख यांवरून श्रीमहाकालीची स्थापना इ. सन १३२४ म्हणजे शालिवाहन शके १२५० चे सुमारासच झाली असावी असें ठरतें. या देवस्थानसंबंधीं माहिती पुढें परिशिष्टांत कालानुक्रमानें व विषयवारीनें दिली आहे. त्यांचें स्वरूप येथें थोडक्यांत दिग्दर्शित करतों. दवीची झालेली पुनरर्चा, देवालयांतील बांधकामें, श्रीची कोठी (दास्तान) व संस्थानकडील नित्यनैमित्तिक नेमणुका व सभेंतील व शिकारीच्या सावजांतील मानकऱ्यांचा क्रम, भगत, पुराण, नैवेद्याबद्दल झालेल्या तंटयांतील निवाडे इ. इ. माहिती तेथें दिलेली आहे.

४. **श्रीदेवी महाकाली**–हिला पंचायतनांतील चवथी देवता मानिली जाते. ही दक्षिणाभिमुखी साध्या काळ्या शीलेची, सुमारें ३४ अंगुलें उंच,

ऊर्ध्वदृष्टी, शवावर पद्मासनस्थ, चतुर्भुज, गळ्यांत रुंडमाला; मस्तकावर पंचमुखी शेष धारण केलेला अशी आहे. हिचे मागचे उजवे हातांत डमरू व डावे हातांत त्रिशूळ, पुढचे उजवे हातांत खड्ग, व डावे हातांत 'पान-पात्र' धारण केलेलें आहे.

५. श्रीमहासरस्वती–ही पंचायतनांतील पांचवी देवता होय. ही साधी काळ्या शिलेची, उभी, उंची सुमारें २४ अंगुलें, सूकरावर बसून पाय खालीं सोडलेली, चतुर्भुज, मागचे डावे हातांत पुस्तक, उजवे हातांत 'तरवार', पुढचे उजवे हातांत 'पंचपात्री' व डावे हातांत हिनें नाग धारण केला आहे.

उपरिनिर्दिष्ट देवतांचें एक पंचायतन मानिलें जातें. या देवतांच्या स्थापना निरनिराळ्या काळीं झाल्या, तसेंच त्यांचे प्राकारहि निरनिराळ्या कालींच झालेले आहेत.

सभामंडपांतील चित्रांची यादी

श्रीमहाकालीच्या सभामंडपांतील लांकडी खांबावर ८; शिवाय तेथेंच गणपति, मृदंगी, भिंतीवर २, द्वारांत चतुर्भुज द्वारपाळ, व जयविजय अशा मूर्ति प्राचीन कारागिरांनीं कोरल्या आहेत.

श्रीपुढें सभामंडपांत छताला २५ चित्रें लाकडाचे पाटावर कोरलेलीं तीं–

१ कमळांतील विष्णु	१ मध्यें ब्रह्मा	१ उत्तरे सोम्
७ कमळें	१ पूर्वेस इंद्र	१ ईशान्यां ईशानम्
१ सूर्य	१ आग्नेयां अग्नि	१ परशुराम सहस्रार्जुन
१ सुरथ राजाचे यांत ३ दंपत्यें व १ तपस्वी आहे	१ दक्षिणे यम्	१ नवनारी कुंजर
	१ निर्ऋत्यां निर्ऋतिं	१ द्रौपदी पांडव
१ रामपंचायतन	१ पश्चिमे वरुणम्	१ महिषासुरमर्दिनी
१ कृष्ण	१ वायव्यां वायुम्	२५

श्रीमहालक्ष्मी, श्रीमहाकाली व श्रीरवळनाथ यांच्या नूतन मर्ति आणविल्या त्याबद्दल माहिती येणेंप्रमाणें—

"अलिकडे श्रीचे पुजारी गुरव हे नित्य म्हणतात कीं, श्रीमहालक्ष्मीची

मूर्ति जीर्ण झाली, तिचे अवयव, अलंकार समजत नाहींत व ही मूर्ति कोणी गैरमाहितीचे इसमानें पाहिल्यास ती पुरुषाची किंवा स्त्रीची मूर्ति आहे हेंहि समजत नाहीं. तेव्हां याबद्दल विचार करावा अशी गुरवांनीं श्रीचे संस्थानचे कमिटीदार यांचेकडे विनंति केली, त्यावरून कमिटीदार खोत यांनीं याबद्दल काय करावें म्हणून श्रीमहाकालीला अंग-प्रसादीं विचारलें कीं, श्रीमहालक्ष्मीची मूर्ति नूतन आणून तिची स्थापना–पूर्वीचे मूर्तीचे विसर्जनपूर्वक–करावी काय ? असा प्रश्न होतांच श्रीनें कौलीं सांगितलें कीं, 'प्राचीन मूर्तीचें विसर्जन करून तिचे ठिकाणीं नूतन मूर्तीची स्थापना करावी.'

श्रीमहाकालीच्या मांडीला (डावीकडील) चीर गेली असून तिची उजवी कूस खडबडीत झाली आहे, व सिंहासनाचें मुख भग्न झालेलें आहे आणि श्रीरवळनाथाचें नाक छिन्न झालें आहे. याबद्दल निरनिराळें कौल लावून विचारलें तेव्हां श्रीनें अंगप्रसादीं कौलीं सांगितलें कीं, महाकालीच्या प्राचीन मूर्तीचें विसर्जन करून त्या ठिकाणीं नूतन सिंहासन व नूतन मूर्ति आणून स्थापना करावी व श्रीरवळनाथाचे मूर्तीचीहि नूतन स्थापना करावी. या आज्ञेला अनुसरून संस्थान-कमिटीनें मूर्ति नूतन करणेबद्दल औंधचे श्री. बाळासो पंतप्रातिनिधि यांजकडे व दुसरे युरोपियन कंपनीकडे चौकशी केली. परंतु किंमतीचें न जमल्यामुळें, मुंबईचे मूर्तिकार बिहारीलाल सुरजमल मूर्तिवाला यांजकडे मूर्ति करण्यास सांगून त्यांचे करार होऊन अंदाज ठरले. त्यानंतर सदर कारागीर यांनीं आपला मनुष्य मुंबईहून आडिवरें येथें पाठविला, त्यानें येथील मूर्ति समक्ष पाहून त्याप्रमाणें कागदावर चित्रें काढून घेतलीं. उंची, जाडी वगैरे अवयवांचें पूर्ण दिग्दर्शन होईल अशी माहिती नेली, आणि कमिटीदार व कारागीर यांमध्यें तारीख ९ फेब्रुवारी सन १९३४ रोजीं करार झाला. त्यांत आजपासून दीड महिन्यानें म्हणजे ता. २४ मार्च १९३४ पावेतों वर्णनाप्रमाणें मूर्ति तयार करून त्या मुंबईस आमचे दुकानीं तुमचे ताब्यांत देऊं असें ठरलें.

" तीनही मूर्ति काळ्या संगमरवरी दगडाच्या असून सिंहासन काळ्या डोंगरी दगडाचें आहे.

श्रीमहाकालीचें सिंहासन लांबी फूट २।।, उंची आणि रुंदी फूट २ असून वजन मण ४५ व किंमत रुपये ४० आहे.

श्रीदेवी महाकालीची मूर्ति उंची फूट २। व रुंदी फूट १।, किंमत रुपये १७५.

श्रीरवळनाथ उंची फूट २।, रुंदी फूट १।, किंमत रुपये १२५.

श्रीमहालक्ष्मीची उंची २।। फूट, रुंदी १। फूट किंमत रुपये १६५. एकूण ५०५.

सदरप्रमाणें पांचशें पांच रुपये किंमतीला मूर्ति व सिंहासन तयार करून घ्यावयाचें ठरलें आणि ठरले तारखेस संस्थानचे जबाबदार मनुष्याचे ताब्यांत त्या मूर्ति दिल्या. व ४५० रुपये घेऊन रामचंद्र गंगाधर परांजपे यांना पावती दिली. ठरावापैकीं पन्नास रुपये देणें ते मूर्ति बसविल्यानंतर घ्यावयाचे आहेत. तेथपर्यंत कांहीं कमीजास्त फरक करणें राहिला असेल तो कारागिरानें येऊन करून द्यावा व नंतर राहिलेली रक्कम न्यावी असें ठरलें आहे.

सदर मूर्ति पूर्णगड खाडीपैकीं रामा टेंबकर यानें आपले 'सीता' नांवाचे गलबतावरून आणून देसायांचे बांधावर श्रीसंस्थानचे कमिटीदार यांचे ताब्यांत दिल्या. या मूर्ति आणण्याकरतां श्रीचे स्वारीचे सर्व सरंजामासह मंडळी देसाई बांधावर सामोरी गेली. आणि मूर्ति वाहनारूढ करून, त्या राजमार्गानें भजन करीत समारंभानें मिरवीत सायंकाळीं सहा वाजतां श्रीचे देवालयीं आणून दाखल झाल्या. येणेप्रमाणें माहिती आहे हें लिहिलें. १ जुलई १९३४ इ."

श्रीमहाकाली–पंचायतनमंदिरांतील नित्य कृत्यें

नित्य कृत्यें—स्नान, पूजा, ऊर्जा, नैवेद्य, कौल, सांजवात इत्यादि.

येथें एकंदर पांच देवस्थानें आहेत तीं–

श्रीदेवनगरेश्वर याची पूजा वगैरे लिंगाइत गुरवाकडून केली जाते.

१. श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ, श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती या चार देवतांच्या पूजा दररोज भाविक गुरवांकडून केल्या जातात.

२. या भाविक गुरवांचीं राणे व शेलार अशीं दोन पथकें आहेत. प्रत्येक पथकाकडे आळीपाळीनें पंधरा दिवस गुरवकीची कामगिरी असते.

३. सर्व देवांना स्नानें रोज सकाळीं, पांच घटिका दिवस येण्याचे पूर्वी,

थंड पाण्यानें घालावयाचीं. स्नानाचे वेळीं व नैवेद्य समर्पण करीत असतां देवालयाचीं द्वारें बंद करून घ्यावयाचीं.

४. **अभ्यंगस्नान**— पौर्णिमा व अमावास्या ह्या दिवशीं सर्व मूर्तींना अभ्यंग करून उष्णोदकानें स्नानें घालावयाचीं. गुरवकी वदळ्ण्याचा अवधी हाच येत असल्यानें ह्या दिवशीं सोमवार आला असतां मात्र अभ्यंग स्नान दुसरे दिवशीं घालावयाचें. अभ्यंग म्हणजे नारळाचा अंगरस काढून त्यांत तेल घालून लावणें. यालाच माखण असेंहि म्हणतात. स्नानाचे वेळीं देव वस्त्ररहित करावयाचे असतात. स्नानानंतर वस्त्रानें अंग कोरडें करून, वस्त्रें नसवावयाचीं.

५. **श्रीमहाकालीला नित्य अलंकार असतात ते**— मुकुट सुवर्णाचा, चिरी सुवर्णाची, दृष्टी, नाकांत मोतीं, मंगळसूत्र, कमरपट्टा सुवर्णाचा, चुडे, गाठलें सुमारें पंचेचाळीस पुतळ्यांचें. याप्रमाणें नित्य अलंकार असतात.

६. **पूजेचा क्रम**— श्रीमहाकाली प्रथम, त्यानंतर श्रीमहालक्ष्मी, त्यानंतर श्रीखंडोबा त्यानंतर श्रीमहासरस्वती. त्यानंतर चवाठा [राजवाडीचे लोटलीकर यांचे त्रिपुराजवळ घुमटींत आहे तो], नंतर गणपति [श्रीमहाकाली पुढील चौकांत उजवे बाजूचे खांबांत कोरलेला आहे तो], त्यानंतर स्तंभ, त्यानंतर अंगारा ठेवितात तेथें खालीं जे दोन देव आहेत त्यांची पूजा, त्यानंतर श्रीमहाकालीचे उजवे बाजूस असलेल्या सत्तादेवीची, त्यानंतर तेथेंच असलेल्या तळखांब्यांची पूजा. शेवटीं श्रीजुगादेवीची पूजा व्हावयाची. ही पूजा गंध पुष्प धूप दीप नैवेद्य इतकीच होते. स्नानानंतर महानैवद्य समर्पण होईपर्यंत सर्व देवांना सोवळीं वस्त्रें नेसवीत असतात.

७. **नैवेद्य**—सकाळीं दहा घटिका दिवसास ब्राह्मणाकडून तयार करवून समर्पण केला जातो. याकरतां रोज तीन शेर तांदूळ व वरणाकरतां पावशेर तुरीची डाळ असते. तांदूळ गुरवांनीं द्यावयाचे आणि डाळीचा खर्च श्रीचे दास्तानांतून केला जातो. नैवेद्य समर्पण केल्यावर ते गुरवानें घ्यावयाच. नैवेद्याबद्दल पेशवाईपासून ३२ रुपये मिळतात. ते सर्व गुरव हिस्सेरशीनें वांटून घेतात.

श्रीमहालक्ष्मी नैवेद्य– १ मोठी मूद, २ लहान. पैकीं एक जैन ब्राह्मणास.

श्रीरवळनाथ नैवेद्य– १ मोठी मूद, २ लहान मुदा.
श्रीमहाकाली नैवेद्य– २ मुदा, मोठ्या श्रीमहाकालीस.
एक लहान मूद आकारी यास.
श्रीमहासरस्वती नैवेद्य– एक मोठी मूद.

याशिवाय आणखी लहान आठ मुदा वाढून तें ताट श्रीजुगादेवी-जवळ खिडकींत ठेवून जुगादेवीप्रमुख इतर देवतांना समर्पण केल्या जातात. त्यांचीं नांवें माहीत नाहींत. नैवेद्य समर्पण करणेपूर्वी धूपारत गुरवानें करावयाची असते. महानैवेद्य रोज एकच वेळ सकाळीं समर्पण केला जातो.

नैवेद्य करण्याबद्दल ब्राह्मणाला दरमहा चार रुपये वेतन देतात. पैकीं दोन रुपये श्रीचे दास्तानांतून व दोन रुपये गुरव यांनीं द्यावयाचे.

देव ओवळे करतात—नैवेद्य समर्पण झाल्यानंतर श्रीमहाकालीला पांढरें पातळ, श्रीमहालक्ष्मीला साडी, श्रीरवळनाथाला पंचा, श्रीमहासरस्वतीला परकर नेसवितात. श्रीमहाकालीला कौल लावावयाचे असतात, त्यामुळें तिचें वस्त्र ठरावीक पद्धतीनेंच नेसवावें लागतें. श्रीमहासरस्वतीला कौल लावितातच व तिचें 'हृदय' नेहमीं वस्त्ररहीत असतें.

कौल लावीत नाहींत ते दिवस—कोणताही सणाचा दिवस, सोम-वती अमावास्या व शुक्रवार या दिवशीं कौल बंद असतात. यावांचून इतर दिवशीं श्रीमहाकाली व श्रीमहासरस्वतीला कौल लावितात.

श्रीनगरेश्वर, श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ यांना विशेष प्रसंगीं कौल लावीत असतात. विशेष मानगडीचे प्रसंगीं ज्या वेळीं श्रीमहाकाली उपरि-निर्दिष्ट देवतांना कौल लावणेस सांगेल त्याच वेळीं कौल लावीत असतात.

१. कौलांनाच प्रसाद असें म्हणतात. हे निरनिराळ्या ठिकाणीं निर-निराळे पदार्थांनीं लावणेची पद्धत आहे. कोठें फुलांच्या पाकळ्या किंवा कळ्या, कोठें तांदूळ, कोठें निर्गुडीचीं पानें. पैकीं येथें निर्गुडीच्या पानांचे कौल लावितात.

निर्गुडीचीं पांच पानें जुळवून त्यांच्या शिरा काढून, त्याचे एक चतु-र्थांश इंचाएवढे तुकडे हातानेंच करावयाचे. हे सात आठ तुकडे एकदम चिमटींत घेऊन, श्रीचे हृदयावर उजवीकडे दोन रांगा व डावीकडे दोन रांगा–प्रत्येकींत चार–याप्रमाणें उभ्या लावितात. याला 'आठवडी' असें

म्हणतात. चिमटींतील तुकडे श्रीचे हृदयावर टेकविण्यापूर्वी प्रत्येक ठिकाणीं बोटानें पाणी लावून त्यावर तुकडे लावावयाचे. हें काम देव ओवळ केल्यापासून सूर्यास्तापर्यंत चालू असतें.

सायंकाळचें कृत्य—दररोज सूर्यास्तानंतर सर्व देवांची धूपारत करून शर्करानैवेद्य श्रीमहाकालीपुढेंच ठेवून समर्पण करावयाचा. धूपारतीनंतर सर्व देवतांचे अलंकार काढून पेटींत ठेवितात व दुसरीं शेजवस्त्रें नेसवितात.

श्रीमहाकालीसन्निध नित्य तीन नंदादीप असतात. शिवाय श्रीच्या पुढें चौकांत, श्रीमहासरस्वती, श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ यांचे सान्निध तेलाचा दिवा (सांजवात) असतो. या दिव्यांना लागणारें तेल रोजचे रोज चाकरीचे गुरवानें, तेली यांचे येथें 'कैफियत' घेऊन जाऊन त्यांत आणावयाचें असतें. बाहेरील सभामंडपांत एक हांडी लावितात त्या तेलाचा खर्च श्रीचे दास्तानांतून केला जातो.

श्रीचे धूपारतीचे वेळीं ढोल वाजविणेंत येतो. हा महार यांनीं येऊन वाजवावयाचा. सर्व कृत्य आटोपल्यावर नित्य व शुक्रवार ह्या वारीचे दिवशीं चतुःसीमेच्या बऱ्याचें गाऱ्हाणें करणेंत येतें. तें– 'बाई, श्रीनगरेश्वर, श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ, घनी, आकारी, श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती, गाऱ्हाणें करतों त्यास यश देऊन चतुःसीमेची रखवाली वाघापासून, विषारी जनावरांपासून, धाभीपासून, इतर सर्व उपद्रवांपासून सर्व बालगोपाळांचें रक्षण करून बरें कर.'

यानंतर श्रीचें द्वार बंद करून गुरवाकडून कुलूप लावणेंत येतें.

श्रीचें मासकृत्य (मासवडा)

१. राणे व शेलार अशा दोन्ही पथकांचे गुरव व शेटये यांनीं करावयाचा.

२. सर्वांचे सवडीप्रमाणें सोमवार वर्ज्य करून करावयाचा.

३. दिवस ठरलेवर योग्य वेळीं गुरवानें शेट्यांस हांक मारावयाची.

४. दर महिन्यास ११ नारळ द्यावे लागतात ते दोन्ही पथकांचे गुरव यांनीं एक सहामाहीचे राणे पथकानें व दुसरी सहामाहीचे शेलार पथकानें आपले खर्चानें आणावयाचे.

५. हें कृत्य सायंकाळीं चार घटिका दिवस राहण्याचे सुमारास सुरू करावयाचें.

६. समयास रुंढेकर असल्यास त्यांना हांक मारावयाची.

७. श्रीपुढें दोन्ही पथकांचे गुरव व शेट्ये यांनीं हात जोडून उभें राहून चतुःसीमेचे बऱ्याचें गाऱ्हाणें करावयाचें. श्रीपुढें या वेळीं नारळ ठेवावयाचा नाहीं.

८. गाऱ्हाण्यानंतर नारळ ठेवितात ते— दोन नारळ श्रीमहासरस्वतीचे मागचे बाजूस देणें, एक श्रीमानूबाईचे मारक्यास.

त्यानंतर चव्हाट्यावर एक, त्यानंतर सीतामातेपुढें एक, त्यानंतर पऱ्याचे धर्मशाळेंतील देवास एक, त्यानंतर मुखशाळेचे मागें पोंवळींतील देवास एक, त्यानंतर श्रीमहाकालीचे मागें विठलादेवीस एक, त्यानंतर निर्गुडीचे झाडाजवळ 'ब्राह्मण' देवास एक, त्यानंतर होळीचे काठयांत काजऱ्याजवळ भुतास दोन, याप्रमाणें ठेवावयाचे. प्रत्येक ठिकाणीं चतुःसीमेच्या बऱ्याचें गाऱ्हाणें करणें.

९. ह्या प्रत्येक ठिकाणीं नारळ ठेवून तो नारळ अमुक महिन्याचे मासवड्याचा ठेविला आहे, असें गाऱ्हाणें करून नारळ न फोडतां परत देवळांत आणावयाचा.

१०. सदरपैकीं दोन नारळ शेट्ये यांना देतात, व बाकीचे नऊ नारळ दोन्ही पथकांचे गुरव निमेनिमे वांटून घेतात.

इतकें झाल्यावर मासवड्याचें कृत्य पुरें झालें.

नैमित्तिक कृत्यें

चैत्र शु. १— प्रातःकाळीं ध्वजपूजा गुरवाकडून केली जाते. सायंकाळीं पंचांगवाचन, वाडा कोंडसर येथील ग्रामजोशी यांनीं येऊन वाचावयाचें. याबद्दल श्रीचे दास्तानांतून चार आणे ग्रामजोशी यांस देतात. हा पूजा व वाचनसनारंभ श्रीमहालक्ष्मीचे देवालयांत होत असतो. या वेळीं सर्व खोत, पेठेंतील इतर मानकरी व हर्डीकर ग्रामोपाध्ये यांनीं हजर असावें लागतें. ग्रामजोशी यांनीं पंचांगें दोन, एक श्रीमहाकालीस व दुसरें शेट्ये खोत यांस देणें.

पेटकर यांचें वार्षिक कृत्य—या दिवशीं सर्व देवतांना सुवर्णाचे मुखवटे घालितात. श्रीला महानैवेद्य सर्व पेटकरमंडळी म्हणून समर्पण केला जातो. ओझरावर गांवजेवण होतें. ह्यांत एका ब्राह्मणास व एका सुवासिनीला भोजन घालणेंत येतें. ब्राह्मण-सुवासिनी-भोजन झाल्यावर सर्व स्वयंपाक उचलून पेठेतील खोत, शेटये वडील घराणें, यांचे येथें आणून त्यांत पूर्वी श्रीमहाकालीला समर्पण केलेला नैवेद्य मिळवून तो सर्वजण प्रसाद म्हणून वांटून घेतात. या दिवशीं सुवर्णाची छत्री व पुतळ्यांचे हार वगैरे विशेष अलंकार घालणेंत येतात. सायंकाळीं श्रीनगरेश्वराला रुंढेकर खोत यांची वसंतपूजा असते. ती आटोपून वांकडे खोत हे श्रीदेवीवर गंधफूल वाहण्याकरतां येतात. तें झाल्यावर मुखवटे उतरतात. रात्रीं प्रसंगोपात् तमाशाहि होतो.

चैत्रबलि—हा बलि प्राचीनकाळीं तावडे यांच्या स्त्रिया सत्या गेल्या त्यांबद्दल काढण्यांत येतो. याकरतां शंभर नारळ, दोन मण गूळ, तांदूळ दोन पायली, एक शेर गुलाल, एक वेळूची चटई (हातरी) व एक टोपली याप्रमाणें सामान गुरव यांनीं आपले खर्चानें आणून ठेवावयाचें. हा बलि दरसाल देणेंत येतो. प्राचीन काळीं या बलिदानाकरितां चार बकरे बळी द्यावे लागत. त्याऐवजीं हल्लीं रामदेव मानी (महाजनी) भिडे यांनीं सुमारें दोनशें वर्षांचे सुमारास चार नारळ बळीचे ऐवजीं म्हणजे चार बकऱ्यांचे ऐवजीं देणेची रीत सुरू केली. या नारळांचा बळि देतात. त्याला 'सांगड तोडणें' असें म्हणतात.

श्रीमहाकालीचे उजवे बाजूचे खिडकींत ही नारळांची 'सांगड तोडणेंत' येते. दोन नारळ एकापुढें एक ठेवून, एकच घाव मारून त्यांचीं शकलें करणें, याप्रमाणें दोन वेळां केलें म्हणजे चार नारळांचीं शकलें होतात. या कामीं कोयत्याचा उपयोग करावयाचा असतो.

दोन पायली तांदुळाचा भात शिजवून त्यापैकीं एकतृतीयांश भात टोपलींत नीट दाबून ठेवावयाचा. बाकीच्या भाताचे ३६० भाग वेळूचे चटईवर (हातरी) निरनिराळे रांगेनें ठेवून त्यांवर गुळाचा लहान सुपारीएवढा खडा व नारळाच्या फोडी अशा ठेवून त्यावर, गुलाल पाण्यांत कालवून तें लाल पाणी घालावयाचें. नंतर शेटये, रुंढेकर, गुरव यांनीं मिळून प्रत्येक देवतेला एक याप्रमाणें नारळ ठेवून चतुःसीमेच्या बऱ्याचें

गाऱ्हाणें करणें. नंतर पूर्वी तयार करून ठेविलेल्या टोपलींतील भाताचे राशीवर एक मोठा कांकडा तेलांत भिजवून लावून ठेवावयाचा, आणि ती टोपली गरवानें घेऊन निघावयाचें. त्याला वरील मंडळी आपटयाचे झाडा-पर्यंत पोंचवावयाला जात असतां तेथील रस्त्यांतील खडे माती प्रत्येकानें हातांत घेऊन, बलि घेऊन जात असलेले गुरवाचे अंगावर फेंकून तोडानें 'चल चल' असें म्हणावयाचें, व सर्वांनीं परत यावयाचें. फक्त बलि नेणारा गुरव मात्र पुढें जातो. या बलिदानाचे वेळीं महारानें ढोल घेऊन वाजवीत जावयाचें. तो बलि तांबूळकाठें येथें नेऊन ठेवितात. या बली-करतां 'तांबूलकाठें' गुरवांना ग्रामस्थांनीं दिलेलें आहे. तो महाबलि महार घेऊन जातो. नंतर परत आल्यावर पूर्वीचे ३६० भाग (उंडया) चटई-वर ठेविलेले असतात ते नदीवर पोंचवावयाचे. हें सर्व कृत्य भूतांपासून पीडा होऊं नये म्हणून केलें जातें.

मान— सर्व खोतांना मिळून दहा नारळ व दहा शेर गूळ द्यावयाचा. शिवाय शेटये यांना दोन नारळ व दोन शेर गूळ, आणि रुंढेकर खोतांना एक नारळ व शेर गूळ देणेंत येतो. बाकी नारळ व गूळ, त्याची खिरापत करून पेठ वाडयांत प्रत्येक घरीं वांटावयाची. खोत मंडळींस नारळ देतात, ते सभेचे [बैठकीचे] म्हणून देणेंत येतात. हें सर्व कृत्य चैत्रमासांत करावयाचें.

आषाढमास—ककसंक्रमण, ग्रहणदिवशीं वाडा कोंडसर बुद्रुक येथील ग्रामजोशी येऊन देवालयांत फलश्रुति सांगतात. त्यांना एक आणा दक्षिणा देणेंत येते.

श्रावणमास— नागपंचमीचे दिवशीं कुंभार मृत्तिकेचा नाग आणून देतो त्याची पूजा भाविक गुरवाकडून केली जाते.

श्रावणी पौर्णिमा—श्रीमहाकालीस पोंवतीं वाहतात त्याबद्दल माहिती —

१. आमंत्रण गुरवाकडून करणेंत येत. तें पेठेंत श्रीचे मंदिरापासून जाखिणीचे स्थानापर्यंत, 'पोंवतीं घालावयास या' असें रस्त्यानें मोठ्यानें सांगत सांगत जाणें.

२. चाकरीचे महारास गुरवाकडून [चाकरीचे] आरोळी देणेंत येते.

३. शेटये, रुंढेकर व बाकी सर्व खोत मंडळी जमल्यावर ह्या कृत्यास सुरवात होते. भाविक गुरव सूर व सनई ही वाजंत्री घेऊन बरोबर यावयाचे. महार ढोल वाजवीत यावयाचा असतो. सर्व मंडळी सरंजामासह निघून प्रथम—

१. श्रीनगरेश्वर [शिवाय तेथील गणपति, नंदी व कीर्तिमुख यांना पोंवतीं वाहावाचीं]. पोंवतें वाहणेपूर्वी प्रत्येक वेळीं प्रत्येक पोंवत्यास सर्व खोत मानकरी मंडळींनीं हात लावावयाचा.

२. श्रीमहालक्ष्मी [शिवाय जैन ब्राह्मण].

३. श्रीरवळनाथ व श्रीपावणाई.

४. श्रीमहाकाली.

५. श्रीमहासरस्वती.

६. सत्ताबाईचें खरें.

७. भराडीण.

८. चवाठा.

९. श्रीजुगादेवी व इतर देवस्थानें श्रीचे आवारांत (पोंवळींत) आहेत त्यांस पोंवतीं वाहावयाचीं.

१०. सर्व खोत मंडळी व जुनगरी वगैरे हक्कदार यांस पोंवतीं देणें.

११. हें पोवतीं वाहाणें व देणेचें काम चाकरीचे गुरवानें करावयाचें.

४. पंचारती लावून श्रीची आरती व गाऱ्हाणें करणेंत येतें.

५. खिरापतीकरितां गुरवाकडून एक नारळ येतो. त्याची खिरापत करून सर्वत्रांस प्रसाद वांटणेंत येतो.

६. खिरापत प्रसाद वांटून झाल्यावर हें कृत्य पूर्ण झालें. या कृत्याला सुरवात दोनप्रहरीं बारा वाजल्यानंतर करणेंत येते.

७. पंचांगांत 'रक्षाबंधन' असें ज्या दिवशीं लिहिलें असतें त्या दिवशीं हें कृत्य व्हावयाचें.

८. पोंवत्यांकरतां लागणारें सूत गुरवांनीं द्यावयाचें.

९. दुसरे दिवशीं गुरव बारा वाड्यांत पोंवतीं घेऊन जातात.

भाद्रपद— १. गणेशचतुर्थी – मृण्मयगणपति वाडा कोंडसर येथील कुंभार यांनीं करून द्यावयाचा. त्याची पूजा चाकरीचे गुरवाकडून होते.

२. ज्येष्ठागौरी—सर्व देवतांना वस्त्रें [मौल्यवान्] नेसविताते.

३. पेठकर मानकरी यांना श्रीचे दास्तानांतून गौरीचे सणाकरतां वस्त्रें [साडया] देणेंत येतात तीं—१ शेट्ये, २ मोरये, ३ जुनगरी, ४ रुमडे, ५ तेली, ६ आडिवरेकर, ७ सोनार, ८ तानवडी व ९ गुरव. गौरीचा उत्सव संपल्यावर हीं वस्त्रें सर्वांनीं परत आणून द्यावयाचीं असतात.

आश्विनमास— श्रीमहाकालीचा उत्साह आश्विन शुा १ पासून नऊ दिवस होतो. दहावे दिवशीं सीमोल्लंघन, अश्मंतकपूजा होते.

१. शुा १ चे दिवशीं घटस्थापनेस व श्रीचे उत्साहास येणेबद्दल सर्व खोतांना आमंत्रण करणेंत येतें.

२. सर्व मानकरी जमल्यावर वाडा कोंडसर येथील ग्रामोपाध्ये हर्डीकर यांनीं घटाची स्थापना व पूजा करावयाची असते. ग्रामोपाध्ये हर्डीकर यांनीं प्रथम पंचगव्य करून तें श्रीदेव नगरेश्वर व श्रीमहाकाली यांचें मंदिर व इतर सर्वत्र प्रोक्षण करून स्थलशुद्धि करावयाची. घटस्थापना श्रीमहाकालीचे शेजारींच करणेंत येते. तेथेंच मानकरी बसावयाचे असतात. त्या मंडळीला पंचगव्य देणेंत येतें. तें प्राशन केल्यावर मंडळी आपापले घरचीं नवरात्र-संबंधीं कृत्यें करण्याकरतां जातात. घटोत्थापनेचे दिवशीं पंचगव्य करून त्यानें सर्व मंदिरें प्रोक्षण केलीं जातात व नंतर घटोत्थापन करणेंत येतें.

३. घटस्थापनेचे वेळीं आंत श्रीजवळ रुंढेकर, शेटये, मोरये, जुनगरी, आडिवरेकर व गुरव हे असतात. इतर सर्व मानकरी बाहेर बसतात. घट कुंभारानें आणून द्यावयाचा असतो.

४. घटावर रोज माळ बांधावी लागते. नंदादीप ठेवावा लागतो.

१. घटपूजा झाल्यावर घटाला व श्रीमहाकालीला नैवेद्य समर्पण केला जातो. यानंतर नित्याप्रमाणें धूपारत व महानैवेद्य समर्पण केले जातात.

यानंतर श्रीचे सुवर्णाचे मुखवटे श्रीमहाकालीचे पुढें स्थापन करणेंत येतात ते—श्रीमहाकाली, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वती, श्रीरवळनाथ याप्रमाणें नीट पद्धतीप्रमाणें मांडून मखर घालून अलंकार, वस्त्रें वगैरेंनीं सुशोभित दिसेल अशी मांडणी केली जाते. श्रीनगरेश्वर याचा चांदीचा मुखवटा, छत्री वगैरे अलंकार व महावस्त्रें नेऊन देव सुशोभित करावयाचे. सर्व देवतांना अलंकार, मुखवटे व वस्त्रें नेसविल्यानंतर गंधपुष्पांनीं पूजा होते;

धूपारती, पंचारती होते व चतुःसीमेच्या बऱ्याचें गाऱ्हाणें करणेंत येतें.

उत्साहांतील नित्य कृत्यांचा क्रम—

१. सूर्यास्तसमयीं धूपारत व्हावयाची.

२. यानंतर श्रीमहाकालीपुढें चौकावर पुराण होतें.

३. पुराणानंतर गायिकांचें व गवयांचें वगैरे गाणें होतें.

४. यानंतर श्रीची पालखी शृंगारून मिरवणूक काढली जाते. पालखींत श्रीस्थानीं श्रीफल स्थापन करणेंत येतें. (पालखींत ठेवणेचा नारळ वाडा पेठ येथील ठि. बागवान यांतून आणावयाचा असतो.) मिरवणूक चालली असतां पालखी ज्या मार्गानें जाते व जेथें थांबते तो क्रम—

श्रीमहाकालीपुढें प्रथम आरती होते. तेथून पालखी श्रीमहालक्ष्मीपुढें थांबते. तेथें आरती झाल्यावर, श्रीरवळनाथाचे मंदिराबाहेर उजवीकडे पोंवळींत थांबते; तेथें आरती झाल्यावर श्रीरवळनाथाचे मागचे बाजूस मुदपाकखान्याचे कोपऱ्यावर; तेथें आरती झाल्यावर श्रीमहाकालीचे मागें मंदिराबाहेर पोंवळींत; तेथें आरती झाल्यावर श्रीचे आवाराचे उत्तर द्वारानें श्रीनगरेश्वर मंदिराकडे जाऊन श्रीनगरेश्वराचे मंदिराबाहेर पोंवळींत मागचे-बाजूस; तेथें आरती झाल्यावर श्रीनगरेश्वराचे उजवे बाजूस मंदिराबाहेर; तेथें आरती झाल्यावर श्रीनगरेश्वरासमोर पिंपळाजवळ; तेथें आरती झाल्यानंतर पुनः परत श्रीमहाकालीचे डावे बाजूचे खिडकीजवळ मंदिराबाहेर; तेथें आरती झाल्यानंतर श्रीमहालक्ष्मीचे मागें मंदिराबाहेर; तेथें आरती झाल्यानंतर श्रीमहालक्ष्मीचे डावे बाजूचे अश्वत्थ वृक्षासमीप; तेथें आरती झाल्यावर श्रीमहासरस्वतीपुढें; तेथें आरती झाल्यावर श्रीमहाकालीसमोर आरती व्हावयाची, याप्रमाणें तेरा ठिकाणचा क्रम आहे.

श्रीमहालक्ष्मीचे मागें 'ब्राह्मणाचें' स्थान आहे. तेथें धूपारत ओंवाळावी लागते. उत्साहांत दररोज तीन वेळां धूपारत होते; दोनप्रहरीं त्या बरोबर पंचारतीहि ध्यावी लागते. (उत्साहांचून नित्य दोनप्रहरीं पंचारता नसते.)

श्रीपुढें आरती म्हणण्याचा मान वाडा नवेदर येथील शांडिल्य गोत्री काळे घराण्याकडे आहे. याबद्दल पारितोषिक म्हणून किंवा बहुमान म्हणून उत्साहाचे शेवटीं श्रीचे दास्तानांतून काळे बुवाला पुतळी देतात.

श्रीचे उत्साहांत मिरवणुकीचे वेळीं रुंढेकर वांकडे खोत हेच प्रामुख्यानें आरत्या म्हणतात.

पहिले दिवशीं श्रीची स्वारी ज्या वेळीं पांच देवतांच्या पुढें जाते तेथें आरतीपूर्वी गाऱ्हाणें व्हावयाचें असतें.

५. भोंवतीनंतर वाडा पेठ येथील श्रीभगवतीचे पुजारी भुते यांचा गोंधळ होतो.

६. गोंधळानंतर नर्तकीचे नाच होतात.

७. नाचानंतर दशावतारांपैकीं एक अवतार *नाटकरूपानें होतो.

८. नाटकानंतर हरिकीर्तन होतें.

९. कीर्तनानंतर शर्कराप्रसाद वांटण्यांत येतो.

हें कृत्य दररोज रात्रीं पहांटेस तीन वाजेपर्यंत चालतें.

१०. उत्साहाचे शेवटचे दिवशीं दोनप्रहरीं महाप्रसाद होतो. ब्राह्मणादि सर्वांचें भोजन व प्रसादग्रहण होतें.

११. रात्रीं उत्साहसमाप्तीनंतर महाद्वारांत शर्कराप्रसाद सर्व आबाल-वृद्धांना वांटण्यांत येतो.

१२. विजयादशमीचे दिवशीं प्रातःकृत्य आटोपल्यानंतर नित्य-पूजा करून नैवेद्य समर्पण करून घटोत्थापन होतें.

घटोत्थापनानंतर घटांतील तीर्थ सर्वांना देणेंत येतें व धान्यें उगवलेलीं असतात तीं प्रसाद म्हणून वांटणेंत येतात.

नंतर कूश्मांडबलि देणेंत येतो. श्रीची आरती व गाऱ्हाणें होते नंतर मुखवटे उतरून भांडारखान्यांत ठेवतात.

अश्मंतकपूजा— विजयादशमीचे दिवशीं दोनप्रहरानंतर व्हावयाची. दोनप्रहरीं पेठेंत, गुरवाकडून सोनें लुटावयास चला, असें आमंत्रण करविणेंत येतें.

सर्व खोत, मानकरी, वाजंत्री, श्रीचे स्वारीच वं सरंजाम, पूजा-साहित्य, गुरव, उपाध्ये हर्डीकर यांचेसह स्वारी निघून अश्मंतक वृक्षाजवळ जाऊन हर्डीकर यांचेकडून पूजा करविणेंत येते. तेथें श्रीफल ठेवून पूजा

---

* ह्या दशावतार नाटकासंबंधीं माहिती परिशिष्टांत दिली आहे.

समाप्त होतांच सर्वजण सुवर्ण घेऊन पुनः समारंभानें मंदिरांत येतात. येथून सर्व देवतांना सुवर्ण वाहण्यांत येतें. नंतर श्रीपुढें हरिकीर्तन होतें. त्यानंतर श्रीचे अलंकार व वस्त्रें उतरून नित्याप्रमाणें सायंकाळचें कृत्य होतें.

१ काळेबुवांचा मान— उत्साहसमाप्तीचे वेळीं पहांटेस घटावर बांधलेल्या माळांपैकीं एक माळ आणून ती काळेबुवा यांचे गळ्यांत घालून दोन नारळ प्रसाद म्हणून देणेंत येतात. नंतर काळेबुवांनीं उदबत्त्या लावून घेऊन त्या सर्व खोत व मानकरी मंडळीला द्यावयाच्या असतात. शेवटची आरती आंतील श्रीपुढील चौकांत होते. नंतर सर्वांच्या पाठवण्या करणेंत येतात त्या—काळेबुवा, कोंडसरकर व नवेदरकर गुरव वाजंत्री, भुते, महार यांना पाठवणी म्हणून नारळ देणेंत येतात. हे नारळ श्रीचे दास्तानांतून घ्यावयाचे असतात.

श्रीचे नवरात्रांत राजपुरकर शेट्ये यांचेकडून सालाबाद जिन्नस येतात त्याबद्दलची माहिती यादी.

श्रीमहाकाली

"यादी जिन्नस श्रीमहाकालीचे नवरात्राचे उत्साहाचें सामान सालाबाद आम्हां शेटयांकडून जात असतें. त्याप्रमाणें हालीं पाठविलें. मिती भाद्रपद वा ३० शके १७६९ गुजारत संभुशेट शेटये हस्तें लखा जाबव याजबरोबर पावले ते तपशील.

१ उदबत्त्या पुडा
८८१ अठरा घान्यें
१० नाडा
८८६॥- ऊद वजन तोळे
८८५ गुलाल वजन
८८६॥- कापूर वजन तोळे
८८३।- दशांग तोळे
८८२॥- धूप वजन
८८॥- बुका वजन

०००६॥ पिंजर वजन तोळे
१ अगरबत्ती
००१ साखर बारीक
०॥- सूत दोन दैसे
३ चंदन वजन ००४।- शेर
००१ खारीक मोठी नग ३८

येणेंप्रमाणें पावले असेत.

नरक चतुर्दशी— या दिवशीं सर्व देवतांना अभ्यंग करून उष्णोदकानें स्नानें घालावयाचीं तीं–

१. शेटये यांनीं श्रीमहाकालीस अभ्यंग करावें.
२. आडिवरेकर यांनीं श्रीमहालक्ष्मीस अभ्यंग करावयाचें.
३. जुनगरी यांनीं श्रीरवळनाथास अभ्यंग करावयाचें.
४. मोरये यांनीं श्रीमहासरस्वतीला अभ्यंग करावयाचें.
५. लिंगाइत गुरव यांनीं श्रीदेव नगरेश्वर यास अभ्यंग करावयाचें.

या प्राचीन वहिवाटीप्रमाणें अरुणोदयीं अभ्यंग करून उष्णोदकानें स्नानें व्हावयाचीं. नंतर नित्यकृत्यें होतात.

कार्तिक मास— श्रीदेव नगरेश्वर मंदिरानजिकचे तुलशीचा विवाह वाडा नवेदर येथील महाजन वत्सगोत्री जोशी यांनीं आपले घरचें सामान आणून विवाह लावणेंत येतो.

२. श्रीमहाकालीमंदिरानजिकचे तुळसीचा विवाह हर्डीकर उपाध्ये हे लावीत असतात. साहित्य श्रीसंस्थानांतून मिळत असतें.

३. तावडे यांची तुळस ही राणे गुरव यांचे दारांसमोरच आहे. या तुळशीचा विवाह हर्डीकर उपाध्ये यांनीं लावावयाचा. या विवाहानंतर पेठवाड्यांतील मानकरी व इतर लोक यांचे येथील तुळसीविवाह हर्डीकर यांनीं पूजा सांगून होतात.

४. कार्तिक शु॥ १५ (त्रिपुरी पौर्णिमा)– श्रीमहाकालीमंदिरानजिक चवाठ्यानजिकचा त्रिपुर वाडा कोणसरकर बेदरकर खोत हे प्रज्वलित

करतात. उजवीकडील त्रिपुर पौष शु॥ १५ ला, राजवाडीचे लोटलीकर हे लाविताते.

५. श्रीदेव रवळनाथ यांचे समोरील त्रिपुर चिंतो गणेश भिडे यांचा, हा त्यांचे वहिवाटदार हरि रामचंद्र जोशी हे लाविताते. या दिवशीं दोन प्रहरीं जोशी यांचे घरीं रवळनाथाला महानैवेद्य समर्पण केला जातो.

६. त्रिपुरावर पणत्या लावावयाच्या त्या कुंभार आणून देत असतो.

मार्गशीर्ष मास— देवांची दिवाळी. या दिवशीं सर्व घरीं गांवांत महानैवेद्य श्रीला अर्पण केला जातो, व ज्याचे त्याचे कुलाचाराप्रमाणें वार्षिक राखण जी असेल ती श्रीपुढें अर्पण केली जाते. ही राखण ठेवणेची वेळ निरनिराळे लोकांची निरनिराळी कार्तिक मासांत किंवा मृगनक्षत्रांत अशी आहे.

१. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा या दिवशीं सर्व खोत मंडळी व मानकरी जमल्यावर चाकरीचे गुरवाकडून सर्व गुरवांस बोलावणें करविणें. शेट्ये वगैरे मानकरी जमल्यावर जामदारखान्यांतून सुवर्णाचे मुखवटे, अलंकार, वस्त्रें काढून त्या त्या देवतांना त्यांचे अलंकार इत्यादि घालून मुखवटे चढवितात.

२. भुते यांनीं येऊन, सर्व मानकरी मंडळीपुढें उभें राहून श्रीपुढें गोंधळ घालणेची परवानगी विचारावयाची, व गोंधळ घातल्यानंतर तो पुरा करणेचे वेळींहि परवानगी घ्यावयाची असते. या वेळीं भुत्यांना बहुमानार्थी शिदोरी व नारळ देणेंत येतो.

३. चाकरीचे गुरवाकडून महार यास बोलावणें. नंतर गुरवानें मानकरी यांची परवानगी घेऊन धूपारती करावयाची.

४. धूपारतीनंतर— वाडा कोणसर बुद्रूक येथील म्हेतरा या घराण्यांतील कुंभारानें एका ताटांत 'शकुन' व दिवा घेऊन यावयाचें, तसेंच चाकरीचे गुरवानेंही एका ताटांत 'शकुन' व दिवा घेऊन यावयाचें व सर्व मानकरी आदिकरून मंडळींनीं श्रीपुढें चौकाशी उभे राहून गाऱ्हाणें घालणेंत येतें. या वेळीं महार पायरीजवळ आलेला असतो त्याचे पुढें श्रीची तरवार नेऊन ठेवणेंत येते. ही तरवार गुरव आणून ठेवीत असतो. ही तरवार महार आपले हातांत घेतो व त्याचेबरोबर सर्व मंडळी सभामंडपांतून पश्चिमे-

कडे बाहेर पडून, मुखशाळेला उजवी घालून श्रीनगरेश्वराचे देवालयीं प्रथमतः जाते. तेथें गाऱ्हाणें होतें. त्यानंतर सर्व श्रीमहालक्ष्मीचे देवालयाकडे समोर येते. तेथें गाऱ्हाणें झाल्यानंतर सर्वांनीं श्रीरवळनाथाचे मंदिरांत जाऊन गाऱ्हाणें व्हावयाचें. त्यानंतर श्रीमहासरस्वतीचे मंदिरांत येऊन गाऱ्हाणें व्हावयाचें. मग भराडणीला विहिरीवरून, नंतर चव्हाट्यावर, गाऱ्हाणें व्हावयाचें. त्यानंतर श्रीमहालक्ष्मीचे मंदिरांत बसलेल्या सर्व मानकरी मंडळींस दिवे ओंवाळणेंत येतात. याबद्दल प्रत्येकीं पाव आणा प्रो देणेंत येतो. एकूण साडेतीन आणे चवदा खोतांचे जमतात. पैकीं ८– गुरव, ८– कुंभार व ८–॥ महार यांस देणेंत येतो.

५. नंतर महारानें श्रीमहासरस्वतीचे उजवे बाजूस, पोंवळींत पिंपळाखालीं, पेठेंतून येतांना नगारखान्याचे समोर, उत्तरेकडे तोंड करून सर्व देव व खोत १४ यांच्याबद्दल 'तोडून घेणें' (तरवार हातांत घेऊन ती पोटावर आपलेच हाताने मारून घेणें). ह्या प्रत्येक तोडण्याचे वेळीं गाऱ्हाणें व्हावयाचें. या कृत्याबद्दल महार यास देणगी दोन नारळ व शिदोऱ्या दोन देणेंत येतात.

६. श्रीकालिकावाडीचे लोकांकडून एक कापडाची प्रभावळ (तोरण) येत असते. ती श्रीचे मुखवटे लाविल्याबरोबर बांधणेंत येते. ही प्रभावळ गुरवानें परीटाजवळ देऊन धुवून आणून ठेवावययाची असते. याबद्दल परीट यास नारळ एक व शिदोरी देतात.

७. या दिवशीं श्रीमहाकाली संस्थानाकडून श्रीकालिका देवीला ओटी (खण, नारळ, तांदूळ, सुपारी, हळकुंड) पाठविणेची वहिवाट आहे.

८. या दिवशीं नैवेद्य समर्पण झाल्यानंतर श्रीरवळनाथापुढें येणारें उत्पन्न नारळ, तांदूळ, सुपारी, पैसे वगैरे सर्व 'जें गुरवास नेहमीं हक्कानें मिळतें,' तें जुनगरा यास मिळावयाचें.

९. ग्रामस्थ लोक श्रीस नैवेद्य व नारळ आणून ठेवितात, त्यांपैकीं नारळ प्रसाद म्हणून ज्याचा त्यास परत देणेंत येतो.

१०. महार 'तोडून घेतो' त्यास 'वारी सोडविणें' असें म्हणतात. या दिवशीं महारास उपवास करावा लागतो.

११. खोतांना दिवे ओंवाळून झाल्यावर वाडा पेठ येथें घरोघर दिवा

फिरवून आणावयाचा. नंतर कुंभार तो दिवा घेऊन वाडा कोंडसर,–नवेदर,–वेत्यें,–रुंढें येथें जातो.

१२. **मार्गशीर्षबली**—एक पायली तांदुळाचा भात शिजवून तो एका परडींत घालून त्यावर *जावडें घालावयाचें. त्यांत एक तेलांत भिजविलेला कांकडा नारळाचे एका करवंटींत (खोबरें असलेल्या) ठेवून दुसरे करवंटींतील खोबऱ्याची खिरापत बळीवर ठेवून, तो बळी गुरवानें घेऊन पांचही देवांपुढें नेऊन गाऱ्हाणें करणेंत येतें व राणे गुरवाकडून 'तांबूळ काढ्यांत' तो नेऊन पोंचविणेंत येतो. हा बळी नेणारा गुरव आपले अंगावरून अंगारा व पानसुपारी ओंवाळून टाकीत असतो. हा बळी चतुःसीमेंतील पीडापरिहारार्थ काढला जातो.

पौष शु॥ १५ ला श्रीभगवतीची जत्रा असते. त्या दिवशीं सर्व देवांना पोषाख देऊन मुखवटे लाविणेंत येतात. हें कृत्य भुत्यांना सुवेर किंवा सुतक असेल त्या वेळीं मागाहूनहि करणेंत येतें.

पौषमास—गांवगुंडी

१. गांवगुंडी ही मार्गशीर्ष किंवा पौष मासांत व्हावयाची. चातुर्मासांत बहुधा होत नाहीं. या वेळची राखण चौदा वाड्यांचे चौदा खोत एकत्र जमून एकमतानें ठेवावयाची असते. यांपैकीं कोणतेहि खोतास सुवेरसुतक असतां हें कृत्य करण्यास अडचण येते. वेळप्रसंगीं अडचणीमुळें दोन तीन सालांत सुद्धां असा दिवस सांपडत नाहीं. अशा स्थितींत श्रीचा अंगप्रसादी कौल लावून गांवगुंडी करावयाची, मग कोणास वरील अडचण असल्यास चालते. त्यांतहि गांवठा (म्ह. विनंती, कौल, गाऱ्हाणें करण्याचा अधिकारी) गुरव, शेट्ये, रुंढेकर हे मोकळे असलेच पाहिजेत.

२. गांवगुंडीकरितां दिनशुद्धि पाहावयाची असते.

३. दिनशुद्धि ठरवून त्याप्रमाणें प्रत्येक वाडयाचे खोताकडे त्या वाडयाचे गुरवानें जाऊन खोताचा हुकूम घेऊन दर घरीं ०।१ तांदूळ

---

* गुलालाचें पाणी.

वसूल करून श्रीचे देवळांत गांवगुंडीचे पूर्वदिवशीं आणून खोताचे स्वाधीन करून हिशोब द्यावयाचा. कुणबी वगैरे लोकांकडे दर घरटी अर्धा आणा वसूल घ्यावयाचा असतो. तो वसूल वाडेनिहाय खोतांनीं आपापला करून समयास हजर करावयाचा. गांवगुंडीचे पूर्वी आठ दिवस वरील सर्व कामगिरी करावयाची.

४. भोजनाचे दिवशीं वडे घाटले व भाजीपाला यांना लागणारें पीठ गुरव यांनीं दोन्ही पथकांनीं निमेनिम तांदूळ नेऊन दळून आणून द्यावयाचें.

५. पूर्वदिवशीं तुरीची डाळ, चिंच, तेल, तूप, भाजीपाला, दूधदुभतें सर्व पाहून तयारी करून ठेवावयाची. राखणेस नारळ अकरा, मांजरपाट कापड पातळाकरितां, चिटें २, गुळ, मीठ, मिरची वगैरे सर्व सामानाची तयारी करणें. भोजनासाठीं लागणाऱ्या पत्रावळी दोन्ही पथकांचे गुरवांनीं द्यावयाच्या. भात उपसणेकरितां डाळी, टोपली, सूप, रोवळी वगैरे महारानें द्यावयाचें असतें. त्याबद्दल महारास कांहीं देत नाहींत. स्वयंपाकी पाहावयाचा. श्रीनगरेश्वराचें देऊळ सारवून पापडींत सडा घालून ठेवावयाचा.

६. गांवगुंडी नेमलेले दिवसाबद्दल वाडेगत खोतास गुरवाकडून सूचन करावयाची. वाडा नवेदर येथील ग्रामोपाध्ये दांत्ये यांना सांगून नवेदर वाडयांत, कोणसर वाड्याचे ग्रामोपाध्ये हर्डीकर यांना सांगून दुतडी कोणसरांत त्या त्या वाडयाचे खोतांचे परवानगीने आमंत्रण करवावयाचें. इतर वाडयाचे खोतांनीं शिरस्त्याप्रमाणें आपापले वाड्यांत आमंत्रण करावयाचें. हें पूर्वदिवशीं झालें पाहिजे.

७. पूर्वदिवशीं लांकडें फोडून आणून ठेवणें व भांडीं घासून ठेवावयाचीं.

८. गांवगुंडीचे दिवशीं सकाळीं पूर्वतयारीकरतां नवेदर व कोणसर दुतडीचे खोतांपैकीं एकानें देवालयीं जाऊन, गुरवाकडून भाज्या चिरणें, डाळ, तांदूळ नीट करवून घेणें वगैरे तयारी ठेवावी.

९. आचाऱ्याकडून दोनप्रहरीं ११ वाजतां स्वयंपाक तयार होईल अशी तजवीज ठेवून गुरवाकडून पत्रावळी आणवून नैवेद्य वाढणें. आणि दाखविणें तें येणेंप्रमाणें–१ श्रीमहाकाली, २ महालक्ष्मी, ३ महासरस्वती, ४ रवळनाथ, ५ नगरेश्वर, ६ गणपति, ७ सत्येश्वर, ८ बाळेश्वर, ९ शक्रेश्वर, १० काळकाई, ११ भराडीण, १२ भगवती असे हर्डीकर यांचेकडून समर्पण

केले जातात. याच वेळीं लक्ष्मीनारायणाकरितां एक शेर तांदूळ व डाळ असा शिधा भराडकर खोतांजवळ देतात. प्रत्येक नैवेद्याजवळ पाव आणा दक्षिणा व एक सुपारी ठेवावयाची. नंतर ब्राह्मणभोजनाचे वेळीं हर्डीकर हे उदक सोडतात.

१०. ब्राह्मणभोजनानंतर इतर मंडळी भोजनास बसावयाची. त्या वेळीं अबदागीरवाले दोन, पालखीचे भोई चार, तासेकरी भुता एक, निशाणवाला परीट एक, हुदा रुमालवाला न्हावी एक, इतके इसम भोजनाचे असतात. नवेदरचे लिंगाइत यांना पानें [ठाव] देणें.

११. प्रसंगीं भणंग भिकारी, अतिथी, गोसावी, पांथस्थ यांस सवडीप्रमाणें अन्न देतात.

१२. भोजनाचे दुसरे पंक्तीनंतर राहिलेले सर्व अन्नासह भांडीं श्रीनगरेश्वराचे बाहेरील सभामंडपांत आणून ठेवावयाचीं, व भविक गुरवांनीं महार यास सालाबादप्रमाणें पानें [ठाव] देऊन उरलेलें अन्न सर्वांनीं यथाविभाग वांटून घ्यावयाचें.

१३. गांवगुंडीचे जमेची व खर्चाची पक्की यादी करून त्यांत जी तूट येईल ती यथाविभाग सर्व खोतांनीं आपले पदरची भरावयाची असते. या वेळीं पाणेरकरांनीं चार आणे व पेटकर खोतांनीं १॥ रुपया द्यावयाचा. अधिक वांटणीस आला तरी द्यावयाचा नाहीं, व इतरांनीं मागावयाचा नाहीं.

येणेंप्रमाणें अस्तमानपर्यंतचें कृत्य संपवून धूपारतीनंतर राखण ठेवावयाची असते. ती सर्वांनीं ठेवावयाची.

१. गुरव श्रीसन्मुख शेंडी करून दोन हातांत नारळ घेतो व श्रीचे उजवीकडे आपले उजवे हाताकडून कुळकर्णी यांजपासून आरंभ करून क्रमानें सर्वांचे–खोतांचे–हातांत तो नारळ दिल्यासारखा करून पुनः घेऊन दुसऱ्याचे हातांत दिल्यासारखा करणें. याप्रमाणें सर्व खोतांचेकडून घेऊन गुरव तो श्रीपुढें अर्पण करतो. या वेळीं सर्व खोतांनीं उभें राहावयाचें असतें. या प्रसंगीं ढोल नसतात. फक्त भविक गुरव यांचीं वाजंत्र वाजतात.

१. प्रथमतः श्रीमहाकालीचे देवळास उजवी घालून श्रीदेव नगरेश्वराकडे एक नारळ व पांचहाती पंचा ठेवून गाऱ्हाणें करावयाचें.

१. नंतर श्रीदेवी महालक्ष्मीपुढें येऊन दोन नारळ व एक सोळा हाती पातळ ठेवून गाऱ्हाणें करावयाचें. (एक नारळ महालक्ष्मीपुढें व एक जैन ब्राह्मणास भिळून दोन.)

१. नंतर श्रीदेव रवळनाथ यांचेपुढें जाऊन तेथें एक पंचा पांच-हाती व नारळ एक ठेवावयाचा. नंतर तेथीलच पावणाईचे खऱ्यास एक नारळ ठेवून गाऱ्हाणें करावयाचें.

१. नंतर श्रीमहाकालीपुढें येऊन एक सोळा हाती पातळ व एक नारळ श्रीपुढें अर्पण करून नंतर तेथें असलेले आकारी पुरुषास एक नारळ ठेवून गाऱ्हाणें करावयाचें.

१. नंतर श्रीमहासरस्वतीपुढें येऊन एक चीट व नारळ ठेवून गाऱ्हाणें करावयाचें.

१. नंतर श्रीसत्ताबाईपुढें एक रुमाल व एक नारळ ठेवून गाऱ्हाणें करणें व नारळ फोडणें.

१. नंतर आडाचे कोंपऱ्यावर सिंहमुख आहे तेथें जाऊन भराडिणीस एक रुमाल व एक नारळ ठेवून गाऱ्हाणें करावयाचें.

१. नंतर चवाट्यापुढें जाऊन एक नारळ ठेवून गाऱ्हाणें करून नारळ फोडावयाचा.

१. नंतर श्रीजुगाबाई पुढें एक चीट ठेवावयाचें. येथें नारळ व गाऱ्हाणें नाहीं.

यानंतर श्रीमहाकालीस कौली "गांवगुंडी मानली काय" म्हणून विनंती करावयाची व ती झाल्यावर चतुःसीमेचे बऱ्याचा कौल घ्यावयाचा. नंतर श्रीमहालक्ष्मी, श्रीमहाकाली, श्रीरवळनाथ, श्रीमहासरस्वती, भराडीण वगैरे यांस अर्पण केलेले नारळ तेथेंच फोडून ते चोकावर आणून खिरापत करून सर्वांस वांटावयाची.

नंतर श्रीचरणीं नमन करून रजा घ्यावयाची.

१. श्रीमहाकालीच्या राखण ठेविलेल्या पातळाचे सारखे १४ रुमाल करून ते चवदा खोतांस मान म्हणून प्रसाद द्यावयाचा.

१. देवतांस राखणेच्या ठेविलेल्या वस्त्रांपैकीं (महाकाली, महालक्ष्मी यांच्या पातळांचे रुमाल करून) बाकी कापड शिल्लक राहील तें व चिटें देव-

स्थानांत ठेवावयाचीं. श्रीनगरेश्वराला अर्पण केलेलें वस्त्र त्या देवाच्या लिंगाइत गुरवास मिळतें.

फाल्गुनमास—श्रीमहाकालीचा होलिकोत्सव. फाल्गुन वद्य १

१. श्रीदेव सत्येश्वर याचा होलिकोत्सव झाल्यावांचून श्रीमहाकालीचा होलिकोत्सव होत नाहीं, अशी प्राचीनपासून वहिवाट आहे. परंतु हल्लीं म्ह. शक १८५३-५४ सालीं श्रीदेव सत्येश्वर यांचीं सालबाद सर्व कृत्यें ग्रामस्थांत आपसांत मानपानासंबंधीं तंटे उत्पन्न झाल्यामुळें राहिलीं. तरी या सालीं श्रीमहाकालीचा होलिकोत्सव सालाबादप्रमाणें झाला.

२. श्रीमहाकालीपुढें होणारे होलिकोत्सवाचे व्यवस्थेची यादी प्राचीन आहे त्याप्रमाणें क्रमानें ज्या वाड्यांतील होळी असेल तेथून ती आणण्यांत येते. हें कृत्य फाल्गुन शुा ११ पासून फाल्गुन शुा १५ पर्यंत पांच दिवस व्हावयाचें. ही होळी पोफळीची करावयाची असते. पेठकर खेळे यांनीं पट्टी करून एकादशीला एक, द्वादशीला दोन, त्रयोदशीला तीन, चतुर्दशीला चार, पौर्णिमेला पांच याप्रमाणें पोफळी आणून त्या खेळविणेंत येतात. यांना 'ओंडा' असें म्हणतात.

३. फाल्गुन ११ रात्रीं सर्व खोत व मानकरी श्रीचे मंदिरांत जमून श्रीकडे अंगप्रसादी कौल लावून शिमग्याचें कृत्य सुरू करणेबद्दल परवानगी मागणेंत येते. ती मिळाल्यावर चतुःसीमेच्या बऱ्याचा कौल घेणेंत येतो.

४. रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास चाकरीचे महार ढोल घेऊन श्रीच सभामंडपांत येऊन निरनिराळे पद्धतीनें पांच वेळ ढोल वाजवितात. नंतर सर्व महार, खोत, वाजंत्री गुरव असे समागमें जाऊन सर्व देवतांना ठराविक क्रमाप्रमाणें गुलाल वहातात. शेवटीं चवाट्यावर गुलाल वहाणेंत येतो. या वेळीं सर्वत्रांनीं महाशब्द करावयाचा.

५. सर्व खोत मंडळीपुढें महारानीं येऊन 'होळी कोणते गांवची' याप्रमाणें विचारपूस करणेंत येते. पुढें महार हे ढोल वाजवीत, पेठकर ओंडा खेळवीत जखिणीचे स्थलापर्यंत जातात.

६. ११ दोनप्रहरीं कोणसर खुर्द, नवेदर व रुंढें येथील कुणबी मानकरी आहेत ते मंदिरांत येतात. त्यांना श्रीचे दास्तानपैकीं 'शिमग्याचे पेहरावाकरितां' प्रत्येक वाड्यांत पांच याप्रमाणें लुगडीं बहुमानार्थी देणेंत येतात.

७. फाल्गुन १५ ला रात्रीं पांच पोफळी आणून त्या खेळे यांनीं घेऊन खेळवावयाच्या.

८. वद्य १ सूर्योदयापूर्वी प्रत्येक वाडयाचे चाकरीचे महारानें ढोल घेऊन आपापले वाडयाचे खोताकडे जाऊन होळीला येणेबद्दल आमंत्रण कले जातें. खोताकडून ढोलाची पूजा करून महारास एक नारळ देणेंत येतो.

९. वद्य १चे दिवशीं दोनप्रहरीं सर्व मानकरी श्रीचे मंदिरांत जमल्यावर गुरवाकडून महारांस बोलाविणेंत येतें. मानकरी, महार, वाजंत्री, तासेकरी, निशाणवाले, अबदागीरवाले, सुतार, हुदारुमाळलवाला न्हावी, एवढी मंडळी जमल्यावर श्रीची धूपारत करणेंत येते व सर्व मंडळीवर गुलाल फेकणेंत येतो. नंतर गाऱ्हाणें करणेंत येतें ते.—

१. 'तुझी होळी आणणेकरतां आज.....वाडयांत, तुझ्या सरंजामासुद्धां जात आहों तरी हें कार्य तूं निर्विघ्नपणें तडीला ने. कज्याकफावत होऊं देऊं नको. याबद्दल राखण घरून बरें कर.'

१०. ज्या वेळीं पांच वाडयांतील होळी आणावयाची असते त्या वेळीं 'जामशेंडा' यास जातांना उजवी घालून जावयाचें व येतांना उजवी घालून यावयाचें असा नियम आहे.

११. होळी कोणतेही वाडयांतील असली तरी ती ओझरावर आल्यावांचून खेळविणेस सुरवात व्हावयाची नाहीं.

१२. ज्या वाडयाची होळी असेल त्या वाडयांतील उत्तम पोफळ असेल ती मालकाचेच संमतीनें पसंत करावयाची व तिचे मुळावर गुलाल टाकावयाचा व ती पोफळ मुळासकट खणून काढून सुताराकडून नीट अंगाला न लागे अशी तासविणेंत येते. नंतर ती घेऊन सर्व मंडळी सरंजामसुद्धां ओझरावर यावयाचे.

१३. ओझरावर होळीचे पोफळीला, ती मोडूं नये व फुटूं नये म्हणून, कोंडयाच्या काठ्या काथ्याच्या दोरीनें बांधून मजबूत करणेंत येते व मंडळी होळी घेऊन खेळवीत, समारंभानें, बांधवाटेनें, श्रीमहाकालीकडे बुंधा करून श्रीमंदिरांत येतात व सभामंडपांत जुना चव्हाटा म्हणून कोनाडा आहे त्यांत तो बुंधा ठेवावा लागतो. बुंध्याकडे चांभारांनीं घरावयाचे असते. तेथून

होलिकापूजनम्



[पृ. ३९

होलिकेचा मंदिरप्रवेश

[

होळी नवीन चवाट्यावर ठेवावयाची व तेथून महाद्वारानें बाहेर काढून, उभी करण्याचे स्थळीं नणेंत येते.

१४. महारानें होळी स्थलावर आल्यावर परिटाकडे जाऊन 'निशाण' आणण्यास सांगावयाचे व परीट निशाण घेऊन घेतो त्याचेबरोबर यावयाचें असतें. तें निशाण होळीला बांधून ती उभी करतात.

१५. होळी उभी करण्याचे ठिकाणीं जुनगरी यांनीं खळगा तयार करून ठेवावयाचा.

१६. होळी उभी केल्यावर तिला नारळाचें तोरण बांधणेंत येतें. तें कोणी गुरव वर चढून काढून नारळ फोडून करवंट्या खालीं खेळे मंडळींत व खोत मंडळींत टाकणेची वहिवाट आहे.

१७. उभ्या राहिलेल्या होळीची हर्डीकर यांचेकडून पूजा होते व अग्नि-संस्कार होतो.

१८. नारळ फोडून खिरापत करून ती घोतरांतच घेऊन वांटण्यांत येतें. ताट घेत नाहींत.

१९. होळी 'मांडावर' आल्यावर ढोल व अबदागीर जड झालें तर 'देवता आली' असें समजण्यांत येतें.

२०. सर्वांनीं श्रीपुढें येऊन गाऱ्हाणें करणेंत येतें तें— "आम्हीं सर्वांनीं होळीचें सर्व कृत्य सालाबादप्रमाणें पुरें केलें हें तुज अर्पण असो."

२१. नवस देणें, गाऱ्हाणें करणें असेल तें यानंतर करावयाचें.

२२. नवसाचे नारळ जुनगरी यांनीं जमा करावयाचे. नवसाचें येणारें उत्पन्न खेळे यांचें असतें. दास्तानीं जमा व्हावयाचें नाहीं.

२३. गाऱ्हाणें झाल्यावर श्रीची धूपारत करण्यांत येते.

२४. धूपारतीनंतर खोतांस मानाचे नारळ देणेंत येतात ते—

१ कोणसर बुद्रुक	१ कोंभे	१ लिंगाइत कोणसर
१ कोणसर खुर्द	१ राजवाडी	१ लिंगाइत नवेदर
१ नवेदर	१ मोघेरें	१ लिंगाइत–कालिकावाडी
२ रुंढें	१ भराडें	१ सरखोत
७ पेठ	१ पाणेरें	२५

१ कालिकावाडी १ तिवरें
१ वेत्यें १ वाडी खुर्द

सदरचे पंचवीस नारळ गुरवाकडून वांटणेंसाठीं येतात.

२५. नारळ वांटल्यावर पेठकर खेळे, सर्व खोतांना खांद्यावर घेऊन नाचवीत असत. अलीकडे नाहीं.

२६. नाचवणीबद्दल पोस्त म्हणून आठ आणे श्रीचे दास्तानांतून खेळे यांना देतात.

२७. होळीचे दिवशीं सकाळीं गुरव, शेटये व महार असे रुंढेकर खोतांकडे जाऊन त्यांना आम्रपल्लवांनीं भूषित करून घेऊन येण.

२८. खादाड म्हणून एक सोंग करणेंत येतें. हें सोंग जानू तेली या घराण्याकडे आहे.

२९. रंगपंचमीचे दिवसापर्यंत, पेटकर खेळे मान वसूल करून, व खेळेपण वसूल करून घेतात. सर्वांनीं समारंभानें होळदेवापुढें जाऊन नारळ ठेवून गाऱ्हाणीं करणेंत येतात. नारळ जुनगरी यांनी जमा करावयाचे. एका ताह्मनांत गुलालाचें पाणी करून तें सर्व देवांवर आम्रपल्लवानें प्रोक्षिलें जातें. या दिवशीं होळदेवापुढें समई लावावयाची असते. मंडळीवर गुलालपाणी प्रोक्षण करतात.याला शिंपणें म्हणतात.नारळाच्या खिरापतीचा प्रसाद वांटण्यांत येतो.

३०. याच दिवशीं महारांनीं खोतांची परवानगी घेऊन सती म्हणून एक सोंग करून तें गांवांतून फिरवून आणावयाचें असतें.

३१. यानंतर श्रीला अभ्यंग करून उष्णोदकानें स्नान घालून नित्य कृत्य होतें.

'यादी स्मरणार्थ श्रीमहाकालीची होळी व नारळ सालाबाद द्यावे लागतात त्याची. होळी, ज्या वाड्याची पाळी येईल त्या वाड्यांतील नारळ २५ व होळी घ्यावी ताा शके १६९६ होळी वाडे गतसालाबाद पडते ते—
वाडे सहा.

१ कोणसर बुद्रुक व खुर्द मिळोन २ रुंढें.
३ रुंढ्यानंतर कालिकावाडी ४ त्यानंतर मोघरें
५ मोघऱ्यानंतर भराडें ६ भराड्यानंतर पाणेरें

श्रीमहाकालीची मिरवणूक



[पृ. ४१

१६ श्रीमहाकालीस रोख नारळ मठ व मठाची मळी. तपशील:—

४ विठ्ठल गोविंद	४ गणेश राम
२ मठ २ मळीपैकीं	२ मठ २ मळी
२ गोविंद हरी मठापैकीं	२ त्र्यंबक विठ्ठल
३ त्र्यंबक गणेश	१ गणेशभट नाटेकर
१ मळी २ मठ	

पंचवीस नारळ घ्यावे ते—तपशील—

१ कोणसर बुद्रक	१ वेर्त्ये	१ कुळकर्णी
१ कोणसर खुर्द	१ कोंमें	१ सर खोत
१ नवेदर	१ राजवाडी	१ पोतदार
२ रुंढे	१ मोघरें	१ वाजंत्री गुरव कोंडसर
१ खोत १ खेळे	१ भराडें	१ कुळकर्णी व गुरव यांचा
७ पेठ	१ पाणेरें	कज्या तो गुरव
१ खोत ६ खेळे	१ तिवरें	

२५

श्रीचे स्वारीची व्यवस्था

श्रीची स्वारी गांवांत फिरावयास जाते ती साधारणपणें एक वर्ष आड करून जाते. ती वसंतऋतूंत जाणेची पूर्वापार वहिवाट आहे. रुसून वगैरे कारणानें जाणें होतें तें कोणतेही महिन्यांत श्रीचा हुकूम होईल त्याप्रमाणें होतें.

१. पालखीसाठीं स्वारीचा दिवस पंचांगशुद्धि पाहून ठरवावयाचा.

२. पालखी बाहेर काढण्याचा दिवस नेमून त्याबद्दल आगाऊ तजवीज करावयाची ती.

१ सर्व खोतांस (१४) निमंत्रण चिठ्या पाठवावयाच्या.

१ वाजंत्री लिंगाइत वाडा-नवेदर, कोंडसर, कालिकावाडी, भविक गुरव यांस सूचना द्यावयाची.

१ भोई, अबदागीरवाले, परीट, न्हावी, तासेकरी, महार यांस सूचना द्यावयाची.

१ पालखी दुरुस्त नादुरुस्त आहे अगर कसें हें पाहावयाचें.

१ पालखी निघावयाची त्या दिवशींचा नैवेद्य लवकर करणेस ब्राह्मणास सूचना देणें.

१ खोत मंडळीचे भोजनाची तजवीज. दूध, दहीं वगैरे आचारीसुद्धां.

३. जमले दिवशीं सकाळीं १० वाजतां मंडळी देवळांत आल्यावर, गुरवाकडून. पेटकर मंडळीस 'स्वारीबरोबर चला,' म्हणून ताकीद द्यावयाची. भगवतीचे देवळापर्यंत गुरव ताकीद करीत असतो. नंतर श्रीमहासरस्वतीचे देवळांत पालखी ठेवून (सजवून तयार करून) तेथें श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती, श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ, यांचे सोन्याचे मुखवटे लावून अलंकार घालावयाचे. श्रीनगरेश्वराचा चांदीचा मुखवटा लावावयाचा. जैन ब्राह्मणाचा तांब्याचा टोप पालखींत ठेवावयाचा व एक नारळ ठेवावयाचा. (हा नारळ ठि० बागवानपैकीं). यानंतर श्रीमहाकालीकडे स्वारीची आज्ञा घ्यावयाची, त्यानंतर सदर कामाबद्दल श्रीमहालक्ष्मीचा हुकूम घ्यावयाचा तो जाहल्यावर बऱ्याचा चतुःसीमेचा कौल घ्यावयाचा. नंतर धूपारत घालून गाऱ्हाणें करून स्वारी बाहेर पडावयाची.

४. जिकडे स्वारी जाईल त्या दिशेकडे श्रीमहाकाली वगैरे चार देवतांचीं तोंडें होतील अशी पालखी धरावयाची.

५. पालखीबरोबर सरंजाम घेणें तो—

२ मंडळीस बसावयास जाजमें दोन २.

१ पालखीखालीं घालाययास सतरंजी एक १.

४ खिरापतीस ताटें २, कोयत्या २.

२ मशाली दोन २.

० पूजासाहित्य, घांट, धुपाटणें, धूप, पिंजर, हळद, गंध, फुलें, अक्षता, पंचारती वगैरे.

६. स्वारीचा बंदोबस्त होणेसाठीं तजवीज—

१ पालखीचे खुराजवळ जबाबदार गुरव दोन ठेवावयाचे.

१ अगदीं पुढें ढोल घेऊन महारांनीं चालावें; त्यांचेमागें भालदार; त्यांचेमागें अबदागीर, निशाण, हुदारुमाल, वाजंत्री, तासेकरी व त्यांचेमागें पालखी, व पालखीचेमागें मंडळी.

अशी तजवीज ठेविल्यास पालखी सुरळीत जाते येते.

७. पालखीबरोबरचे इसम, नोकर वगैरे सर्वांनीं त्या दिवशीं कैफ करण्याची मनाई आहे. त्यासाठीं पोस्तास द्यावयाचें नाहीं.

८. पालखींत येणारे नारळ व तांदूळ, जागोजाग हिशोब ठेवून श्रीमहाकालीचे देवळांत पोंचते करणेची तजवीज करणें.

९. सदर कामासाठीं त्या त्या वाड्याचे खोताची मदत घ्यावयाची.

१०. देवापुढें फळफळावळ येते ती सर्वांस मिळेल अशी तजवीज करून ओंटी घेऊन व दर्शनास येणारे भक्त यांस त्याजबद्दल योग्य ती मदत, म्हणजे त्यांची पूजा, ओंटी भरणें वगैरे कृत्य, नीट होऊं देणें व गाऱ्हाणें घालून आंगारा देणें. याची व्यवस्था खोत मंडळीनें दक्षतेनें करावयाची. कोणाचा अपमान होतां कामा नये.

११. पालखी स्थानास गेल्यावर सतरंजी आंथरून त्याजवर पालखी ठेवावयाची. नंतर आंतील मुखवटे स्थानांत लावणेचें काम करून धूपारत घालावयाची. नंतर ओंट्या येतात; त्यांचीं गाऱ्हाणीं करावयाचीं. नंतर पालखी उचलतांना गाऱ्हाणें सर्वांनीं करून पालखी उचलावयाची. त्यापूर्वी तेथें नारळाचीं खिरापत करून वांटावयाची. (हें काम कुळकर्णी हजर असल्यास त्यांनीं करावयाचें असतें.)

१२. पालखी पांच वाड्याकडे गेल्यास ओझरावरून पुढें जामशेंड्यास उजवी घालून अशी जाते. पूर्वापार जे मार्ग ठरले आहेत त्यांनीं पालखी जाते व येते.

१३. पालखी पेठेंत आल्यावर ती ओझरावर जाते. तेथें पिंपळाचे पारावर तेथील तेली घोंगडी आंथरतात. त्याजवर पालखी उतरावयाची. नंतर धूपारत घालावयाची. नंतर प्रथमतः बागवान ठिकाणांतून ओंटी येते त्यांचें गाऱ्हाणें करून, त्या नारळाची खिरापत करावयाची. ओटी न आल्यास खिरापत पदरचे नारळाची करावयाची व ती वांटावयाची त्यानंतर आणखी ओंट्या आल्यास तीं गाऱ्हाणीं करावयाचीं. गाऱ्हाण्यांचा अनुक्रम पहिलें गाऱ्हाणें केव्हांहि बागवानाचें करावयाचें. त्यामागून इतरांचे ओंट्यांचीं गाऱ्हाणीं होऊन पालखी निघते.

१४. ओझरावरून पालखी देवळांत येते. ती पेठेंतून दगडी पाखाडीनें

येते. वाटेंत ओट्या येतात त्यांचीं गाऱ्हाणीं करावयाची असतात. पालखी देवळांत आल्यावर मुखवट्यांपुढें पंचारती ओंवळावयाची. मुखवटे उतरून धूपारत करावयाची. नंतर शिधा द्यावयाचा तो प्रत्येक इसमास शेर ८८१ प्रमाणें.

१ वाजंत्री-लिंगाइत १ शिंगवाला, कर्णेवाला, तासेकरी.
कोणसर, नवेदर, काळकावाडी येथील. लिंगाईत गुरव वाजंत्री महार ढोलवाले.

१ वाजंत्री-भाविक गुरव. १ भालदार, चोपदार,

१ चवरीवाला, भालेकरी, हुदा रुमालवाला न्हावी. निशाणवाले.

१ पोतदार (सोनार), सुतार, भोई (तेली), अबदागीरवाले.

१ मशालजी.

भोई व्यक्ति आठ असतात. स्वारी लांबची असल्यास दुहेरी संच असतो. त्या मानानें शिधा द्यावयाचा. भोई, तेली यांचीं दोन पथकें आहेत. वरचे पथकाचे त्यांनीं पालखीचे पुढचे बाजूस लागावयाचें व खालचे पथकाचे तेली यांनीं मागें लागावयाचें.

१५. जमलेले नारळांतून भोई यांस नारळ चार, अबदागीरवाले यांस नारळ एक बहुमानाचा देणेची वहिवाट आहे. खोत मंडळीस प्रसाद म्हणून नारळ वांटतात.

१६. नंतर स्वारी मानली कीं नाहीं, याचा कौल घेऊन बऱ्याचा कौल घेणें. नंतर पालखींतील नारळाची खिरापत करून वांटणें व दागदागिने आणि मुखवटे खजिन्यांत ठेवावयाचे.

१७. शिल्लक राहिलेले नारळ व तांदूळ यांची विक्री करून खजिन्यास पैसा जमा करावयाचा.

१८. 'मिा चैत्र वा १३ शके १८५१ रोजीं खांबाचे बावळेंत पालखी गेल्या वेळीं वेत्यांचे सीमेपासून स्थानांपर्यंत वेतकर यांनीं पालखीस खांदा दिला व स्थानावरून परत वेत्यांचे सीमेवर पालखी आणून पोंचविली, त्याबद्दल त्यांस एक मानाचा नारळ वहिवाटीप्रमाणें दिला.'

श्रीबाळेश्वर

१ श्रीसत्येश्वराचे स्थापनेपूर्वी तेथें श्रीबाळेश्वराचें स्वयंभू स्थान होतें. तो देव आकारानें स्थापित लिंगापेक्षां लहान म्हणून त्याला बाळेश्वर हें नांव प्राप्त झालें.

१ श्रीदेव बाळेश्वर याचें प्रकटीकरण शक १२०० पूर्वी झालें आहे. हें लिंग सुमारें सात अंगुळें उंच आहे. त्याचीं शकलें झालेलीं आहेत.तीं एकत्र राहणेकरतां एक तांब्याचा टोप वर घालणेंत येत असतो. शक १७३७ सालीं या स्वयंभू लिंगावर कळशी पडून त्याचीं शकलें झाल्याची माहिती मिळते. त्या वेळीं ग्रामस्थांनीं अद्‌भुतशांति केली—

१ श्रीदेव बाळेश्वर–मासाभिषेकाबद्दल नोंद आहे ती.

शक १७५० तिसा अशरीन मयातैन व अलफ. सन १८२८.

६ श्रीदेव बाळेश्वर मासाभिषेक–कर्दे रामचंद्र भट गोरे.

श्रीदेव सत्येश्वर

श्रीमहाकालीच्या स्थापनेला(पृ.१३।१४पहा)जें कारण झालें तेंच कारण त्या वेळीं श्रीसत्येश्वराचे स्थापनेला झालें. ही स्थापना शके १२५० चे सुमारास झाली आहे. हें लिंग विभिन्न झालें आहे. उज्जैनसारख्या ठिकाणचा उत्तम बाण आणवून त्या ठिकाणीं त्याची प्रतिष्ठा करणें ग्रामसंस्थांचें कर्तव्य आहे.

कदम तावड्यांचा नाश करण्याला ज्या मसलती 'मंडलीक व परांजपे यांनीं दिल्या त्या सत्य झाल्या' म्हणून त्याचे स्मरणार्थ नाना भिडे व कोंडसरचे मंडलीक खोत यांनीं एकमतें श्रीची स्थापना केली. या कामीं वाडा कोंडसर येथील भट उपनांवाचे गृहस्थांनीं 'प्रामुख्यानें मदत केली. म्हणून श्रीची स्वारी गांवांत फिरवयास जात तेव्हां भट यांचे येथें घरीं जाऊन पूजा घेणेची पद्धत आहे. भिडे यांचे येथें याच कारणानें जाते.

श्रीचे स्थापनेचे वेळीं मानकरी नेमिले ते– भट घराण्याकडे वाडा कोंडसर येथील महाजनकीचा हक्क सरकारांतून आणून दिला (सनद देवविली). लिमये घराण्याकडे ब्रह्मत्वाचा मान दिला. फडके यांजकडे सदस्यत्वाचा मान दिला. शांडिल्य गोत्री जोशी यांना घटिकास्थापनेबद्दलची वृत्ति दिली. हर्डीकर यांना ग्रामोपाध्येपणाचा अधिकार दिला.

श्रीदेव सत्येश्वर स्थापित लिंग याची उंची सुमारें १८ अंगुळें असून परिघ ४० अंगुळें आहे.

या देवाच्या मासाभिषेकाबद्दल नोंद आहे ती—शके १७५० तिसा अशरीन मयातेन व अलफ. सन १८२८.

६ श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर मासाभिषेककर्दे– त्र्यंबक भट दांत्ये.

श्रीदेव सत्येश्वरासंबंधीं आख्यायिका—

१. श्रीदेव सत्येश्वराची स्थापना कोंडसरकर खोत व भिडे यांनीं मिळोन राजीमतें केली. शके १४३३ चे पूर्वी सन १५११ मंडलीक खोत यांना कोंडसर दुतडीची खोती मिळाली.

२. कदमांचा नाश करण्याला दिलेली मसलत सत्य झाली म्हणून 'सत्येश्वर' या नांवाचे देवाची स्थापना केली. ही गोष्ट शक १२५० चे सुमारास (इ. सन १३२८) झाली आहे.

३. अग्निहोत्री दाते हे श्रीसत्येश्वराची पूजा नित्य होडींतून येऊन करीत. ही परिस्थिति शके १५५४ पर्यंत (इ. सन १६३१) होती.

मंदिराची नजीकची माहिती

श्रीसत्येश्वर हें स्थान वाडा कोंडसर येथें आहे. वाडा नवेदर व वाडा कोंडसर बुद्रक व खुर्द या तीन वाड्यांची ही देवता मानिली जाते. येथेंच दुसरें एक श्रीबालेश्वर म्हणून स्वयंभू शंकराचें स्थान आहे. हीं दोनही देवालयें निरनिराळीं आहेत. येथें होणारे उत्साह श्रीसत्येश्वरमंदिरांत होतात. श्रीचें देवालय पूर्वाभिमुख आहे. या देवालयाला तीन सभामंडप आहेत. पहिल्या मंडपांत श्रीसत्येश्वर यांचा गाभारा व त्याबाहेर सन्मुख नंदीश्वर आहे. गाभाऱ्यांत श्रीचे मागें धातूची पार्वतीची मूर्ति आहे. गाभाऱ्याचे बाहेर डावे हाताला पाषाणाची गणेशमूर्ति आहे. श्रीनंदीजवळ नंदीचे उजवे बाजूला पादुका आहेत. या धातुमय आहेत. या पादुका कोणाच्या आहेत व त्या कोणीं कधीं ठेविल्या त्याची माहिती मिळत नाहीं. श्रीचे डावीकडे गाभाऱ्याचे प्रदक्षिणेचे वाटेवर श्रीचा नैवेद्य वगैरे करतात, व उजवीकडे श्रीच्या जामदारखान्याच्या पेट्या ठेविलेल्या असतात. याला नंदीचा सभामंडप म्हणतात.

आडिवरें ग्रामस्थ – वेदशाळा कमिटी व विद्यार्थी

[पृ. ४७

श्रीमहाकालीचा सभामंडप

यापुढें दुसरा सभामंडप आहे. यांत कार्तिकमासीं पुराण, वसंतपूजा मंत्रजागर इत्यादि समारंभ होतात. हे दोनही सभामंडप एकदमच बांधिले आहेत. हे सभामंडप शके १७१० सालीं बांधिले आहेत.

यापुढें तिसरा सभामंडप आहे. हा पन्नास साठ वर्षांपूर्वी बांधिला. श्रीचा उत्साह कार्तिकमासीं असतो, त्या वेळीं मंडळीला बसण्याकरतां मंडप घालावा लागे. अशा परिस्थितींत शके १७९७ सालीं मोठें वादळ होऊन गांवांत अनेक वृक्ष मुळासकट पडले. त्याचा फायदा घेऊन ग्रामस्थांनीं एकमतें श्रीचे सभामंडप बांधण्याचें काम केलें. या सभामंडपांत उत्साह म्हणजे मंत्र-जागर, पुराण, कीर्तन, दशावतार नाटक वगैरे होतात.

दुसरा सभामंडप व तिसरा सभामंडप यांचे दरम्यान आलिंद आहे. त्याला सोंड असें म्हणतात.

तिसरे सभामंडपांतून पूर्वेकडे बाहेर पडतांना डावे हाताला श्रीचंडाचें स्थान आहे. त्याचे डावे हाताला तीन त्रिपुर आहेत व समोर पूर्वेकडील पोंवळीला लागून एका ओळीनें सात त्रिपुर आहेत. आडावर आणखी तीन त्रिपुर आहेत. श्रीसत्येश्वराचे आवारांत (पोंवळींतच) ईशान्य कोप-ऱ्यांत एक सुंदर वर्तुलाकार विहीर आहे. या विहिरीचें पाणी आरोग्यकारक आहे अशी ख्याति आहे. या विहिरीचेंच पाणी श्रीचे स्नानपूजेकरतां उपयो-गांत आणितात. येथें पाणी काढणेकरितां एक यंत्र आहे. त्याला 'ओक्की' असें म्हणतात.

आवारांतच श्रीदेवालयाचे बाहेर नैर्ऋत्य कोपऱ्यांत ऋग्वेदशाळा होती त्या जागेंत हल्लीं गांवठी मराठी शाळा व लहानसें ग्रंथसंग्रहालय आहे. दक्षिणेला श्रीतुळसीवृंदावन आहे. आग्नेयीला हिरण्यकेशी वेद-शाळेची इमारत आहे. श्रीचे उत्साहांत नैवेद्याचा स्वयंपाक करणें व दशावतार नाटक होतें, त्यासाठीं व इतर उत्सव कृत्याकडे उपयोग केला जातो.

हिरण्यकेशी वेदशाळा शके १८१९ पासून १८४० पर्यंत होती व आश्वलायन वेदशाळा शके १८२० पासून शके १८३८ पर्यंत होती. पुढें या दोन्ही वेदपाठशाळा मुलांचे अभावीं बंद झाल्या !

श्रीचे पोंवळींत जाणेकरितां पूर्व दिशेला एक, पश्चिमदिशेला एक, उत्त-रेला एक, याप्रमाणें तीन द्वारें आहेत. यापैकीं पूर्व पश्चिम द्वारानें गांवांत

जाण्याचे मार्ग आहेत व उत्तर द्वारानें फक्त गुरववाडींतच जाणेचा रस्ता आहे. पूर्व दिशेकडे जें द्वार आहे तेथून वाडा नवेदर पूर्व तडीनें श्रीमहाकालीचे देवालयापर्यंत रस्ता असून तो चिरेबंदी आहे. याच द्वारांतून दुसरा रस्ता वाडा कोंडसर खुर्द वाडयांत जातो. हा रस्ताही चिरेबंदी बांधीव आहे. पश्चिम द्वारानें दोन रस्ते जातात. एक वाडा नवेदराचे पश्चिम तडीकडून देसाई बांधाकडे जातो. दुसरा वाडा कोंडसर बुद्रूक वाडयाकडे जातो.

श्रीदेव सत्येश्वर व श्रीबाळेश्वर यांचीं देवालयें एकाच आवारांत निरनिराळीं आहेत. एकाच ठिकाणीं दोन सांबाचीं देवालयें फार क्वचितच असतील. या देवालयाचे गाभारे बांधले आहेत. त्यांना 'हेमाडपंती देवालय' असें म्हणतात.

नित्यकृत्यें

श्रीसत्येश्वर व श्रीबाळेश्वर यांची दररोज सकाळीं सूर्योदयाचे वेळीं प्रक्षालनपूजा (किंवा पाखाळणी) गुरवाकडून होते. दहा वाजतां एक शेर तांदुळाचा भात करून त्याचा नैवेद्य गुरवाकडून दाखविला जातो. नैवेद्याला लागणारे खर्चाची तजवीज गुरवांनींच करावयाची असते. पूजा-ऊर्जा-नैवेद्य-नंदादीपाकरितां सरकारांतून इनाम जमिनी आहेत, त्यांचा गुरव उपभोग घेतात. सायंकाळीं धूपारती होते. वाडा कोंडसर बुद्रूक व खुर्द या दोन वाडयांत दररोज प्रत्येक घरीं श्रीला नैवेद्य समर्पण केला जातो तो नैवेद्य चाकरीचे गुरवानें रोज दोनप्रहरीं जाऊन घेऊन यावयाचा. वाडा नवेदरपैकीं फडके व अग्निहोत्री दाते या घरीं मात्र रोज नैवेद्य असतो. बाकी घरीं सणावारीं नैवेद्य समर्पण करणेची वहिवाट आहे. तो नैवेद्य गुरव यांनीं घेऊन यावयाचा असतो.

अभ्यंग स्नानें (माखण)

प्रत्येक शनिवारीं श्रीदेव सत्येश्वर व श्रीबाळेश्वर यांना माखण करणेंत येतें. (नारळाचा स्वरस लावणें).

नैमित्तिक कृत्यें

चैत्र शुद्ध १ पंचांगपूजा, ग्रामजोशी यांनीं पंचागवाचन करावें व दोन पंचागें द्यावीं. पैकीं १ देवाकडे

या दिवशीं महाजन परांजपे यांची वसंतपूजा असते, ध्वजपूजा गरव करतो.

चैत्र शु।। २ कल्याण यांची वसंतपूजा असते. हल्लीं फौजदार परांजपे करतात.
चैत्र शु।। ३ कोंबेकर परांजपे यांची वसंतपूजा.
चैत्र शु।। ४ खोत परांजपे ऊर्फ घांटवळ यांची
चैत्र शु।। ९ गोरे, कोणसर बुद्रक, यांची
चैत्र वा।। १ खोत वेदरकर, वाडा कोंडसर खुर्द
चैत्र वा।। २ भट महाजन यांची
चैत्र वा।। ३ काळे उपाध्ये यांची
चैत्र वा।। ११ हर्डीकर डोंगरकर यांची
वैशाख शु।। १ अग्निहोत्री दाते
वैशाख शु।। ३ महाजनी गोरे, वाडा नवेदर
वैशाख शु।। ११ रुंढेकर वांकडे खोत
वैशाख शु।। १४ नृसिंहजयंती ग्रामजोशी यांचे घरीं
वैशाख शु।। १५ लिमये ब्रह्मे यांची
वैशाख वा।। ११ पुराणीक फडके, वाडा नवेदर
वैशाख वा।। ३० भिडे महाजनी खोत, वाडा नवेदर, यांची

येणेंप्रमाणें सुमारें १६ वसंतपूजा होतात. या पूजेकरतां लागणारें सामान ज्यानें त्यानें आपापले घरून घेऊन यावयाचें असतें. या वसंतपूजेचें आमंत्रण करण्याची वहिवाट नाहीं. सायंकाळीं चाकरीचे गुरवानें श्रीचे देवालयांत कर्णा फुंकावा, म्हणजे तो ऐकून लोकांनीं यावयाचें, अशी वहिवाट आहे. या दिवशीं पाद्य करण्याची वहिवाट आहे. त्या प्रसंगीं अग्निहोत्री दाते यांचें पाद्य प्रथम करून प्रथम त्यांना गंध लावावयाचें असतें. पुराणीक पुराण सांगावयास बसतात तेथेंच शेजारीं असलेले खांबाजवळ अग्निहोत्री यांनीं बसावें व त्याच बाजुस परंतु पश्चिमेकडील खांबाजवळ गोरे महाजन यांनीं बसावें. यांचे दरम्यान इतर भिक्षुक मंडळींनीं बसावें. देवाचे डावीकडे ग्रामस्थ शिष्ट मंडळींनी बसावें.

१ चैत्रमास व वैशाखमास व आश्विन शु।। १५ पासून कार्तिक शु।।

१५ पर्यंत रोज सायंकाळीं पुराणवाचन असतें. याबद्दल फडके पुराणीक यांना इनाम जमीन दिलेली आहे. शिवाय तीन्ही वाड्यांत प्रत्येक घरीं सर्दचे पिकाचे वेळीं व उन्हाळी पिकाचे वेळीं भात देणेची वहिवाट आहे. हें भात पुराणीक यांनीं घरोघर हिंडून पूर्वापार वहिवाटीप्रमाणें वसूल करून आणावयाचें असतें.

१ आषाढमास--कर्कसंक्रांतीचें वाचन ग्रामजोशी करतात.

१ श्रावणमास—नागपंचमी मृत्तिकेचा नाग, कुंभार आणून देतो त्याची गुरव पूजा करतात.

१ श्रावणी पौर्णिमा--पोंवतीं गुरवानें वहावयाचीं असतात.
श्रावणमासांत प्रत्येक घरची पूजा येत असते, व एक सोमवारीं अभिषेक नैवेद्य समर्पण केला जातो अशी प्रत्येक घरची वहिवाट आहे.

१ भाद्रपद शु॥ ४ गणेशपूजा. मृण्मय गणपति कुंभार करून आणून देतो त्याची पूजा चाकरीचे गुरवानें करावयाची असते.

१ आश्विन शु॥ १० अश्मंतकपूजा ग्रामोपाध्ये हर्डीकर यांनीं करावयाची.

१ आश्विन शु॥ १५ दीपपूजा–भिडे महाजनी, बेदरकर खोत, परांजपे यांनीं मिळून करावयाची असते. प्राचीन काळीं कार्तिकमासांत दीपोत्साह होत असे.

१ आश्विन वा॥ १४ अभ्यंग स्नान गुरवाकडून घातलें जातें.

१ कार्तिक शु॥ १० पासून पांच दिवस श्रीचा उत्साह फार प्राचीन काळापासून असतो.

या दिवशीं श्रीची पालखी सजवून सरंजामासह सायंकाळीं सुमारें प्रहर दिवस राहिला म्हणजे ती पूर्वद्वारानें बाहेर पडून नवेदरच्या पूर्वतडीनें प्रथमतः फडके पुराणीक यांचे घरासमोर राजरस्त्यावर उभी रहाते. तेथें फडके यांची पूजा घेऊन पुढें प्रत्येक घरासमोर राजरस्त्यांत उभी राहून पूजा घेत घेत जाते. भिडे यांचे येथें श्रीची स्वारी घरीं जाते. तेथें पूजा षोडशोपचार होऊन भूयसी, खिरापत, विडे वांटून झाल्यावर स्वारी निघावयाची. याप्रमाणें भिडे यांचे प्रत्येक घरीं अशीच पूजा व्हावयाची. पूर्वतडीनें भिकारवाडीचे दक्षिणेकडील रस्त्यानें, नवेदरचे पश्चिम तडीनें, जोशी महाजन यांचे घरासमोर उभी राहून, पूजा घेत घेत पश्चिमतडीनें आपटे, लिमये,

काळे यांचे येथील पूजा घेऊन 'नमशीतील' भिडे यांचे येथें सायंसंध्येच्या वेळेपर्यंत जाते. तेथें लोक सायंसंध्या वगैरे उरकतात. दिवा उजेडाची तयारी करून, स्वारी निघून दाते ग्रामोपाध्ये यांची पूजा घेऊन हाजनी गोरे, अग्निहोत्री, यांच्या पूजा घेऊन पश्चिम तडीनेंच कोंडसर बुद्रुक वाड्यांत गोरेउपाध्ये, परांजपेमहाजन, कल्याण, होडे, कोंबेकर यांच्या पूजा घेऊन, (उत्तरकोंडीचे) 'मिठागराचे' बांधावरून कोंडसर खुर्द वाड्यांत काळे उपाध्ये, जोशी वृत्यंशी, हर्डीकर ग्रामोपाध्ये, यांच्या पूजा घेऊन, पुढें भट महाजन यांचे घरीं श्रीची स्वारी जाते. तेथें षोडशोपचार पूजा होऊन शक्यतेनुसार मंडळीला अल्पाहार वगैरे झाल्यावर स्वारी निघून रानडे महाजन यांची पूजा घेऊन कंद्रप रानडे, काळे उपाध्ये, गोखले व बेदरकर खोत यांची पूजा घेऊन, स्वारी रात्रीं एक वाजेपर्यंत मंदिरांत दाखल होते. नंतर धूपारती, मंत्रपुष्प, पुराण, कीर्तन वगैरे कार्यक्रम होऊन त्या दिवशींचें उत्साहकृत्य संपतें. श्रीचे देवालयांत स्वारी आल्यावर श्रीचे मुखवटे सिंहासनारूढ करून धोतर नेसवून, पागोटे घालून, बाहेरील सभामंडपांत सौंडीवर द्वाराचे उजवे बाजूला ठेवितात. स्वारी निघतेवेळीं मुखवटे सजवून पालखींत मांडावयाचे असतात. याच वेळीं चाकरीचा गुरव स्वारीबरोबर असतो. तो प्रत्येक घरीं स्वारी जाते तेव्हां उत्साहाचें आमंत्रण करीत असतो. स्वारीचे वेळीं श्रीपुढें येणारें उत्पन्न चाकरीचे गुरवाचें असतें. एकादशीला पुराण, कीर्तन, भजन इत्यादि कार्यक्रम रात्रीं होतात. कार्तिक शु्ा १२ ला तुलसीविवाह नवेदरचे भिडे महाजनी 'अनंत वासुदेव भिडे' या घराण्यांतील पुरुषानें व हर्डीकर ग्रामोपाध्ये यांनीं; रात्रीं मंत्रपुष्प, आरती झाल्यानंतर, तुलसीविवाह लावावयाचे असतात. विवाहार्थ लागणारी सामुग्री आपापले घरून आणावयाची असते. १४ वैकुंठ चतुर्दशीला पहांटेस श्रीला स्नानें घालून पूजा होते. पुराण होतें. ग्रामस्थ मंडळी दर्शनाला व पूजेला येतात. शु्ा १५ त्रिपुरी पौर्णिमा या दिवशीं रात्रीं ग्रामस्थ सूर्यास्तसमयीं देवालयीं जमतात. पणत्या कुंभार आणून देतात. टिवळीं श्रीचे दास्तानींच ठेविलेलीं असतात. तीं ज्यांचीं त्यांनीं ओळखून घ्यावयाचीं. तेल, वाती, भूयसी, पूजासाहित्य ज्याचे त्यानें आपापले घरून आणून हर्डीकर ग्रामो-

श्रीदेव शंकरेश्वर

श्रीदेव शंकरेश्वर यांची स्थापना शके १२०० चे सुमारास शंकराजी पंत पंडित यांनीं केली, असें दंतकथेवरून समजतें. श्रीकालिका व श्रीशंकरेश्वर यांचीं मंदिरें एकेच ठिकाणीं आहेत. या दोनही मंदिरांचा प्राकार एकच आहे. श्रीचें लिंग सुमारें १० अंगुलें उंच असून लिंगाचा परिघ ३३ अंगुलें आहे. श्रीचेजवळ पितळेची धातुमय पार्वतीची मूर्ति आहे, व पितळेचा पऱ्याचा नाग आहे. घुमटीचे बाहेर उजवीकडे एक व डावीकडे एक अशा दोन शिळेच्या गणेशमूर्ति आहेत. सन्मुख शीलेचा नंदीश्वर आहे. श्रीची पूजाऊर्जा लिंगाइत गुरवाकडून केली जाते. श्रीला नित्य दोन प्रहरीं ग्रामस्थ लोक आपापले घरीं महानैवेद्य समर्पण करतात. तो गुरव घेऊन येतो व उपयोग करतो. श्रीला वाराभिषेकाची नेमणूक दरसाल एक रुपया आहे. तो सांवरेकर पाध्ये यांना मिळत असतो. आश्विन शु॥ १५ पासून कार्तिक शु॥ १५ पर्यंत पहांटेस रोज कुळकर्णी यांचेकडून कांकडे आरती केली जाते. शेवटचे दिवशीं अहोरात्र भजन ग्रामस्थ करतात. दीपोत्साहसांगता, ब्राह्मणभोजन वगैरे कुळकर्णी यांचेकडून केलें जातें. श्रीचा उत्साह स्वतंत्र असा होत नाहीं. पूर्वी होत असे.

श्रीदेवी कालिका प्रसन्न

श्रीदेवी कालिका हिची स्थापना श. १४०० चे सुमारास काळकावाडी येथील भाटे खोत यांनीं केली. श्रीचें मंदिर भाटे यांनींच बांधिलें. नित्य पूजा, नैवेद्य, सांजवात वगैरे भाटे हे करीत असतात. श्रीचे स्थापनेचे वेळीं वाडा कोंभें येथील 'मोरये भंडारी' यांनीं मदत केली त्यामुळें भाटे यांनीं श्रीचे देवालयीं त्यांचा विशेष मान ठेविला आहे. श्रीचें मंदिर पूर्वाभिमुख आहे. उत्साह दरसाल आश्विनमासीं नवरात्रांत होत असतो. ललितापंचमीचे दिवशीं वाडा नवेदर येथील 'शांडिल्य गोत्री दशावतारे काळे बुवा' हे श्रीपुढें कीर्तन करीत असतात. त्याबद्दल त्यांचा सन्मान म्हणून एक वडा पांच भोकें असलेला, देणेंत येतो. याच दिवशीं वाडा कोंडसर येथील गुरव हे दशावतार नाटक करीत असतात. त्यांचाहि सन्मान, 'एक पांच भोकांचा

वडा' देऊन केला जातो. श्रीचें देवालय जीर्ण झालें होतें त्याचा शक १८५२ सालीं रा. सदाशिव रघुनाथ भाटे व रामचंद्र पाध्ये गुर्जर यांनीं जीर्णोद्धार केला. श्रीचे आवाराचा पोंवळीचा कांहीं भाग नादुरुस्त झाला होता, तो ग्रामस्थांनीं पट्टी करून शक १८५३ पौष वद्य ६ रोजीं जीर्णोद्धार केला. श्रीचे आवारांत नूतन धर्मशाळा शक १८५३ सालीं ग्रामस्थांनीं पट्टी करून बांधिली आहे.

श्रीकालिकेचें वर्णन—श्रीची मूर्ति काळी शालिग्रामशिळेची, चतुर्भुज, तेजस्वी, सुमारें ३२ अंगुळें उंच, कानांत नागभूषणें, वरचे डावे हातांत डमरू व खालचे हातांत कपाल आहे. वरचे उजवे हातांत त्रिशूल व खालचे हातांत खड्ग आहे. प्रेतावर उभी, उजवीकडे एक व डावीकडे एक अशा दोन कन्या – लक्ष्मी व सरस्वती या नांवाच्या – आहेत. त्यांची उंची सुमारें आठ अंगुळें असून त्या कन्या प्रभावळींतच कोरलेल्या आहेत. डावीकडील कन्या, द्विभुज हातांत खड्ग घेऊन पाय खालीं सोडून बसलेली आहे व उजवीकडील कटीप्रदेशीं एक बाळ घेऊन उभी अशी आहे.

श्रीचें ध्यान एका वृद्धाचे मुखीं आहे तें येणेंप्रमाणेः—

प्रेतस्थां शशिशेखरांकित जटां दंष्ट्राननां भीषणाम् ।
दक्षे शूलमसी कपाल डमरूं वामेन संबिभ्रतीम् ॥
कन्याभिः तिसृभिश्च खड्ग शिरो हस्ताभिरासेविताम्
पार्श्वे सिंहयुतांमभीष्ट वरदां वंदे महाकालिकाम् ॥ १ ॥

१ चैत्रमासांत शुद्ध १ ला हर्डीकर यांची वसंतपूजा असते.

१ श्रावणमासांत श्रीचे मंदिरांत ग्रामस्थांची सार्वजनिक श्रावणी होते. ही श्रावणी सांवरेकर पाध्ये यांनीं आपले घरचें साहित्य आणून करावयाची असते. त्या साहित्याबद्दल प्राचीन काळीं ग्रामस्थांनीं जमीन दिली आहे. तिला 'श्रावणी' असें नांव हल्लीं आहे.

१ शु॥ ५ चे दिवशीं मृत्तिकेचा नाग, वाडा कोंडसर येथील 'ह्येतरा' कुंभार आणून देतो. त्याची पूजा भाटे करतात.

१ वद्य ८ चे दिवशीं मृत्तिकेचें गोकुळ करून 'कुंभार' यांनी आणून द्यावयाचें. त्याची पूजा भाटे करतात. वाडा कोंडसर येथील कुंभार नाग

व गोकुळ देतो, त्याबद्दल त्याला भाटे तांदूळ एक शेर देतात.

१ भाद्रपदमासीं शु॥ ४ चे दिवशीं मृण्मय गणपति कोंडसरचे 'म्हेतरा' कुंभार देत असतो. त्याची पूजा भाटे करतात. त्याबद्दल एक शेर तांदूळ भाटे देतात.

१ आश्विनमासांत– नवरात्रांत उत्साह सामान्यतः असतो. श्रीपुढें उत्साहांत वगैरे प्रसंगीं 'गुर्जर पाध्ये' यांनीं पुराण वाचावयाचें असतें.

१ कार्तिक शु॥ १० रात्रीं सुमारें आठ वाजतां श्रींची पालखी सजवून त्यांत श्रीकालिका व श्रीशंकरेश्वर यांचे मुखवटे ठेवून भिरवणूक गांवांत जाणेकरतां निघते. ती प्रथम भाटे यांचेकडील पूजा घेऊन, वाडी खुर्द येथें (आज विद्यमान चिंतामण नारायण कुलकर्णी) त्यांचे घरीं जाते. तेथें त्यांचेकडून षोडशोपचारें पूजा होऊन बरोबरचे मंडळीला अल्पाहार देणेंत येतो. नंतर स्वारी निघून खुर्द वाड्यांतील इतरांच्या पूजा घेत घेत वाडा कोंभें येथें फिरून येऊन पूजा घेत आणि अशी पहांटेस तीन वाजण्याचे सुमारास पुनः स्वस्थानीं मंदिरांत येते.

१ श्रींचे स्वारीसमयीं पुढें येणारे नारळ, तांदूळ वगैरेंचा विनियोग, कार्तिक वा॥ १ ला कांकडे आरतीची सांगता कुळकर्णी करतात, त्यांतच केला जातो.

१ सांगतेचे दिवशीं श्रीपुढें भाटे यांनीं गोंधळ घालावयाचा असतो. या गोंधळाचे वेळीं लिंगाइत गुरव यांनीं मशाल धरावयाची.

१ कार्तिक शु॥ १० पासून शु॥ १५ पर्यंत श्रीशंकरेश्वराचा उत्साह पूर्वी होत असे.

कार्तिक शु॥ १५ ला श्रीपुढें भाटे व गोरे हे आपापले त्रिपुर लावितात.

१ मागशीर्ष मासांत वद्य ८ ला श्रींचा वाढदिवस म्हणून एक दिवस उत्साह केला जाता.

१ माघ शु॥ ६ रोजीं श्रीकालिकेची स्वारी, मौजे करोळी येथें श्रीकनकादित्यांचे भेटीकरतां रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास निघत असते.

१ त्यापूर्वी भाटे व ग्रामस्थ मिळोन पालखी शृंगारून, मुखवटे पालखींत ठेवून पोशाख घाऊन पूजा करून ठेवीत असतात.

१ पालखी श्रीकालिकेची आहे. इतर सरंजाम श्रीसंस्थान महाकाली येथून येत असतो.

१ मौजे आडिवरें येथील समस्त वाडयांचे खोत, लिंगाइत गुरव वाजंत्री, ढोलवाले महार, तासेकरी, हुदा रुमाल (उडता रुमाल), निशाणवाले, अबदागीरवाले, चवरीवाले, मोरचेलवाले, दिवटीवाले आदिकरून सर्व मानकरी जमल्यावर स्वारी मंदिरांतून बाहेर पडते.

१ पालखीचे भोई– वाडी कालिका येथील मोंडे यांनीं पुढें लागावें व नवाळे यांनीं मागें लागावें.

१ चवरी वारणें ती रोकडे यांनीं ढाळावयाची.

१ मशाल – वाडा कोंडसर येथील म्हेतर कुंभार यांनीं मशाल धरावयाची.

१ श्रीदेवीभगवती हिला पाठराखण म्हणून भुते घेऊन जातात.

१ श्रीची स्वारी निघून अर्धमार्गी 'सांबरे याचे घोरवर' धर्मशाळा आहे तेथें जाते तों तेथें मौजे कशेळीचे समस्त खोत, मासवडेकरी, इतर मानकरी सामोरे आले असतात, व त्यांचेकडून स्वागतार्थ म्हणून मोठा जाळ केला जातो. (हल्लीं ज्याला 'बन फायर' म्हणतात तसा.)

१ हें काम करण्याचें काम पेटावा म्हणून कुणब्याकडे आहे. जाळण्याकरतां कवळाच्या सामुग्रीनिमित्त त्याला एक जमीन दिली आहे. तिला पटाव्याची (पेटविणाराचा) खरा असें म्हणतात. या पेटाव्यानें तेथें आडिवरेकर मंडळींचीं पादत्राणें मागून घेऊन तीं पोत्यांत भरून डाक्यावर घेऊन स्वाराबरोबर असावयाचें.

१ स्वारी निघून 'कालिकावाडी' नांवाचे ठिकाणांत जाते. हें ठिकाण सोनार यांचे बराजबळ आहे. त्या ठिकाणांत सोनार स्वारी येणे पूर्वी बैठक घालून, व दिवा लावून ठेवीत असतो. तेथें स्वारी जानेवसाकरतां थांबते.

१ तेथें कशेळीचे मासवडेकरी श्रीची षोडशोपचारें पूजा करतात. श्रीची आटी भरतात. श्रीपुढें कालिकावाडी येथील गरवाचें गाणें होतें. सर्व आडिवरेकर मंडळाच पाद्य होतें. गर्वई गुरवास सन्मानार्थ श्रीफल देतात.

१ स्वारी निघून श्रीजाखोदवीचे मंदिरापुढून जाऊं लागते त्या वेळीं

मंदिराचे दरवाजे लावून घेतात. (पूर्वी आपोआप लागत असत असें म्हणतात.)

१ स्वारी श्रीकनकादित्यांचे मंदिरांत अरुणोदयीं दाखल होते. तेथें भाटे यांनीं श्रीकालिकेला नेऊन श्रीकनकादित्याशेजारीं रथावर बसवावयाची.

१ भगवतीदेवी बरोबर पाठराखणी म्हणून गेलेली असते. तिची स्थापना भुते हे बाहेरील धर्मशाळेंत करीत असतात.

१ सूर्योदयानंतर माघ शु॥ ७ (रथसप्तमीचे दिवशीं) आडिवरेकर मंडळी स्वारीबरोबर गेलेली असते. त्यांस कशेळींचे मासवडेकरी यांजकडून पूर्वापार वहिवाटीप्रमाणें शिधा-तांदूळ देणेंत येतात.

१ पूर्वापार ठरावाप्रमाणें मासवडेकरी यांनीं तांदूळ आणून ते भागवत यांजपाशीं द्यावें. भागवत यांनीं भाटे खोत यांजपाशीं मोजून द्यावे. कुळकर्णी (वाडी खुर्द येथील) यांनीं यादी वाचावी व त्याप्रमाणें प्रत्येकाला भाटे यांनीं तांदूळ देत जावें.

१ स्वारीबरोबरच्या मंडळीला आंवळकर हे आपले घरीं बोलावून नेत असतात. तेथें त्यांच्या इच्छेप्रमाणें स्नानें, अल्पाहार वगैरे होतो.

१ श्रीभगवतीचा मुखवटा माघ शु॥ १० सूर्योदयापूर्वी आडिवरें येथें स्वस्थानीं भुते यांनीं आणून ठेवावयाचा.

१ श्रीकालिकेचा मुखवटा माघ शु॥ ११ सूर्योदयापूर्वी भाटे यांनीं घेऊन श्रीकालिकेच्या मंदिरांत आणून ठेवावयाचा. बरोबर समारंभ नसतो, म्हणून भाटे खोत ' कालिकेला ' पळवून नेतात असें म्हणतात.

१ श्रीमहाकाली, श्रीभगवती, श्रीजाखादेवी (कशेळीची), श्रीकालिका यांना बहिणी मानितात.

१ श्रीकालिकेची पूजा ब्राह्मणाकडून होते. म्हणून तिला सोंवळी म्हणतात.

१ फाल्गुन मासांत कालिकावाडी येथील गुर्जर पाध्ये यांनीं एक महिना श्रीकालिकेची पूजा करून श्रीपुढील उत्पन्न घेणेची वहिवाट आहे.

श्रीलक्ष्मीनारायण

श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति शालिग्रामशिळेची असून सुमारें दोन फूट

उंच आहे. नारायण गरुडाचे मस्तकावर डावी मांडी मोडून बसलेले आहेत. नारायणाचे डावे मांडीवर लक्ष्मी उजवी मांडी मोडून बसलेली आहे. खालीं दोहों बाजूंस दोन द्वारपाल आहेत. मूर्ति चतुर्भुज आहे. वरच्या उजव्या हातांत चक्र, खालच्या उजव्या हातांत शंख, वरच्या डावे हातांत गदा व खालचे डावे हातांत पद्म आहे. मूर्तीचे मागें पितळेच्या पत्र्याची प्रभावळ असून मस्तकावर पितळेच्या पत्र्याच्या नागाची फणा आहे.

चैत्र शु॥ १ ध्वजपूजा पुजारी हर्डीकर यांचेकडून केली जाते.

पंचांगपूजा—मोघरघर यांनीं करावयाची. त्या वेळीं भराडें व राजवाडी येथील मानकरी येतात. ग्रामजोशी पंचांगपूजेनंतर फलश्रुति सांगतात.

शु॥ १ मोघरकर यांची वसंतपूजा असते.

शु॥ २ भराडेकर खोत यांची वसंतपूजा असते.

शु॥ ३ राजवाडी येथील वसंतपूजा असतात.

आश्विनमास शु॥ १५ पासून कार्तिक शु॥ १५ पर्यंत रोज दीपोत्साह, हरिजागर होतो.

कार्तिक—कार्तिक शु॥ ११ रोजीं रात्रीं १० वाजतां रुंढें येथील वांकडे खोत हे त्रिपुराची पूजा करून त्रिपुर प्रज्वलित करतात. या त्रिपुराची दुरुस्ती शके १८५६ सालीं रुंढेकर खोत यांनीं केली.

१ शुद्धपक्षांत व कृष्णपक्षांत एकादशीपासून पांच दिवस उत्साह होतो. हा उत्साह-मोघरें, भराडें, राजवाडी येथील लोक पट्टी करून करतात. पट्टीची यादी पुरातन केलेली आहे. त्याप्रमाणें वसूल करावयाचा.

१ उत्साहांत पुराण सांगणेबद्दल बिदागी आठ आणे देणेची चाल आहे. अलीकडे जास्त देतात.

१ कार्तिक शु॥ १० रात्रीं १० वातजां श्रीची पालखी सजवून मिरवणूक निघत असते. प्रथम देवालयासभोंवार दोन प्रदक्षणा करून मंदिरासमोरील अश्वत्थाचे पारावर जाते. तेथें मोगरकर खोत यांची म्हणून हर्डीकर उपाध्ये यांचेकडून पूजा, महानैवेद्य समर्पण केला जातो. येथूनच रात्रीं सुमारें एक

वाजतां श्रीची स्वारी मंदिरांत दाखल होते.

१ या स्वारीसमयीं मानकरी आहेत त्यांचा तपशील पुढें लिहिलेप्रमाणेः—
भोई व दिवटी धरणें—राजवाडी येथील लोटलीकर.
मृदंग वाजविणें—भराडें येथील कामत घराण्याकडे.
पंचारती धरणें—तिवरे वाड्यांतील जुवळे यांजकडे.
दोन भोई, एक दिवटीवाला, एक आरती धरणारा, एक मृदंग वाजविणारा, या प्रत्येकास बहुमानार्थी एकेक श्रीफल देणेंत येतें.

१ मासाभिषेकानिमित्त दरसाल पांच रुपये सरकारांतून, मौजे नाटें येथील दामोदर गुंडो पाध्ये गुर्जर यांस मिळत असतात.

१ श्रीपुढें पुराण कोणीं सांगावें याबद्दल तंटा हर्डीकर व सावरेकर पाध्ये आणि भोगले यांमध्यें होऊन त्याचा निकाल गुर्जर यांनीं सांगावें असा झाला.

१ श्रीचें मंदिर पूर्वाभिमुख आहे. आवारांतून बाहेर पडण्याचे पूर्वद्वारावर बंगला आहे. तेथें हल्लीं प्राथमिक सरकारी मराठी शाळा आहे. येथेंच शेजारीं शके १८२० चे सुमारास वेदशाळा होती. महाद्वाराचे बाहेर विहीर फार जुनी व मोठी बांधीव आहे. यांतील पाणी वर्षभर पुरत नाहीं.

१ श्रीची पूजा व नैवेद्य हर्डीकर उपाध्ये हे करतात. त्याबद्दल सरकारी उत्पन्न थोडेंसें आहे.

१ श्रावणमासांत जन्माष्टमीला दोन दिवस उत्साह होतो व दहींकाला होतो.

१ श्रीचे शेजारीं हर्डीकर, नाटेकर, गुणे अशा लोकांचीं ब्राह्मणांचीं घरें आहेत.

इतर वस्ती—खोत-लोटळीकर, कामत, महाडदळकर, जुवळे वगैरे मडळींचीं घरें जरा लांब आहेत.

दशावतार व दशावतारी

श्यामजी नाईक काळे दशावतारे यांस आज्ञाः—सुरू सन सबा सलासीन मया व अलफ. राजश्री फकीरजी आंग्रे यांचें लग्न आहे, याकरितां तुम्ही

गोतसमवेत हुजूर निघून येणें छ ७ (?) शिक्का लेखन सीमा रामशेट शेट्ये.

सदरहू राजमुद्रांकित पत्र आंग्रे दरबारचें आहे. हें पत्र शक १६५८ सालचें संभाजी आंग्रे यांचे अमदानींतील आहे.

मौजे आडिवरें वाडा नवेदर येथें पूर्वतडीला शके १६४० पासून आज शक१८५६पर्यंत शांडिल्य गोत्री (पत्रांत उल्लेखिलेल्या) काळे उपनांवाच्या श्यामजी नाइकाचे घराण्याची वसाहत आहे. या श्यामजी नाईकानें पुढें संभाजी आंग्रे यांजकडोन शके १६५९ सालीं मिरास पत्र लिहोन आणिलें. त्यांतील सारांश असा कीं, 'आमचे मिराशीचें ठिकाण वाडे मजकुरीं असोन तें साठ पाऊणशें वर्षें नारो रुद्र भिडे याजकडे कमाविशीस आहे त्याजवळ आपण दहा बारा वर्षें मागतो तें देत नाहीं. तें परत आमचें आम्हांस द्यावें,' अशा आशयाचें आहे. यावरून शके १६५९चे पूर्वी दहा बारा वर्षेंच हे येथें कायमची–वसाहत करण्याकरतां आले. त्यापूर्वी म्हणजे शके १६४० चे पूर्वी हे कर्नाटक प्रांतीं होते. तेथून येथें आले. त्या वेळीं बरोबर 'दशावतार नाटक' हें नवचीज म्हणून आणून तें लोकांपुढें ठेविलें.

राजपत्रावरून होणारा बोधः— राजमुद्रांकित पत्रांत "नाइक दशावतारे" "गोत समवेत" हीं वाक्यें फार महत्त्वाचीं आहेत. यावरून असा बोध होतो कीं,

श्यामजी नाईक यांची दशावतार नाटकरूपानें करून दाखविणेची कंपनी असून ते लांब लांब हें नाटक करून दाखविणेकरतां जात व श्यामजी हे त्यांत खुद्द नाइकीचें काम करीत. त्यांची कंपनी नांवाजलेली व राजदरबारींहि प्रसिद्ध अशी होती. त्यांचे जोडीदार वाडा पेठ येथील महाजन शिवराम नाईक गोडबोले हे याच सुमारास आंग्रे दरबारीं तोफखान्यावर होते. त्यांचे माहितीनें आंग्रे दरबारचें आमंत्रण श्यामजी नाईक यांना आलें. कर्नाटकांतून येतांना हे दोघेही बरोबरच आले. शिवराम नाईक हे कीर्तन करणारे बुवा होते.

दंतकथा— श्यामजी नाईक व शिवराम नाईक गोडबोले यांनीं दशावतार आणून तें नाटक येथील तमासगीर लिंगाइत गुरव लोकांना

श्रीबाळेश्वराचे मंदिरांत शिकविलें. तेथपासून लिंगाइत गुरव नाटक करीत व स्वतः श्यामजी व शिवराम नाईक हे नाइकीचें काम करीत.

रंगशाळा— शके १६५८ सालीं दशावतार नाटक येथें आलें त्या वेळीं श्रीसत्येश्वराचें देवालय लहानच होतें. तेव्हां लोकांची ये जा असतां नाटकाची तालीम करण्यायोग्य ठिकाण तें देवालय नव्हतें. हें देवालय शके १७१० सालीं ग्रामस्थांनीं मोठें बांधिलें, व त्यानंतर तिसरा सभामंडप शके १७९७ सालीं ग्रामस्थांनीं बांधिला. म्हणून दशावतार आला त्या वेळीं श्रीबाळेश्वराचे देवळांत रंगशाळा करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

देणगी व वहिवाट— यानंतर यांचें अनुकरण करून राजापूर प्रांतांत पुष्कळ ठिकाणीं लिंगाइत गुरव लोक दशावतार करूं लागले. राजापूर प्रांतांत कोणतेही गांवीं दशावतार करणेकरितां रंगशाळेंत मंडळी जमली म्हणजे प्रथम एक नारळ घेऊन तो उत्पादकाचें स्मरण करून ठेवून 'तुझ्या कृपेनें आम्ही आरंभिलेलें हें दशावतार नाटक निर्विघ्नपणें तडीस जावो' अशी प्रार्थना करून, नंतर पात्रें रंगण्यास सुरवात होते, व नाटकाचे प्रारंभीं सूत्रधार येणेपूर्वी, काळेबुवा दशावतारास 'चला' अशी आमंत्रण हांक मारतात. याप्रमाणें गोडबोले यांनाही हांक मारणेची वहिवाट होती, असें लोक सांगतात.

उत्पादकाविषयीं— श्यामजी नाईक हे कीर्तनकार होते. यांनीं श्रीचे उत्साहांत कीर्तन करणेचा मान संपादन केला, त्याबद्दल प्रसाद म्हणून एक पुतळी श्रीचे दास्तानांतून मिळते. श्रीकालिकेचे देवळांत ललितापंचमीचे दिवशीं कीर्तन करणेचाहि मान आहे. त्याबद्दल प्रसादाचे दिवशीं एक वडा काळेबुवांना देतात. त्या वडयाला भोंकें पांच असावयाचीं. शिवाय यांना वाडा नवेदर येथें ठिकाण गयाळ नजीक भोरण्याचें ठिकाण होतें तें पूर्वी काळे भोरपी यांना दिलेलें होतें, तें पुढें नारमानी भिडे यांनीं जबरीनें घेऊन आपलें घरभाट ठिकाणांत पूर्वीप्रमाणें सामील केलें.

उत्साहांत प्रवेश— श्रीदेवी महाकालीचा उत्साह नवरात्रांत, श्रीसत्येश्वर याचा उत्साह कार्तिक मासांत, श्रीकालिकेचा उत्साह आश्विनांत-नवरात्रांत व देव श्रीलक्ष्मीनारायणाचा उत्साह कार्तिकमासीं असे उत्साह प्राचीनपासून होतात. परंतु उत्साहांत बसण्यास जागा पुरत नाहीं म्हणून

मंडपास झांपाची नेमणूक शके १७३८ सालची आहे. यानंतर शक १७४१ ते १७४४ सालापर्यंत श्रीमहाकालीचा सभामंडप श्रीमहालक्ष्मी, महाकाली व महासरस्वती या तीन देवळांना एकत्र करणारा असा बांधिला शके १७१० त श्रीसत्येश्वराचा सभामंडप बांधिला. म्हणजे १७०० चे सुमारास हा दशावतार उत्साहांत रूढ झाला. त्यापूर्वी दशावतार करण्यायोग्य अशी देवालयांची स्थिति उत्साहाचे वेळीं नसे. हें दशावतार नाटक शके १७०० पासून तों शके १८५३ सालपर्यंत अव्याहत १५० वर्षें उत्साहांत होत असे.

वाताहत— अलिकडे दहा पांच वर्षें दशावतारे गुरवही नाहींसे झाले, जुनीं लेखी बाडें नाहींशीं झालीं. आजूबाजूचे गांवीं जीं लेखी बाडें आहेत तीं अर्धवट विसंगत अशीं आहेत. त्यामुळें हा दशावतार नामशेष झाला.

पुनर्जन्म— [1]दशावतार नाटकाची अशी कठीण परिस्थिति प्राप्त झाली असतां येथील रहिवाशी हरिभक्तपरायण बाळकृष्ण नारायण अग्निहोत्री दांत्येबुवा यांनीं आपली अमोल वेळ व बुद्धि खर्च करून पूर्वपरंपरेला धरून, नवीन अशीं दहाही अवतारांचीं पौराणिक कथानकें नाटकरूपानें सुसंबद्ध अशीं लिहून तें दशावतार नाटक गांवांतील ब्राह्मण व सारस्वत ब्राह्मण यांतील 'दशावतार नाटकप्रेमी' मंडळीला शिकवून तयार केलें, व शके १८५४ सालचे नवरात्रांत श्रीदेवी महाकालीचे उत्सवांत तें त्यांचेकडून करविलें. या नाटकांत नाइकाचें काम बाळकृष्णबुवा हे स्वतःच करतात. श्रीदेवीचे संस्थानांतून त्यांना आर्थिक मदत मिळत असते. यानंतर हें नवीन दशावतार नाटक आजूबाजूला लोकांनीं दोन तीन ठिकाणीं लिहून नेलें आहे. बाळकृष्णबुवा हे हें दशावतार नाटक इतक्यांत छापून प्रसिद्ध करणार आहेत.

---

१ सदर्हु दशावतार महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत १९३२ सालीं रा. र. कृ. पाटणकर, राजापूर यांनी छापून प्रसिद्ध केले आहेत.

परिशिष्ट

सहाशें वर्षांपासूनची देवाची नेमणूक

लेखांक १

शक १७४९

फेब्रुवारी इ. सन १८२७

ही माहिती सदाशिव कृष्ण भिडे यांनीं स्वहस्तें लिहून ठेविलेली आहे. १३।७५ श्रीदेव नगरेश्वर यासी इदलशाही पातशाई अमलांत आम्हां भिडे यांचा मूळ पुरुष, आम्हांपासून सोळावा, नारमाजनी बिन सांड माजनी यांनीं सरकारांत विनंती करून नेमणूक (पृ. ९ पहा) करून घेतली, असें वडिलमुखें ऐकिवांत आहे. येविशीं सनदपत्रें होतीं ते प्रसंगीं वडिलांचे कारकीर्दीस घर दग्ध झालें त्या वेळेस जळोन दग्ध झाल्यापासून ऐन जिनसांबाबद सदरहु आमचे नांवें प्राचीनपासून वडिलांनीं ठेविला आहे. त्यासी साल दरसाल नेमणुकेप्रमाणें श्रीकडे आदा होत आहे.

भिडे घराण्याचे पिढ्यांचें अनुमान होणेकरतां पांच पुरुषांचे जन्मकाल मिळाले. ते पुढें लिहिल्याप्रमाणें:-

सदरची माहिती सांगणार सदाशिव कृष्ण भिडे शके १७०४
सदरचे बंधु—दिनकर कृष्ण भिडे शके १७०९ मार्गशीर्ष वद्य ९
यांचे पुत्र—महादजी दिनकर भिडे शक १७३६ ज्येष्ठ कृष्ण ३
यांचे पुत्र—गणेश महादाजी भिडे शके १७६२ माघ कृष्ण ४
यांचे पुत्र—विद्यमान—भिकाजी गणेश भिडे शके १८०६ भाद्रपद कृष्ण ५
यांचे पुत्र—विद्यमान—नारायण भिकाजी भिडे शके १८३५ आश्विन कृष्ण २

देवाची असलेली प्राचीन जमीन

लेखांक २

शक १६३६ अधिक आषाढ वद्य १२

इ. १७१४ जुलै १६

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री कान्होजी आंग्रे सरखेल ताा अनंत बिन लखा गुरव मौजे आडिवरे तो राजापूर सुरू खमस अशर मया व अलफ दिल्हें आज्ञापत्र ऐसीजे– हुजूर जंजिरे विजयदुर्गचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, श्रीदेव नगरेश्वर वाडा नवेदर मौजे मजकूर येथें श्रीचें ठिकाण पुरातन आहे. त्यापैकीं आगर जमीन व आगराखालील शेत, केशव भट दांत्या यांचे वडिलांस क्रमाविसीस होतें. त्याचें स्वामित्व कांहीं श्रीस देत होता. अलिकडेस स्वामित्व न देतसे झाले. व ठिकाणावर घर चिरेबंदी बांधावयास लागले. तेव्हां आपण त्यास सांगितलें कीं, तुम्हांस देवाच्या ठिकाणावर घर बांधण्यास प्रयोजन नाहीं. त्यांणीं उत्तर दिलें कीं, ठिकाण आपलें मिरास आहे. इनामत आपणांस

सदरच जन्मावलीवरून १२६ वर्षांत ४ पिढ्या झाल्या. प्रत्येक पिढी ३१ वर्षांची पडते. सरदचे जबानीप्रमाणें इ. सन १३२७ सालाचे सुमारास इकडे जे यवनी राजे होते, त्या राजांपासून ही सनद नेमणूक करून आणिलेली आहे. वरील जबानींत आदिलशाही असें आहे. परंतु त्यावरून मुसलमान बादशहांपासून एवढाच बोध घ्यावयाचा. या वेळीं आदिलशाहीचा जन्मच नव्हता. परंतु इतर कोणत्या राजाची सत्ता होती?

चित्तपावन भिडे भराणें इ. सनाचे १४वे शतकाचे आरंभापासून सुमारें साडेसहाशें वर्षें येथें नांदत आहे.

इ. स. १३२७ चा सुमार हा काल जर बरोबर धरला तर १३२७ इदलशाही ह्या नांवानें लेखक बहामनी सांगत आहे असें म्हणावें लागतें व तेव्हां अल्लाउद्दीन पहिला हा सत्ताधारी होता. असा हा संज्ञाभ्रम पूर्वीच्या लेखांत आढळतो.

आहे. देवाचें ठिकाण नव्हे. त्यावरून आपण पारिपत्यास आलां हें मनास आणून पारिपत्य केलें पाहिजे म्हणौन. त्याजवरून केशवभट दांत्यास व त्याच्या इनामपत्रास व ग्रामस्थ मौजे मजकूर हुजूर आणून मनसुबी मनास आणितां, त्या ठिकाणास "नम*स पैकीं" म्हणून नांव ठेवून इनाम करून घेतलें. दांत्याचें मिरास ठिकाण नव्हे व नमसपैकींहि नव्हे. श्री ठिकाण खरें असें झालें. दांत्या+ कतबेस खोटा झाला. त्यावरून त्याजकडून ठिकाण दूर करून त्यापासून गुन्हेगारी रुपये तीनशें ३०० पोत वसूल घेतले. ठिकाण देवाचें. याची कमाविसी चालिली पाहिजे. त्यास बहुत दिवस गुरवाकडेस कमाविसी चालिली नाहीं. दुसरीकडे कमाविसी लाविल्यानें घालमेल होते. गुरवानें कमाविसी करण्याकरतां तुज देवाचें ठिकाणपासून हरकी दोनशें २०० रुपये पोत वसूल घेऊन ठिकाण कमाविसीस तुझे दुमाला केलें असे. तरी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें कमाविशी करीत जाणें. रबिलाखर छ १६ माहे जमादिलाखर. रुजुछे ८ सवाल पाा हुजूर.

देवाचा बाग

लेखांक ३ श. १६८५ श्रावण शुा १०

इ. १७६३ आगष्ट १८

आज स्वारी राजश्री नारो त्र्यंबक सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ताा कमाविसदार मौजे आडिवरें तो राजापूर. सुरु अर्वा सितेन मया व अल्लफ. गोविंद विश्वनाथ महाजनी भिडे खोत वाडा नवेदर मौजे मजकूर. यांनीं सुभा जंजिऱ्याचे मुकामीं येऊन विनंती केली कीं श्रीदेव नगरेश्वर जागृत स्थान वाडे मजकुरीं आहे. त्यास सन्निध उदक नव्हतें, तें नवी विहीर

---

* नमसी म्ह. नवसी. न वसाहात झालेली, न वसलेली ती नवसी 'ब' चा म होऊन 'नमसी जमीन.'

+ अथापि सांप्रत ही जमीन दाते यांजकडेच आहे.

खणोन उदक जहालें. परंतु पुष्पवाटिका करावयासी क्षेत्र नाहीं. याजकरितां देवाचे उत्तरेस कुडयाट जमीन, देवालयालगत आहे ती इनाम करून दिलियास श्रीचे पूजेस तुलसी व पुष्पें होऊन पूजा चालेल म्हणौन तपशिलें विदित केलें, त्यावरून मनास आणून देव चमत्कृत पूजा ऊर्जा जहाल्यास राज्यास श्रेयस्कर, हें जाणून भात जमीन कुडयाट देवासमीप आहे. त्यापैकीं पांड ८८३ इनामत करार करून हें पत्र सादर केलें असे. तरी साल मजकुरापासून देवाकडे सदरहू तीन पांड जमीन इनामत चालवीत जाणें. नूतन पत्राचा आक्षेप न करणें. जाणिजे छ ८ माहे सफर मोर्तब सुद्.

श्रीनगरेश्वर देवाच्या जमिनीचा पहाणी-खर्डा

लेखांक ४

शक १७०६
इ. १७८४

मौजे आडिवरें तर्फ राजापूरपैकीं जिराइत[1]. वाडा नवेदर तो विजयदुर्ग सुरु खमस समानीन मया व अलफ

श्रीदेव नगरेश्वर भात जमीन

१ बाबू गुरव	कुडयाटें	मांडीव	तुरवांटे
	१ पांड (४॥×४)	१। (५×५)	ठिकाण बावीळ २
	·॥·	(४×२॥) ठिकाणनजिक घर	काठे (७×६)
	·॥·	(४×३) वजा तिपांडी ·।·	बाकी १ वजा तिपांडी ·।·
	२	आकार २। पांड	बाकी १॥। ठि. आकार

वजा तिपांडी ·।· बाकी १॥।· येकूण आकार ·।२।.

---

१ ह्या खडर्यांत देवाच्या जमिनींचें क्षेत्रफळ, प्रतबंदी, आकारबंदी सांगितलेली आहे.

२ म्हाद गुरव

कुडयाटें	मांडीव	तुरवांटे
१। (४॥×५)	१। (८×३॥)	१॥ बावीळ (९ × ३॥)
०॥० (३॥ × २॥)	वजा तिपांडी १	काठें (२॥। × ८)
१॥।० पांड	एकूण २।०	४। पांड

०।० पांड वजा बाकी १॥ पांड येकूण आकार ०।१॥

वजा तिपांडी ८॥।० बाकी ३॥ पांड येकूण अकार ०॥।१॥०

३ शिव गुरव

कुडयाटें	तुरवांटे
०॥० पांड (३॥। × ३)	०।०।० पांड (११ × ९)
१॥ पांड (८ × ३॥)	(९॥ × १०)
	१९ पैकीं निमे.

वजा तिपांडी ०।० बाकी १॥ येकूण २। आकार

वजा तिपांडी ०॥।० बाकी ४॥।० येकूण आकार १८१॥०

तेरीज शिव गुरव

ऐन जमीन पांड	वजा पांड	बाकी पांड	येकूण आकार
कुडयाटें २	०।०	१॥।	८।२।
तुरवाटें ०।०।।	०॥।०	४॥।०	८१८१॥
सरवट भात २॥	०॥।०	१॥।०	८२८२
नागली ४॥	१।	३।	८।२॥।०
८॥४।	८८३	८॥१॥	८२८२॥८२

तेरीज महाद गुरव

ऐन जमीन पांड	वजा पांड	बाकी पांड	येकूण आकार
कुडयाटें १॥।	०।०	१॥	८।१॥
मांडीव १।	०।०	१	८८२।
तुरवाटे ४।	०॥।०	३॥	१॥।१॥
नागली १॥	०॥०	१	११॥।०
८।३॥	८८१॥।	८।२	८१॥१

तेरीज बाबूगुरव

	ऐन जमीन	वजा	बाकी	येकूण आकार
कुडयाटें	२ पांड	०।० पांड	१।॥ पांड	१।२।
तुरवाटे	२	०।०	१॥।	१।२।
मांडीव	१।	०।०	१	११२।
	८८।०॥	८८॥।०	८८४	८१८॥।०

सरवट भात २। (३ × १४) २। (९ × ५) ८४॥

नागली ठिकाण देव २॥ (७ × ७) वजा सांवे ८॥।० ८१॥।

नागली १। (८ × ३॥) वजा खराबा ८८॥ बाकी

वजा खराबा ८८३। बाकी ८८३। येा ॥

एकूण आकार ८८२८२ ८८१ येकूण आकार १॥।०

आ. ८।२॥।०

प्राचीन देणगीचें रूपांतर

ले० ५ शक १७९६ आषाढ शु्ा ११
१८७४ २५ जुलै

श्रीदेवनगरेश्वर सनद नंबर १५२

धी सेक्रेटरी आफ इन्कौन्सिल यांजकडून—

श्रीदेव नगरेश्वर मौजे आडिवरें तो राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानाचे वहिवाटदार यांस

माजी राज्याचे वेळेपासून सालिना नक्त नेमणूक श्रीदेवनगरेश्वर मौजे आडिवरें तो राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानाबद्दल पावत आहे. ऐसियास असें ठरविलें आहे कीं सरकारी रुपये ११ अक्षा रुपयांची नेमणूक सदर देवस्थानचे वहिवाटदार जोंपर्यंत इमानें सरकाराशीं इमानेइतबारें वागतील तोंपर्यंत इंडियाचे सरकारी खजिन्यांतून निरंतर चालवून आदा करण्यांत येईल.

ही सनद दी सेक्रेटरी आफ स्टेट इनकौन्सिल यांचे मुंबईचे गव्हरनर इनकौन्सिल यांचे हुकुमावरून कर्बल घरीन सो सी. एस. आइ ऐळी-एशनसेंटलमेंट आफिसर, दक्षिणभाग, यांचे सई व शिक्यानिशीं तारीख २५ माहे जुलई सन १८७४ इसवी रोजीं तयार करण्यांत आली आहे.

शिक्का–सई इंग्रजी.

ले. ६

शक १७१७ आषाढ व १३

इ. १७९५ जुलै १४

यादी श्रीदेव नगरेश्वर वास्तव्य मौजे आडिवरें येथें श्रीचे पोवळ पापडीचे काम वेदमूर्ती केशव दीक्षित लिमये यांजकडून करविलें त्यास खर्च लागले ते रुपये.

९८१॥।१॥- पोंवळीस खर्चाबद्दल.

४८७८१ पापडीचे कामास खर्चाबद्दल.

१४६९८-॥-

सदरहू हिशोब वेदमूर्ति बापू दीक्षित लिमये यांजकडोनं घेऊन फडशा केला असे. मिति आषाढ वद्य १३ मंगळवार शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे मुक्काम पुणें.

देवालयबांधणी

ले. ७

१ त्रिपुर–शके १७१७ सालीं बांधिलें व प्रत्येकीं २६ रुपये खर्च आला.

१ देवालयाचा जीर्णोद्धार–राजश्री वासुदेव गोविंद भिडे वाडा नवेदर आज मुा ब्रह्मदेश, यांनीं शके १८२५ प्लवंगनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य ५ रविवार, रोजीं केला.

कडिपाट–बाहेरील सभामंडपाचा. शक १८४० सालीं ग्रामस्थांनीं केला.

फरशी संगमरवरी–आंतील सभामंडपांतील शके १८५४ सालीं वैशाख मासीं गोठणकर यांनीं धर्मार्थ केली.

श्री देवाचा जुना उल्लेख

ले. ७

श. १२४९
इ. १३२७.

श्रीमहालक्ष्मी, श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती, श्रीरवळनाथ आद्या चार मूर्ती अडिवऱ्यास प्रकट झाल्या. ती ज्या पुरुषानें स्थापन केली त्या वेळीं श्रीला रहावयास जागा योजिली. वेत्यांस रहावें तर ब्राह्मणवस्ती नाहीं, पाणेऱ्यांत रहावें तर कातळवट जमीन. राजवाडीस रहावें तर तेथें ठीक नाहीं. शोधांतीं श्रीचे खात्रीस वाडा पेठ येथें मध्यभागीं जागा योजिली. तेथें सभोंवतालीं माळजमीन, नजीक शहर, वाण्याचीं दुकानें, सर्व जिन्नस घेऊन बाळगोपाळ सुखी रहातील, आणि दर्शन घेऊन भजतील, ब्राह्मणाचा ब्रह्मकर्मघोष श्रवण होईल तेथें मध्यपुरुष श्रीशंकर नगरेश्वर प्रत्यक्ष ईश्वर त्याचे सन्निध रहावें. श्री अंबिका भवानी तेजांत तेज मिळोन एकरूप झालें असे.

नवा गुरव

ले. ८

शक १६०० सुमारें
इ. सन १६७८

श्रीदेव नगरेश्वर याचा गुरव पूर्वी होता त्याची नकल झाली. त्यावर नारमाजनी खोत वाडा नवेदर यांजकडे वहिवाट आहे. याकरितां देवाची पूजा नाहीं. (पूजेकरतां गुरवकीचा गुरव नाहीं.) खोत मजकूर हे कांहीं दिवस पूजा करीत. हल्लीं गुरव आहेत, त्याचा वडील कोणीकडून येऊन श्रीलक्ष्मी नारायण—मोघरें येथें धुमाळ वाजवून होता. तेव्हां श्रीस पुजारी नाहीं याजकरितां तेथून आणून आपलें ठिकाण घांटावा, येथें खोपटी बांधोन देऊन, श्रीची पूजा करावयासी तेथें कांहीं दिवस होता. तेथून जावयासी दूर म्हणोन नजीक खोपटी बांधोन राहिला.

श्रीदेवास नेहेमीं खर्च सरकारांतून इनामत, भात सात मण व नंदादिपास तेलाबद्दल तीळ दोन मण गांवापैकीं द्यावे, अशी आहे.

पुराणासंबंधीं व्यवस्था

ले. ९

शक १७१७ सुमारें
इ. १७१५

कार्तिकमास पुराणाबद्दल देणगी

वेदशास्त्रसंपन्न राजश्री महादेव भटजीबावा पुराणीक मुकाम कसबा पुणें स्वामीचे सेवेसीं

सेवक–भिकशेट शेटये व मान शेट खोत वाडा पेठ मौजे आडिवरें कृतानेक साष्टांग दंडवत विनंती विशेष. कार्तिक शु।। ४ तागाइत आपले कृपेंकरून सुखरूप असों. तुम्ही तेथें असतां श्रीनगरेश्वराकडे पुराण चालत नाहीं. याजकरितां अगत्य धरावें. सर्व प्रकारें आम्ही तों आपलें आहों.

शके १६७५ (सुमारें)
२ इ. सन १७५३

जबानी–कृष्ण महाजनी भिडे नवेदर यांची–माद शेटीचा बाप रवळ शेट शेटकी चालवी तेव्हां श्रीनगरेश्वराचे देवळीं पुराणीक सदाशीवभट याचा बाप विश्वनाथभट पुराण सांगत. तेव्हां रवळ शेट ऐकत ते समई दक्षिणेचे ऐवजीं ' काठें ' सडयावर पेठेचे घारेवर दिलें तें अद्याप त्याजकडे आहे.

समाराधनेची यादी

ले. १०

शके १७३१
इ. सन १८१९/०२

यादी श्रीदेव नगरेश्वर वाडा नवेदर मौजे आडिवरे तो राजापूर सुरू अशर मयातेन व अलफ सालाबाद दर घरटीस एक पायली शिरोळी तांदूळ व पैसा एक याप्रमाणें शिरस्ता असतां कमी देतात सबब सर्वांचे मतें ठराव. दर घरटीस शिरोळी तांदूळ एक पायली व एक पैसा याप्रमाणें सालाबाद द्यावयाची मान्यता

गोविंदभट अग्निहोत्री
बापूभट दाते अग्निहोत्री
गणेश लक्ष्मण भिडे
कृष्ण महाजनी भिडे

रामचंद्रभट दाते अग्निहोत्री
गणेशभट दात्ये अग्निहोत्री
बाळाजी गणेश भिडे
विसाजी राम भिडे
महादाजी विश्वनाथ भिडे
वासुदेव गणेश भिडे
बाबू जोशी
रामचंद्र जोशी
नारो महादेव गोडबोले
रुद्र महाजनी भिडे
बाबदेवभट दात्ये
बापुभट दात्ये
नागेश्वरभट दात्ये
राघो मोरेश्वर फडके
विश्वनाथभट काळे महाजन
गोविंद दीक्षित लिमये
रघूनाथ दीक्षित लिमये
गोविंद शंकर जोशी
गणेशभट फडके

येणेंप्रमाणें ठराव श्रीनगरेश्वराचे देवालयीं जाहला. मिति कार्तिक वद्य ५ इंदुवार शके १७३१ विद्यमान रुद्र महाजनी भिडे दस्तुर खुद.
[सर्वारिष्ट–निरसनार्थ जी समाराधना होते त्याबद्दलची ही माहिती आहे.]

वाराभिषेकाची नेमणूक

लेखांक ११ शक १७५३ कार्तिक शु॥ ११
१६ डिसेंबर १८३१

सेवेसीं खोत वाडा नवेदर मौजे आडिवरें तर्फ राजापूर तालुके विजयदुर्ग सुरू इसने सलासीन मयातेन व अलफ. श्रीदेव नगरेश्वर वाडा मजकूर यांस श्रावणमासीं *वाराभिषेकाची सरकारांतून नेमणूक आहे. त्यास सालमजकुरीं वाराभिषेक वेदमूर्ति राजश्री त्र्यंबकभट बिन बाळंभट काळे रहाणार मौजे मजकूर याणीं नेमणुकेप्रमाणें श्रीस अभिषेक केला. खावंदांस जाहीर व्हावें. ता. १६ माहे डिसेंबर सन १८३१ बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

सई—सखाराम नारायण भिडे
दस्तुर—दिनकर कृष्ण भिडे

*प्रति सोमवारचा अभिषेक म्ह० वाराभिषेक.

देवाची चीजवस्त

लेखांक १२ श्रावण शु. १० शक १७५८
१३ जुलई १८३६ इ.

यादी मोजदाद—श्रीदेव नगरेश्वर वाडा नवेदर मौजे आडिवरें तर्फ राजापूर तालुके विजयदुर्ग सुरु सन सबा सलासीन मयातैन व अलफ सुभाचा हुकूम ता. १३ जुलई सन १८३६ रोजीं ताकीद घेऊन शिपाई आला त्याजवरून दास्तानाची मोजदाद केली. श्रावण शु. १० श. १७५८ अदमासें रुपये—

२७ श्रीदेव नगरेश्वर यांचा चांदीचा मुखवटा वजन तोळे २७ दर रुपयास तोळ्याप्रमाणें कळससुद्धां.

१० दाब रुप्याचा. पेट्यासुद्धां वजन तोळे ११ दर रुपयास मासे १३ प्रमाणें.

१ सोन्याची कुडकी वजन मासे ८८८।८१. पैकीं वजा कुडकांतील मोतीं. वजन १ गुंज. बाकी एक मासा. दर तोळ्यास १२ प्रमाणें.

१६॥≡ तांब्याचे दागिने. तपशील. ·॥॰ टोप वजन ८८॥॥१
१॥॥= प्रमाणें कळशी वजन ८८१॥॥११ १ गळती ॥ ८८१८२
१ ,, ,, ,, ८८१ ८।= शाळुंखा तांब्याची
१। ,, ,, ,, ८८१। वजन पक्के ८८८।९
१॥।– कोळंबें तांब्याचें ,, ८८१॥।६
१॥= ,, ,, १ वजन ८८१॥१२

५।– पितळी दागिने तपशील. १६॥≡
१॥≡ समई वजन ८८२।९ २ घंटा १ धुपाटणें
१॥= ,, ,, ८८२१९ १ गंधाचा पेला १ नाग
२ किरकोळ दागिने १ छत्री १ पंचारती.
६० ५।– ७

एकूण साठ रुपयांची चीजवस्त सदरीं लिहिल्याप्रमाणें आज मोजदादीस आहे. सदरहू श्रीचें दास्तान बाळा बिन बाबू गुरव व कृष्णा बिन बच्चा गुरव लिंगायत याजपाशीं आहे. तारीख माहे सपटंबर सन १८३६.

७ धोतरजोडे	१ दुपेठा	३ रेशमी पोवत्या सोंवळ्याच्या
१३ पागोटीं	१ फडकी काळी	१ शेला १ टोपी सकलादी
१ निशाण खाकी	१ गजनी	१ खाकी १। कित्ता भांडी
१ टोप तांब्याचा	·।· तपेली	

८९। ८८१ २८

सालाबाद उत्पन्न ५ मण तीळ, ७ मण भात, ·।=॥—१२॥. येणेप्रमाणें असे.

देवाचीं नित्यनैमित्तिक कृत्यें

शक १८२५
लेखांक १३ इ. १९०३

श्रीस पूर्वी नित्याभिषेक, वाराभिषेक, मासाभिषेक यांच्या नेमणुका होत्या. अलीकडे कांहीं नाहीं.

वसंतपूजा—चैत्र शु. १ रुंढेकर खोत यांची असते. ते पूजा करतात. चैत्र शु. २ शेट्ये यांची पूजा. ही हर्डीकर यांचेकडून होते.

नागपंचमी—मृत्तिकेचा नाग कुंभार आणून देतो.

गणेशचतुर्थी—गणपति मृण्मय कुंभार करून देतो.

कार्तिकमास पुराण—रोज सकाळीं फडके हे सांगतात.

कार्तिक शु. ११ रोजीं महापूजा तांदुळांची. रुंढेकर यांची असते.

तुलशीविवाह—शु. १२ रोजीं महाजन जोशी हे लाविताति. व दुसरीकडे हर्डीकर हे लावून नंतर श्रीमहाकालीचे देवालयांतील तुलसीचा विवाह लाविताति.

त्रिपुर—जोशी, गोडबोले, गोरे यांचे शु. १५ ला लाविताति.

उत्साह—कार्तिक व. १० पासून कार्तिक व. ३० पर्यंत होतो. हा उत्साह ग्रामस्थ वर्गणी करून करतात.

श्रीमहाकाली पंचायतनांत प्रत्येक ठिकाणीं श्रीनगरेश्वराचें प्राथम्य आहे. वार्षिक राखण ठेवितात त्या वेळीं प्रथम श्रीनगरेश्वराला राखण ठेवावयाची.

देवालयाला रंग देणें, कौलें चाळणें वगैरे ऊर्जा श्रीमहाकालीचे

संस्थानांतून केली जाते. प्रसगीं सरंजाम श्रीमहाकालीकडूनच आणिला जातो.

दररोज सूर्योदयीं लिंगाइत गुरवाकडून प्रक्षालनपूजा होते. दहा घटिकेला महानैवेद्य गुरवाकडून करवून दाखविला जातो. सांजवात गुरव लाविती.

देवाचेपुढें येणारें उत्पन्न चाकरीचे गुरवानें घ्यावयाचें असा नियम आहे. प्रत्येक घरीं रोज नैवेद्य समर्पण केला जातो. तो गुरव जाऊन घेऊन येतो.

देवाच्या नंदादीपाची व्यवस्था

ले. १४ शक १८३९ वैशाख वा। ४

इ. सन १९१७

यादी श्रीदेवनगरेश्वर यांचे देवालयीं नंदादीप सतत चालू रहावा, असें वाडेकरी मंडळी मिति वैशाख वा। ४ शके १८३९ गुरुवार रोजीं जमल्या वेळीं ठरलें. या कामीं दरमहा दहा शेर प्रमाणें वर्षाचे तीन मण तेल लागतें असें ठरवून त्याबद्दल तेल देणारांची नांवनिशी. पांचरुपये—रामकृष्ण त्र्यंबक दाते अग्निहोत्री यांनीं दिले त्याचे येणारे व्याजांतून त्यांचे वांटणीचें तेल घ्यावें.

श्रीमहाकाली	समई
भिकाजी गणेश भिडे ०।१०	दामोदर सदाशीव वेळणकर ०।१०
महादेव सखाराम काळे ०।५	हरी रामचंद्र जोशी ०।१०
काशिनाथ बहिरव गोरे ०।२॥	वासुदेव गोविंद भिडे ०।५
भिकाजी काशिनाथ दाते ०।२॥	चिंतामण कृष्ण दीक्षित ०।२॥
गोपाळ सदाशीव आपटे ०।२॥	विनायक बल्लाळ आपटे ०।१०
दत्तात्रेय लक्ष्मण जोशी ०।५	गोविंद बल्लाळ जोशी ०।५

लेखांक १५ अपूर्ण

श्रीमहाकाली संस्थान आडिवरें तो राजापूर जिा रत्नागिरी **श्रादेवी महाकाली मौजे आडिवरें या वगैरे देवांची स्थापना** कोणी केली व तेथें वाढ्यानिहायचे खोतांस मान कोणते प्रसंगीं कसें मिळाले, याबद्दलची हकीकत—

१. मौजे आडिवरें वाडा पेठ येथें शके ११०० पावेतों जैन लोकांचीं देवस्थानें व वस्ती होती. शंकराचार्यस्वामी यांनीं जैन मतांचें खंडण करून आपले देवांची स्थापना करणेचा क्रम सुरू करून आडिवरें मुक्कामीं स्वामी आले. त्या काळीं जैन लोक हे ना ऐकत. तेव्हां त्यांची अशी समजूत केली कीं, तुमचा व आमचा देव दोन नाहीं, एकच आहे. यासाठीं तुमचे व आमचे दोन्ही देवांची स्थापना करून त्यांची पूजार्चा तुमचे स्वाधीन देऊं. या गोष्टीस ते लोक कबूल जाहल्यावरून त्यांचा देव जैन ब्राह्मण व आमचे देव श्रीमहाकाली व योगेश्वरी अशा तीन देवांची स्थापना करून पूजा जैनांचे गुरु यांच्या स्वाधीन केली. पुढें त्या गुरूची संतति वाढली, त्यास भाविक गुरव म्हणूं लागले. पुढें कांहीं वर्षांनीं जैन लोकांची वस्ती मोडली जाऊन कदम या आडनांवाच्या मराठे लोकांचा समुदाय जमूं लागला. शेवटीं त्यांचा इतका उत्कर्ष जाहला कीं, त्यांचे आज्ञेबाहेर कोणतेही वाड्यांत कोणी काडी हलवूं नये. 'बलगुबल' जाहली असतां पांच सहाशें मनुष्य हत्यारबदानिशी एकदम बाहेर निघे. बादशहाकडून वसुलास कोणी आला असतां त्याजला एक पैसाही वसूल मिळत नसे. वसुलाचे कामदारास मारझोड करून लावून देत असत. हा बोभाटा बादशहापावेतों गेला तेव्हां त्यानें बंदोबस्तासाठीं पुणें येथील सरसुभेदारास आज्ञा केल्यावरून त्याजपाशीं रत्नागिरी तालुक्यांतील सडे गांवचे राहणारे नाना भिडे या नांवाचे गृहस्थ सरदारीचे कामावर होते. त्यांची योजना बरोबर दोनशें अरब देऊन या बंदोबस्तासाठीं सरसुभाहून जाहली. त्यांजला अशी आज्ञा जाहली कीं, जे लोक दंडेली करतील त्यांची कत्तल उडवावी. पुढें ते दोनशें अरबांनिशीं आडिवऱ्यास आले. परंतु कदमांचें मनुष्य फार असून सर्व हत्यारबंद, तेथें दोनशें मनुष्यांचा इलाज चालेना व दुसरा कांहीं बंदोबस्ताचा इलाज सुचेना. तेव्हां त्यांनीं वाड्यानिहाय राहणारे मुख्य मुख्य शाहाणे मनुष्यांची मदत घेतली. त्या समयीं **वाडा कोंडसर येथील जगन्नाथपंत परांजपे** यांनीं आपल्या वाड्याचे सभ्य गृहस्थ मंडलीक अशा आडनांवाचे होते, त्यांजला अशी मसलत दिली कीं, कपिलाषष्ठीचा योग आला आहे. त्या पर्वांत कदम हे समुद्रास जातील. तेव्हां ती संधि पाहून त्यांची कत्तल उडविण्याविषयीं नाना भिडे सरदार यांना सुचवावें. ती गोष्ट मंडलीक यांनीं भिडे यांस कळविली.

नंतर कपिलाषष्ठीचे पूर्व दिवशीं रात्रौ सर्व अरब लोकांस वाडा वेत्यें येथील रानांत जागोजाग ठेविलें. दुसरे दिवशीं कदमांचे लोक समुद्रस्नानास जमावानें हत्यारबंद निघाले. या कारणानें त्यांचे अंगावर चालण्याचा इलाज चालला नाहीं. पुढें कदम यांनीं हत्यारें किनाऱ्यावर ठेवून समुद्रांत स्नानाकरितां शिरले. ती संधि अरब यांनीं राखून एकदम तेथें जाऊन किनाऱ्यावर ठेवलेलीं हत्यारें घेतलीं. जे लोक दंडेलीस आले, त्यांची कत्तल उडविली. जे लोक शरण आले त्यांस सोडलें. त्या वेळीं कित्येकांच्या बायका सत्या गेल्या; तेव्हां आडिवरें येथें शांतता जाहली. मंडलीक यांचे मदतीनें आपला हेतु तडीस गेला, या कारणानें कोंडसर वाड्याची दुतर्डीची खोती व महाजनकी त्यांजला देवविली. आणि नवेदर वाड्याची खोती व महाजनकी सुरसुभांचे आज्ञेनें आपण घेतली. पुढें कांहीं दिवशीं मंडलीक हे अजारी पडले. त्यांजला संतति नसलेकारणानें त्यांनीं आपले आश्रित शहाबेदर यांजला उगवत वाड्याची खोती देऊन व महाजनकी परांजपे यांस दिली. कदम लोकांवर अमल परांजपे यांचे मदतीनें बसला. त्या कारणें त्यांजला वाडा पेठ येथील श्रीमहालक्ष्मीचें देवालयींही महाजनकीचा मान देवविला. पुढें मंडलीक हे मयत झाले.

२. शके १२०० अखेर श्रीयोगेश्वरी देवीची मूर्ति जीर्ण जाहल्या कारणानें त्यांनीं श्रीदेवी महाकाळी, श्री देवरवळनाथ आणि महा सरस्वती अशा तीन देवांची स्थापना करण्यास नव्या मूर्ति तयार करून गलबतावरून वेत्यें बंदरांत आणिल्या. त्या मूर्ति तेथील पाहणारे गोविंद येसनाक भंडारी यांजला सांगून वाडा पेठ येथें आणविल्या. त्या वेळीं आपणांस या देवीचा कांहीं मान असावा, कारण जशी मुलगी माहेराहून सासऱ्यास गेल्यावर तिची संतति वाढून ती लौकिकास येते, तसें या देवास आम्ही आपले वाड्यांतून पेठेंत पोंचविलें. तेथें लौकिकास येणार, सबब आमचा येथें विशेष मान असावा असें त्यांचें बोलणें पडलें. तेव्हां हें जर माहेर आहे असें तुमचें म्हणणें असेल, तर तुम्ही माहेरचा एक पोषाक दरसाल देण्याचें कबूल करावें, म्हणजे हें माहेर असें समजून तुमचा विशेष मान ठेवूं. याप्रमाणें भिडे यांनीं सांगितल्यावरून त्यांनीं सालोसाल पोशाक

देण्यार्चे कबूल केलें. तेव्हां त्यांचा अधिक मान ठेविला. तो असा कीं, एक साल आड करून देवाची स्वारी अवघे वाड्यांत फिरावयास जाईल त्या वेळीं त्या वाड्याचे हद्दींत देवास दुसरे कोणी हात लावूं नये, तेथील भंडारी जाधव लोकांनीं आपल्या सीमेपर्यंत पोंचवीत जावें, अशी समजूत करून तेव्हांपासून श्रीचे हुकुमानें एक साल देव फिरावयास जाण्यार्चे ठरविलें.

३. पूर्वी श्रीयोगेश्वरी देवीचें देवालय लहान होतें, त्याची खूण वेतकरखोत यांचे बसण्याचे जागीं मागचे अंगास खांबाचे उथळ्याचा दगड आहे त्याजला हल्लीं स्तंभ असें नांव पडून त्याची पूजा करितात व त्याचे उत्तरेस मिलीपाशीं दगड आहेत त्यांवर कोंबडयांचीं वगैरे देणीं देत असत, एवढेंच होतें व देऊळ फार जीर्ण जाहालें होतें आणि मूर्तीही जीर्ण जाहाली होती. सबब नवें देऊळ भिडे यांनीं बांधून तेथें श्रीदेवी महाकालीची स्थापना केली, व समोर महासरस्वतीची आणि उजवे बाजूस श्रीदेव रवळनाथ आणि उत्तरेस आडिवरें नगर कदम यांचे हातून मुक्त जाहालें सबब श्रीनगरेश्वर या देवांच्या स्थापना केल्या. मंडलिक यांनीं मसलत दिली ती सत्य जाहाली, या कारणानें तीन वाडयांत सत्येश्वर महादेवाची स्थापना केली.

४. कदमांचे मनुष्यांपैकीं जे लोक शरण आले त्यांचा या देवालयीं मान असा ठेविला कीं, त्यांनीं दरसाल देवास एक पोषाक नेसवून त्याजवर राखणीबद्दलचा कौल घेत जावा व देवीस नैवेद्य करून जावें. देवळांतील खरकटें त्यांनीं काढूं नये. पेठ वाडयांत जो नवा खोत होईल त्यानें काढावें. या अन्वयें ठरून अवघे वाड्यांतील सर्व मुख्य लोकांनीं ज्याच्यानें जशी जाहाली तशी मदत भिडे यांना दिली. सबब त्या वाड्याच्या त्याजला देऊन श्रीदेवालयीं त्यांचे मान आदिपश्चात् ठेवण्याची योजना भिडे यांचे सांगण्यावरून सरसुभांतून जाहाली.

५. शके १३०० चे सालीं वाडा कालिकादेवी येथील भाटे व पंडित यांचे वजन सरकारांत अधिक पडलें. त्या कारकीर्दीत श्रीकालिकाई हिची स्थापना भाटे यांनीं केली व शंकराजीपंत पंडित यांनीं आपल्या नांवाचा श्रीशंकरेश्वर देव ह्यांच्या स्थापना केल्या आणि सर्व आडिवरें गांवचा

कुळकर्णीपणा पंडित यांणीं मिळविला. या देवाच्या स्थापनेस मदत वाडा कोर्मे येथील मोर्ये मंडारी यांनीं दिली सबब त्या वाडेकरी यांचा मान भाट यांनीं त्या देवालयीं ठेविला.

लें. १६ श्रीः शक १६८२ फाल्गुन शुा ८
इ. स. १४ मार्च १६३१

करिना जबानी– संभूशेट खोत वाडा पेठ मौजे आडिवरें तर्फ राजापूर सुरू इसने सितेन मया व अलफ. श्रीमहालक्ष्मीचा कोंडें व मठ याची हकीकत राजश्री गोविंद माजनी वाडा नवेदर यांनीं पुशिली, त्यास आपण श्रीच्या देवालयीं बसलों होतों तेव्हां जाना परीट, नारशेट सोनार, बापूजी भंडारी, ऐसे बसलों होतों. तेव्हां मीं पुशिलें, पेठेंतून पाट* नवेदरास कसा गेला व कोणी नेला ? तेव्हां ते बोलिले जे; महाजनी व वाडेकरी यांनीं घरण बांधोन पाणी नेलें. अर्धमार्गें गेलें आणि पुढें न चाले. जिरोन गेलें. तेव्हां श्रीमहालक्ष्मीस कोंडें व मठ दिला. व देऊळवाडयाचे खोत यास पासोडी, वर्षास एक द्यावी व तांदूळ पेटकरांस चोवीस कुडव× खोत नवेदरकर याखेरीज द्यावे. ऐसें द्यावयास केलें, तेव्हां पाणी गेलें. हें लिहोन दिलें सही छ. ६ माहे शाबान.

---

* पाटवडी—पाट नेण्याचा मार्ग—च्या शिस्तीची यादी शक १५५४ मधील आमचे संग्रहीं हस्तलिखित आहे. ह्या वरील जबानीप्रमाणें पाटाचे वेळीं जर महालक्ष्मीसही जमीन दिली असेल तर हा पाट उपर्युल्लिखित शकांमधील असल्यामुळें जमीनहि तेव्हांच महालक्ष्मीकडे दिली असली पाहिजे हें ठरतें. ही जमीन वाडा नवेदरपैकीं आहे.

× वाडा नवेदर येथील लोक पाटाचें बलुतें म्हणून बारा कुडव तांदूळ व पासोडीबद्दल बारा आणे देतात. बाकी राहिलेले बारा कुडव तांदूळ ? अंदाज कीं, कशेळीचे जत्रेंत आडिवरेकर वऱ्हाडी मंडळीला म्हणून जे बारा कुडव तांदूळ कशेळकरांकडून दिले जातात ते हे असावे आणि त्याचा संबंध या तांदुळांशीं जमिनीच्या मोबदल्यानें वगैरे केलेला असावा असें वाटतें.

महाकाली-स्थापना-कर्ते

ले. १७

शक १७१० भाद्र. शु. २
इ. १७८८ सप्ट. २

१ करिना जबानी भिकशेट बिन समशेट शेटये खोत वाडा पेठ मौजे आडिवरें तर्फ राजापूर सुा तिसा समानीन मया व अलफ. कारणें लिहून दिल्हा करिना ऐसाजे. पूर्वी कोणे कालीं वाडे मजकुरीं श्रीदेवी महाकालीची स्थापना झाली तेव्हां आपला वडील आला. श्रीची स्थापना आमचे वडिलांचे हातून झाली त्या पुरुषानें श्रीजवळ उजवे हातास देवालयांत घोंडा घेतला आहे त्यास आकारी म्हणतात. त्याची पूजा ऊर्जा श्रीबरोबर नित्य चालत आहे. त्यापासून खोती व शेट्ये पण व मानपान वाडे मजकूरचा आपणाकडे चालत आहे. त्या अलिकडे पांच सात पुरुष झाले त्यांचीं नांवें आपणांस माहित नाहींत. श्रीजामदारखाना व वस्तभाव पुरातन आम्हाकडेसच आहे. याप्रमाणें लिखित भोग्यानिशी पुरवून देऊं. हा करिना लिहून दिल्हा छ १ जिल्हेज.

२ जबानी-बाळाजी गणेश भिडे सरखोत उमर वर्षे ७० श्रीचे मुखवटे लग्न मुहूर्तास कोणाकडे पूजितात म्हणोन पुशिलें ? जो शेटकी करीत आला त्या कडेस पूजितात इतर वाणी यांचे घरीं पूजीत नाहींत. येणेंप्रमाणें असे. कलम १

ले. १८

आख्यायिका

(१) शके १२०० अखेर श्रीयोगेश्वरी देवीची मूर्ती जीर्ण झाल्या कारणानें त्या जागीं श्रीमहाकाली, श्री देव रवळनाथ आणि श्रीमहासरस्वती अशा तीन देवांच्या मूर्ती नव्या तयार करवून त्यांची स्थापना करणेकरतां गलबतावरून वेत्यें बंदरांत आणिल्या.

(२) वेत्यें बंदरांत एका मासे पागणाराला त्या जाळ्यांत सांपडल्या.

(३) गोमंतकांतून या मूर्ती तयार करवून वांकडे यांचेबरोबर गलबतावरून वेत्यें बंदरांत आणिल्या.

(४) शेट्ये घराण्यांतील दंतकथा- महांकाळ नांवाचे आमचे पूर्वजानें

श्रीची (महाकाली) स्थापना केली. त्या वेळीं दामाजीपंतानें, ज्या दुष्काळांत कोठारें लुटविलीं तो दुष्काळ होता.

(५) नाना भिडे सरदार यानें वेत्याचे बंदरांत कदम तावडे यांचा नाश केल्यानंतर श्रीमहाकालीची स्थापना झाली.

(६) या सात मूर्ती तयार करवून गलबतावरून नेत असतां तें गलबत वेत्यें बंदरांत फुटलें व मूर्ती बुडाल्या त्या एका कोळ्याला जाळ्यांत सांपडल्या व त्यांची निरनिराळ्या ठिकाणीं स्थापना केली. विजयदुर्गाचे बाजूस 'कात्राई' म्हणून जी देवी आहे ती या सातापैकीं भ्रष्ट झालेली देवी आहे. तिला ओंवळी देवी म्हणतात. या सात देवी बहिणी म्हणतात.

महाकालीच्या स्थापनेविषयीं आख्यायिका

ले. १९

१ श्रीच्या मूर्ती आडिवऱ्यास प्रकट झाल्यावर श्रीनें राहावयास जागा योजिली.

१. वेत्यास रहावें तर ब्राह्मण वस्ती नाहीं.

२. पाणेऱ्यास रहावें तर तेथें कातळवट जमीन.

३. राजवाडीस रहावें तर तेथें ठीक नाहीं.

उपरिनिर्दिष्ट स्थानीं स्थापना करण्याच्या योजना केल्या त्या ठिकाणीं श्रीला रुसवून नेण्याची चाल आहे. तीं स्थानें–पाणेरें, नाट्याचें तळें, खांबाची बाउळ, जामशेंडें (चांदेल) हीं होत.

खांबाची बाउळ हें स्थान वेत्यांत आहे त्या वाड्यांत स्तंब म्हणून एक स्थान आहे तेथें वर्षांतून एक वेळ जत्रा भरते. त्या ठिकाणींच प्रथम श्रीची स्थापना करावयाची असें ठरवून, वेत्याचे सड्यावरील खांबाचे बाउळेंतून 'मुहूर्तस्तंभ' काढून तो, जत्रा भरते तेथें ठेविला होता. परंतु ती जागा पुढें नापसंत झाली.

शुद्धचर्थ अर्च्येबद्दल शेट्यांकडून खर्चाची वसुली

श. १७१० वैशाख व. १४
ले. २० इ. १७८८ जून ३

अज स्वारी राजश्री गंगाधर गोविंद सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ताा कमाविसदार मौजे आडिवरें ताा राजापुर सुरू तिसा समानीन मय्या व अलफ भिकशेट शेटया पेठ मजकूर यानें भाऊबंद दायाज याचें सुवेर सुतक न धरतां श्रीमहाकालीचे देवालयीं संपर्क केल्यामुळें गांवांत अनोपत पडली, ते समई ग्रामस्थ मिळोन श्रीजवळ निवाडा करितां श्रीचा राग, येविशीं निवडिलें; त्याजवर गांवकरी यांणीं जाब दिल्हा कीं, शेटयाचें सुवेर-सुतक यांचा फडशा होईतों अशौचामध्यें श्रीस संपर्क होऊं देणार नाहीं. याप्रमाणें बोलोन श्रीची अर्च्या करविली त्यास खर्च लागला आहे तो शेटया देत नाहीं म्हणौन विदित केलें त्याजवरून हे सनद सादर केली असे. तर अर्च्येसंबंध खर्च जाला असेल तो भिकशेट यांजकडून घेणें. गांवांत रयतेवर पट्टी एकंदर न करणें जाणिजे छ २७ माहे शाबान मोर्तब सुद.

अर्चेनिमित्त वाडेगत पट्टी

श. १७३७ माघ शु. ३
ले. २१ इ. १८१६ फेब्रु. १

यादी अर्च्या करावयाबद्दल सुरूसीत अशरमय्यातेन व अलफ माघ शुा ३

५॥। वाडा कोणसर बुद्रुक	२॥ पेठ	२॥ वेत्यें
५॥ कोणसर खुर्द	२॥ वाडी बुद्रुक	१। राजवाडी
९। नवेदर	॥॰ वाडी खुर्द	१॥। भराडें
१। रुंढें	१॥ कोंभें	३॥। मोघरें
		२॥ तिवरें
४२ एकूण.		१॥ पाणेरें

महाकालीमंदिराची पोंवळ बांधणी

श. १६९१ माघ वा। २
ले. २२ इ. १७७० फेब्रु. १२

फारिखत शके १६९१ विरोधीनाम संवत्सरे माघ वा। २ राजश्री ग्रामस्थ मौजे आडिवरें यांसी भास्कर महाजनी भिडे खोत वाडा नवेदर मौजे आडिवरें लिहून दिल्हि फारिखत ऐसीजे, श्रीमहाकाली प्रमुख देवजी यांची पोंवळ तुम्हीं बांधावयासी सांगितलीत त्यावरून आम्हीं पोंवळ बांधीन इमारतीचा हिशोब तुम्हांस समजावून तुम्हांजवळ दिला. इमारतीचा पैका लागला तो व्याजमुद्धां भरोन पावलों. बिा राघो शंकर कुळकर्णी मौजे मजकूर.

निा। भास्कर महाजनी भिडे खोत वाडा नवेदर
लिहिलें सई–दस्तुर खुद्द.

महाकाली मंदिरांतील आलिंद + बांधणी

ले. २३ शक १६९६ सालीं

आलिंद राजापुरचे शेट्ये यांनीं बांधिली.

(होळीप्रसंगांतील पोफळीचा बुंधा ज्या ठिकाणच्या कोनाड्यांत ठेवितात तो ओटा. ह्या कोनाड्यास चवाटा म्हणतात. हा आलंदबांधणीचा उल्लेख शेट्येमंडळींत आपसांतील तंटयाचे वेळीं जबानींत एकानें सांगितला आहे.)

महाकालीमंदिर–सभामंडपाकरतां देशमुखांची देणगी

ले. २४ शक १७४३ ४ चैत्र व. १२
१८ एप्रील १८२२ इ.

हू. अजम पोतखान सरगरो महालकरी तो लांजें व प्रभावली.

दामो–र.

अजीदील – बाजी बल्लाळ सरकमाविसदार तो रत्नागिरी–सलाम इसने अशरीन मयातेन व अलफ मौजे वांकेड तो लांजे हा गांव जलतृण-

---

+ आलिंद म्ह. देवालयाबाहेरचा द्वारपालांच्या दोन्ही बाजूंचा ओटा.

काष्ठपाषाणसुद्धां चिंतो* वामन देशमूख यांस इनाम आहे. त्या गांवांत सायाचीं लांकडें आहेत. त्यांपैकीं तीन लांकडें श्रीदेवी महाकाली मौजे आडिवरें यांचे सभामंडपाकरतां देशमूख यांणीं देविलीं आहेत. त्यास लांकडें तोडावयास देवाकडील कोणी येईल त्यास तोडूं देणें, मना न करणें. जाणिजे छ २५ रजब ता॥ १८ एप्रील सन १८२२. ज्यादा काय लिहिणें ?

शिक्का तो रत्नागिरी

देवीच्या मंदिरांतील इतर बांधकाम

ले. २५

१. शक १६९६ सालीं श्रीरवळनाथाचें मंदीर दुरुस्त केलें.

२. सभामंडप– शके १७४१ पासून १७४४ पर्यंत. तीन वर्षें. खर्च १३८०|≫ रुपये.

३. मुखशाळा– शके १७५० सालीं बाजी बल्लाळ लोटलीकर यांनीं श्रीचे खर्चानें बांधिली. (देवीच्या नैवेद्याचा स्वयंपाक करण्याची जागा.)

४. धर्मशाळा– शके १७५३ धर्मशाळा बांधिली. याला कौलें १७३३० व पाठाणें २८० खर्च झालीं. कौलें दर हजारीं १|||. रु. पाटाणे दर शेंकडा ३८– रुपये.

५. छताचें काम– शके १७५९ श्रीमहाकालीचे गाभाऱ्यांतील छताचें काम व भिंतीची दुरुस्ती केली.

६. पडवी– शके १७६५ श्रीमहाकालीचे देवालयाची पडवी बांधिली.

७. बंगला– दक्षिणद्वारावरील. शके १७७१ सालीं बांधिला.

८. बंगला– पश्चिमद्वारावरील. शके १७७९ सालीं पश्चिम बंगल्याची दुरुस्ती केली.

९. पापडीची दुरुस्ती– शके १७८५ सालीं केली. (मंदिरांतील आवाराची फरशी]

१०. धर्मशाळा दुरुस्ती–शके १८०४ सालीं झाली.

---

* हे प्रसिद्ध देशमूख पेशवाईच्या उत्तरकालीं होते.

११. विहीर नवी–श्रीमहाकालीचे पोंवळीबाहेर नूतन पाडून बाग नेमाविली. ता. १० जुन १९३५.

महाकालीचें भांडार

ले. २६ श. १७६१
इ. १८३९

श्रीचें दास्तान

यादी मोजदाद दास्तान श्रीदेव महाकाली मौजें अडिवरें तो राजापूर मुरू सन अर्बैन मय्यातैन व अल्लफ इस्तकबील सन सबा सलासीन. तारीख ३ जुलई सन १८३६ तारीख ३० दिजंबर सन १८३९ पर्यंत शके १७६१.

सोनें

६८९७ पेशजी सन सबा सालीं याद तपशीलवार दिली आहे.

१७५ पुतळ्या ३५ एकूण ३०प्रा ५
७०७२

५२३१ रुपये पेशजी तपशीलवार यादीप्रों.
६॥१ अलीकडे याद ५ सुर्ती
१॥१ चिंचवड
१०५० मोर्ती, हिरे, माणिक, जडाव पेशजी तपशीलवार याद दिली आहे.
८४॥१ तांबें पेशजी यादीप्रों
८१।१॥ पितळ पेशजी यादीप्रों

कापड

६०।· चिरडया पेशजी यादीप्रों
३१॥ पातळें पेशजी यादीप्रों
२१ नवीं पातळें ३ आलीं
११४॥· रेशमी. याद पेशजी
६ दुपेटे ५ याद पेशजी
५० बादली याद दिली सणगें ५
१ पागोटें १
२६१ लुगडीं ११
१।· खण ५

९१२९॥१॥-

दास्तानच्या जुन्या जागा

ले. २७

श्रीचे मुखवटे प्राचीन काळीं मराठा गुरव वतनदार होता त्याजकडेस असत. परंतु त्यानंतर शामलांची धामधूम फार. यामुळें पेठेंत जो शेटकी चालवी त्याकडेस ठेवूं लागले. त्या अलिकडे श्रीशिवछत्रपति शिवाजी महाराज यांनीं स्वराज्यसंस्थापना केल्यावर श्रीचे देवालयीं दास्तान ठेवूं लागलें. ×

दास्तानचे लेखक

ले. २८ श. १७६६
इ. १८४४

श्रीचे जामदारखान्याचें लिहिणेंपुसणें वगैरे गांवचे कुलकर्ण्यानें करावयाचें असे. परंतु राज्यक्रांतीचे वेळीं कुलकर्णी मुशाहिरा बंद झाल्याकारणानें तें काम करीनातसे झाले. त्यामुळें त्या वेळचे संस्थानचे व्यवस्थापक कमिटीनें सर्वानुमतें जो योग्य ठरेल, त्याकडे श्रीचे लिहिण्याचें काम असावें असें ठरलें.

शके १७६६ पासून १७७२ पर्यंत संभूशेट भिकशेट शेट्ये यांजकडे व्यवस्था होती.

शके १७७२ पासून १७८३ पर्यंत वासुदेव बल्लाळ खोत [बेदरकर]

शके १७८३ पासून महादाजी बल्लाळ बेदरकर खोत यांजकडे.

पुढें रामचंद्रपंत बेदरकर यांजकडे काम होतें. ते ता. १२।७।१९०४ रोजीं मयत झाले त्यामुळें त्यांचे जागीं गणेश महादेव भिडे यांची नेमणूक ता. १६।७।१९०४ रोजीं झाली. ते वारल्यामुळें त्यांचे जागीं त्यांचे पुत्र भिकाजी गणेश भिडे यांची नेमणूक ता. १६।१।१९०७ पासून झाली. आज हेच काम पहातात.

× हा उल्लेख श. १६८९ सालच्या शेट्यांच्या कज्याच्या जबानींतील आहे.

दास्तानचें कबुलायतपत्र

ले. २९

श. १७७२ ज्येष्ठ शु. १३
इ. १८५० जून २०

राजश्री समस्त खोत बारा वाडेकरी मौजे आडिवरें स्वामीचें सेवेशीं कबुलायतपत्र वासुदेव बल्लाळ खोत वाडा कोणसर खुर्द मौजे मजकूर साष्टांग नमस्कार व रामराम विनंती विशेष श्रीदेवी महाकाली मौजे आडिवरें हिचें जामदारखान्याचें काम संभशेट शेटये यांजकडे होतें. त्यास शेटये यांनीं शिलकेंत तफावत करून शिल्लक कांहीं खाल्ल्यामुळें त्याजकडोन जामदारखान्याच्या किल्ल्या घेऊन माझे हवालीं किल्ल्या करून जामदारखान्याचें काम तुम्हीं मजकडे सांगितलें आहां त्यास श्रीदेवीची इस्ताद संभशेट याचे मोजदादींतील, व नवी जमा येईल त्याची वहिवाट इमानेइतबारें करून तुम्हांस सालाचे सालास समजावीत जाऊं. व खर्चबेंच देणें घेणें करावयाचें तें खोतमंडळींचे विद्यमानाशिवाय करणार नाहीं. तुम्हां खोतांचे मनांत एखादे वेळेस मजकडून काम जामदारखान्याचें काढून दुसरे यास सांगणार जाहाल्यास आम्ही दास्तानाच्या किल्ल्या व शिल्लक सांखळी तुम्ही ज्या समई मागाल ते समई हवाली करूं. हरकत करणार नाहीं. मिती ज्येष्ठ शु॥ ११ शक १७७२ साधारण नाम संवत्सरे सुरू सन इहिदे खमसेन मयातेन व अलफ हे विनंती दस्तुर खुद्द.

सई वासुदेव बल्लाळ खोत दस्तुर खुद्द.

दास्तानांतून सतीस देणगी

ले. ३०

श. १७४३
इ. १८२१

श्रीमहाकाली

राजश्री सदाशिवपंत भाऊ भिडे खोत याडा नवेदर स्वामीचे सेवेसीं.

नमस्कार वि. वि. वे. घोंडभट गोरे हे देवाज्ञा झाले. त्यांची बायको सती जाय. त्यास पातळें देणेबद्दल रुपये २ दोन रुपये देणें.

श्रीचे दास्तानापैकीं देणें. मजुरा देऊं. मिति आश्विन शु. १२ शके १७४३ सुरू इसने अशरीन. हे विनंति.

जमाखर्च मार्गशीर्ष वद्य १२ पातळ कमी किमतीचें नाहीं.
सा. रुबरु पेठेंत देवळीं होतें ते दिले. २।≫

अग्निहोत्रास देणगी

ले. ३१ श. १७७२
इ. १८५०

राजश्री वासुदेव बल्लाळ खोत वाडा कोणसर खुर्द जामदार
स्वामीचे सेवेसीं

सुरु सन इहिदे खमसेन मयातेन व अलफ वेदमूर्ति बाळंभट दांत्ये नवेदरकर अग्निहोत्र घेणार त्यास धर्मादाय श्रीचे दास्तानापैकीं रुपये २ दोन कंपनी द्यावे मिति ज्येष्ठ शु. ८ शके १७७२ दस्तुर श्रीधर नारायण सोवनी. सई विद्यमान समस्त खोत.

देवस्की-देणगी खाजण पांगारी

ले. ३२ श. १६६८
इ. १७४६

यादी ठिकाण पांगारीचा कलह, वाडा कोंडसर खुर्दकर व बुद्रुककर, यांचा फज्या लागला, ते वेळेस आम्ही बुद्रुककरांनीं-खुर्दकर, खाजणांत लागू होऊं नये, ऐसें करावें त्यानिमित्त खर्च केला. सुरु सबा अर्बैन ताा अंताजी नारायण कल्याण यांचे पदरीं घातले येणेंप्रमाणें कुलारग तपशील— रुपये.

४२।।≫।	निाा अंतो नरसी	२३।≫	विसाजी नारायण
४२।।≫।	निाा पोतदार	७।।–	शंकराजी नाइक
१९।।.।	निाा गोरे		रघु व कल्याण
११।।≫।	विठ्ठलराम		बालो हरी कोर्मेकर
२३।≫	रामचंद्र होडा		गंगाधरभट
२५०।.			

गुदस्तां खर्च शा गुा अंताजी नारायण यांचे पदरीं + + घातला + + + बाडेकरी यांनीं एक + + + + वे वर रुपये पंचवीस दिले. १

१ श्रीसत्येश्वरास मानणूक केली होती कीं, खाजण खुर्दकरांच्या हातास न जावें आम्ही बोलिलें कीं, महारुद्र केला त्यास रुपये खर्च ५०.

१ श्रीदेवीस मानणूक खाजण खुर्दकरांच्या हातास न जावें; याकरतां मानणूक येणेंप्रमाणें.

१ श्रीमहाकाली पातळ व नारळ कलम १
१ श्रीमहालक्ष्मीस नारळ एक
१ श्रीमानमोडीस नारळ व चीट–कलम १
१ श्रीरवळनाथास नारळ एक
१ श्रीदेवनगरेश्वर यास नारळ एक
१ श्रीलक्ष्मीनारायण यास तेल ८८२॥ व नारळ
१ श्रीगांवखडीचे देवीस नारळ दोन, रुमाल दोन,

येणेंप्रमाणें सालमजकुरीं व गुदस्तां, विल्हे केली. सदरहूच्या यादी–अंतो नरसी, याजपाशीं चौघांही ठेवून दिल्या आहेत.

किरकोळी जिन्नस पांगारी + + + निमित्त.

तांदूळ

१।. हरबा
१।. नारायणभट
१॥. गोविंद पना.
+ + अंतो नरसी
१॥. रघु दर्भ्या
१।. रामचंद्र
११ विसाजी नारायण.
१।. विसो विठ्ठल
११ कित्ता–अंतो नरसी

नारळ

५ विसाजी नारायण
५ रघु दर्भ्या
५ बाळो हरी
५ नारायणभट
१ शंकरभट.
६ अंतो नरसी
३ विसो विठ्ठल
३ विसो महादेव
१ रामचंद्र
२ हरी महादेउ

पानें विड्याचीं

५०० बाळंभट दर्भ्या
५०० विसो विठ्ठल

सुपारी

१॥५ रामचंद्र.
१।५ अंतो नरसी.

५०० गंगाधरभट १।. मिरशिंगा–अंतो नरसी.
५०० हरी महादेव ८८१।. आलें–अंतो नरसी.

श्रीसत्येश्वरास सालमजकुरीं खुर्दकर कज्यास उठिले. त्येसमई महारुद्र व खाजण एक विघा ८१ देवास दिलें असे. महारुद्र करावयाचा असे. दस्तुर अंताजी नारायण खोत वाडे मजकूर येणेंप्रों धंदा माजे गुजारतीनें केला असे.

श्रीदेवीच्या नित्यखर्चाची नेमणूक

ले. ३३ श १६८४
इ. १७६२

शिक्का अस्सल बरहुकूम नक्कल

अज स्वारी राजश्री नारो त्र्यंबक सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ताहा कमाविसदार मौजे आडिवरें तर्फ राजापूर सुरू सन सलास सितेन मय्या व अलफ अंताजी विश्वनाथ कुळकर्णी मौजे मजकूर यांनीं सुभा जंजिऱ्याचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, संभाजी आंग्रे यांचे कारकीर्दीस श्रीमहाकाली देवी नेहमीं खर्चास भात (२४) चोवीस मण व तीळ सवाचार मण (४।) चालत होते, त्यासी तुळाजी आंग्रे सरखेल यांनीं सवा अकरा मण (११।) दूर केला; त्याचे दाखले पाहोन पेशजीप्रमाणें करार करून द्यावी म्हणोन विदित केलें त्याजवरून श्रीदेवीमहाकाली देवस्थानें च्यार,जागृत जाणोन, मागील कुळकर्णी यांजवळील दुसाला हिशोब पाहोन नेहेमीं खर्च करार गल्ला, कैली–साडेतिशेरी मापें.

	अैन गल्ला	भात	तीळ काळे
बद्दल गुदस्त	।।।=	·।।।	८२
जाजती करून दिले			
सालमजकुरापासून	·।। ।	·।४	८२
	१।३।·	१८४	८४।·

एकूण गल्ला एक खंडी सवाआठ मण नेहेमीं खर्च करार करून हें पत्र सादर केलें असे. सदरहूप्रमाणें साल दरसला देत जाणें. जीाणजे छ २१

माहे जिलकाद मोर्तब सुद. मोर्तब असे

ले. ३४ श. १६८५

इ. १७६३

वाजी भू प्रधानाख्य सेवा नमः

नारायणस्य मुद्रेयं त्र्यंबकस्य विराजते

कौलनामा अज स्वारी राजश्री नारो त्र्यंबक सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ताा कर्दे रामचंद्र अनंत परांजपे होडे, खोत वाडा कोंडसर बुद्रुक मौजे आडिवरें ताा राजापूर. सुरु अर्बा सितेन मया व अलफ. दिल्हा कौलनामा ऐसाजे. तुम्हीं जंजिरे मजकुरचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, + + +बंदिस्त खाजण श्रीसत्येश्वर + + + + डुग, नजिक पांगारी हें + + + + + + आंगरे सरखेल यांचे कारकीर्दीस + + + खाजणाचे बरोबर बंदिस्त + + वर्षी खाड पडोन खाजण दर्यागर्क झालें तें + + + + + + + + (पुढें कागद जीर्ण झाल्यामुळें वाचतां येत नाहीं.)

श्रीदेवीमहाकाली

ले. ३५ श. १७०२ ज्येष्ठ शुा ५

इ. १७८० ७ जून

श्रियासह चिरंजीव राजश्री दिनकरपंत भिडे मुकाम मौजे आडिवरें वाडा नवेदर यांसी रामचंद्र गणेश भिडे मुकाम ब्रह्मवर्त अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागाइत फाल्गुन वा १० पावेतों श्रीकृपेंकरून क्षेम असों विशेष. तुम्हांकडून अलीकडे पत्र येऊन कुशलार्थ कळत नाहीं तरी + + + बरोबर पत्र पाठवून संतोषवीत जावें. इकडून श्रीदेवी महाकालीकरतां पालखी राजश्री विठलपंत ताह्मनकर यांजबरोबर पाठविली आहे तरी ती श्रीदेवीस देऊन वगैरे सरंजाम पाठविला आहे बिा तपशील.

१ पालखी श्रीदेवीस. गांवकरी वाडेवाड्याचे बोलावून मंडळी वगैरे सर्व जमा करून वाद्यें वाजवून श्रीस अर्पण करावी.

१ शालजोडी तांबडी श्रीदेवीस द्यावी. १ पातळ व खण श्रीदेवीस नेसवावें.

१ ब्राह्मणभोजन व किरकोळ खर्च. ताह्मनकर यांजपाशीं अलाहिदा याद दिली आहे त्याप्रमाणें ताह्मनकर करतील. १ पुतळी श्रीदेवीस द्यावयास पाठविली आहे.

येणेंप्रमाणें पाठविलें आहे त्याप्रमाणें श्रीदेवीस अर्पण करून, त्यानें यथास्थित चालावें याविशीं प्रार्थना करावी. पालखी अर्पण केल्यानें वगैरे श्रीचा हुकूम ज्याप्रमाणें लागेल त्याप्रमाणें लिहून पाठवावें. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे आशीर्वाद.

श्रीफल-देणगी

ले. ३६ श. १७४०
इ. १८१८

जबानी—महाजनी भिडे खोत वाडा नवेदर मौजे आडिवरें सुरू तिसा अशर मयातेन व अलफ. वाडे मजकुरी पेठेचे नदीचा पाट धरण बांधोन सालाबाद पूर्वापार आणितों. धरण बांधतेवेळेस राजबागेपैकीं नारळ दोन न्यावे. पैकीं एक नारळ प्रथम धरण बांधतेसमई फोडावा व पाणी घालावें. दुसरा नारळ श्रीरवळनाथाचे सांडीजवळ पाणी आलें म्हणजे श्रीमहालीस नारळ ठेवून गाऱ्हाणें घालून फोडावा. ही वहिवाट खोत यांनीं करावी.
बिा गणेश लक्ष्मण भिडे महाजनी खोत वाडा नवेदर.

श्रीमहाकाली पट्टी

ले. ३७ श. १७३८
इ. १८१६

अज स्वारी राजश्री रामचंद्रराव महादेव सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ता। कमाविसदार मौजे आडिवरें तो। राजापूर सुरू सबा अशर मयातेन व अल्लफ (शके १७३८) समस्त ग्रामस्थ मौजे मजकूर यांनीं सुभा जंजिरे मजकुरचे मुकामीं येऊन विनंती केली कीं श्रीमहाकाली संस्थान मौजे मजकूर याचे नवरात्राचे उत्साहास यात्रा बहुत मिळते त्यांत उत्साहांतील पुजेउर्जेस सरकारांतून नेमणूक नाहीं ऐशीयास कृपाळू होऊन कांहीं साहित्य नेमून देऊं केल्यास समारंभ यथास्थित चाले असें जहालें पाहिजे म्हणोन त्याजवरून नवरात्राचा उत्साह मोठा होतो; खर्चास सरकारी नेमणूक नाहीं,

यास्तव रामेश्वर पट्टी मौजे मजकुरावर वाडा काळकादेवी सुद्धां नक्त ५० पन्नास नेहमीं चालत आहे ते रामेश्वर पट्टी दूर करून श्रीपट्टी ठरावून देऊन पन्नास रुपये सालाबाद सिरस्तेप्रमाणें वसूल करून श्रीचे उत्साहाकडे खर्च करावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी श्री पट्टीचे पन्नास रुपये वसूल करून श्रीचे उत्साहाकडे साल दरसाल करीत जाणें. रामेश्वर पट्टीचा तगादा तुम्हांस करणार नाहीं. सनदेप्रमाणें वहिवाट तुम्ही करीत जाणें प्रतीवर्षी नवीन सनदेचा आक्षेप न करणें. या सनदेचो नकल घेऊन अस्सल सनद श्रीचे संस्थानीं ठेवणें जाणिजे छ ५ माह मोर्तब सुद मोर्तब असे.

श्रीदेवीकडील जुनी देणगी

ले. ३८ नंबर १५० पावती नं. २

दी सेक्रेटरी ऑफ् स्टेट् इन कौन्सिल यांजकडून श्रीदेव महाकाली मौजे आडिवरें तो राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानचे वहिवाटदार यांस.

माजी राज्याचे वेळेपासून सालिना नक्त नेमणूक श्रीदेव महाकाली मौजे आडिवरें तालुके राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानाबद्दल पावत आहे ऐसियास असें ठरविलें आहे कीं सरकारी रुपये १४ चवदा रुपयांची नेमणूक सदर देवस्थानचे वहिवाटदार जोंपर्यंत इंग्रेज सरकारशीं इमानें इतबारें वागतील तोंपर्यंत इंडियाचे सरकारी खजिन्यांतून निरंतर चालवून आदा करण्यांत येईल.

ही सनद दी सेक्रटरी ऑफ् स्टेट इन कौन्सिल यांचे वतीनें मुंबईचे गवरनर इन् कौन्सिल यांचे हुकुमावरून कर्नल एपरीजसाहेब, सी. एस. आई., एलीएनेशन सेंटलमेंट आफिसर, दक्षिण भाग, यांचे सई शिक्यानिशीं तारीख २५ माहे जुलई सन १८७४ इसवी रोजी तयार करण्यांत आली आहे

सई इंग्रजी.

श्रीदेवीस जकातींतून नेमणूक

ले. ३९

शक १७३९

इ. १८१७

अज स्वारी राजश्री रामचंद्र महादेव सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग

ताा साहुकार उदमी स्वदेशी व परदेशी पेठ मौजे आडिवरें ताा राजापूर सुरु सन समान अशर मय्यातेन व अलफ. मौजे मजकूरचे कमावीसदार यांणीं विदित केलें कीं पेठ मजकुरीं, उदमी बैल भरून जिन्नस नेतात व बाहेरून येतात वगैरे, उदीमी उदीम करतात त्यास जकातीचा हांसील सरकारचे आहे, त्याचा फडशा जकातदार करून घेतात, त्यास श्रीमहाकाली संस्थान मौजे मजकूर, जागृत स्थान आहे तेथें नवरात्र उत्साह वगैरे श्रीचा खर्च आहे. सरकारांतून नेमणूक नाहीं, त्यास बैल येतील व जिन्नस भरून जातील, त्यास दर बैलास, पाव आणा श्रीस द्यावा, याप्रमाणें सरकारची आज्ञा उदमी यांस जहाल्यास श्रीचे दास्तानीं जमा होऊन, ऊर्जा चालेल म्हणौन त्याजवरून मनास आणितां श्रीचे उत्साहास वगैरे खर्च आहे, सरकारची नेमणूक नाहीं. जागृतस्थान. श्रीस नेमणूक करून दिल्यानें,सरकारास व उदमी यांस श्रेयस्कर. हें जाणोन सनद सादर केली असे, तर पेठ मौजे मजकूर, येथें बैल भरून येतील व जिन्नस भरून जातील त्यास दर बैलास पैसा, पाव आणा, प्रमाणें व जलमार्ग माहागिऱ्या मौजे मजकुरीं गल्ला वगैरे भरून येतात, त्यास दर माहागिरीस रुपया, "आठ आणे" प्रमाणें श्रीचे दास्तानीं जमा करीत जाणें. पेठ मजकूरचे जकातीचें काम असेल त्याणें, दररोज श्रीची जमा दास्तानीं लावून मांडून घेत जाईल. या सनदेची प्रत लिहून घेऊन असल सनद श्रीचे दास्तानीं भोगवटीयास ठेवणें जाणिजे छ २ सवाल मोर्तब सुद मोर्तब मोर्तब असे.

बार

नकलेचे दस्तूर बाजी भिकाजी लोटलीकर खोत मौजे मजकुर अस्सल पाहून लिहिलें असे.

नेमणूक–पावती

ले. ४०

श. १७५०

इ. १८२८

सरकार कंपनी इंग्रज बहादुर विद्यमान कलेक्टर व माजिस्त्रेट सुा ताो विजयदुर्ग पावती बेशमी गोंदगुरव विन बाबूगुरव व दादू विन धोंडा गुरव भाविक निाा श्रीदेवी महाकाली वाडा पेठ मौजे आडिवरें ताो राजापूर

सुरु तिसा अशरीन मय्यातेन व अलफ श्री देवी महाकाली मौजे मजकूर हिच्या नांवें सरकारांतून नेहेमीं खर्च गल्ला कैली साडे तिशेरी मापें व नक्त खर्च पडोन सालबाद आम्हांस पावले. श्रीकडे खर्च करीत आलों. त्या प्रमाणें साल मजकूर सुरु तिस्सा अशरीनचे पावले ते तपशील आकार येणेंप्रमाणें

२७ भात कैली साडे तिशेरी मापें १८४
१० तीळ काळे ८४
१॥= नक्त तुपाबद्दल

३८॥= सदरहू साडे अडतीस रुपये दोन आणे आम्हीं घेऊन भरून पावलों तारीख २८ माहे आगष्ट सन १८२० ही पावती लिहून दिली सई दस्तुर

शंभू भिकशेट शेटये खोत वाडा पेठ दस्तुर खुद

साक्ष

१ मोरो नारायण परांजपे खोत वाडा कोणसर बुद्रुक. गोंद गुरव
१ महादाजी परशराम खोत वाडा भराडें. दादू गुरव
निशाणी धुपाटणें

नेमणुका यादी

ले. ४१

हकीगत इतलाक नेमणुका पेशवे कारकीर्दीत श्रीदेवस्थानें मौजे आडिवरें तर्फ राजापूर तो विजयदुर्ग सुरू सलासीन मयातेन व आलफ (शक १७५१)

१ श्रीदेवीमहाकाली मौजे मजकूर हें संस्थान थोर जागृतस्थान नेहमीं शुक्रवारचे वारीस आरती धुपारती व कीर्तन, नवरात्राचा उत्साह होत असतो त्यास नेमणुका--

१ धुळप सुभेदार यांणीं उत्साहांत बार काढावया करितां तर्फे दिली आहे.

१ श्रीचे मंडपास झांपाची नेमणूक गंगाधर गोविंद सुभेदार यांचे अमलांत १०० व नारो गोविंद आवटी सुभेदार यांचे अमलांत सुरू सन इहिदे अशर मया तेन व अलफ (शक १७३२) चे सालीं छ ५ रमजानची सनद देऊन झांप सुमारें २०० याची नेमणूक करून दिली आहे.

१ रामचंद्र भिकाजी सुभेदार यांणीं सन इहिदे अशर (श. १७३२) छ ९ रबिलाखरची सनद देऊन ऐन जिन्नस दारूची नेमणूक श्रीचे उत्सांहात बार मारावया करितां १॥॥५ यादी करून दिली आहे.

१ रामचंद्रराव महादेव नगरकर सुभेदार यांचे अमलांत सन–सीत अशर मया तेन व अलफ (श. १७३७) छ २६ माारची सनद देऊन नेमणूक ऐन जिनसी दारवेची पेशजी रामचंद्र भिकाजी सुभेदार यांचे अमलांत झाली त्याप्रमाणें पांच सालां ऐन जिन्नस दारु पोचत आली. परंतु उत्साहाचे वेळेस किल्ल्याचे कोठींतून यावयास अवकाश लागे याजकरितां नक्त रुपये १५ याची नेमणूक करून दिली.

ताा २६ आगस्ट १८२९ सन अशरीनचा हुकूम सरकार अमलांतील मालवणाहून आला तो अस्सल.

ले. ४२ श. १७५०
इ. १८२८

यादी इतलाक श्रीदेवस्थानें सरकारांतून नेमणूक होऊन पावतात ते मौजे आडिवरें व वाडा काळकादेवी तर्फ राजापूर तिसा अशरीन मयातेन व अलफ १५०८७५ रुपये ताा १००॥। ७५ पेशजी नेमणुकी होऊन चालतात ते.

६ श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर मासाभिषेक कर्दे त्र्यंबकभट दात्ये.
४६॥। श्रीमहाकाली.
६ मासाभिषेक कर्दे पाळंदे वहिवाट दात्ये.
३८५० नक्त नेमणुका.
१॥५० नक्त.
१॥ झांर सुमारें १००
३८५०
३७॥५० ऐन जिनसपैकीं भात तांळ काळे
४६॥। २७ १०॥५०

६ श्रीदेव बाळेश्वर मासाभिषेक कर्दे रामचंद्रभट गोरे
१४।७५ श्रीदेव नगरेश्वर

१ चार सोमवार श्रावणमास
१३।७५ ऐनजिनसपैकीं भात तीळ काळे
१४।७५ ८।७५ ५
१८५० श्रीदेवी भगवती ऐनजिनस भात १
२२। श्रीदेव लक्ष्मीनारायण.
६ मासाभिषेक कर्दे विसो पाध्ये हर्डीकर
१६।- ऐनजिनस पैकीं
२२।-
५ श्रीदेव शंकरेश्वर तीळ काळे ८२ ऐनजिनसापैकीं
४५॥५० अलिकडे नेमणूक होऊन चालतात ते
२७॥५० श्रीदेव गणपति देवालय बांधोन स्थापना सदाशिव कृष्ण भिडे यांणीं करून नेमणूक तारीख २६ माहे सित अशर कारकीर्द रामचंद्रराव महादेव
१॥ नक्त नारळ व पानसुपारी शेंदुर मिळोन.
२६८५० ऐनजिनस व सुमारें मिळोन.
१६॥५० भात नैवेद्यास कैली -॥।-
६।- तीळ गोडे ८२ नंदादिपास
३ झांप सुमारें २०० मंडपास
२६८५०
२७॥५०
१८ श्रीदेवी महाकाली
१५ दारु शुक्रवारची तोफ नेहमीं बारमासी चालते. रामचंद्र भिकाजी करंदीकर यांचे अमलांत चालती झाली ती ऐनजिनस दारु कोठींतून सन इहिदे अशर तागायत सन सित अशरपर्यंत.
१॥ श्रीदेव सत्येश्वर झांपसुमारे १००
१॥ श्री देव लक्ष्मीनारायण झांपसुमारें १००
१८ (=१४६॥२५ ही बेरीज मूळच्या १५०८७५ ह्या रकमेंत
४५॥५० ३॥५० नें कमी पडते. वाटतें कीं, यादी अपूर्ण मिळाली.)

सरकारनें नेमणुका बंद केल्या त्या

ले. ४३ श. १७५१
इ. १८२९

राजश्री गोविंद गुणाजी गोखले तलाठी मौजें आडिवरें तर्फ राजापूर तो विजयदुर्ग गोसावी यासी

सुरू सन सलासीन मयातेन व अलफ. हुजुरून नंबर १५० तारीख २० जुलई सन १८२९ चा हुकूम सादर जाला त्याजवरून हल्लीं हा हुकूम तुम्हांस फर्माविला असे. तरी मौजे मजकुरीं एकंदर देवास इनाम इतलाख मिळोन सन इसने अशरीनचे सालीं एकंदर रुपये २१९॥३१ दोनशें साडे एकोणीस रुपये एकवीस रेंस खर्च आहेत. या नेमणुकीपैकीं पुणें जाबता व झडतीस दाखल आहे. ते रुपये १७३॥८१ एकशेंपावणेचौऱ्याहात्तर रुपये एक्यायशीं रेंस. व दाखला नाहीं ते रुपये ४५॥५० साडे पंचेचाळीस रुपये पंन्नास रेंस कमी आहेत ते येणेंप्रमाणें—

१५ श्रीमहाकाली नक्त तोफेचे दारुबाबत सन सीत अशरीनची नेमणूकी मामलेदार यांणीं करून दिली ते.

२७॥५० श्रीगणपतीस सन सित इशरीन सालीं नेमणूक मामलेदार यांनीं करून दिली ते.

१॥ श्रीसत्येश्वर झांप सुमारें १०० एकूण सन सबा अशर.

१॥ श्रीलक्ष्मीनारायण झांप सुमारें १०० एकूण सन सबा अशर.

४५॥५० एकूण साडेपंचेचाळीस रुपये पन्नास रेंस याचा दाखला पुणें जाबत्यास व झडतीस नाहीं. याजकरितां येविशींचा पुरावा सरकारांत होऊन हुकूम होईतोंपर्यंत, आदा न करणेंविशीं बंदोबस्त ठेवणें जाणिजे छ २२ मोहरम इंग्रजी ता. २४ माहे जुलई सन १८२९ बहुत काय लिहिणें–मोर्तब असे.

मल्हार आपाजी शेवड्ये अकटिंग
बाळकृष्ण लक्ष्मण लेले कारकून सुभा
बार
पौ ता। २६ जुलई सन १८२९.

श्रीचे सावजाचे मानाचा तपशील

ले. ३९ कित्ता

प्रथम सुरी सावजास गुरव यांणीं लावावी तें पतक गोंद गुरव

५ पांच पांच देवाचे	३ भराडीण, भगवती, पुदख (महारांचा देव)
१ मुंडी, देवीची	१३ खोत
१ गुरव १ शेटये	२ कोणसर खुर्द व बुद्रुक
१ मोर्या १ जुनगरा	१ नवेदर
४	
२ जांग (जंघा)	१ रुंढें १ पेठ १ वाडी कालिका
१ शेटये	२ कोर्भे व वेत्यें
१ गुरव	५ मोसरें, भराडें, राजवाडी, पाणेरें, तिवरें
२	१३

१ बाकी सर्व घरटीस पेठेंत द्यावें. १ कुळकर्णी १ सरखोत १ पोतदार. १ समयास शिपाई वगैरे येईल त्यास.

येणेंप्रमाणें जबानी कानशेट शेटये यांणीं हरबा खोत व जनार्दन खोत व बाळाजी विठल व आपाशेट तानवडी व गुणशेट तेली व आपाशेट कोरगांवकर यांचे समक्ष सांगितलें. मिति भाद्रपद वद्य ३ श. १७५० सावजी-विसाजी राम यांचें.

श्रीचे कचेरींत बसावयाच्या नेमणुकीच्या जागा

ले. ४० शक १७७२

इ. १८५०

यादी श्रीदेव माहाकाली मौजे आडिवरें तर्फ राजापूर सुरू सन इहिदे खमसेन मयातेन व अलफ श्रीचे देवळांत कचेरींत बसावयाचे जागे पुरातन-आहेत. त्यास हल्लीं रुंढेकर खोत व कुळकर्णी यांचा पूर्वेकडील खांबाजवळ बसावयाचा तंटा लागला तेव्हां उभयतांनीं समस्त खोत मंडळीजवळ सांगूं लागले कीं, आमचा तंटा निवारण करावा. त्याजवरून कुळकर्णी यांस पुसिलें तुम्ही खांबाजवळ कोणत्या सबबेनें बसावयाचें पहातां ? ते

म्हणोले कुळकर्णीपणाचे सबबेनें. त्यास सर्व खोतांस दर वाडयास एक जागा त्याप्रमाणें कुळकर्णी यासही एक जागा अशी वहिवाट चालत आली असून हल्लीं कुलकर्णी दुसऱ्या जागेस तंटा करितात हें वाजवी नाहीं. कुळकर्णी बैठकीची याद आहे असें बोलिले. तेव्हां ती याद दाखवावी असें सांगितल्यावरून कुळकर्णी यांणीं दाखविली. ती पहातां एकटांकी लिहिणाराचें अक्षर कोणाचें हें लिहिलें नाहीं व त्यावर खोताच्या हातच्या निशाण्या असाव्या तेंही नाहीं. कुळकर्णी यांनीं आपले साधनास ठेविली ती प्रमाणांत येत नाहीं. पुरातन दरखोतास एक जागा, त्याप्रमाणें कुळकर्णी ही एक जागा अशी वहिवाट चालत आहे त्याप्रमाणें चालावें. म्हणोन उभयतां रुंढेकर खोत व कुळकर्णी यांस समजून दिली असे. कचेरीस बसावयाचे जाग्याचा अनुक्रम —

१ श्रीदेवीमहाकालीचे देवळांत श्रीचे दरवाज्याचे उजवे बाजूस म्हणजे पश्चिमेचे आंगास बसावयाच्या नेमणुकी जागा.
१ भीतबागेजवळ म्हणजे दक्षिणेकडे पुढा करून कोणी संभावीत गृहस्थ व कुळकर्णी यांनीं बसावें.
१ खांबाजवळ पूर्वेस पुढा करून भाटे खोत.
१ खांबाचे दक्षिणेस पूर्वेस पुढा करून परांजपे खोत चौकाबरोबर.
१ परांजपे यांचे दक्षिणेस पूर्वेस पुढा करून शहाबेदरकर खोत.
१ शहाबेदरकर यांचे दक्षिणेस पूर्वेस पुढा करून भिडे महाजनी खोत.

५

श्रीचे दरवाज्याचे डावे बाजूस पूर्वेकडील अंगास
१ भीतबागेजवळ दक्षिणेकडे पुढा करून लोटलीकर खोत व संभावीत कोणी.
१ भीतबागेचे भिंतीलगत पाणेरकर.
१ खांबाजवळ पश्चिमेकडे पुढा करून वांकडे खोत.
१ खांबाचे दक्षिणेस खांबाबरोबर कामत खोत, पश्चिमेकडे पुढा.
१ कामत यांचे दक्षिणेस पश्चिमेकडे पुढा करून महाडदळकर खोत.
१ महाडदळकर यांचे दक्षिणेस पश्चिमेकडे पुढा करून शेट्ये

१ शेटये यांचे दक्षिणेस पश्चिमेकडे पुढा करून वेतकर खोत.
१ वेतकर यांचे दक्षिणेस कोंभेकर खोत पश्चिमेकडे पुढा करून
१ कोंभेकर खोत यांचे दक्षिणेस पश्चिमेकडे पुढा करून तिवरेकर
९

येणेंप्रमाणें वसावयाची चाल चालत आल्याप्रमाणें चालावें असा ठराव जहाला असे. मिती कार्तिक वद्य ५ शके १७७२ साधारण नाम संवत्सरे दस्तुर गोविंद बाजी लोटलीकर खोतवाडा राजवाडी.

सया

१ बाळकृष्ण बच्याजी परांजपे, को. बु.
१ अंताजी भिकाजी परांजपे, को. बु.
१ वासुदेव बल्लाळ शहाबेदरकर, को. खुर्द
१ दिनकर कृष्ण भिडे महाजनी, नवेदर
१ येसू बिन रामजी तोडणकर, कोंभे
१ गोपाळ बिन मायाजी हळदणकर, तिवरें
१ हरी नारायण वांकडे रुंढें.
१ गणशेट फटशेट शेटये, पेठ
१ विठल गणेश महाडदळकर खोत, मोघरें
१ येसाजी महादेव कामत, भरार्डे
१ बापूजी शामराव भाटे, कालिकावाडी
१ बाजी बल्लाळ लोटलीकर, राजवाडी
१ राघोजी लक्ष्मण जाधव, वाडा भेत्यें

श्रीचे भगत (शिवकळा)

ले. ४१

आडिवऱ्यास कोणी विष्णु भट म्हणून होता. त्याची सरकारांत बहूत चलती. आंग्र्याची मामलत विष्णु भटाकडे. बारा वाडे वसुलाचें काम सांगोन सर्व वाडयांची वहिवाट करीत होता. ते समई देवस्कीमुळें बारा वाडयांत गुरांवर गोचिडी जाली. तेव्हां श्रीनें सांगितलें कीं कोणी अवसर पाणेऱ्यांत आहे त्याची निरगत करावी तें झाड येथें आणावें म्हणजे गोचिडी दूर होईल. याचें नांव अंबाई म्हणून होतें. हा श. १६०० चे सुमारास झाला.

शके १६३० चे सुमारास विठल राम मराठे
शके १६७० चे सुमारास रामदेव मानी भिडे

शके १७०० चे सुमारास शंकर जोशी
शके १७४० चे सुमारास विठा वारिशा
शके १७५० चे सुमारास विसाजीराम.

शके १७७० सुमारास गणू वारिशा. हा सुमारें ६० वर्षें *वाढत असे. यापुढें विठल भट मराठे यांचे अंगीं येत असे. परंत ते शके १८४१ चे वशाख मासीं वारले. त्यानंतर अलिकडे १२ वर्षें कोणी अवसर+ नाहीं.

श्रावण-मासाभिषेक

ले. ४२ श. १७१८
इ. १७९६

अज स्वारी राजश्री गंगाधर गोविंद सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ताा कमाविसदार मौजे आडिवरें तो राजापूर सुरू सबा तिसेन मया व अलफ इा देणें धर्मादाय श्रावणमास मासाभिषेक श्रीदेव महाकाली--भूदेव बापूभट पाळंदे यांस अभिषेकाची दक्षिणा रुपये सहा ६ ऐकूण सहा रुपये देविले आहेत मार्गशीर्षखिस्ती पैकीं आदा करणें जाणिजे छ १८ माहे जमादिलाखर.

पुराणिकांसंबंधीं निर्णय

ले. ४३ श. १७४३
इ. १८२१

(श्रीदेवीचे पुढें पुराण कोणीं सांगावें याबद्दल फडके पुराणिक व सांवरेकर पाध्ये या उभयतांमधील तंटयाचा निकाल श्रीनें अंगप्रसादीं सांगितला तो.)

यादी वेदमूर्ती गुर्जर सांवरकर व फडके यांचा नवरात्रांतील पुराणाचा कज्या होता त्यास उभयतां कज्याचे तोडीस राजी झाले कीं श्री सांगेल त्याप्रमाणें सांगो. त्याजवरून गांवकरी देवालयीं जमा होऊन श्रीस पुसिलें कीं, हे राजी जाहले, आम्ही दहा जण राजी जाहलों. तूं पूर्वी

---

*वाढणें = अंगांत येणें, संचारणें.

+भगत, अवसर व शिवकळा हे तिन्ही शब्द एकाच अर्थी असून त्याचा अर्थ देवता ज्याचे अंगांत संचारते तो.

तोड सांगावयासी राजी आहेस कीं काय? त्यास 'आहें' म्हणून प्रसाद झाले. त्याजवरून पुसिलें कीं 'फडके यांणीं पुराण सांगावें कीं काय? त्यास सांगों नये, म्हणून प्रसाद जहाले. गुर्जर यांनीं सांगावें कीं काय? म्हणौन पुसिलें, त्यास सांगो नये, म्हणून प्रसाद झाले. याप्रमाणें दोघे राजी होऊन गेले. विद्यमान समस्त खोत मिा आश्विन वद्य ३० गुरुवार शके १७४३ सुरु इसने अशरीन मया...

श्रीचा नैवेद्य

ले. ४४

श्रीला पूर्वी मद्यमांसांचा नैवेद्य दाखवीत असत असें दंतकथेंत ऐकूं येतें. तो नैवेद्य विठल राम मराठे यांनीं किंवा रामदेव मानी भिडे यांनीं बंद करून हल्लीं चालू वहिवाटीप्रमाणें ब्राह्मणाकडून दाखविणेची व्यवस्था केली. वरील दोघेही श्रीचे भगत होते, परंतु कोणाकडून ही व्यवस्था झाली हें नक्की समजत नाहीं. म्हणून त्या दोघांचीं जन्मसालें देतों. शक १६८९ सालीं शेट्याचे कज्यांत यांचे साक्षींत यानी स्वमुखें उमर वर्षें सांगितलीं. त्यावरून अनुमान होईल.

विठल राम मराठे जन्म शके १५९८ }
रामदेव मानी भिडे जन्म शके १६४४ } यावरून सुमारें १६७० शका पासून सुमारें १८२ वर्षें ब्राह्मणाकडून नैवेद्य समर्पण केला जातो.

या नैवेद्याचा ठराव शके १७८८ सालीं झाला आहे तो येणेंप्रमाणें—

१ यादी ठराव गुरव यांणीं श्रीस नैवेद्य करणार भट यास दरमहा १॥ रुपया देणें तो सर सालीं आकार रुपये १८ होतो. ते दरसाल मे महिन्यांत सरकारांत पावतीचे रुपये आणिले म्हणजे एकदम १८ रुपये भट यास द्यावे व भट यांणीं श्रीस नैवेद्य करणें तो दररोज सकाळचे सहा घटिका दिवसास बारमाही करीत जावें. हा ठराव झा मार्गशीर्ष शु॥ १० शके १७८८ पासून होऊन याप्रमाणें दरसाल चालावें आणि कबुलीच्या सया केल्या ते विद्यमान समस्त खोत मिति मार्गशीर्ष शु॥ १० शके १७८८ दस्तुर येसाजी महादेव कामत खोत वाडा भराडें.

सया १ सदाशीव भट बिन चिमणभट आपटे दस्तुर खुद.
सया गुरुवांच्या.
१ येसा बिन भोरा गुरव निशाणी घुपाटणें
१ धर्मा बिन बाळ गुरव
१ अंता बिन विठा गुरव
१ गुणा बिन आपा गुरव
१ गणा बिन पांगा गुरव
५ पांच सयांचा दस्तुर बाळाजी सदाशीव परांजपे.

सेवेकरीण भाविणीची पोटगी

लेे. ५५

यांदी ठराव श्रीमहाकालीचे देवालयीं चाकरीकरितां पूर्वापार भाविण असत. त्या कांहीं दिवस मध्यें कोणी नव्हती. सालमजकुरीं हालीं आलली आहे. सबब तिचे पोटाबद्दल पूर्वी गांवाकडून नेमणूक होती, परंतु अमुक तऱ्हेनें होती असा दाखला न मिळाल्याकारणानें हालीं ठराव करितात वाडेगत तो. (कुडव)

८७ कोप्तसर बुद्रक	८५ वेर्त्ये	८५ मोघरें	८२ कुळकर्णी
८७ कोंडसर खुर्द	८३ रुंढें	८५ तिबरें	
८७ नवेदर	८३ काळकादेवी	८२॥ भरार्डे	
८६ पेठ	८५ राजवाडी	८२॥ कोंभें	
८२७	८१६	८१५	८२

॥

येणेंप्रमाणें वाडेगत भात दर वाड्याचे खोताकडे भावीण हिनें जाऊन वसूल करावें व खोत यांणीं वसूल करून द्यावें याप्रमाणें आज रोजीं ठराव केला. मिती मार्गशीर्ष शुा १ शके १७९२

१ विठल गणेश परांजपे १ बाजी भिकशेट शेटये १ नारायण बाबूराव
१ विष्णु सखाराम भिडे १ नारो महादेव खोत १ नारायण बाबूराव महाडदळकर
१ बाजी भिकाजी कदम १ अंताजी बिन रघु खोत १ येसू रामजो खोत

नवरात्रखर्च—श्रीमहाकाली

ले. ४६ इ. स. १८८८ श. १८१०

यादी नवरात्र खर्च शके १८१० सर्वधारी नाम संवत्सरे आश्विन शु॥ ९

८=	उपाध्ये हर्डीकर	१।	भविक गुरव
१०	पुराणीक धोपेश्वरकर	·॥·	पालखीचे भोई
२५	हरिदार सर्व मिळोन	८=	आरतीवाला
२१	नायकीण	·।·	चोपदार
·॥·	गवई गोळपकर	८=	मशालजी
२१॥।=	लिंगाईत गुरव	१॥	शिंगवाला
७॥	चौघडेकरी	·।·	अबदागीर
२	हरिदास साथीदार	·।·	निशाणदार
८	नाचकरी गुरव	·।=	रोषणाई
२।-	मृदंगी	·।·	हुदा रुमाल+
३	गुरव परगांवचे	·।·	तासेवाले भुते
		६॥।०॥	समाराधनेकडे
१५	राजापुराहून किरकोळ जिन्नस	३।-॥	दीपमालेकडे गोडें तेल वगैरे.
२॥।-	दारुसामान	२।=	तेल तळपाकडे अर्धा मण.

येणेंप्रमाणें आमचे विद्यमानें खर्च जहाला आहे. मिा मजकूर दस्तुर दिनकर बाजी लोटलीकर विद्यमान समस्त खोत. (सया).

श्रीमहाकालीची आरती

लेखांक ४७

सागरांतुनी जगदंबा आली । एका भक्तजनें–दृष्टी देखीली । आडिवरें

+ म्यानासह तरवार एका रेशमी जाड मोठ्या पिशवींत घालून त्या पिशवीचे तोंडास एक लांब रुमाल असावयाचा व तो चवरीप्रमाणें देवीवर ढालावयाचा. ह्यास उडता अथवा हुदा रुमाल म्हणतात.

ग्रामीं स्थापना केली । अखिल भारतवर्षीं विख्यात झाली । जय देवी जय देवी जय महाकाली । आरती ओवाळूं भावें त्रिकाळीं ॥ १ ॥ आपुलिया शयनीं निजवुनि पतिला । ब्रह्मांडाचा तुवां व्यापार केला । जागा होण्यापूर्वी अदृश्य केला । ऐसा व्यासमुखीं इतिहास कथिला ॥ जय देवी० ॥२ ॥ आदी शक्ती ऐसें प्राज्ञ बोलती । ध्यान पाहूनियां आनंदित होती । दक्षिणामुखीं उग्र देवता । आर्यावर्ती दुजी नाहीं पहातां ॥ जय देवी० ॥ ३ ॥ बारा वाड्यांची तूं ग्रामदेवता । मातेसारिखी हो करिशी ममता । भक्तांलागीं नसे अन्य रक्षिता । धांवसि देशांतरीं ध्यान करितां ॥ जय देवी० ॥४॥ शुक्रवारीं तुझी वारी जे करिती । खोत महाजन कुलकर्णी येती । धूपदीपेंसी करुनी आरती । शर्करा प्रसाद सर्वांसी देती ॥ जय देवी० ॥ ५ ॥ शिवकळेनें तुझा वाढे अवसर । व्याधिग्रस्त जन येती परिवार । पिशाचयोनी निरसी साचार । ऐसा अंबे तुझा महिमा हा थोर ॥ जय देवी० ॥ ६ ॥ चौदा खोतांसी संकट जें पडलें । आई जगदंबे हो तूं निवारीलें । काळासी दारुण युद्ध जें केलें । मज आपुलें हें धन रक्षिलें ॥ जय देवी० ॥ ७ ॥ आसनीं भोजनीं नित्य गे शयनीं । सगुण रूप तुझें नित्य असे मनीं । योगी ध्यान करिती तुझें गे जननी । तूंचि सृष्टि केली असें वाटे मनीं ॥ जय० अंबे सर्वही दिशा अवलोकन करिसी । भक्तमंडळींच्या हृदयीं रहासी । मृत्युलोकीं तूं नवसा पावशी । पुतळ्यांचे नवस घेऊनी येसी ॥ जयदेवी० ॥९॥ अंबे वामभागीं महालक्ष्मी देवी । सन्मुख सरस्वती उभी आहे देवी । दक्षिणेस आहे रवळनाथ देव । पश्चाद्भागीं असे नगरेश्वर शीव ॥ जय देवी० ॥१०॥ अंबेचे द्वारीं उभे द्वारपाळ ॥ चतुर्भुज, दोघे बाळ गोपाळ । आंत पहातां चित्रें अपार । पुढें दिसे तुझें स्वरूप सुंदर ॥ जय देवी० ॥ ११ ॥ भाविक गुरव पूजा करिती । माध्यान्हीं नैवेद्य ब्राह्मण करिती । दहावे घटिकेला तुज समर्पिती । त्रैलोकींही तुझी विख्याती मोठी ॥ जय देवी० ॥१२॥ यमुना बालकें करितें प्रार्थना । उपदेशवूनी शांतवी जना । रक्षीं बालकासह सर्वही सज्जना । ज्ञानबुद्धी द्यावी बहुत दुर्जना ॥ जय देवी० ॥ १३ ॥

ही आरती वाडा नवेदर येथील फडके घराण्यांतील माहेरवाशिणीनें ०० शकाचे सुमारास केली आहे.

श्रीचा साक्षात्कार

लेखांक ४८

कथा १ ली

कोण कालीं एक ब्राह्मण श्रीचें दर्शन घेऊन रोजगारास निघोन चालिला, तो बावड्याचा घांट चढोन शहरांत जाऊन एका सोनाराचे घरीं उतरला. तेथें वस्ती करून एक रोज होता. ओळख चांगली केली. आणि त्याच देशांत राहून दहा वर्षें रोजगार केला. हजार रुपयांचें सोनें पदरीं जहालें तें समई घरचें स्मरण होऊन यावयास लागला. तो बावड्यास ओळखीच्या सोनाराचे घरीं आला. त्यांची भेट होऊन सुखगोष्टी बोलिले. तेव्हां सोनार विचारूं लागला रोजगार केलात तेथें द्रव्य काय मिळविलेंत तें आपणांस सांगावें. तो ब्राह्मण बहुत भोळा; सत्यानें सांगितलें कीं अमुक रुपयांचा विषय प्राप्त झाला. सध्यां आपणापाशीं आहे. त्यापासून सोनारास चैन पडेनासें झालें. चंद्रोदय होतांच ब्राह्मण घरीं जावयास निघावयाचा त्याची वाट पहात होता, व कपटानें मित्रभाव धरून एक जागीं निद्रा केली. त्या वेळीं सोनारानें थोर पासोडी व एक तरवार उशास घेऊन निजला. तों तीन प्रहर रात्र लोटली. चंद्रोदय झाला, प्रकाश स्वच्छ पडला तो पाहून सोनारानें ब्राह्मणास जागें केलें व म्हणों लागला कीं आम्हांस कोकणांत जाणें आहे ते आपण दोघेजण संगतीनें जाऊं. मग दिसों लागल्यावर आपण आपल्या गांवास जावें. आम्ही आपल्या कामास जाऊं. परंतु चार कोस बोलत चालत सोबत होईल हें ब्राह्मणानें श्रवण करून एकट्यानें जाणें ठीक नाहीं, सोबत चांगली आहे, असें समजून दोघेजण निघाले. तों बहुत रान, साळव्याचा कडा. कोणा माणसाची वस्ती नाहीं. वाघ, अश्वलें जागजागां ढोलींत होतीं त्या अरण्यांत ब्राह्मणास नेऊन, एक जागीं विश्रांतीचे मिषानें बसले. तों सोनारानें पासोडींतून हत्यार तरवार काढून दाखविली व तुम्हीं गांठोडें ठेवून एकीकडे व्हावें, ऐसें बोलोन मरणाचें भय घातलें. व तरवारीचें मेण उडवून ती लखलखीत तरवार ब्राह्मणासमोर चमकवूं लागला. त्या तेजानें ब्राह्मण भयभीत झाला, व या काळाचे हातून कसा पार पडतों या संकटांत पडला व निरुपाय, हें मरण नाहक आहे, तेव्हां

पवित्रकाया करून मरण आल्यास पुनः ब्राह्मणाचा जन्म येईल, असें समजून त्या सोनारास बोलिला कीं, आतां आपली विनंति आहे; तुम्हीं आपले पाशीं माझी जिंदगी ठेवावी. मी स्नान करून तळ्यावरून येतों मग काय करणार तें करावें. त्यावर सोनारानें विचार केला कीं, येथें रस्ता नाहीं. अरण्यांत कोणी मनुष्य येणार नाहीं. त्यापेक्षां दोन घटिका वेळ लागला म्हणून नासत नाहीं. असें समजोन ब्राह्मणास स्नान करण्यास सांगितलें. ब्राम्हण पाणी शोधीत निघाला तों जवळच पाणी होतें तेथें स्नानाकरितां बुडी मारिली व श्रीमहाकालीचें ध्यान केलें व कोणी वांचविणार नाहीं, तुझें चरण दूर राहिले, घरीं माणसांची भेट होईल म्हणून निघोन आलों. परंतु मी बहुत पातकी ! माझा हेतु तडीस कसा जाईल ? शेवट ही पाळी अरण्यांत आली. कुडीची काय अवस्था होईल कोण जाणे. आतां आपणांस या कालशस्त्राचे हातून तारशील तर पन्नास रुपये देईन असें म्हणून उदक सोडिलें. इकडे सोनार वरचेवर हांका मारीतच होता व ब्राह्मण त्यास येतों म्हणून सांगतच होता. कांहीं वेळानें शंभर रुपये तुझे चरणीं अर्पण करीन असें उदक सोडिलें. तरी उपाय दिसत नाहीं असें समजून श्रीची प्रार्थना केली कीं, आई, माझें रक्षण कर, मी सर्वस्व तुझे चरणीं अर्पण केलें आहे. अशी विनंती करून तिसरें उदक सोडिलें. तरी कांहीं तरणोपाय दृष्टीस पडेना. शेवटीं निर्वाण जागा समजोन ब्राह्मण बहुत कष्टी झाला, व आतां मला कोणीही तारणार नाहीं, मज पातक्यास श्री कशी पावेल, असें वारंवार आठवून स्नान करूं लागला. त्या कालीं असा चमत्कार झाला कीं, श्रीनें घांटमाथां घांवणें केलें. अकस्मात् व्याघ्र निर्माण झालेला दिसला. तो दोन पुरुष उंच व दहा हात लांब सुमारे होता. तो भयंकर वाघ सोनारापाशीं जाऊन त्यास तोंडांत धरून या जलाशयाचे कांठानें निघोन गेला. तो ब्राह्मणानें पाहिला व मनांत म्हणों लागला कीं, एका कालाचे हातून वाचलों तों हा दुसराच काळ आला. हा कसा जातो, ही चिंता पडली. वरती येऊन ओलें धोतर नेसून कुंभ्याचे झाडावर चढोन बसला. कांहीं वेळानें रात्र सरली. पाखरें बोलों लागलीं व शब्द ब्राह्मणाचे कानीं पडले. तेव्हां निर्भे भय गेलें. चांगलें दिसों लागलें तेव्हां झाडावरून उतरून सोनाराचे जाग्यापाशीं आला व पाहिलें तों आपली जिंदगी आहे. हें जाणोन गाठोडें व

सोनाराची तलवार व पासोडी घडी, पगडी यांची व्यवस्था करून सांपडेल त्या रस्यानें घरीं येऊं लागला, व प्रथम श्रीचा नवस वारून मग घरीं जावें या हेतूनें आडिवरें येथें श्रीचे चरणीं येऊन सर्व द्रव्य श्रीचरणीं अर्पण केलें. श्रीस सर्व हकीकत निवेदन केली. त्यावर श्रीनें साक्षात्कारानें पन्नास रुपये अर्पण करावे व बाकी सर्व तुम्हीं न्यावे अशी आज्ञा केली. याप्रमाणें करून ब्राह्मण श्रीचरणस्मरण करून गांवीं निघोन गेला.

ले. ४९

कथा २ री — एका गृहस्थाची मुलगी सासरीं बहुत दिवस होती. तीस माहेरीं आणिली. ती चार मास माहेरीं होती. ती आणण्याकरतां तिच्या सासऱ्याहून माघारी येऊन मुलीचे बापास सांगितलें कीं, माघारीण आणण्याकरतां मला पाठविला आहे; माघारणीची रवानगी करावी. त्याजवरून ते मुलीची रवानगी करून दिली. दोघेंही चालतीं झालीं. तीं दोन कोसांवर जाऊन तेथें एका तळ्यावर पाणी पिण्याकरतां उतरलीं. नंतर गडी मुलीस बोलिला कीं, येथें चोरांचें भय आहे तेव्हां तुझे अंगावरील नग माझेपाशीं द्यावे. त्यामुळें मुलीनें सर्व नग काढून गड्याचे स्वाधीन केले, व ते घेऊन गड्यानें त्या मुलीस एका झाडास बांधून ठेविली, व एक दगड आणावयास गेला; तें त्या मुलीनें समजोन श्रीमहाकालीचें स्मरण केलें व प्रार्थना केली- " मातोश्री, या काळाचे हातून तूं रक्षण करशील तर या जिवावेगळा तूं मागशील तें देईन." परंतु आपणास जगवावें अशी प्रार्थना केली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, तो गडी जेथें दगड आणावयास गेला तेथेंच त्यास आरानें घरला व गिळूं लागला. गडी ओरडतां बेजार झाला. कोणी दुसरें नाहीं. ते समई तेथील देवाची पारध लागली होती. ते सावजाचे मागून फिरत त्या रानास आले, व या मुलीस पाहिली व तिला सोडून व तोंडांतील चोंथा काढून सर्व हकीकत विचारिली व तो आरानें मारलेला गडी दाखविला. मग ते मुलीस घेऊन सर्व जण नग वगैरे घेऊन सासरीं पोंचविली. तेव्हां तेथील सर्व माणसें विषाद मानितीं झालीं व मुलीवरून बहुत प्रकारें चाक उतरून सावध केली. नंतर ते मुलीनें ' आपण श्रीमहाकालीस नवस केला आहे, सर्व नग श्रीचरणीं

अर्पण करतें, आपणास श्रीचरणीं पोंचवावी,' असें ऐकितांच मुलीचे दिरानें तिला घेऊन आडिवऱ्यास आणिली व श्रीपुढें सर्व वृत्तांत निवेदन केला व जिंदगी अर्पण केली. तेव्हां श्रीनें सुचविलें मुलीजवळून नग घेऊ नये. ती भयास्तव बोलिली. नग आपण मुलीस बक्षीस केले. व चोळी, लुगडें देऊन आपले घरीं जाणेची परवानगी दिली. ती आपले घरीं जाऊन सुखानें नांदूं लागली.

ले. ५०

कथा ३ री—वाडा नवेदर येथे लिमये उपनांवाचें एक घराणें फार प्राचीन कालापासून नांदत आहे. त्यांचे घरीं घडलेला व त्याच घराण्यांतील व्यक्तीनें म्हणजे प्रस्तुत ग्रंथकर्ता यानें पाहिलेला हा साक्षात्कार आहे. आमचे घरीं ता। ६ मे १८९५ पासून भूतचेष्टा होत असत, त्या श्रीचे कृपेनें बंद झाल्या. त्याची माहिती फार मनोरंजक आहे ती येणेप्रमाणें — ता। ६ मे १८९५ पासून अडीच वर्षें आमचे घरावर दररोज सायंकाळीं रात्रीं दहा वाजेपर्यंत दगड पडत. ते दगड कोण मारतो हें पहाण्यासाठीं त्या वेळचे ग्रामस्थांनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु कांहीं ठरेना व हें काम मनुष्यकर्तृक नाहीं असें ठरविणें भाग झालें. या अवधींत नऊ महिने आम्ही घरदार सोडून जोशी यांचे घरीं रहात असूं. पुढें तारीख १५ आक्टोबर १८९७ चे सुमारास ही भूतचेष्टा श्रीचे कृपेनें बंद झाली. यापूर्वी दोन दिवस पहाटेस आमचे शेजारी महादेव गोडबोले यांचे अंगांत भूतसंचार होऊन एक दिवस पहाटेस व दुसरे दिवस संध्याकाळीं तो संचार होऊन वाढूं लागला. विचारल्यास कांहीं बोलना. दोन माणसांनीं आंवरून धरल्यास आंवरेना. त्याच दिवशीं आमचे वडील कृष्ण दीक्षित हे मरणोन्मुख आजारी असतां त्यांचेहि अंगांत आलें व तेही दोघांना आंवरतना. अशा स्थितींत सकाळपासून घरावर दगड पडूं लागले. तेव्हां आमच्या आईनें आमचे वडील बंधु बापू यांना सांगितलें "तूं श्रीमहाकालीच्या देवळांत जाऊन श्रीमहाकालीचे 'बऱ्याचे कौल' व पीडा नाहींशी होऊन वडिलांना बरें वाटेल, अशाबद्दल, 'गाऱ्हाणें करून' ये." त्याबरोबर बापू हे श्रीचे देवळांत जाऊन त्यांनीं कौल घेवविले. श्रीनें अंगप्रसादीं सांगितलें "ही

भूतचेष्टा आजपासून बंद होऊन तुझे वडील पंधरा दिवसांत बरे होतील."

असे हे कौल श्रीचे देवालयी चालले असतां इकडे घरीं असा चमत्कार झाला कीं, महादेव गोडबोले यांचे अंगांत भूतसंचार झाला. त्याला 'मारून विचारलें', तो कांहीं बोलेना; तेव्हां धूप वगैरे घालून पुनः विचारलें तेव्हां तो बोलूं लागला कीं, मला श्रीमहाकालीचा मार बसत आहे. मी जातों.तेव्हां पुनः विचारलें 'ही भूतचेष्टा कोणीं केली व कां केली' तेव्हां तो म्हणाला 'तुम्हीं माझी खिजावणी (चिडवणी) केलीत त्यामुळें मी तुम्हांला पीडा देत आहें.' मी आतां कांहीं करणार नाहा. मला श्रीमहाकालीचा मार बसत आहे. तेव्हां विचारलें, दीक्षित आजारी कशानें ? तो बोलला माझ्यामुळें. आतां तूं जाशील त्या वेळीं ही सर्व पीडा बंद होईल ना ? त्यानें होय म्हटलें व मला ताक पिऊं घाला व एक नारळ द्या. आणि एका ब्राह्मणास वैशाखमासीं कुळीथाचें पिठलें करून जेऊं घालून त्याला एक पै दक्षिणा द्या. ताक पिऊं देऊं लागलों तों तो म्हणाला मी शूद्र असून आम्ही दोघे आहों. दुसरा माझा जोडीदार वडावर आहे'. तेव्हां ताक एका बाजूला जाऊन हातावरच प्याला व नारळ फोडून एक करवंटी त्या वडावर आपले जोडीदाराकरतां फेंकून दिली व दुसरी हातांत ठेविली. त्यावर म्हटलें, 'तूं जर खरें बोलतोस तर गाईचें शेण व तुळस हातांत घेऊन शपथ घे, व कृष्ण दीक्षित यांचेपुढें चुकी केल्याबद्दल नाक तोंड घास'. त्यावर तो म्हणाला 'मी शूद्र आहें', शेण तुळस हातांत न घेतां पुढें ठेवा म्हणजे मी चुकी मागून घेतों व जातों. मला श्रीमहाकालीचा मार बसत असून तिचा फार तगादा आहे. याप्रमाणें सांगून नाक घांसून व चुकी मागून निघाला व हातांतील करवंटी वडाचे झाडाखालीं जाऊन खाली, व त्या झाडाखालीं धाडकन अंग टाकून बेशुद्ध पडला. तो पंधरा मिनिटांनीं शुद्धीवर आला व नंतर घरीं आला. त्यावर त्याला स्नान घातलें व त्यानंतर तो आपले नित्य व्यवहार करूं लागला.

इतकें होत आहे तों आमचे बंधु बापू हे श्रीचे देवळांतून आले व त्यांनीं सर्व हकीकत श्रीकडील सांगितली. ती अगदीं तशीच मंदिरांत बापूंच्या प्रत्ययास आलेली. दोघांस एकाच वेळीं आणि अगदीं भिन्न स्थलीं एकच

हालचाल व वृत्त प्रत्ययास आलें हें पाहून आम्हांस अचंबा वाटला. विशेषतः त्याप्रमाणें त्या दिवसापासून त्या भूतचेष्टा बंद होऊन वडिलांची तबेत सुधारत चालली व पंधरा रोजांत ते बरे झाले. याप्रमाणें श्रींचा साक्षात्कार समक्ष पाहिला आहे.

ले. ५१ श्रीः कार्तिक वा। ९ श. १७६९
दिसं. १ इ. १८४७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दिनकरपंत तात्या भिडे खोत
मौजे आडिवरें स्वामीचे शेवेसी

पो महादाजी गोपाळ फाटक मुा भोर साष्टांग नमस्कार विनंती–येथील कुशल ता। कार्तिक वा। ९ शके १७६९ पावेतों यथास्थित असे विशेष इकडील मजकूर कलमें.

१ श्रीमंत राजश्री चिमणाजी रघुनाथ पंतसचीव यांची व त्यांचे कुटुंबाची राखण सालाबादी रु। १० दाहा सुर्ती बहिरजी चव्हाण हुजरे व दाजी साळवी याजबरोबर पाठविले आहेत. हे श्रीमहाकालीचा अवसर येईल तेव्हां पुढें ठेवून पुढील उभयतांचा बंदोबस्त करून प्रसादाचा नारळ व आंगारा पाठवून द्यावा. साल गुदस्त आपल्यास लिहिलें होतें कीं, श्रीमंतांस पुत्र कधीं होईल तें देवास विचारून लिहून पाठवावें. त्याचें उत्तर आपलें मार्गशीर्ष शु। १ प्रतिपदेचे मित्तीचें आलें. त्यांत लिहिलें कीं, अवसरीं देवानें आठ महिन्याने पदर घेरल. एक दान श्रीमंतांचे हातून–दिवा व अनंत रेशमाचा, व ब्राह्मणास धोत्रजोडा व दक्षणा चार-पांच रु। पर्यंत असें एका ब्राह्मणास दान देऊन, तो ब्राह्मण दान देतांच वाड्यांतून निरोप द्यावा व शिधा द्यावा. याप्रमाणें सांगितल्यावरून लिहिलें आहे, म्हणोन आपण लिहिलें. त्याप्रमाणें श्रीमंतांकडून दान-दिवा व अनंत व पांच रुपये दक्षिणा व धोत्रजोडा या प्रो दिल्हे. आठ महिन्यांची मुदत लिहिली, त्यास बारा महिने जाले, अद्यापि पदर घरत नाहीं. त्यास देवानें सांगितलें त्यांत अंतर पडूं नये, तें पडलें. त्यास हालीं देवास विचारून पुत्र कधीं होतो? तें लिहोन पाठवावें. आपलें पत्र येतें तें येथें श्रीमंतांस दाखवावें लागतें त्यास देव सांगेल त्यांत अंतर पडूं नये. आंतर

पडलें असतां लौकिकास नीट नाहीं त्यास पेलाप्रमाणे देवास विचारून लिहून पाठवावें. कलम.

१ श्रीमंतांचे पागेंतील घोडीं, पावसांत दोन चार गार्वी चारणीस गेलीं होतीं. त्यापौ बाजारवाडीस दाहा घोडीं होतीं तीं दाहा घोडीं मेलीं. वरकड ठिकाणचीं चांगलीं आहेत, एके ठिकाणचींच दाहा मेलीं, यांचें कारण काय? उपद्रवानें गेलीं किंवा कोणी कांहीं कर्णी केली. व पागेंत नेहमी घोड्यांचे पायास आजार होऊन, घोडीं जायाबंदी होतात, घोडीं उपजऱ्यास येत नाहींत याचा मजकूर तपशीलवार बहिरजी चव्हाण सांगेल तो देवास विचारून पुढें पक्का बंदोबस्त होईल असें करावें आणि मजकूर लिहून पाठवावा. कलम.

१ आमचे घरचे राखणेबद्दल अर्धा रुपया सुर्ति सालाबादी पाठविला आहे हा देवापुढें ठेवून पुढील बंदोबस्त करून आंगारा पाठवून द्यावा. आम्ही तेथें बायकोस व सुनेस घेऊन आलों होतों, तेव्हां देवानें बंदोबस्त केला तितकाच आहे. कांही कसर राहिली आहे ती निघत नाहीं. त्याची विनंती आमची देवास करून बंदोबस्त करवावा. कलम.

१ रामचंद्र भट साठे जांबलीकर याचे घरीं दरवडा पडूं नये म्हणौन त्यांणीं राखण एक रुपया दरसाल कबूल केली ती पाठविली आहे ती देवापुढें ठेवून पुढील बंदोबस्त करून आंगारा पाठवून द्यावा. कलम.

१ श्रीमंतांनीं वाड्यांत दिवाणखाना, निद्रा करावयास नवा केला त्यांत प्रथम दिवशीं निद्रा केली, ते दिवशीं श्रीमहाकालीचे नांवें नारळ काढून ठेविला होता तो हालीं पाठविला आहे हा देवास द्यावा. कलम.

१ राजश्री रामजी आपा गांडेकर यांचे घरीं उपद्रव होतो त्याचा नवस कोल्हापूर व तुळजापूर येथें केला आहे, तो नडतो त्यास पांच रुो देणें म्हणजे बंदोबस्त करतें, असें देवानें सांगितलें; त्याजवरोन पांच रुो आपा गांडेकर याणी दिल्हे ते पाठविले आहेत हे देऊन बंदोबस्त करवावा. राखणबद्दल रुपया १ येक पाठविला आहे हा देवीस देऊन पुढील बंदोबस्त करून आंगारा पाठवावा व आपाचे बंधू धोंडोपंत यांची स्त्री दोन वेळ

प्रसूत जाली, पहिल्यानें आठ महिन्यांची जाली, व दुसऱ्यानें सहा महिन्यांची प्रसूत होऊन दोन्ही मुलें गेलीं. त्यास पुढें मूल होऊन संतत वाढावी, दरसाल एक रुपया राखण पाठवीत जाऊं याप्रमाणे बोलले आहेत तरी त्याचा बंदोबस्त करवून लिहून पाठवावें. कलम

१ आमचे घरीं पाहुणा आगांतुक समंध उत्रोलीकर कुळकर्णी कृष्णाजीपंत उपद्रव करीत होता. तो आम्ही येथें आलों तेव्हां देवीनें हाकून देऊन बंदोबस्त केला, त्या गांवची वहिवाट हाली श्रीमंतांनीं आमचे चिरंजीवास सांगितली आहे. कृष्णाजीपंत याचा मुलगा व भाऊ गांवचे कुळकर्णी आहेत. त्यास त्याचा बंदोबस्त देवीनें करावा. नेहेमीं त्यासी व आम्हांसी प्रसंग पडणार याजकरतां बंदोबस्त करवून उत्तर पाठवावें. कलम.

७

येकूण सात कलमें लिहिलीं आहेत याचें उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

ले. ५२ श्रीः श्रावण वा। १० श. १७८४
आगस्ट २० इ. १८६२

यादी ठराव वाडेकरी समस्त मिळोन केला जे. वाडे मजकुरीं सर्वांनीं भंडारमाड दिल्यामुळें श्रीसत्येश्वरास नड होऊन गांवांत गुरांची धाम पडली तेव्हां सर्व जमोन देवाजवळ जावसाल दिला कीं, जी नड असेल ती आम्ही सर्व जमोन काढूं, असें कबूल केलें. त्यास सर्वांचे विचारें भंडारमाड उतरावयाचें ठरविलें. त्यास त्यांतून कोणी माड उतरावयास हरकत सांगेल तर, त्याणें सर्व देवस्कीचें जोखींव त्याचे शिरावर. व तो सर्वांचे बाहेर. यास अमान्य होईल त्यास श्रीसत्येश्वर व बाळेश्वर यांची शपथ असे. हें आम्ही सर्वांनीं एकविचारें करून ठराव केला असे. मिति श्रावण वा। १० शक १७८४ दुंदुभिनाम संवत्सरे दस्तुर विनायक बल्लाळ लेले वाडा मजकूर.

सया

१ बाळकृष्ण बच्याजी परांजपे वगैरे १६ समस्त वाडेकरी यांच्या आहेत.

ले. ५३ श्रीः श्रावण वा। ९ श. १६८६
आगस्ट २१ इ. १७६४

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण वास्तव्य मौजे, नाटे व कशेळी व आडिवरें व घाउलवली व गोठणेदेव ता। राजापूर
स्वामीचे शेवेसीं

सेवक कृष्णाजी विश्वनाथ मुा। जंजिरे विजयदुर्ग. साष्टांग नमस्कार विनंती, येथील क्षेम जाणून स्वकीयें लिहावें. विशेष–पर्जन्य प्रस्तूत पडत नाहीं, यास्तव तुम्हीं समस्त मंडळी श्रीईश्वरस्थानीं गांवचे गांवी मिळोन देवास उदक-पूरित करावें, व अभिषेक व जप अनुष्ठान करून श्रीसन्निध निकट करून पर्जन्यवृष्टी सद्यः होये तें करावें. यास कोणी अनमान न करणें सो छ १८ सफर बहुत काय लिहिणें ? हे विनंती. पो छ २१ माहे सफर श्रावण वद्य ९ इंदुवासरे.

लेखांक ५४ श. १८५१
इ. १९२९

श्रीमहाकालीचे पुजारी गुरव यांना भविक गुरव असें म्हणतात. यांचीं दोन पथकें आहेत. एक राणे पथक व दुसरें शेलार पथक. यांपैकीं शेलार पथ-काचें घराणें मुकाम घाऊळवळी येथून प्राचीन काळीं ग्रामस्थांनीं आणविलें. राणे पथक हें पूर्वीचे जैन गुरूचे वंशज आहेत. यांचे घरीं पशुहत्या करा-वयाची नाहीं असा कुलाचार (जैन धर्माचा अवशेष म्हणून) पाळला जातो. श्रीपुढें येणारें उत्पन्न एक रुपया किंमतीपर्यंत येतें तें उत्पन्न गुरव यांना मिळत असतें. एक रुपयापेक्षां जास्त येणारें उत्पन्न श्रीचे दास्तानांत जमा होतें. यापुढें या गुरव लोकांची आणेवारी व त्यांचा वंशवृक्ष व इतर ठिकाणचे उत्पन्नाबाबद माहिती पुढें दिली आहे.

श्रीमहाकालीचे गुरव यांचेबद्दल माहिती

१. भविक गुरवाचें वरचें पथक यांची आणेवारी जगू येसू गुरव ८५८४, सदू काना गुरव ८५८४. या हिश्शांत बाळ गोपाळ, येसू कृष्णा, आत्माराम बाळ वगैरे. बाबू लक्ष्मण ८५८४ याप्रमाणें आहे.

२. आणेवारी सदू काना गुरव वगैरे मिळोन ८५८४ ची
सदू काना गुरव ८८१० व बाळ गोपाळ गुरव ८८११ = ८१८९
धोंडू विठू गुरव ८८१० व आत्माराम बाब्या गुरव ८८११ = ८१८९

येसू कृष्णा गुरव ८८११ येसू कृष्णा याचा चुलता– ८१८१०

चुलती मयत आहे तो हिस्सा येसू कृष्णाकडे चालत असतो. ८८११

३. श्रीदेवीची गुरवकी–जगू येसू गुरव महिने दोन, सदू काना गुरव महिने दोन, बाबू लक्ष्मण गुरव वगैरे दोन २ याप्रमाणें असते.

वंशावळ



ही माहिती सदू काना गुरव वरचे पथकाचा, यानें सांगितली. आश्विन वा। १३ शके १८५१

गुरव दोन पथकांचे, यांचा तंटा शके १७७३ फाल्गुन मासीं झाला. **निकाल** सर्व खोतांनीं श्रीदेवीकडे अंगप्रसादीं कौली करून घेतला तो येणेंप्रमाणें. कलमें ६

१ होळीखालीं व पायरीवर नारळ फोडावयाचे ते प्रथम नारळ वरचे पथकाचे राणे यांनीं फोडावा व नंतर दोन्ही पथकांचे गुरव यांनीं फोडावे.

१ दिपवाळीचे दिव्यांची मिळकत मिळेल ती, महालक्ष्मीचे देवालयीं पैसे दिव्यांत मिळतील ते राणे गुरव यांनीं घ्यावे. दिवे उभयतांनीं ओंवाळावे. पेठेंत दिवे दोन्ही पथकांचे गुरवांनीं ओंवाळून मिळकत उभयतांनीं निमे निमे घ्यावी. दिवे राणे गुरव यांनीं घ्यावे. अडचण आल्यास शेलार यांनीं घ्यावे. परंतु श्रीमहालक्ष्मीचे देवालयांतील मिळकत राणे यांनीं घ्यावी.

१ भराडीण व खामदा यांची चाकरी व मिळकत राणे व शेलार यांनीं निमे निमे घ्यावी.

१ महार यांजकडे घाणा लग्नाचा भरतात, ती मिळकत शेलार व राणे यांनीं तेथें जाऊन निमे निमे घ्यावी.

१ चांभार यांजकडील पायतण श्रीस येतें तें उभयतांनीं निमे निमे घ्यावें.

१ नवरात्र उत्साहाचा प्रसादाचा नारळ येतो तो गांवकरी खोत मंडळी यांचा, गुरवांचा नाहीं.

येणेंप्रमाणें उभयतांनीं निमे निमे चाकरी करून मिळकत घेत जावी. फाल्गुन वद्य २ शके १७७३ तारीख ६ मार्च १८५२. दस्तुर दिनकर कृष्ण भिडे महाजनी खोत.

श्रीमहाकालीच्या चाकरीचे पालट.

१ चैत्र शु॥ १ ते चैत्र शु॥ १५	जगू येसू गुरव
२ चैत्र वा॥ १ ते चैत्र वा॥ ३०	गोविंद सदू गुरव
३ वैशाख शु॥ १ ते वैशाख शु॥ १५	बाबू लक्ष्मण गुरव

४ वैशाख वा। १ ते वद्य ३०	धोंडा गुणा गुरव वगैरे
५ ज्येष्ठ शु।। १ ते शु।। १५	सदू काना गुरव वगैरे
६ ज्येष्ठ वा। १ ते वा। ३०	गणू बाब्या गुरव
७ आषाढ शु।। १ ते शु।। १५	बाबू लक्ष्मण गुरव
८ आषाढ वा। १ ते वा। ३०	गोविंद सदू गुरव
९ श्रावण शु।। १ ते शु।। १५	जगू येसू गुरव
१० श्रावण वा। १ ते श्रावण वा। ३०	धोंडू गुणा गुरव
११ भाद्रपद शु।। १ ते भाद्रपद शु।। १५	जगू येसू गुरव
१२ भाद्रपद वा। १ ते भाद्रपद वा। ३०	संभू सोना गुरव
१३ आश्विन शु।। १ ते आश्विन शु।। १५	सदू काना, बाळ गोपाळ, येसू कृष्णा वगैरे
१४ आश्विन वा। १ ते आश्विन वा। ३०	गोविंद सदू गुरव
१५ कार्तिक शु।। १ ते शु।। १५	बाबू लक्ष्मण गुरव वगैरे
१६ कार्तिक वा। १ ते वा। ३०	धोंडू गुणा गुरव वगैरे
१७ मार्गशीर्ष शु।। १ ते शु।। १५	जगू येसू गुरव
१८ मार्गशीर्ष वा। १ ते वा। ३०	गणू बाब्या गुरव
१९ पौष शु।। १ ते पौष शु।। १५	सदू काना गुरव वगैरे
२० पौष वा। १ ते पौष वा। ३०	गोविंद सदू गुरव
२१ माघ शु।। १ ते माघ शु।। १५	सदू काना गुरव वगैरे ६
२२ माघ वा। १ ते माघ वा। ३०	संभू सोना गुरव
२३ फाल्गुन शु।। १ ते शु।। १५	बाबू लक्ष्मण गुरव
२४ फाल्गुन वा। १ ते फाल्गुन वा। ३०	धोंडू गुणा गुरव वगैरे

अधिक महिना सर्व असामी वांटणीनें करतात. हींहि माहिती वरचे पथकाचा सदू काना गुरव यानें दिली. आश्विन वा। १३ शके १८५१— भिकाजी गणेश भिडे लिहून घेणार.

श्रीसत्येश्वर पुराणाची नेमणूक

ले. ५५

श. १६१४
इ. १६९२

श्रीधर्मप्रद्योतिताशेषवर्णादाद्यरथे–

रिव राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या
विराजते.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक १९ अंगिरा नाम संवत्सर भाद्रपद शुद्ध प्रतिपदा गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती यांणीं वेदमूर्ति

श्रीराजाराम नरपति हर्षनिधान मोरेश्वरसुत नीळकंठ मुख्य प्रधान	श्रीलक्ष्मी नृहरिप्रीतेः मुद्रानारा जीजन्मनः । राजाराम प्रतिनिधेः प्रल्हादस्य विराजते.	कानभट यांचे पुत्र विश्व- नाथभट फडके अत्रिगोत्र आश्वलायनसूत्र वास्तव्य मोजे आडिवरें तपे राजापूर यांसी दिधलें वृत्तीपत्र ऐसें

जे तुम्ही चंदीचे मुक्कामीं स्वामीसन्निध येऊन विदीत केलें कीं, आपण श्रीसत्येश्वर मौजें (आडिवरें) मजकूर आहे तेथील स्थळ पुराणिक, श्रीसन्निध पुराण सांगोन स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून आहों. ऐसि– यासी आपण कुटुंबवत्सल आहों योगक्षेम चालवयाचें कठीण आहे. तरी स्वामी वर्मप्रभु देवांब्राह्मणाचे प्रतिपालक आहेत. आपणांस कांहीं भूमी इनाम दिधलियानें तें उत्पन्न अन्न होईल तें भक्षून वैश्वदेव औपासन सत्कर्में आचरोन वेदशास्त्राध्ययन शिष्यवर्गास सांगोन त्रिकाळीं श्रीसंनिध स्वामीस आशीर्वाद चिंतोन असोन म्हणोन शृत केलें. त्याजवरून मनास आणितां तुम्हीं बहुत भलें, सत्पात्र विद्यासंपन्न ऐसा सत्पात्रीं दान दिध-लियानें बहुत पुण्य आहे ऐसें जाणोन तुम्हांस नूतन इनाम श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ सहिरण्योदकधारापूर्वक मौजे आडिवरें ता॥ राजापूर पैकीं भूमी ठिकाणें बि॥

वाडानवेदर यांमध्ये आगर श्री	वाडा कोणसर खुर्द आगर बाबती
सत्येश्वर बाबती पुराण सपात याची	फडके सपात यास चतुःसीमा
चतुःसीमा पूर्वेस घांटीचा माथा	पूर्वेस घांटीचा माथा दक्षिणेस

पश्चिमेकडे आगर भाऊ महाजनी उत्तरेस कुंभाराची खाणी व आगर मांडणी बाबदेव भट येवं ठिकाण १

गोविंदभट रानडे यांचें आगर पश्चिमेस मळा रानडयाचा. उत्तरेस बाबजी बल्लाळ रानडे याचे आगर एकूण ठिकाण १

एकूण ठिकाणें २ दोनी रास कुलबाव कुलबाबू हाली पट्टी व पेस्तर पट्टी झाडझाडोरा पडिलें पान सहित खेरीज वतनदार करून ठिकाणें नेमून दिधलीं असेत तुम्ही आपले स्वाधीन करून घेऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप असणें यास कोणी अन्यथा करील त्यास धर्मशास्त्राचीं वचनें.

एवंच भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजां । न भोग्या न कर-ग्राह्या बिप्रदत्ता वसुंधरा ॥ १ ॥

ब्राह्मणवित्तानि नाशयंती हरंति ये । तेषां पादरजोमीत्या चर्मणा पिहितं मया ॥ २ ॥

इन्द्रः पृच्छति चांडालि किमिदं पच्यते त्वया । श्वमांस सुरा सिक्तं कपाले च चिदाग्निनाः ॥ ३ ॥

स्वदत्ता दुहिता भूमि पितृदत्ता सहोदरी अन्यदत्ता भवेन्माता यो हरेत् त्रिषु संगतः ॥ ४ ॥

हे पातकें स्मरोन तुम्हांस इनाम चालवितील निदेश समक्ष संमत-सचीव मर्यादेयं विराजते.

श्रीसत्येश्वराची नित्यपूजा

ले. ५६

श. १६२७
इ. १७०५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिव नाम संवत्सरे भाद्रपद बहुल द्वितीया मंदवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांनीं पारपत्यागार, शिक्का शिक्का कारकून वर्तमान व भावी, ताा राजापूर यांस आज्ञा केली ऐसिजे. वेदमूर्ति विठलभट पारायणजपे, वास्तव्य मौजे आडिवरें तर्फ मजकूर यांणीं हुजूर विदित केलें. कीं, श्री मौजे मजकुरीं आहे. हें बहुत जागृत अनादि स्थान आहे; येथें श्रीस नित्याभिषेक पूर्वी चालत होता, सांप्रत चालत नाहीं, ऐशियास आपण ब्राह्मण कुटुंबवत्सल आहों, आम्हांस अभिषेक करावयाची आज्ञा करून आपली उपजीविका करून दिधलिया

आपण श्रीस अभिषेक करून वेदाध्ययन करून स्वामीस व स्वामींच्या राज्यास कल्याण इच्छून राहूं. म्हणून त्याजवरून मनास आणितां, श्री बहुत जागृत स्थळ, तेथें नित्याभिषेक चालिल्यानें बहुत पुण्य आहे. व वेदमूर्ति विठलभट बिन नरसिंह भट पारायणजपे, गोत्र विष्णुवृद्ध, सूत्र आश्वलायन, ऋक् शाखाध्यायी, हे वेदशास्त्रसंपन्न, बहुत थोर, कुटुंबवत्सल, यांची उपजीविका जाहालीयानें ब्राह्मण सुखरूप राहोन स्वामींस अभीष्ट इच्छितील; याजकरितां स्वामीनें यावरी कृपाळु होऊन यास श्रीचा अभिषेक करावयाची आज्ञा करून यास इनाम, यांचें शेत मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वेकडे बाग, व दक्षिणेकडे खाजणपर्या. व पश्चिमेकडे नदी, उत्तरेकडे खाजण, याप्रमाणें चतुःसीमा कुलबाब कुलकानू देखील हालीं पट्टी व पेस्तर पट्टी, झाड झाडोरा जल तरु पाषाणसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून शेत खाजण, राजेश्री आनाजी दत्तो यांचे घारियानें, विसा पांडांचे विधियानें, जमीन बिघे दोन २ मिरास इनाम करून दिली असे. तरी सदरहू शेत तुम्हींच चतुःसीमा मोजून दोनी बिघे भट गोसावी यांचे स्वाधीन करून, इनाम यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविणें. श्रीस अभिषेक यांजकडून करवीत जाणें. वर्ष प्रतिवर्षी नवीन पत्राची आक्षेप न काणें. या पत्राची प्रत लेहोन घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास भट गोसावी यांजवळी परतोन देणें.

लेखनालंकार मोर्तब आहे.

शिक्का

ले. ५७

श. १६५७
इ. १७३५

जाबिता चतुःसीमा इनामत, वेदमूर्ती कृष्णंभट परांजप्ये व रामचंद्रभट परांजप्ये वाडा कोणसर बुद्रुक मौजे आडिवरें ताा राजापूर सुरू सित सलासीन मया व अल्फ. मौजे मजकुरीं भट गोसावी यांची इनामत खाजण जमीन बिघे दोन ८२ पुरातन पत्राप्रमाणें चालत आली; त्यास सदरहू ठिकाणामध्यें वारिसदाराची जमीन बिघे ८॥३। अर्ध बिघा सवातीन

पांड आली होती, ते हाली वारिसदार हजर जहाला त्यावरून त्याची जमीन त्याचे स्वाधीन केली, त्याचा मोबदला जमीन व पेशजीची जमीन, चतुःसीमाबाबद सनद राजश्री सरखेल छ २१ जमादिलावल, शिवाजी संभाजी कारकून किल्ले यशवंतगड यासी पाठवून चतुःसीमा करून आणविली. अता चतुःसीमा जमीन ठिकाण नाा बाग खाजण मोजणीपूर्वक बिघे ८= दोन

अर्ज	मूळ
६२	९॥
१७॥	१८
	२५
	५२॥·

मोबदला जमीठि खाजण मुळवस

अर्ज	मूळ
२२	१२

जमीन ८॥३।·

जमीन ८१।३ बिघे

पैकीं वजा पोईजमीन

१२ अर्ज	२ मूळ
जमीन	बाकी जमीन
८८१।	८१।८॥।·

चतुःसीमा

पूर्वेस—बाग—पश्चिमेस—नदी.

दक्षिणेस—खाजण पर्या.

चतुःसीमा

पूर्वेस खाजण अंतो नरसी

दक्षिणेस खाजण शेवडे

पश्चिमेस आगर खुद्द

उत्तरेस खाजण अंतो विश्वनाथ

तेरीज जमीन ८१।८॥।

८॥३।

८२

उत्तरेस खाजण बाबजी नारायण.

एकूण खाजण जमीन दोन बिघे इनामत करून दिली असे. पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करीत जाणें छ २ रमजान मोर्तब.

श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर प्रसन्न

सरकारी नेमणुका

लेखांक ५८

श. १६४४
इ. १७२२

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृत नाम संवत्सरे फाल्गुन शु।। ७ भंदवार क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी यांनीं राजश्री देशाधिकारी व लेखक, वर्तमान व भावी. सुभा प्रांत राजापूर यांसी आज्ञा केली ऐसीजे. अंतोबा नाईक भिडे यांनीं स्वामीसन्निध विनंती केली कीं, श्रीदेवस्थान मौजे आडिवरें तो मजकूर येथें आहेत. बहुत जागृत आहे. तेथील पूजा, नैवेद्य, नंदादीप चालवावयाबद्दल पूर्वीपासून इनाम आहे. जमीन बिघे १०॥ साडे दहा तपशील —

जमीन भातजमीन बिघे	माळजमीन वरकस पिकाचे ८३ बिघे.
८२॥ मळा ठिकाणें	आगर देवालयासमीप जमीन बिघा ८२
८१ वाडा कोणसर	रेंवट वाडा कोणसर जमीन बिघा ८३
८१॥ वाडी काळकीची	८५
८२॥	
८३ भातसेत चार कुडवांचें वाडा कोणसर	
८५॥	ठिकाण

येणेंप्रमाणें जमीन बिघे ८१०॥ साडे दहा इनाम आहे त्याचीं पूर्वील पत्रें होतीं तीं धामधुमीचे प्रसंगीं गुरवाचें घर दग्ध जहालें त्यांत जळालीं. तरी स्वामींनीं कृपाळू होऊन पूर्ववत् इनाम करार करून देऊन श्रीची पूजा, नैवेद्य, नंदादीप चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन त्याजवरून मनास आणितां श्रीदेवस्थान बहुत जागृत आहे तेथील पूजा, नैवेद्य, नंदादीप चालवलियानें श्रेयस्कर असें जाणोन मौजे मजकूरपैकीं सदरहू जमीन कुलबाब कुलकानू, देखील हालीं पटी पेस्तर पट्टी, खेरीज हक्कदार इनाम खेरीज करून दिला आहे तरी तुम्हीं सदरहूप्रमाणें मौजे मजकूर पैकीं इनाम जमीन अंस सुरळीतप्रमाणें चालविणें प्रतीवर्षी नूतन पत्राची तालीक लेहोन घेऊन असल पत्र भोगवटियास परतोन देणें जाणिजे.
लेखनालंकार मोर्तब आहे सुरु सुद बारबार.

पूर्वीचे इनामपत्राची पुनरावृत्ति

लेखांक ५९ श. १६५०
इ. १७२८

राजश्री प्रतापजी नाईक काळे गुंडे नामजाद जंजिरे विजयदुर्ग गोसावी. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री कान्होजी आंग्रे सरखेल राम-राम सुरू तिसा अशरीन मया व अलफ. श्रीदेव मोजे आडिवरें तो राजापूर महास्थान श्रीची पूजा अर्चा चालिली पाहिजे याकरितां मौजे मजकूरचीं ठिकाणें शेतें हुजुरनें इनामत दिलीं आहेत.

भातजमीन बिघे ८२॥ मळा. वाडा कोणसर बुद्रुकपैकीं बिघा ८१
८१॥ वाडी काळकीची
८३ भातखांचर कुडयाठें वाडा कोणसर.
८५॥

माळजमीन वरकस बिघे ८३
आगर देवाजवळ बिघा ८१
रेंवट वाडा कोणसर बिघा ८१
८५

एकूण साडेदहा बिघे हुजूरून दिली आहे. त्यापैकीं हालीं श्रीस बिघे पांच ८५ करार केली असे. सदरहू पांच बिघे यास सरस जमीन सदरहू शेतांपैकीं जमीन नेमून देऊन पांच बिघे याचा आकार होईल तो साल दर-साल श्रीकडेस खर्च लिहीत जाणें. प्रतीवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची तालीक लेहोन घेवोन असल पत्र भोगवटीयास फिरोन देणें जाणिजे छ ३ माहे जिल्हेज मोर्तब सुद मोर्तब आहे.

नेमणूक मंडपाचे झांपांची

लेखांक ६० श. १७३८
इ. १८१६

अज स्वारी राजश्री रामचंद्रराव महादेव सुभेदार प्रांत जंजिरे विजय-दुर्ग ता॥ कमावीसदार मौजे आडिवरें तो राजापूर सुरू सबा अशर मय्या

तेन व अलफ तुम्हीं सुभा राजापूरचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, मौजे मजकुरीं श्रीदेव सत्येश्वर महास्थान श्रीलक्ष्मीनारायण व श्रीकालिकादेवी हीं जागृत स्थानें त्यास श्रीसत्येश्वराचा उत्साह कार्तिकमासीं व श्रीलक्ष्मी-नारायणाचा उत्साह कार्तिकमासीं व श्रीकालिका देवीचा उत्साह नवरात्र याप्रमाणें सालाबाद मंडप घालावे लागतात त्यास झांपांची नेमणूक करून दिलियास यात्रा मिळते, पर्जन्याचे दिवस, देवळांत दाटी होते यास्तव कीर्तनास व यात्रेस जागा विस्तीर्ण होऊन यथास्थित समारंभ होईल म्हणोन तपशिलें विदित केलें. त्याजवरून मनास आणितां तिहीं देवांचीं महास्थानें जागृत, उत्साह प्रतिवर्षीं होतो. नेमणूक करून दिलिया श्रेयस्कर हें जाणोन मौजे मजकूरपैकीं झांप नेमून दिले आहेत सुमारें

१०० श्रीदेव सत्यश्वेर. वाडा नवेदर, कोणसर खुर्द व बुद्रुक.
१०० श्री लक्ष्मीनारायण. भराडें, मोघेरें व राजवाडी.
१०० श्रीदेवी कालिका. वाडी मजकूर.

३००

एकूण ३०० तिनसें झांप सालदरसाल देत जाणें. हिशेब नेहेमीं खर्चा-कडे मजुरा दिले जातील. या सनदेची नकल लिहून घेऊन असल सनद भोगवटियासी भिडे महाजनी खोत वाडा नवेदर यांजवळ परतोन देणें छ ७ सवाल मोर्तब सुद मोर्तब असे.

दशावतार

ले० ६१ श. १६५१.
इ. १७२९.

राजश्री श्यामजी नाईक 'दशावतारे' यांस आज्ञा. सुरू सना सलासीन मय्या व अलफ. राजश्री फकीरजी आंग्रे यांचें लग्न आहे. याकरितां तुम्ही गोतसमवेत हुजूर येणें. छ ७ शिक्का लेखनसीमा

ले० ६२ श. १७२७
स. १८०५

यादी श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर श्रीसत्येश्वराचे देवालयीं सालाबादी वार्षिक कार्तिक शु।। १२ होते तेथें तुळसीचे लग्नासंबंधीं नारळ १५ वाडा कोंडसर बुद्रुक येथील यांसी नांवनिशीं सुरू सन सित मयातेन व अलफ क्रोधी नाम संवत्सरे नारळ १५ यांचा तपशील.

१ कल्याण	२ विष्णू हरी	३ नारो विश्वनाथ
१ महादेवभट परांजपे	१ दर्भ्यें	१ भिकाजी नारायण
३ शेवडे निसबत	३ होडे निसबत	

१५

खर्च नारळ

४ ब्राह्मणांस नारळ सालाबाद देतात ते.
१ पुराणिक, १ हर्डीकर, १ जोशी, १ अग्निहोत्री,
२ श्रीदेवास सालाबाद ठेवितात ते.
१ सत्येश्वर, १ बाळेश्वर,
८ देवालयीं नारळ शेरणीस सालाबाद फोडतात.
१ नारळ राहिला तो वाडेकरी यांनीं माघारी वाडे मजकुरास जाऊन वाडेकरी यांणीं फोडावा आणि शेरणी करावी. नारळ १

श्रीचे होलिकोत्सवासंबंधीं व्यवस्था

ले० ६३

यादी श्रीदेव सत्येश्वराचे होळीस सुपारीची होळी ठिकाणें वाडा नवेदर सुरू सन तिसा सबैन मया व अलफ शके १७०० विलंबीनाम संवत्सरे फाल्गुन शु।। १५ ठिकाणवारी येणेप्रमाणें.

१ ठिकाण सदाशीवभट फडके	१ शंकर जोशी व बाळ जोशी
१ शिवमानी भिडे	१ गोविंदभट काळे

१ ठिा घांटावा भिडे
१ दायजा महाजनी खोत
१ बाळाजी गणेश भिडे
१ विसाजी शामजी काळे
१ ठिा वेलणकर
१ ठिा रुटके कर्दे बाबदेवभट काळे
१ ठिा नातू
१ ठिा जोशी शेवड
१ ठिा विग महाजनी भिडे कर्दे जोशी
१ रामचंद्रभट आपटे
१ ठिा केशवभट लिमये-ब्रह्मे
१ विश्वनाथभट काळे
१ ठिा नमस भिडे
१ दांत्ये आपाभट व बचंभट
१ भिडे कृष्ण मानी
१ रामदेव मानी
१ बाबदेवभट व गणेशभट अग्निहोत्री
१ गुणभट व सदाशीवभट गोरे यांनी दरसाल दोन नारळ द्यावे सबब होळी नाहीं.

सदरहू बावीस ठिकाणें पण होळ्या एकवीस पाळीप्रमाणें घ्यावयाच्या. वाडेकरी यांनीं खोत महाजन यांचे मतें ठराव केला यासी अंतर करील त्यास श्रीसत्येश्वराची शपत मिा मजकूर.

होळीसंबंधीं ठराव–वाडा नवेदर

ले. ६४ श. १७९८
इ. १८७६

ठराव वाडा नवेदर मौजे आडिवरें येथील समस्त अधिकारी व ग्रामस्थ यांचा ऐसा जे, वाडा मजकूर येथील श्रीदेव सत्येश्वर याची समाराधना वगैरे हरएक काम देवासंबंधीं होतें तें मुख्यत्वेंकरून वाडा मजकुराचे अधिकारी यांचे संमत्तानें वाडा कोणसर बुद्रुक व खुर्द येथील लोकानीं करावें. तशी वहिवाट त्यांजकडून चालत नाहीं व नवेदर येथील वाडेकरी यांचे हरएक कामांत अनुमत्त न घेतां दांडगाईनें काम चालवितात. तसें सालमजकुरीं फाल्गुन शुद्ध १५ रोजीं होळीचें काम चालवितील. जाणोन सर्व वाडेकरी श्रीगणपतीचे देवालयी आज रोजी जमोन असा ठराव करीत आहेत कीं, वर लिहिले रोजी होळी देणेचा पालट वाडे मजकूरपैकीं दांत्ये अग्निहोत्री यांचा आहे. त्यांणीं होळी वाडेकरी यांचे अनुमताशिवाय, कोण-

सरकर यांजला किंवा हर कोणासही वर लिहिले बाबतीचा ठराव होईपर्यंत देऊं नये. या ठरावाविरुद्ध जो वर्तणूक करील किंवा कोणसरकर दोन वाडेकरी यांस सामील होईल तो श्रीदेवाचा अपराधी होईल. मिति फाल्गुन शुद्ध १३ शके १७९८.

दस्तुर केशव गोविंद भिडे खोत.

१ सइ कृष्णाजी नारायण भिडे खोत द. खु.

१ रामचंद्र सदाशिव भिडे
१ गोपाळ अनंत भिडे खोत
१ चिंतामण भट गोरे
१ त्र्यंबकभट बिन भाऊभट दांत्ये
१ गोपाळ त्र्यंबक फडके द. खु. दामले
१ महादाजी दिनकर भिडे
१ गोविंद बल्लाळ जोशी महाजन
१ दामोदर बाजी दांत्ये दस्तुर वामन दामोदर दांत्ये
१ रामचंद्र सदाशिव दांत्ये
१ नारायण भट बिन जनार्दन भट दांत्ये
१ सदाशिव भट विश्वनाथभट वेलणकर १ बाळंभट चिमणभट आपटे वस्ती नवेदर.

श्रीसत्येश्वर देवालय इत्यादि बांधकाम-यादी

ले. ६५

श्री बाळेश्वराचे देवालयाची दुरुस्ती शके १६९४ सालीं केली आहे.

श्रीदेव सत्येश्वराचें देवालय शके १७१० सालीं ग्रामस्थांनीं दुरुस्त केलें.

श्री देव सत्येश्वराचा बाहेरील सभामंडप ग्रामस्थांनीं शके १७९७ सालीं बांधिला.

श्रीदेव सत्येश्वरासमोरील त्रिपुर व पिंपळाचा पार महादेवभट फडके यांनीं पेद्रू मस्तरी यांचेकडून बांधविले ते प्रत्येक त्रिपुरास २६ रुपये घेऊन त्यांचे मालकास विकत दिले. पूर्वेकडील अश्वत्थ हरभट भट यांनीं लाविला त्यांचेकडून ३० रुपये घेऊन त्यांस पार बांधून दिला.

याबद्दल जमाखर्च आश्विन शु।। १० व वैशाख शु १५ शके १७१० चा फडके पुराणिक यांचे दप्तरीं आहे.

श्री बाळेश्वरा समोरील नंदी. जीर्णोद्धार.

पूर्वीचा नंदी जीर्ण जहाल्याकारणानें नूतन नंदी करून तो शके १८२२ वैशाख शु।। ५ रोजीं ग्रामस्थांनीं स्थापना केली. या देवाचे सभोंवारची गाभाऱ्यांतील पायडी शके १७४५ सुभानुनाम संवत्सरे पौष शु।। १३ इंदुवारीं बाळवजा याजकडून करविली.

अद्भुत शांति श्री देव बाळेश्वर

श्री बाळेश्वराचे मस्तकावर कळशी पडून लिंग छिन्नभिन्न झालें व श्रीदेव सत्येश्वराचे देवालयीं भ्रष्टाकार झाला म्हणून शके १७३७ सालीं अद्भूत शांति केली.

श्रीसत्येशाष्टकम्

ले. ६६

सत्येश्वरमजं देवं सर्वव्यापिनमीश्वरम्। पूर्णकामं सदाभासं नौमि सत्यं सनातनम् ॥१ ग्राममध्ये स्थितं शांतं ग्रामपालमतिप्रभं। ब्रह्मस्थापितलिङ्गस्थं नौमि० ॥२ निर्गुणं च गुणाभासं सत्त्वानां लयकारणं। प्रकृत्या च प्रसूयन्तं नौमि० ॥ ३ अग्रे कृतमहोक्षंच पृष्ठे तु निजवल्लभाम्। दक्षिणे च गणेशानं नौमि० ॥ ४ कृत्वा बालेश्वरं वामे स्थितं सर्वस्थितं सदा। रक्षन्तं सकलाँल्लोकान् नौमि० ॥ ५ ॥ धर्मार्थकाममोक्षणां दातारं सर्वदाजनम्। उपाधित्रयहर्तारं नौमि० ॥ ६ ॥ योगीशं परमानन्दं भूतावासमुमापतिम्। सर्वज्ञानप्रदं नित्यं नौमि० ॥ ७ ॥ कालान्तकं गानलुब्धं जटाजूटविराजितम्। ब्रह्मविष्णुमुखैः पूज्यं नौमि० ॥ ८ ॥ सत्येशस्याष्टकं पुण्यं यः पठेत्सुसमाहितः। हत्वा शत्रूञ्शिवं याति भुक्तभोगः सदा गृही ॥ ९ ॥ यः पठेत्प्रातरुत्थाय मासमात्रं शुचिव्रतः ॥ ब्रह्मराक्षसवेतालडाकिन्यश्च महाभयाः ॥ १० ॥ भूतप्रेतपिशाचाश्च बालघातकराश्च ये। त्रस्ताः सर्वे विनश्यन्ति भक्तानां च शिवाज्ञया ॥ ११ ॥ त्रिवारं यस्तु पठति चैकविंशतिवासरान्। आभिचाराणि सर्वाणि तस्य गच्छन्ति

नान्यथा ॥ १२ ॥ दृष्ट्वा त्रिकालं पठति मासषट्कं बुधोजनः । पुत्रलाभो भवेत्तस्य यच्चान्यदपि चिन्तयेत् ॥ १३ ॥ अश्लीलयं नुतिरिति वक्ति मन्दो जनो यदा । तदा वाग्भवति भ्रष्टा जिह्वा कृमिमती भवेत् ॥ १४ ॥ नत्वा सांबं शिवं शांतं वाग्देवीं च सरस्वतीम् । महादेवस्य पुत्रेण स्तुतोऽयं सत्यनामकः ॥ १५ ॥ इतिश्रीसत्येश्वराष्टकस्तोत्रं संपूर्णम् ॥

आरती श्रीबाळेश्वराची

ले. ६७

वंदे शिवमीशानं वन्द्यं हतमदनम् । मायातीतममेयं निजभक्ताधीनम् । शंभुं भवभयदलनं भक्तानां शरणम् । व्याघ्राजिनपरिधानं वृषभप्रिययानम् ॥ जय देव जय देव शिव हर मृड शंभो । नीराजनमवलोकय सततं कुरु शं भोः ॥ १ ॥ वन्दे कनकाभरणं मुनिपूजितचरणम् । त्र्यक्षं भद्रंकरणं जगदुद्भवकरणम् । पालितबहुलाभरणं नाशितरिपुबाणम् । विश्वस्यास्य प्राणं चिन्तामणिशरणम् ॥ २ ॥ खण्डितमायाजालं नरकीकसमालम् । वन्दे शिवगोपालं नृजनामयहारम् । भूत्या चर्चितभालं रमणीयकपोलम् । विबलं कण्ठे नीलं शरणागतपालम् ॥ ३ ॥

आरती श्रीसत्येश्वराची

ले. ६८ श. १७५८
इ. स. १८३६

जय देव जय देव सत्येश्वर शंभो । नीराजनमवलोकय सततं कुरु शं भोः ॥ धृ. ॥ त्र्यक्षं रुद्रं गिरिशं रजनीपतिमौलिम् । रुद्राक्षान् बिभ्राणं सुरवरमुनिवन्द्यम् । तापाद्दुःखाद्दादहणरिपुभयपुंजात् । रक्षय तव सेवायां निरतान् निजभक्तान् ॥ १ ॥ स्तुत्यर्केंद्रोपेंद्रैर्धिषणापतिमुख्यैः । देवैर्वेदागम्यं ह्यनिशं जयरूपं । विद्यां बुद्धिं शक्तिं दत्त्वा ते वंदे । स्वारूप्यं यच्छन्तं गौरीपतिमीशं ॥जय० २॥ क्षित्याद्यष्टौमूर्ती बिभ्राणं शर्वं । भूत्या लिंगं व्यालैर्विरचितनेपथ्यं । सर्गं पोषं ध्वंसं कुर्वंतं सत्यं । सत्यासक्तं वंदे विश्वेशं नित्यम् ॥ जय० ३ ॥ कैलासादागत्य क्षित्यांतिष्ठंतं । विघ्नौघाद्रक्षंतं भक्तानांवृंदम् । षडरिविनाशनधीरं वन्दे शितिकण्ठम् । महादेवं विप्रं कविसदाशिवाडिंभं ॥ जय देव० ॥ ४ ॥

नवा गुरव ठेविण्याबद्दल सनद

ले. ६९ श्री श. १६८८
इ. १७४४

आज स्वारी राजश्री नारो त्र्यंबक सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग ता कमाविसदार मौजे आडिवरें तो राजापूर सुरु सबा सितेन मया व अलफ. श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर ईश्वरस्थानें वाडा कोणसर बुद्रुक मौजे मजकूर येथें आहेत. त्यांस सन्निध भरड जमीन आहे. त्यांत साल मजकुरीं नवी विहीर खणोन, फुलझाडें, तुळशी व बेल लाविले आहेत. त्यांचें शिंपणें त्यास नवा गुरव करार केला आहे. जुने गुरव आहेत, त्यांस दोन वाड्यांची चाकरी व श्रीदेवाची व श्रीदेवाच्या बागेची निघा होत नाहीं, सबब दुसरा गुरव नवा करार केला आहे. त्यांचें घर श्रीदेवाचे निसबत वाद बेठ बिगार माफ केलिया नवा गुरव आणून ठेवीन म्हणौन विष्णु हरी परांजपे खोत वाडा कोणसर बुद्रुक मौजे आडिवरें यांनीं सुभा जंजिरे मजकूरचे मुकामीं येऊन विनंती केली त्यावरून मनास आणून श्रीदेवाचे पूजेस पुष्पें व तुळशी जहाल्यास श्रेयस्कर जाणोन नवा गुरव, खेरीज वस्ती, साल मजकुरीं आणतील. त्यांचें घर बादी खालीं लिहिवीत जाणें, आकारी साल दरसाल बाद पडत जाईल जाणिजे. छ २७ माहे मोहरम मोर्तब सुद. [शिक्का]

गुरवांस जामीन

ले. ७० श. १७५७
इ. १८३५

श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर संस्थान वाडा कोणसर बुद्रुक मौजे आडिवरें जामीनकतवा बेशमी बाळंभट बिन केशवभट गोरे राहणार वाडा कोणसर बुद्रुक मौजे आडिवरें तोा राजापूर तोा विजयदुर्ग सुरुसन खमस सलासीन मयातेन व अलफ. लिहून दिला जामीनकतबा ऐसा जे. गणा बिन बिस गुरव लिंगायत निा श्रीदेव सत्येश्वर यास आम्ही जामीन रहातों कीं, गुरव मजकूर यांजकडून देवाचे चाकरींत कांहीं अंतर पडलें त्याजवरून

वर्तणुकेस जामीन, गुरव मजकूर याजजवळ मागितला, यावरून आम्ही जामीन राहिलों असों. तरी गुरव मजकूर याजकडून देवाची चाकरी व नैवेद्य नेमणुकेप्रमाणें गुरव मजकूर हा करील. याजकडून अंतर पडल्यास मी खुद्द जाबसाल करून देइन हा जामीन कतबा मी आपले खुषीनें लिहून दिल्हा सई. मिति वद्य १३ शके १७५७ मन्मथनाम संवत्सरे.

बाळंभट बिन केशवभट गोरे दस्तुर खुद्द.

ठराव गुरवकीचा

ले. ७१ श. १८२७
इ. १९०५

ठरावपत्र श्रीदेव सत्येश्वर यांतील सर्व गुरव लिंगाइत यांचे देवाचे उत्पन्नाबद्दल नेहेमीं तंटे उत्पन्न होतात. त्याप्रमाणें कार्तिकीचा उत्साह शके १८२७ चा सुरू झाला, त्यांत उत्पन्न झालेवरून तीन वाडेकरी खोत महाजन व इतर ग्रामस्थ यांचे संमतीनें सर्व गुरव यांस बोलावून आणून, त्यांची सर्व तंटयाची बाब ऐकून घेऊन खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव झाले ते. त्यांना विचारून व त्यांजला मान्य होऊन करण्यांत आले आहेत ते येणेंप्रमाणें

१ गुरव यांचीं पथकें तीन. त्यांपैकीं येसलिंग नंदलिंग, व सखलिंग सदलिंग व बचलिंग हरलिंग व बापू नानलिंग गुरव लिंगायत या पथकांपैकीं, येसा व सखाराम, बच्चा व तारें यांपैकीं येसा याचे उत्पन्नास निमे हिसेदाराची आजपर्यंत तक्रार नाहीं. तक्रार "उत्पन्न वांटून घेण्याचे बाबतींत" फक्त सखाराम व तारें व बच्चा यांत होती. त्याचा निकाल त्यांचे एकमेकांचे समजुतीनें, ज्याचे गुरवकींत जो विषय देवापुढें व गांवांत जो मिळेल तो ज्याची गुरवकी असेल त्यानें घ्यावा त्यासंबंधीं वांटणीचें कांहीं कारण राहिलें नाहीं.

येणेंप्रमाणें पुढील वहिवाटीस नियम करण्यांत आले आहेत. मागील उत्पन्नाबद्दल दोन सालचे कार्तिकीचे उत्पन्नाबद्दल तंटा होता त्याजबद्दल नुकसानी वगैरे बाबतींत निकाल करून आपसांत समजुती झाल्या आहेत. त्यांजबद्दल आतां कांहीं संबंध राहिला नाहीं. मिति कार्तिक शुद्ध १४ शके

१८२७ तारीख ११ माहे नवंबर सन १९०५ मंदवार दस्तुर गंगाधर विठ्ठल परांजपे.

साक्षी	सया
१ गोपाळ बाळलिंग लिंगायत	१ बच्या हरलिंग गुरव द. खु.
१ गोविंद कृष्ण लिंगायत	१ सखलिंग सदलिंग गुरव द. खु.
निा धुपाटणें. दस्तुर गोपाळ	१ बापू नारायणलिंग गुरव द. खु.
बाळलिंग लिंगायत द. खु.	१ येसलिंग नंदलिंग गुरव द. खु.
	दस्तुर गोपाळ बाळलिंग गुरव.

ठराव गुरवकीबद्दल

ले. ७२ श. १८११
इ. १८८९

यादी ठराव वाडा कोणसर बुद्रुक व वाडा कोणसर खुर्द व वाडा नवेदर मौजे आडिवरें यांजकडे श्रीसत्येश्वर याचे गुरवकीविषयीं, कृष्णलिंग यानें वांटणी करून घ्यावयाविशीं फिर्याद केली, त्याजवरून तीन वाडेकरी यांणीं ठराव केला तो असा कीं, श्रावण, कार्तिक व माघ महिना, असे तीन महिने, गंगालिंग, कृष्णलिंग व उमा कोम सोना गुरव या तीन असामींनीं सदर लिहिलेले महिन्यांत चाकरीस हजर राहून (जी चाकरी सांगाल ती) जी मिळकत होईल ती तीन असामींनीं सारखी वांटणी करून घ्यावी. बाकीचे नऊ महिने चालीप्रमाणें वहिवाट करावी त्याप्रमाणें तीन वाडेकरांनीं जो ठराव केला तो आम्हा तीन असामींनीं कबूल करून खालीं सया करून दिल्या आहेत. मिति श्रावण वद्य १ शके १८११ विरोधीनाम संवत्सरे ताजा कलम

उमा गुरवीण हिचे चाकरीबद्दल मर्द इसम गंगालिंग अथवा कृष्ण या दोघा असामींतून चाकरीस हजर करून घ्यावे.

मिती व शके मजकूर

साक्ष सई कृष्णलिंग बिन गणलिंग
१ येसा बिन नंदलिंग गुरव निा धुपाटणें गुरव लिंगायत धुपाटणें
१ बाबजी बिन शिवलिंग गुरव निा धुपाटणें हस्तें खुद्द.

सदरहू दोन साक्षीचे दस्तुर
गोविंद विश्वनाथ भिडे दस्तुर खुद

१ गंगलिंग बिन विसलिंग गुरव
१ उमा कोम सोनलिंग निा वाळा
सदरहू तीन सयांचा दस्तुर
✓गोविंद विश्वनाथ भिडे दस्तुर खुद

करार गुरवांचे चाकरीबद्दल

ले. ७३

श. १७७२
इ. १८५०

राजश्री ग्रामस्थ वाडेकरी वाडा कोणसर बुद्रुक व खुर्द यांस खालीं सया करणारे लिंगायत गुरव वाडा कोणसर बुद्रुक लिहून देतों कीं, देवस्थान श्रीसत्येश्वर बाळेश्वर यांचे देवळांतील कळशा व समई चोरीस गेल्या आहेत. शिवाय आम्ही बेकाळजीपणानें वागल्याबद्दल लिहून देतों कीं, आम्हा गुरवांस जे घरे सरकारांतून नांवें करून दिले आहेत, ते तुमचे वाडयापैकीं सदरील लिहिलेले देवाचे चाकरी करणेबद्दल दिलेले आहेत. त्याचप्रमाणें काळकावाडी गांवांत तुम्ही दोन वाडेकरी व वाडा रुंढें येथील खोताच्या पाट्या आहेत. त्या देवाच्या नांवचें खातें होऊन आमचेकडे वहिवाटीस आहेत. त्या तुम्ही तिन्ही वाडेकऱ्यांनीं देवळांतील जें काम देवासंबंधीं पडेल अगर तुम्ही सांगाल तें करण्याबद्दल चालविल्या आहेत. त्याप्रमाणें तुम्ही सांगाल तें देवळांतील काम आम्ही करीत जाऊं व तसें आमचेकडून न जहाल्यास पाट्यांचें उत्पन्न तुम्हीं घ्यावेंत. त्याचप्रमाणें देवाची इनामत रोज एक पायली नैवद्याकरितां चालत आहे, त्याप्रमाणें आम्ही नैवेद्यनंदादीप यांचें काम रीतीप्रमाणें करीत जाऊं व देवळांत रात्रीं पाळीपाळीनें रोज दोन तीन असामी निजावयास जाऊन पहाऱ्याचें काम करीत जाऊं. तसें आमच्याकडून न जहाल्यास देवाची नुकसानी होईल ती आम्ही समस्त सया करणारे गुरव भरून देऊं. त्याजबद्दलची कांहीं तक्रार करणार नाहीं. हें आमचे आम्हीं खूषीनें लिहून दिल्हें. सई मिति माघ शुद्ध १० शके १७७२ साधारणनाम संवत्सरे इंग्रजी तारीख ११ फेब्रुवारी सन १८५१ दस्तुर हरी संभाजी कुलकर्णी.

साक्ष
१ बाळ दिक्षीत बिन जनार्दन
दीक्षित लिमये
१ बाबाजी पाध्ये हर्डीकर
दस्तुरखुद्द.

असल बरहुकुम नकल रुजु असे

१ गणलिंग विसलिंग गुरव
१ शिवलिंग गोंदलिंग गुरव
१ बाळलिंग गोंदलिंग गुरव
१ विसलिंग नंदलिंग गुरव
१ संभालिंग म्हादलिंग गुरव
१ रामलिंग हरलिंग गुरव
सई इंग्रजी.

श्रीदेव सत्येश्वराचा मुखवटा

ले. ७४

श्रीदेव सत्येश्वर यांचा पूर्वीचा मुखवटा जीर्ण जाहला तो नवा करण्याकरितां ८० रुपये वर्गणी गांवांत जमा करून शके १७५० कार्तिक शु॥ १५ मुखवटा करविला

श्री सत्येश्वर-दास्तान

ले. ७५

श. १७७२
इ. १८५०

यादी श्रीदेव सत्येश्वर व बाळेश्वर तीन बाडे इ॥ मुखवटे व दागिने तांबे व पितळ वगैरे मोजदादीस आहेत ते. सुरु सन इद्दिदे खमसेन मयातेन व अलफ. मिति कार्तिक शुद्ध १२ शके १७७२ साधारणनाम संवत्सरे सन १८५० इसवी.

मुखवटे वगैरे दागिने

१ मुखवटे श्रीदेव सत्येश्वर कानांत सोन्याच्या राकड्या जोड दोन जमा

१ मुखवटा श्रीबाळेश्वर संबंध
१ सांखळी रुप्याची त्यांत आहे ती १ पदक ४ तावजा पौ फुटकीं.

सोनें दागिने.

३ पुतळ्या वजन मासे
२ राकड्या श्रीदेव सत्येश्वर याचे कानांत राकड्या जोड दोनआहेत.
१ श्रीदेव बाळेश्वर याचे कानांतील कुडकीं मोकळीं, कुडीं २ कुडकीं ३ मोती एक सर ओवलेले मोतीं

२ दाब दोन
» श्रीपार्वतीचा कमरपट्टा.
१ छत्रीदांडा व पोली नाहीं.

१ श्रीदेव सत्येश्वर याचे मुखटयाचा कळस ३
४ मुखवटयाचे तुकडे ४ लहान

तांबे दागिने

२ हांडे
२ तपेलीं
१ थोर, १ लहान नैवेद्याचें
२ तांब्ये गडवे ताा.
१ वाळयाचा १ कासंडी फुटकी
२ कटवे लहान
१ पंचपात्री १ कोपरा
२ मुखवटे लावावयाचे देवाचे

३ गळत्या २ चांगल्या १ फुटकी
५ मेखळा

७ कळशा सात

१ फुटकी, ६ चांगल्या

१ कोपरा चांगला
१ कुदली

सगगें दागिने.

२५ घोतरें
१० कोरी, ११ धुवट, ४ फाटकीं बोजाबांधण्याचीं फटक्या

२ बन्हाणपुरी १ चिटवी ३ पागोटी

२ वराणपुरी १ देवांवर बांधावयाचें
१ पालखीचे दांडयास गुंडाळणेचें १ शेलारी.
१ पितांबर पिवळी फाटकी
१ बासन फाटकें
२ सालगुदस्त शके १७७१ सालीं बहिरंभट परांजपे हस्तें वासुदेव बल्लाळ खोत जोडा धुवट घोतरें दोन

पितळ दागिने.

४ कर्णे: १ चांगला वाजणेचा ३ मोडके
२ ताट फुटकें १ पितळी चांगली एक
७ समया: १ थोर, ४ मध्यम, २ लहान
१ तुतारी मोडकी १ शिंग मोडकें
२ नाग ताा १ लहान, १ थोर
१ शिंपला १ बुदली २ दिव्याचे दांडे

२ कळस अब्दागिरीचे दोन लहान
२ पालखीचे कळस
१ पंचारती १ टाळ २१ घंटा तीं
१८ घंटा देवळांत बांधलेल्या आहेत.
१ आरती वाजविणेची २ फुटक्या

येणेंप्रमाणें मोजदादीस आहेत. मिा मजकूर

श्रीदेवशंकरेश्वर बाराभिषेकाबद्दल नेमणूक

ले. ७६ श. १७५९
इ. सन १८३७

सरकार कलेक्टर जिल्हा दक्षिण प्रांत कोंकण शेवेशीं अर्ज विश्वनाथ पाध्ये बिन नारो पाध्ये सावरेकर गुर्जर राहाणार मौजे कशेली तर्फ राजापूर तो विजयदुर्ग सुरू सन समान मयातेन व अलफ अर्ज करितों ऐसीजे. मौजे मजकुरीं श्रीदेवकनकादित्य यास मासाभिषेकाची नेमणूक सरकारांतून रुपये ६ व वाडा काळकादेवी मौजे आडिवरें श्रीदेवशंकरेश्वर यास बाराभिषेकाची नेमणूक रुपया एक १ एकूण रुपये सात ७ आमचे तीर्थरूप नारो पाध्ये बिन सदाशीव पाध्ये सावरेकर गुर्जर हे सदरहू मासाभिषेक व बाराभिषेक पालट वांट्याप्रमाणें करून दक्षिणा सरकारांतून घेऊन त्याची पावती देत आले. ते सालमजकुरीं भाद्रपद वद्य ३ रोजीं मयत जाहाले. याजकरितां सदरहू नेमणुकीचे रुपये घेणें राहिले. त्याप्रमाणें सालमजकूरची वरसल आमची. त्याचा मासाभिषेक व बाराभिषेक आम्हीं केला. त्याची पावती देऊन नेमणूक घ्यावयाची, त्यास सदरहू नेमणुकेबद्दल माझी पावती घेऊन नेमणूक देणेविशीं हुकूम करणार धणी खावंद आहेत. ता. १३ माहे दिजंबर सन १८३७ इसवी.

श्रीदेवी कालिकेला सरकारी नेमणूक

ले. ७७ श. १७५०
इ. १८२९

सरकार दौलत मदार कुंपणी इंग्रजबहादुर विद्यमान कलेक्टर सुभा तालुके विजयदुर्ग पावती बेशमी बापूजी शामराव भाटे जात कऱ्हाडे ब्राह्मण राहणार वाडा कालिकादेवी. मौजे आडिवरें तो राजापूर सुरू सन. तिसा अशरीन मय्यातैन व अलफ लिहून दिली पावती ऐसीजे. श्रीदेवी कालिका वाडा मजकूर यासी सरकारांतून वाडा मजकूरपैकीं इतलाक नेहमीं खर्चाची नेमणूक प्राचीनपासून चालत आहे त्याचा आकार ऐन जिनसाबाबद नक्त १४।।।७५ पावणे पंधरा रुपये पंचाहात्तर रेंस श्रीचे नांवें सरकार जाबत्यास खर्च पडोन साल दरसाल श्रीचे पूजा व चाकरीचे काम आम्हांकडे आहे सबब आम्हांस पावतात. त्याची पावती सालगुदस्त सन समान अशरीन सालीं आम्हीं...दिली आहे त्याप्रमाणें साल मजकूर सन तिसा अशरीन सालचे सदरहू रुपये १४।।।७५ एकूण पावणेपंधरा रुपये पंचाहात्तर रेंस विद्यमान बापूजी भास्कर पाळेकर कारकून, दप्तरहुजूर, जमीदार तर्फे मजकूर यांणीं देविले ते वाडे मजकूरचे कमाविसदार यांजकडून आम्हीं सलीद घेऊन श्रीकडे खर्च करोन भरोन पावलों ही पावती लिहून दिली. सई तारीख ११ माहे एप्रील सन १८२९ दस्तुर नारायण अनंत नाडकर्णी कसालदार.

सई बापूजी शामजी भाटे दस्तुर खुद्द.

श्री

ले. ७८ श. १७९४
इ. १८७२

यादी जत्रा कशेळी येथें स्वारी श्रीकालिकादेवी मौजे आडिवरें तो राजापूर हिची, श्रीदेव कनकादित्य यांचे भेटीस आली व उत्साहास सालाबादप्रमाणें आली. तिचे मानकरी वगैरे यांस तांदूळ आडिवरेंचे सीमेंतील, आडी-बारा, कशेळकर मासवडेकरी यांस दिल्या. त्याबद्दल तांदूळ बारा कुडव शिरोळीमापें मासवडेकरी यांनीं आडिवरेकर यांस दिले. ता

मिती माघ शु।। ७ शके १७९४ अंगिरानाम संवत्सरे–यासी खर्च शिरोळी मार्पे.

८२८१ श्रीदेवांस ता।।	८२।।। शागीर्द पेशा निा। श्रीमहाकाली	
८।।।· श्रीकालिकादेवी	८८१ निशाणदार	
८।= श्रीशंकरेश्वर	८१ अबदागिरें	
८।· श्रीनगरेश्वर	८८१ हुदारुमाल	
८।१ श्रीमहाकाली	८८२ मोरचेलें	
८।· श्रीसत्येश्वरबाळेश्वर	८८२ चवऱ्या	
८८२ श्रीलक्ष्मीनारायण	८८१ शिंग	
८८१ श्रीदेवीभगवती	८८२ विंटकरी	
८२८२	८८२ चोपदार	
८।। मासवडेकरी भाट	८८२ पंखे	८३८३ वाडेगत खोत तपशील
८।· उपाध्ये	८८१ तासेकरी	८।३ बाडा कोणसर बुद्रुक
८८२ जोशी	८८२ वेतकाठ्या	८।२ कोणसर खुर्द
८८१ कळावंत	८।· वाजंत्री	८।।· नवेदर
८।।।३	८।१ बोथाटीदार	८।- रुंडें
८२।।।२ श्रीदेवीकालिका शागीर्दपेशा	८८१ झांज	८। पेठ
८८१ निशाणदार	८८१ टाळ	८८२ वेत्यें
८८२ अबदागिरे	८८।. वाजंत्री कोणसरकर	८८२ कोंभें
८८१ मोरचेल	८८।· वाजंत्री नवेदरकर	८।- राजवाडी
८८१ चवरी	८८१ पंखा	८।- मोघरें
८८१ इटेकरी	८८३ तासेकरी	८८२ भराडें
८८२ दिवटया	८२।।।.	८८२ पाणेरें
८।२ भोई		८८२ तिवरें

८८३ तासेकरी	८।• कुलकर्णी
८८२ चौकेदार	८३८३
८८३ चुडेकरी	८८१ पोतदार पेटकर
८८२ वाजंत्री वाडकर	८८३ मापाची कसर धर्मा-
८।• गवई	८८३ धर्म बैरागी [दाव
८८१ आडाव बरखंदार	८६।•
८८२ पोरगे	
८८२ चुडयेवाडी खुर्द	
८८२ पेटकर चुडये	
८२।।।२	
८५।।।३	

८१२८३

तपशील जमा	व खर्च	तेरीज
८१२ कशेळकर मासवडेकरी	८२८२ श्रीदेवदास	
८८३ मापाची कसर	८।।।३ जोशी उपाध्ये वगैरे काळकाईचे	
८१२८३	८५।।।३ शार्गीत पेशा ८२।।।३ महाकाली	
	८२।।। कालिका	
	८३८३ मंडळी–खोव व कुळकर्णी	
	८।• धर्मादाव	
	८१२८३	

येणेंप्रमाणें जमाखर्च असे. मिा मजकूर. दस्तुर गोविंद गणेश कुलकर्णी मौजे आडिवरें. (या यादीचा ले० १६ शीं संबंध असावा)

श्रीदेवलक्ष्मीनारायणाची स्थापना

ले. ७९

श्रीदेव लक्ष्मीनारायण याची स्थापना शके १५३३ सालीं झाली. याची कथा येणेंप्रमाणें—शंक्रोजी हरी, व कृष्ण, तिमाजी व राघो विश्वनाथ व

त्र्यंबक काशी व बाबजी नारायण व गणो केशव मौजे आडिवरें वाडा राजवाडी जबानी एसाजे—

मूळ पुरुष आमचा वडील विठलभट जाला यांनीं गांव साध्य केला. ते समयीं गांवीं देव असावा म्हणौन, श्रीलक्ष्मीनारायणाचें कांजळें* साध्य करून आपणापाशीं ठेविलें. नंतर रामकृष्ण मोघारकर यांच्या वडिलास बोलावून व भराडकर यांच्या वडिलांस मूळ पुरुषास बोलावून व पाणेरकर यास बोलावून व तिवरकर मालनाक याचे बापास बोलावून देव स्थापना कोठें करावी म्हणून विचारलें, ते समई त्यांणीं उत्तर केलें कीं, तुम्ही स्थापना कराल तेथें आम्ही आहों. तर भराडे व मोघरें व राजवाडी यांचे सीमेवर देवस्थापना देवळ बांधून, चिरा आमचे वडिल विठलनाक यांणीं उचलोन देवा पाया साध्य करून देव आमचे हातें सिंवरास बसविला. नंतर त्रिपुर वटही बांधिले. ते समई चार वाडेकरी यांचा मान उत्पन्न केला. कसा तर ? चार वाडेकरी यांस कार्तिक शुा १० उत्साह साध्य करून पालखी राजवाडीस न्यावी. पालखी कोठें उतरावी म्हणून श्रीमहाकालीस पुसिलें ? तेव्हां श्रीनें सांगितलें कीं, दाइजा व नमसदाइजा व श्रावणी समीप उतरावी. म्हणून चार वाडेकरी यांस कार्तिक शुा १० स बोलावून, पालखीचा सरंजाम साध्य करून श्रीलक्ष्मीनारायणाचा मुखवटा आपले हस्तें पालखी रूढ करून, पालखी बाहेर त्रिपुरा खाल आणून त्रिपुराची व तुळसीची पूजा आमचे वडिलांनीं करून आपले भाऊबंदांस पालखीस खांद मारावयास सांगितलें. ते समई भाऊबंद यांणीं खांद मारून, पालखी चार वाडेकरी यांस पालखीसहित घेऊन, दाहिजा, व नमसदाहिजा व श्रावणी यांत येऊन उतरून नंतर आपले उपाध्ये यांस सांगोन, देवाची पूजा व धूप दीप नैवेद्य पालखी घेऊन देवळास आले. नंतर चार वाडेकरी यांस कांहीं तरी मानपान असावा म्हणून चार वाडेकरी यांस बसवून मानापानास प्रारंभ केला. आणि उपाध्ये यांस गंध व नारळ आणावयास सांगितलें. ते समई उपाध्ये यांनीं गंध व नारळ आणून, विठलभट यांजपुढें ठेविले. तेव्हां त्यांनीं गंध

---

* प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वीची देवतामूर्ति

घेऊन, मोघरकर यांस पहिल्यानें टिका लाविला व भराडकर यांस टिका लाविला. तिसऱ्यानें पाणेरकर यांस टिका लाविला. चवथ्यानें तिवरकर मालनाक याचे वडिलांस टिका लाविला. याप्रमाणें टिके लावून नारळ मोगरकर यांचे हातें एक दिला असें चौघांस नारळ देऊन सांगितलें कीं, एकादशी संध्याकाळ नारळ घरटीस, पांच वाडेकरी यांनीं आणावे. आणि पुराण व कथा करून त्याची पूजा करून पुराणीक यानी पुराण सांगावें याचे प्रो चार वाडेकरी यांचे अनुमतें याजप्रमाणें वंशपरंपरेनें देवाचा उत्साह चालवावा. येणेंप्रमाणें माहिती आहे. आज चार पिढ्या असें चालतच आहे. हल्लीं मोगरकर व भराडकर यांनीं कज्याचा बावराव करून मानपान बुडविले. असा प्रकार केला. नंतर आम्हांकडेस कोणी मनसुभी सांगे ऐसा नाहीं. याजकरितां त्यांणीं श्रीलक्ष्मीनारायणाची पालखी राजवाडीस यावयाची ती बंद केली. आम्हांस या मनसुबी सांगावयास बल नाहीं. व सरकारची इतलाक आम्हांकडे नाहीं. याजकरितां वेळ पाहून मानपान घेतले. नंतर तो कज्ज्या अद्याप आहे. याचप्रमाणें वडिलांनीं जबानी लिहून दिली. यास वर्षे शके १६४५ श्रीलक्ष्मीनारायण याची रचना शके १५३३ या शकास श्रीलक्ष्मीनारायण जहाले यास साक्षी नांवनिशिवार आहेत. व मानपान अद्यापपर्यंत चालले आहेत. आमचे वडिलांनीं श्रीलक्ष्मीनारायणाची रचना व गांवची रचना केली.

सिद्धार्थीनाम संवत्सरे.

त्रिपुर लावणें

ले. ८० श. १७३९
इ. १८१७

पुा राजश्री महादाजी रघुनाथ गोसावी यांसी

सुरु इहिदे सबैन मया व अलफ. वेदमूर्ती सदाशीवभट व महादेव पाध्ये नाटेकर वास्तव्य वाडा मोघरें मौजे आडिवरें प्रांत राजापूर विजयदुर्ग यांणीं सरसुभा विदित केलें कीं, श्रीलक्ष्मीनारायण संस्थान वाडा भराडें येथील देवापुढील त्रिपुर, पुरातन आमचे वडिलांपासून आपण उजळीत आलों. व देवाची पालखी कार्तिक शुा १० स निघते ती आमचे घरापावेतों येऊन

तेथें देवाचें पूजन आपण केल्यानंतर मग देवालयांत जाते. याप्रमाणें चालत असतां, शेणवी मोगरकर तीन साळें त्रिपुर उजवूं देत नाहीं. व पालखी गुदस्तांपासून आमचे घरापावेतों न आणितां अश्वत्थाभोंवतीं फिरवून देवालयांत नेतात. तरी पुरातन चालत आल्याप्रमाणें चालविलें पाहिजे म्हणोन त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी येविशींचें वर्तमान मनास आणून वाजवी पुरातन चालत असेल त्याप्रमाणें चालवणें जाणिजे. छ १ रजब पो हुजुर. लेखनसीमा.

श्रीलक्ष्मीनारायणास पेशव्यांची देणगी

ले. ८१ श. १६९६
इ. १६७४

श्रीमंत सवाई माधवराव पेशवे ह्यांच्या जन्मानिमित्त नवस-ऐतिहासिक टिपणें भाग ५ वा, पृष्ठ २१. इ. संग्रह

यादी नवस श्रीमंत राजश्री रावसाहेब शके १६९६

१०००० श्रीलक्ष्मीनारायण वस्ती वाडा मोघरें मौजे आडिवरें प्रांत राजापूर ता॥ विजयदुर्ग श्रीचें देवालय बांधावें.

पापडीचें काम

ले. ८२ श. १७४३
इ. १८२१

यादी श्रीदेव संस्थान पांचवाडे मौजे आडिवरें तो॥ राजापूर सुरू इसने अशरीन मयातेन व अलफ. शके १७४३ वृषनाम संवत्सरे मिति कार्तिक वद्य १३ श्रीचे पापडीचें काम राजश्री बाजी बल्लाळ लोटलीकर खोत वाडा राजवाडी मौजे मजकूर यांणीं करविलें त्याचा आकार विद्यमान लक्ष्मण बल्लाळ लोटलीकर खोत व सदाशीव कृष्ण भिडे खोत.

मोजणी लांबी १४ तसूचे हातानें व रुंदी रांग अठरा आंगळेंप्रमाणें.

एकूण लांबी हात २८१९॥२॥. खर्च रुपये ४५५८।- येणेंप्रमाणें.

श्रीलक्ष्मीनारायणमंदिराची बांधणी

ले. ८३

श्रीदेव लक्ष्मीनारायणाचे देवालयाचा बाहेरील सभामंडप नवीन बांधला

तो शके १६८२ सालीं ग्रामस्थांनीं पट्टी करून बांधिला. तों श्रीचे सभामंडपाचें काम शके १६८३ चे वैशाखमासीं पूर्ण झालें.

पुढें श्रीचे देवालयाचा जीर्णोद्धार शके १७०५ सालीं ग्रामस्थांनीं पट्टी करून केला.

श्रीलक्ष्मीनारायणाचें सरकारी उत्पन्न

ले. ८४ श. १७९९
इ. १८७७

दी सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौन्सिल यांजकडून श्रीदेव लक्ष्मीनारायण वाडा भराडें मौजे आडिवरें तो राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानचे वहिवाटार यांस माजी राज्याचे वेळेपासून सालीना नक्त नेमणूक श्रीदेव लक्ष्मीनारायण वाडा भराडें मौजे आडिवरें तो राजापूर जिल्हा रत्नागिरी या देवस्थानबद्दल पावत आहे. ऐसीयास असें ठरविलें आहे कीं, सरकारी रुपये पांच ५ रुपयांची नेमणूक सदर देवस्थानचे वहिवाटदार जोंपर्यंत इंग्रज सरकारशीं इमानें इतबारें वागतील तोंपर्यंत इंडियाचे सरकारी खजिन्यांतून निरंतर चालवून आज्ञा करण्यांत येईल.

ही सनद दी सेक्रेटरी आफ् स्टेट् इन् कौन्सिल यांचे वतीनें मुंबईचे गव्हरनर इन् कौन्सिल यांचे हुकुमावरून कर्नल एथ रोज साहेब, सी. एस. आय ई., एलीएशन सेटलमेंट ऑफिसर, दक्षिण भाग, यांचे सइ व शिक्यानिशी तारीख २५ माहे जुलई सन १८७४ इसवी रोजी तयार करण्यात आली आहे.

सइ—इंग्रजी
सेटलमेंट ऑफिसर, एस्. डी.

या सनदेंतील मराठीपुरता एकस्ट्राक्ट राजापूर कोर्टाचा
मु. नं. ९१६ सन १८७७

यांत प्रतिवादीतर्फे दाखल आहे. तारीख ३ जानेवारी १८७८.

सई इंग्रजी
स. जज्ज से.

निशा झेड
फो. मुशा नं. ५०

१९१९

ले. ८५

श. १८१६
इ. १८९४

धी सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल यांजकडून श्रीदेवलक्ष्मीनारायण वहिवाटदार नरहर कृष्ण पराडकर यांस ज्या जमिनीचें खालीं वर्णन लिहिलें आहे त्या जमिनीस मुंबईचे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सन १८६३ चे सातवे आक्टाचे आधारावरून समरी सेटलमेंट लागू केलें आहे. यास्तव या सनदेवरून असें ठरविण्यांत येत आहे कीं, सदरहू जमिनीबद्दल जीस कमी किंवा इतर देणीं आजपर्यंत देण्यांत आलीं आहेत, त्यांखेरीज सालीना ८३८६ तीन आणे सहा पै रुपये जुडी घेऊन ती जुडी पुढें न वाढवितां इंग्रेज सरकार सदरहू जमीन श्रीदेव लक्ष्मीनारायणाबद्दल खालीं लिहिलेले शर्तीनें निरंतर चालवितील. म्हणजे त्या जमिनीचे वहिवाटदार इंग्रेज सरकाराशीं वतनदार व इनामदार रयतेप्रमाणें चालतील तर सदरहू जमिनी निरंतर चालवितील.

जिल्हा रत्नागिरी तालुका राजापूर मौजे आडिवरें, वाडा भराडें, तो वहिवाटदार नरहर कृष्ण पराडकर.

शेताचा नंबर ४३, पोट नं. ७, फा. नंबर ८-९-१०.

४४ पोट नं. १-२ फाळणी नं. १

मोजणी ८६।॥ गुंठे व ८३१॥ गुंठे एकूण ८३८।. गुंठे.

भर आकार १ रु. १ आ. व १ रु. २ आ. ६ पै एकूण २८३८६ त्यापैकीं सरकारांत देणेंत येतो तो सात आणे सहा पै. समरी सेटलमेंटान्वयें ठरलेली जुडी तीन आणे सहा पै. सरकारांत घ्यावयाचा एकंदर सालीना ऐवज अकरा आणे.

ही सनद आज तारीख १४ माहे जून सन १८९४ रोजीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल यांचेतर्फे व मुंबईचे गव्हरनर यांचे हुकुमावरून रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर डब्ल्यु. डाडरेटसाहेब, इस्क्वायर, यांचे सईशिक्यानिशीं करून दिली आहे. सदरहू नरहर कृष्ण पराडकर राहणार वाडा भराडें तो राजापूर वर लिहिलेल्या शर्तीवर सदरहू देणगी स्वीकारितो.

सई नरहर कृष्ण पराडकर दस्तुर खुद्द.

ले. ८६

वाडा भराडें मोघरें व राजवाडी या गांवीं श्रीदेवलक्ष्मी नारायण देवाची मिळकत आहे तिची माहिती

अ. नं.	स. नं.	पोट हि नं.	जमीन	आकार	कबजेदाराचें नांव	कूळ व खंड वगैरे
१	५	१	तिवरेवाडी ८६॥	१८६	श्रीदेवलक्ष्मी नारायण व. गजाजन सखाराम कामत वगैरे ३	
२	३२	१	खरी देवाची ८२४ ८११८३		,,	
३	३३	१	देवाची आड ५८२० १८३		,,	
	४१	१४	देवळानजीक ८११		,,	
	४४	४	आगर ८८११॥	१८३	,,	
	४५	४	दांतीचा माडा ८२३।	१८११		
	४३	११	आगर ८५।·		१८३ आकार; ८५ जुडी इनामत	
	४४	५	आगर ८२०		१८७ आकार; ८३ जुडी	
९	१	१६	पन्हळ व धारसा ८२८ ८४८३		राजवाडी गांवांतील मिळकत	
१०	१३	१२	चिरे खण ८३	८१	वाडामोघरें	
११	९९	४	होड सेखरी ८३।	८१		
			८८३४॥·	७८१३		

सदरहू जमीन पूजा करण्याबद्दल वगैरे वेा रामभटजी महादेव हर्डीकर यांजकडे वहिवाटीस आहे.

श्रीदेवी भगवतीची स्थापना

ले. ८७

श. १६७०
इ. १७४८

हिची स्थापना शके १६७० (इ. स. १७४८) त झाली. ही हकीकत बागवान व पेटकर यांचे कज्याचे वेळीं शके १६८० सालीं पेटकरांच्या साक्षी घेतल्या त्यांत भुत्यानें जबानींत सांगितलें तें, मौजे आडिवरें तो राजापूर वाडा पेठ ठिकाण झाडे. सुरु तिसा खमसेन मया व अल्लफ श्रीदेवी भगवतीची स्थापना केली. ते समई ठिकाण उजवलें. ठिकाण पुरातन जुनगऱ्याचें. त्याजउपर बारा वाडेकरी खोतांनीं व जुनगरा यानें राजीमतें करून दिली कीं राजभाग देऊन तुह्मी खुशाल खा. गुा भुते येणेंप्रमाणें आहे.

या देवीचे पुजारी भुते आहेत. येथें पौष शुा १५ स यात्रा भरते. येथील भुते गोंधळ घालतात. यांची गोंधळ घालणेच्या गांवाची सीमा ठरलेली आहे. या देवीला जे लोक दर्शनाला जातात ते, पीठ मीठ देवी पुढें ठेवतात असा शिष्टाचार आहे.

श्रीदेवी भगवतीला सरकारी नेमणूक

ले. ८८

श. १७४२
इ. १८२०

सरकार कंपनी इंग्रज बहादुर वि. कलेक्टर व माजिस्त्रेट सुा तो विजयदुर्ग पावती बेशमी गंगाजी बिन गुणा भुता, व भांबू बिन तुळा भुता, जात मराठा निसबत श्रीदेवी भगवती वाडा पेठ मौजे आडिवरें तो राजापूर सुरू अशरीन मय्यातेन व अल्लफ श्रीभगवती देवी इच्या नांवें सरकारांतून नेहेमीं खर्च गल्ला केली साडेतिशेरी मापें भात एक मण खर्च पडोन सालाबाद आम्हांस पावले. श्रीकडे खर्च करीत आलों त्याप्रों साल मजकूर सन अशरीनचें सदरहू भात एक मण त्याच्यावर नक्त रुपये १८१२॥ एक रुपया साडेबारा रेस आम्ही घेऊन भरून पावलों. तारीख २८ माहे आगष्ट

सन १८२० ही पावती लिहून दिली सई दस्तुर संमू शेट शेट्ये खोत वाडा पेठ मौजे मजकूर.

साक्ष गंगा भुता भांबू भुता निा चौंकडे आहे.

१ भिकाजी नारायण परांजपे खोत वाडा कोणसर बुद्रुक.

१ भिकाजी गंगाधर खोत वाडा राजवाडी मौजे मजकूर.

श्रीदेव गणपतीची स्थापना

ले. ८९ फा. शु. १० श. १७३७
मार्च ता. ९ स. १८१६

रा. सदाशीव कृष्ण भिडे यांनीं श्रीगणपतीची स्थापना केली. या देवाची पूजा, नैवेद्य, सांजवात वगैरे भिडे घराण्यांतील वंशज करतात. भाद्रपद शुा ४ पासून तीन दिवस उत्सव होतो. या मंदिराचा जीर्णोद्धार भिकाजी व हरी गणेश भिडे यानीं शके १८४६ ज्येष्ठ वा ५ स केला.

श्रीदेवी भद्रकाली (भराडीण)

ले. ९०

हिचेसंबंधीं लेखी माहिती उपलब्ध झालेली नाहीं. परंतु जुने मनुष्याचे तोंडी ऐकीव कथा व कांहीं अस्पष्ट अशा लेखी उल्लेखांवरून पुढील माहिती देत आहें. श्रीदेवी भराडीण हिलाच भद्राकाली म्हणतात. हिची स्थापना शके १६०० चे पूर्वी (इ. स. १६७८) जहालेली आहे. पुढें शके १७०७ चे सुमारास तिची मूर्ति भग्न झाली. त्यानंतर तेथें मूर्तीची स्थापना जाहली नाहीं. त्या श्रीचे स्थानावर साधी शिला ठेविली होती. या वेळीं देवालय कौलारू होतें. परंतु तें ग्रामस्थांचे दुर्लक्ष्यामुळें मोडून गेलें. पुढें कोणीं भक्तानें दुरुस्त करून गवतारू केलें. तें शके १८१३ सालीं वैशाखमासीं वीज पडून दग्ध झालें. पुनः तें गवतारू बांधलें. यानंतर शके १८३६ सालीं कौलारू बांधलें, आणि शके १८४४ फाल्गुन वद्य ११ उत्तराषाढा (मंगळवार १३ मार्च १९२३) चे दिवशीं श्रीभद्रकालीची मूर्ति ग्रामस्थांनीं स्थापन केली. ही मूर्ति मुा कळसवलीचे कारागिराकडून करवून पंचवीस रुपये मोबदल्यानें

आणिली आहे. ही मूर्ति सिंहासनासह आणिली आहे. या देवीची पूजा पूर्वी हरमने म्हणून मराठा होता तो करी व श्रीची वलवणी वगैरे तोच करी. पुढें त्याचा निर्वंश झाला. हल्लीं श्रीमहाकालीचे गुरव दर मंगळवारीं पूजा करतात. हिची रोज पूजा नाहीं. उत्साह कधींही होत नाहीं. येथें कौल-प्रसादी देवस्की चालते. कोणाची देवस्की असेल त्या दिवशीं सकाळीं स्नान पूजा, नैवेद्य त्यानें करून नंतर कौल लावावयाचा अशी चाल आहे. या गांवचे लोक राखणेचे म्हणून मार्गशीर्षमासीं श्रीचे देवालयीं जेवणें करतात. या देवीचें नांव वाड्याचे नांवावरून म्ह० भराडें वाड्यांतील ह्मणून 'भराडीन' म्हणतात. भराडें वाड्यांतील वसाहत शके १५३५ चे सुमारास झाली. त्यानंतर पांच पन्नास वर्षांत या देवीची स्थापना झाली असावी.

श्रीस्वामीची समाधि

ले. ९१

श. १७५१
इ. १८३०

वाडा नवेदर येथें तलावाचे कांठीं ही समाधि वाडा नवेदर येथील शांडिल्यगोत्री रामचंद्र बल्लाळ जोशी यांची आहे. हे शके १७५१ (इ. स. १८३०) ते १७५४ चे दरम्यान समाधिस्थ झाले. परंतु शके १७५४ सालीं समाधि बांधिली. नंतर तिची दुरुस्ती शके १८३० सालीं जोशी यांचे वंशज हरि रामचंद्र जोशी यांनीं केली. या समाधीची पूजा जोशी हे ब्राह्मणाकडून करवितात किंवा स्वतः करतात.

श्रीसमर्थ मठ

ले. ९२

श. १८२९
मे इ. १९०८

हा मठ शके १८२९ (इ. स. १९०८ मे) सालीं चैत्र वैशाख मासीं बांधिला आहे. याचा उद्देश भजनाची जागा व वाचनालय ठेवणें असा आहे···त्याप्रमाणें तसें मालक करीत असतात. पूर्वीच्या गवतारू इमारतीचें काम सर्व ब्राह्मण मंडळीनें केलें होतें.

वाडा नवेदर येथील तलाव

श्रीदेव वड्या

ले. ९३

हा वड्या देव वाडा रुंढें येथें आहे. हें देवस्थान श्रीचे मान्यतेंतील आहे. गुराखी लोकांचा हा देव होता. धुळप नांवाचा मराठा याची पूजा दर सोमवारीं करतो व नैवद्य दाखवतो. येथें कौल लावीत नाहींत. शिला उचलून ती जड होणें व हलकी होणें यावर देवस्की चालते. यासंबंधींचा उल्लेख शके १६९० (इ. स. १७६८) पासून आढळतो.

महार पुरुख

ले. ९४

याची स्थापना महार लोकांनीं आपले वसाहतकालीं केली. शके १५३० चे सुमारास शृंगारपूरकर सुर्वे मौजे मजकुरीं वाडा पेठ येथें आले असून ते शेटये खोताकडे उतरले होते. तेथें नदीच्या पलीकडे महारवाडा होता त्यांतील दिवा सायंकाळीं पाहूं नये तो राजे यांनीं पाहिला. याच ठिकाणीं त्यांचें नेहमीं येणें होणारें होतें त्यामुळें (हाल्लीं ज्याला ठिकाण बागवान म्हणतात तें) त्यांनीं महारवाडा तेथून उठवून पुरुखाजवळ जागा घर बांधावयास नेमून दिली. यावरून शक १५३० पूर्वी (इ. स. १६०८) बराच काल यांचें अस्तित्व आहे. हा महार लोकांचा देव आहे. त्याची पूजा-ऊर्जा हेच लोक करतात. याला गांवचे कांहीं लोक सालाबादी राखण ठेवितात. गांवांत गुरांचे रोग व गोंचिडीचा उपद्रव झाला असतां या पुरुखाला नवस बोलतात. पुरुखाला स्नान घालतात त्या वेळीं तें ठिकाण बागवान येथील विहिरीचें पाणी आणून स्नान घालणेची वहिवाट पुरातन कालापासून आहे. गांवांत फाल्गुनमासीं सती फिरते तें स्थान येथेंच आहे.

श्रीदेव खामदा

ले. ९५

हें वड्यासारखेंच देवस्थान कालिकावाडी येथें आहे. येथें देवस्की वड्या-

प्रमाणेंच करतात. येथें मूर्ती नाहीं. एक शिला आहे. ती उचलण्यानें देवस्की होते. या देवाचें अस्तित्व बरेंच प्राचीन कालपासून आहे. याची पूजा रोज हुंदलेकर नांवाचा मराठा करतो. प्रत्येक पौर्णिमा-अमावास्येला श्री-महाकालीचे गुरव–राणे पथकांतील जाऊन पूजा नैवेद्य करतो. येथें होणारें नवसाचें उत्पन्न गुरव व हुंदळेकर असे दोघे विभागून घेतात. हिचें देवालय नाहीं. जो बांधील त्यानें तें एका रात्रींत बांधिलें पाहिजे असें दंतकथेंत आहे. वेत्ये, तिवरें, कालिकादेवी येथील वधूवरें (ववरें) या रस्त्यानें गेलीं तर येथें देवापुढें हुंदळेकर तोरण धरतो. या देवाचें वास्तव्य शक १५५० (इ. सन १६२८) पासूनचें असावें. असें अनुमान आहे.

श्रीदेव जांबरा व डावरा

ले. ९६

हीं भुतें (याची माहिती पुढें भुतांचे यादींत दिली आहे.) वाडा कोणसर बुद्रुक व खुर्द येथें आहेत. या देवता गावडे लोकांच्या आहेत. जांबरा देवाची मूर्ति जांब्या दगडाची उपडी घालून ठेविलेली आहे. म्हणून तिला निराकारी म्हणतात. हा देव क्रूर तामसी आहे असें मानतात. दुसऱ्याचा नाश करण्याच्या उद्देशानें या देवाला नारळ ठेवितात, व गाऱ्हाणें करतात. देवस्की प्रकरणांत श्री मानुबाई (श्रीमहासरस्वती) श्रीनिरंकार (श्रीबाळेश्वराचे मागें भिंतींत कोनाडयांत आहे तो) यांना कांहीं देणें वगैर देणें पूर्वी व जांबरा देवाला नारळ वगैरे देणें दिल्यावांचून देवस्की होत नाहीं. नारळ ठेवणें कोंबेकर परांजपे यांचेकडून ठेवावा लागतो. हे परांजपे दर मंगळवारीं नैवेद्य दाखवितात. विशेषप्रसंगी नारळ विडा ठेवणें तो इतर देवतांना ठेवणेंपूर्वी हिला ठेवतात. हिला सालाबादी राखण म्हणून कोंबेकर एक नारळ दरसाल देतात व नरकचतुर्दशीचे दिवशीं पहांटेस अभ्यंग-स्नान घालतात, व फराळाचा नैवेद्य दाखवावा लागतो. या देवीला नैवेद्य दाखविणेबद्दल तेथेंच पायथ्यास असलेलें ठिकाण जुवी हें कल्याण, घांटवळ, परांजपे, होडे, शेवडे व कोंबेकर यांचेकडे वहिवाटीस पूर्वीपासून आहे असें लोक सांगतात.

श्रीवेताळ देव

ले. ९७

हें स्थान देसाई यांचे बांधावर आहे. येथें बांध बांधतेवेळीं महाराचें जोडपें बळी दिलेलें आहे असें म्हणतात. याचें अस्तित्व बांध बांधल्यापासून म्हणजे शके १६५६ सालापासून आहे. या देवाला नवेदरकर कुणबी पाऊसकाल संपल्यानंतर पहिल्यानें वाण घरतात त्या वेळीं त्या देवाला एका परडींत तांदूळ, फुलें, जानवें, विडा, सुपारी ठेवून ती परडी देवापुढें ठेवितात व बऱ्याचा जाप करतात. बांधावरील व्यापारी लोक या देवाला दरसाल नारळ देऊन बऱ्याचें गाऱ्हाणें करतात. याची पूजा महार करतात. या रस्त्यानें ववर जातें ते वेळीं येथें नारळ द्यावा लागतो.

श्रीदत्तगुरु

ले. ९८

हें स्थान कोणसर खुर्द येथें रानडे यांचे आंगणांत आहे. या ठिकाणीं श्रीच्या पादुकांची स्थापना शके १८१५ विजयनाम संवत्सरे फाल्गुन शुा ३ रेवती नक्षत्रावर, इ. सन १८९४ मार्च १० शनिवार रोजीं नारायण बाबूराव रानडे यांनीं केली. मार्गशीर्षमासीं दत्तजयंतीचे दिवशीं दत्तजयंतीचा उत्साह व ब्राह्मणभोजन या गांवचे शिस्तीप्रमाणें थाटाचें होतें. रोज पूजा, नैवेद्य, सांजवात, धूपारती वगैरे रानडे हेच करीत असतात. हें स्थान रानडे यांचें खाजगी स्वरूपाचें आहे.

ले. ९९

ह्यावांचून मौजे मजकुरीं लोकांनीं भजण्याचीं स्थळें आहेत ती येणेंप्रमाणें—

यादी भुतें वाडेगत यास कुन्या दरसाल द्यावयाच्या त्या

सुा सन तिसेन मया व अलफ शके १७११ (इ. सन १७८९)

वाडा कोणसर बुद्रुक येथें (४)–१ काजन्यावरील. निा हरी कृष्ण, नारळ एक सहा महिन्यांनीं देतात.
२ कुंभाराची लांवसट, यास कुंभार नारळ देतात.

३।४ जांवरा देव वडावरा वडावरील. नारळ रामचंद्रपंत व गुणभट यांनीं दोन २ द्यावे.

४

वाडा कोणसर खुर्द येथें (६) १ काजऱ्यावरील-यास धोंडभट रानडे गुरवाकडून दर सहा महिन्यांनीं नारळ एक देतात.
२ गोखले यांचें, यास नारळ १ सहा महिन्यांनीं गुरवाकडून देतात.
३ बाळाजी राम याचे, विठलादेवीचें गुरवाकडून १ नारळ देतात.
४ महारस्थळ केगदीवर आहे (कंद्रप रानडे यांचे आगरांत), यास कुरी महार देतात.
५ गुण गुरव याचे मोवईवर आहे त्यास १ नारळ देतात.
६ चौघाचार भूत काजऱ्यावर, यास चौघे नारळ १ देतात.

६

वाडा नवेदर--१ गाडे पाणदीवरील, यास नारळ १ अग्निहोत्री देतात.
२ भिडे यांचे खुटचें भूत, यास नारळ १ भिडे देतात.
*३ काळ्याचें भूत वडावर परडयांत आहे. खुटचें भत आहे यास काळे १ नारळ देतात.
४ महालक्ष्मीच्या मठांत वडावर खुटचें भूत उगवत तड.

वाडी खुर्द— ×१ वोवळीवरचें भूत, यासी नारळ १ गुरव देतात.
२ हातणीवरचें भूत यासी नारळ १ गुरव देतात.

२

---

* यासंबंधीं ले. ५० यांत माहिती दिली आहे. × ले. १०९ व ले. १०७ यांत माहिती दिली आहे.

वाडी बुद्रुक— १ नारो विठल याचें भूत यासी नारळ १ गुरव देतात.
२ मांडणींत भूत यासी नारळ भाटे देतात.
२

वाडा वेत्यें— १ थंवचें भूत याची जत्रा करतात.
वाडा भराडें— १ काजऱ्यावर भूत आहे यास कुरी नारळ १ गुरव देतात.
वाडा मोघरें— १ काजऱ्यावरील भूत यास कुरी निमे निमे देतात. कृष्णा..
२ घोंडीचे भटानिसबत भूत. नारळ १ भट देतात.
३ म्हाडें याचें भूत यास कुरी कोण देतात माहीत नाहीं.
३

एकूण २३

याप्रमाणें उपदेवाचीं स्थानें मौजे मजकुरीं आहेत. यावांचून श्रीदेवीचे आवारांत ज्या देवता आहेत त्या येणेंप्रमाणें—

ले. १००

श्रीनगरेश्वराचे मागें निरंकार, श्रीमहाकालीचे त्रिपुराजवळ चवाठा, श्रीमहाकालीचे मागें विठलादेवी, श्रीचे आसनाजवळ आकारी, श्रीमहालक्ष्मीजवळ जैन ब्राह्मण, रवळनाथाजवळ पावणाई व पादुका, श्रीचे उजवीकडे सत्ताबाई, डावीकडे जुगादेवी, बंगल्याजवळ सीतामाता, श्रीमहालक्ष्मीचे मागें दुसरा ब्राह्मण, चौकांत खांबदेव, श्रीसरस्वतीचे मागें मारकाई, सभामंडपांत श्रीपुढें होळदेव, पर्यावर महालक्ष्मी, ओझरावर महापुरुष, बागवानांत भूत; येणेंप्रमाणें आणखी देवादिकांचीं स्थानें आहेत. श्रीचे आवारांत आहेत तेवढ्यांची नैवेद्य धूपारत रोज श्रीचे बरोबर होते.

ले. १०१ श. १८३४
इ. १९१२

१. कालिकावाडी येथें गोपाळराव कुलकर्णी यांचे येथें श्रीगणपतीचें मंदिर आहे. मूर्ति पूर्वी तेथें शेजारीं रानांत होती ती शके १८३४ वैशाख वा। ७ बुधवार ता. ८ मे १९१२ रोजीं देवालय बांधून त्यांत श्रवणनक्षत्रावर स्थापना केली. पूजा, नैवेद्य, सांजवात, उत्साह तेच करतात.

ले. १०२

१. जांबशेंडा येथें एक देवस्थान आहे तें कुणबी लोकांचें आहे.

ले. १०३

१. भिडे यांचे येथील समाधि. ही समाधि महादजी दिनकर भिडे यांची आहे. यांनीं शके १८१७ माव शु. १० चे दिवशीं सायंकाळीं आतुर संन्यास घेऊन दुसरे दिवशीं (ता. १५ जानेवारी १८९६ शनिवार) दोन प्रहरीं २ वाजण्याचे सुमारास ते समाधिस्थ झाले. या ठिकाणीं समाधि पुढील सालीं म्ह० शके १८१८ सालीं पौष शु॥ १५ बांधून तयार केली. ही समाधि त्यांचे पुत्र गणेश महादेव भिडे यांनीं बांधिली आहे.

१ वाडा कोंडसर खुर्द येथें बेंदगीस घुरडांत एक ब्रह्मदेवाचें स्थान आहे. त्याची पूजा वगैरे खोत बेदरकर व गोखले करतात.

१ वाडा रुंढें येथे सोवनी यांचे शेजारीं राजमार्गावर एक समाधि आहे. हिजबद्दल माहिती मिळाली नाहीं.

१ वाडा कोंडसर खुर्द येथें डोंगरास हर्डीकर यांचे शेजारीं झऱ्याजवळ एक देवस्थान आहे त्याची पूजा प्रसंगपरत्वें हर्डीकर करतात.

ले. १०४ श्रीमाणी श. १७३०
इ. १८०८

श्रीलक्ष्मीकांत

ता॥ कादार मौजे आडिवरें ता॥ राजापूर सुरू तिस्सा मय्यातेन व अलफ वेा॥ राजश्री गणेशभट फडके पुराणीक यांचे ठिकाणांतील जमीन नजीक "माणी" येथें राजश्री चिमणाजी बल्लाळ भिडे सरखोत यांचे वडिलांनीं माडांची नेमावणी केली होती. ती जमीन माडमुद्धां हल्लीं भिडे सरखोत यांणीं पुराणीक यांचे स्वाधीन करून पत्र लिहून दिल्हें. त्याचा दस्त भिडे यांचे नांवें आहे. तो हल्लीं फडके यांचे खात्यास उतरोन घ्यावयाची आज्ञा असावी म्हणून भिडे सरखोत यांनीं विनंती केली. त्याजवरून हे ताकीद सादर केली असे. तरी सदरहू माडांचा दस्त भिडे यांचे खात्यास वांटून फडके पुराणीक यांचे नांवे खातें घालून साल दरसाल आकार

होईल तो पुराणीक यांजपासून घेत जाणें. जाणिजे छ २९ रबिलाखर मोर्तब असे.

घरांत मुंग्या किंवा चांचड येतात, मुलांच्या डोक्यांत उवा होतात त्या वेळीं या माणकाईला नैवेद्य ठेवितात. त्यानें पीडा दूर होते. ही मुंग्या व चांचड यांची देवता आहे.

श्री सीतारामचंद्र-पंचायतनाची स्थापना

ले. १०५ फा. शु. ३ श. १७९९
मार्च ता. ९ इ. १८७८

ही स्थापना रेवती नक्षत्रावर वाडा पेठ येथें सदाशीव भिकशेट गांधी यांनीं केली. यांची पूजा, नैवेद्य ब्राह्मणाकडून होतात. चैत्र शु. १ पासून ९ पर्यंत उत्साह होतो. चैत्र शु. १५ ला मारुतीजन्म होतो. देव स्थापन करणारानें पूजा नैवेद्य, सांजवात नेहेमीं चालविणेबद्दल व्यवस्था कायमची केलेली आहे. त्या जमिनीचें उत्पन्न गांधीचे वंशज घेऊन त्या मोबदला पूजा, नैवेद्य, सांजवात, उत्साह वगैरे करतात.

लेखांक १०६ श्रीः

श्रीसीतारामचंद्राची नित्य पूजा, नैवेद्य, सांजवात व रामनवमीचा उत्साह-खर्च याकरतां श्रीचे नांवची जमीन घेऊन ठेविली आहे त्याबद्दल माहिती.—

खरेदीपत्र शके १८२३ प्लवनाम संवत्सरे आषाढ शुा ५ ता २१ जून सन १९०१ ते दिवशीं लिखिते श्रीदेव रामचंद्रजी वाडा नवेदर मौजे आडिवरें तो राजापूर वहिवाटदार भिकशेट कृष्णशेट गांधी राहाणार मौजे व तो मजकूर यांसी खरेदीपत्र लिहून देणार केशव गोविंदशेट पाथरे रा. मौजे पूर्णगड आज मु. राजापूर तो मजकूर लिहून देतों आम्हीं तुम्हांकडोन आज रोजीं घेतले रोख सरकार चाल सुर्ती रुपये १० दहा यासी मिळकत तुम्हांस खरेदी देतो ती— खालीं लिहिलेली ही मिळकत मूळ मालकी गोविंद दादाजी माडदळकर रा. वाडा तिवरें गाउडवाडी मौजे आडिवरें तो राजापूर यांची, ती राजापूर कोर्टाचा दरखास्त नंबर ४५४ सन १८९९ वरून विकली ती मी ता. ३ एप्रील सन १९०० रोजीं लेलावांत घेतली.

त्या मिळकतीबद्दल कोर्टाचे सरटीफिकीटहि मिळविलें. ती मिळकत लेलावांत घेतल्याप्रमाणें तुम्हांस खरेदी देतों त्याचा तपशील— जिल्हा व रजिष्टर तुकडी रत्नागिरी पोटतुकडी राजापूर मौजे आडिवरेंपैकीं वाडा तिवरें गाउडवाडी येथें गोविंद दादाजी जुवळे ऊर्फ महाडदळकर यांचे नांवें धाऱ्याचें खातें नंबर ७ चें आहे त्यांतील मिळकतीपैकीं नंबर १ यांतील ठिकाण अनुक्रम नंबर १ ते ७८ सकट नंबर २ यांतील मिळकत वर लिहिलेले रुपयांस मालकी हक्क घेतला तो तुम्हांस खरेदी दिला आहे. येणेंप्रमाणें मिळकत तुम्हांस दहा रुपयांस खरेदी दिली आहे. तरी कोर्टांतून जशी मीं लेलावांत घेतली, तशी मीं आपला कांहीं हक्क न ठेवितां तुम्हांस खरेदी दिली आहे. तरी तुम्हीं लिहिलेंप्रमाणें बोजा संभाळून मिळकतीचा वहिवाट व उपभोग घ्यावा. सदरील मिळकतीचा ताबा करून घेणें आहे. तो तुम्हीं कोर्टामार्फत करून घ्यावा व सरकारी दस्त तुम्हीं लावून खरेदी हक्काप्रमाणें वहिवाट करावी. सदरील मिळकतीवर आमचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध किंवा वारसा राहिला नाहीं. सदरहू कोर्टाचें बील यासोबत तुम्हांस दिलें आहे. त्याप्रमाणें उपभोग घ्यावा हें लिहून दिल्हें. सई मिती व शके मजकूर दस्तुर गोविंद बाबजीशेट रा. राजापूर.

केशव गोविंदशेट पार्थे. दस्तुर खुद्द.

ले. १०७

श. १६५५
इ. १७३३

ताा कमाविसदार मौजे आडिवरें तर्फ राजापूर सुरू अर्वा सलासीन मया व अलफ ताा रामकृष्ण विठल धनरस खोत वाडा मोघरें मौजे मजकूर यांणीं जंजिरा विनंती केली कीं, वाडे मजकुरीं पांचवे तक्षिमेचा ठिकाणदार होता तो मृत्यु पावला. त्याचा समंध व भूत आहे तें वाड्यांत उपद्रव करितें म्हणौन श्रीनें वाड्यावर सोडिलें. तेव्हां बाबदेवभट नाटेकर यास ताकीद करून समंद व भूत यांस कुरी देतात. मशारनिल्हे भट देत तरी ठिकाण सोडूत देणें म्हणून सांगणें. ठिकाण वाडे मजकूरचे खोत करतील म्हणौन खातरीनें सांगणें. कुरी न दिली तर श्रीहरिहरेश्वरीं गत देववर्णे. वाड्यांतील उपद्रव व कुळांतील चुकवर्णे. सदरहू ठिकाणदार पूर्वी कुरी

देत होता त्याप्रमाणें देवविणें जाणिजे छ.२८ तो मोर्तब सुद मोर्तब असे असल चिठी हरिपंत कुळकर्णी याजवळ आहे.

देवस्की

ले. १०८

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कमाविसदार मौजे आडिवरें स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपाळ कृष्ण किल्ले यशवंतगड सा. नमस्कार वि. विशेष रा. बाबदेवभट बागवान व पेटकर वाणी, तेली यांचा कज्या आहे, त्या दिवशीं सारे पेटकर आणविले होते त्या दिवशीं तुम्हांस लिहिलें कीं, तेली सुतकी आहेत, कांहीं वाणी पुणें यांसी गेले. संभशेट शेख्यास रा. दिवाणजी याची देवस्की होत आहे, त्यास यावयास तूर्त होत नाहीं ऐसें तपशिलें लिहिलें. त्यास राजश्री शिव ठाकूर यांजकडे मुनसबी नेमून दिली. त्यांनीं करिने कतबे घेतले. पुढें फडशा करावा त्यास त्याजवर पेटकर यांनीं भुतें घातलीं, त्यांनीं त्यामुळें करिने कागद येथें पाठविले. त्यांणीं फडशा भुतामुळें केला नाहीं. याजकरितां तुम्हांस लिहिलें असे. तरी, ठाकूर याजवर भुतें पडली, तीं कोणाचीं, त्याची चौकशी केली पाहिजे, तरी श्रीचा अवसरी प्रसादीं पुसोन निवाडा करोन लिहोन पाठवावी व ज्याचीं भुतें पडलीं असतील त्यासहि +करावे तूर्त आधीं भुतांचाच फडशा जाहला पाहिजे. त्यास राजश्री रामदेव माजनी व गोविंदपंत कुलकर्णी व संबशेट ऐसे आले पाहिजेत, त्यास तूर्त गांवकीचें काम जाल्यावर पेटकर यासी घेऊन तीन वर्गास चौहों दिवसांनीं पाठवावे. तुम्हीही लौकरच पुणेस जाणार याचे मनसुबीचा फडशा जाला पाहिजे. याजकरितां कधीं येतात तें लिहोन पाठवावें. बागवान याजकडे अनोपत आहे. त्यास मनसुबीचा फडशा होई तों याजकडील ... करवणें अतःपर चौदिवसांनीं न आल्यास सरकारांतून बोलावणें होईल हे विनंती.

ले. १०९ श. १५५३
इ. १६३१

राजश्री किटो नारायण खोत वाडा काळकादेवी गोसावी यांसी नागोजी

नामदेव सरखोत व मामदेवभट व विश्वनाथभट परांजपे व नारमाजनी व नारनाक रुंढेकर व फटशेट व दामभट व बावदेभट व म्हातनाक व येसनाक म्हाडा व किटे प्रभू व विट शेणवी व समस्त खोत व महाजनानी व रयानी मौजे आडिवरें तो राजापूर सुरू सन इसने सलासीन अलफ मौजे मजकुरचे कुलकर्णी किटो कायदेउ होता तो भुताकरतां व चेटकाकरतां परागंदा जाला. त्वाचा ठाव नाहीं. गांवीं कोणी कुलकर्णी नाहीं. एक घाटीचा ब्राह्मण ठेविला होता तो दूर केला. मौजे मजकुरास कुलकर्णी अगत्य पाहिजे. याकरितां तुमचे भाई विरादरास बोलावून आणून मिरास करून देत होतों. परंतु कोणीही मान्य नाहींत. आतां तुम्ही मान्य करणें. तुम्हांस पुत्रपौत्रीं मिरास करून देतों. आणि कुलकर्णास भूत चेटक आहे. त्याणें बारा वाडे मोडिले आहेत. ते भूत व चेटक तुम्ही श्रीहरिहरेश्वरास जाऊन त्यास गतीस लावणें. जो खर्च लागेल तो लावून निवारणें आणि गांवींचा उपद्रव दूर करणें. तुम्ही हर उपद्रव चुकवाल गांव सुखी राहील म्हणौन तुम्हांस पुत्रपौत्रीं मिरास करून दिल्ही आहे. तुमचा पुत्र अंतो कृष्ण याचे हातून आम्ही चालवून घेऊं. येविशीं आम्हीं समस्त खोत व महाजन व रयेत राजेश्री गोसावी यासी जाऊन अंतो कृष्णाचे नांवें पत्र आणून देऊं. तुम्ही माहीसाहेब शेवसीं पो पेक देणें. तुम्हांस कुलकर्णगिरीस मुशाहिरा सालिना बेरीज. ऐन मुशाहिरा सादिलवार पट्टी हक्क लजिमा सुा सुमारें ७५ पैकीं देऊं १८ पो

येणेंप्रमाणें तुम्हांस सदरहूप्रमाणें मुशाहिरा केला असे. सदरहूप्रमाणें घेऊन दिवाणसेवा करून सुखी असीजे. फुडामागा तुमचे भाऊबंद व दाइजा उभे राहतील त्यांस संबंध नाहीं. तुमचे मिराशीस कोणी हरहिरकी करील तो पंच मापातकी असे. त्याचे माईवर गडदू असे. छ ५ रबिलावल लिहिलें.

सई नागोजी नामदेव अंतनाक.

मामदेभट
विश्वनाथभट
नारमाजनी
नारनाक

येसनाक
तिमनाक म्हाडा
किटे प्रभू
विट शेणवी

फटशेट पांडुरंग शेणवी सालसकर
दामभट
बाबदेभट

ले. ११०

१ कै. रावबहादुर सीताराम गणेश परांजपे रा. पुणें पेठ सदाशिव यांनीं महाकालीचे पाटीमागें प्रभावळ पितळेच्या पत्र्याची करवून ती शक १८५५ आश्विन शु॥ १ रोजीं श्रीचे मागें बसविली. या कामीं सुमारें १०४॥ इतके रुपये खर्च झाले. हें काम वाडा नवेदर येथील तुकाराम शिववजा सुतार मेस्त्री यानें केलें आहे.

१ श्री. रा. दत्तात्रय गोविंदशेट लुब्री सु. रत्नागिरी यांनीं मौजे आडिवरें वाडीखुर्द येथें सुमारें चौदा रुपये सरकारदस्ताची जमीन विकत घेऊन ती श्रीमहाकालीला बक्षीस दिली आहे. या स्थावर मिळकतीचे उत्पन्नांतून श्रीदेवी महाकालीकडे नित्यनंदादीप लावावयाचा असून आणखी कांहीं पैसे शिल्लक राहिल्यास त्याचा विनियोग श्रीचे नवरात्रोत्सवाकडे करावयाचा आहे. ही स्थावर मिळकत सुमारें चारपांच वर्षांपूर्वी विकत घेऊन सदरीं लिहिलेप्रमाणें व्यवस्था करून ठेविली आहे.

१ यादी श्रीस्वामी समाधिस्थ वैशाख शु॥ १ शके १७७१ रोजीं झाहले त्यास तेरा दिवसपर्यंत १९ रुपये खर्च झाहला ते विद्यमान यज्ञेश्वरभट फडके पुराणिक वाडा नवेदर.

१ श्रीमंत पंतसचीव संस्थान भोर यांचेकडून श्रीला दरसाल राखण येत असे ती अलीकडे सुमारें इ. सन १९१३ सालापासून येत नाहीं.

समाप्त



श्रीदेवी महाकालीचे प्राकारांतील

(म्हणजे सोबतच्या रेखाचित्रांतील)

मुख्य ठिकाणांची सूचि

माहे फेब्रुवारी सन १९२९ इ.

अनु. नंबर	ठिकाणाचें नांव	अनु. नंबर	ठिकाणाचें नांव
१	श्रीदेवी महाकाली	२१	वाणी खोत बसण्याची जागा
२	श्रीजुगा देवी	२२	भंडारी खोत बसण्याची जागा
३	श्रीसता देवी	२३	ब्राह्मण खोत बसण्याची जागा
४	तळखंबे ८	२४	श्रीमहालक्ष्मी
५	बळी देणेची जागा	२५	ब्राह्मण आकारी
६	देव	२६	इतर खोत बसण्याची जागा
७	खामदेव	२७	सोपा
८	इतर खोत बसण्याची जागा	२८	कोठी
९	चौक (आंतील)	२९	सोपा (श्रीदेवी महासरस्वतीच्या देवालयाचा)
१०	ब्राह्मण खोत बसण्याची जागा	३०	श्रीदेवी महासरस्वती
११	नैवेद्याची खोली	३१	मारके (सरस्वतीच्या देवळांतील ३)
१२	कोठी	३२	मारके (,, ,, ४)
१३	चांभार लोक बसण्याची जागा	३३	मारका (बाहेरील)
१४	महार लोक बसण्याची जागा	३४	भराडीण
१५	सभामंडप	३५	विहीर
१६	सोपा	३६	विहीर व वृंदावनाच्या जवळची उंच जागा
१७	जुना चव्हाटा	३७	तुळशीवृंदावन
१८	चौकानजीक		
१९	चौक (बाहेरील)		
२०	ब्राह्मण खोत बसण्याची जागा		

अनु. नंबर	ठिकाणाचें नांव
३८	मोरी (पाथर, डोणी वगैरे)
३९	चव्हाटा
४०	दीपमाळ
४१	,,
४२	मारका
४३	मारका
४४	बाहेरील धर्मशाळा
४५	बंगला पश्चिमेकडील
४६	सीतामाता
४७	देव
४८	तटाबाहेरील पापडी
४९	श्रीदेव रवळनाथ
५०	श्रीपाउणा देवी
५१	पादुका
५२	निगडीचा पार
५३	देव
५४	मोरी (धर्मशाळेजवळ)
५५	धर्मशाळा (गाळे ३)
५६	पडवी धर्मशाळेची ५५
५७	लाठीचा चौक
५८	बंगला (दक्षिणेकडील)
५९	जिना
६०	पार (पिंपळाचा) आबा तानु गुरवपैकीं
६१	जगू येसू गुरवपैकीं पिंपळाचा पार
६२	बाळा गोपाळ गुरवपैकीं पार
६३	मोरी
६४	मोरी (कोपऱ्यांतील)
६५	जैन ब्राह्मण
६६	देव
६७	निगडीचा पार
६८	श्रीविठला देवी
६९	धर्मशाळा (नं. १ ते ११)
७०	धर्मशाळा (नं. १२ ते १५)
७१	पापडी

यांची साफसफाई कशी करावयाची (म्हणजे कोणता भाग कोणत्या गुरवानें रानें वगैरे बेणून स्वच्छ करावयाचा) त्या विभागास 'अ' 'ब' वगैरे अक्षरांनीं खुणा दाखवून पुढें गुरवाचें नांव लिहिलेलें आहे.

अ गणा बाब्या गुरव
ब धोंडा गुणा गुरव
आपा बाळ गुरव
क गोंविद सदू गुरव वगैरे ४
ड जगू येसू गुरव वगैरे ६
ई येसू कृष्णा गुरव
फ जगू येसू गुरव
ग बाळा गोपाळ गुरव
ह आबा तानू गुरव
ज आत्माराम बाबी गुरव
य गोविंद सदू गुरव
म भिका नारा गुरव

यात्रेची माहिती

१. यात्रेकरूनें आडिवरें येथें गेल्यावर आपले कुलगुरूला भेटून त्याचेकडून शरीरशुध्यर्थ पंचगव्य प्राशन करून, नूतन यज्ञोपवीतें धारण करावीं.

१. सर्व पापपरिहारार्थ समुद्रतीरीं जाऊन विध्युक्त स्नान करावें. वाडा वेत्यें येथें स्नानाची सोय आहे.

१. श्रीनगरेश्वराचें दर्शन घेऊन श्रीला श्रीफळ व श्रीगणेशाला विडा व श्रीनंदीकेश्वराला विडा व दक्षिणा प्रत्येकीं पाव आणाप्रमाणें ठेवावी. श्रीनगरेश्वराला एक आणा ठेवावा. श्रीनगरेश्वरावर रुद्राभिषेकपूर्वक महापूजा करून ब्राह्मणाला पूजासाहित्य, भोजन, अभिषेकाबद्दल म्हणून नक्त आठ आणे रोख द्यावे. एकूण खर्च १ नारळ, ५ सुपाऱ्या, १० विड्याचीं पानें, दहा आणे रोख.

२. श्रीमहालक्ष्मीचें दर्शन घेऊन श्रीपुढें एक नारळ, एक आणा व एक विडा ठेवावा व ब्राह्मणाकडून अभिषेकपूर्वक षोडशोपचार पूजा करवून त्याला नक्त आठ आणे द्यावे. एकूण नक्त नऊ आणे, एक नारळ, ६ विड्याचीं पानें, ३ सुपाऱ्या.

३. श्रीरवळनाथाचें दर्शन घेऊन श्रीपुढें नारळ एक, विडा व एक आणा दक्षिणा ठेवावी. रुद्राभिषेक ठरवून ब्राह्मणाला आठ आणे द्यावे. एकूण नक्त नऊ आणे, ६ विड्याचीं पानें, ३ सुपाऱ्या.

४. श्रीमहाकालीचें दर्शन घेऊन श्रीपुढें खणनारळाची ओटी ठेवावी. विडा व चार आणे दक्षिणा ठेवावी. एक सप्तशतीचा पाठ करवावा व एक सुवासिनी व कुमारिका व एक ब्राह्मण यांना भोजन घालावें. सुवासिनी व कुमारिका यांना एक खण व दोन आणे दक्षिणा द्यावी. पाठाचे ब्राह्मणास एक रुपया दक्षिणा देणें. एकूण खण ३, नारळ १, सुपाऱ्या ७, विड्याचीं पानें १५, नक्त १, एक रुपया दहा आणे.

५. श्रीमहासरस्वतीचें दर्शन घेऊन श्रीपुढें एक विडा, एक आणा दक्षिणा, एक नारळ ठेवावा. अभिषेकपूर्वक षोडशोपचार पूजा करून ब्राह्मणाला आठ आणे द्यावे.

६. श्रीदेव बाळेश्वराचें दर्शन घेऊन श्रीपुढें विडा व पाव आणा ठेवावा.

७. श्रीदेव सत्येश्वराचें दर्शन घेऊन श्रीपुढें एक नारळ, विडा व एक आणा दक्षिणा ठेवावी. रुद्राभिषेक करून ब्राम्हणाला आठ आणे द्यावे.

८. श्रीदेव शंकरेश्वराचें दर्शन घेऊन श्रीपुढें एक विडा व एक आणा ठेवून रुद्राभिषेक करून ब्राह्मणाला आठ आणे घ्यावे.

९. श्रीदेवी कालिका हिचें दर्शन घेऊन श्रीपुढें विडा एक, नारळ, दक्षिणा एक आणा व खणाची ओटी ठेवावी. सप्तशतीचा पाठ करवून ब्राह्मणाला भोजनासुद्धां एक रुपया द्यावा.

१०. श्रीदेव लक्ष्मीनारायणाचें दर्शन घेऊन विडा व नारळ, एक आणा दक्षिणा ठेवून पवमान पंचसूक्ताचा अभिषेक करवून एक रुपया दक्षिणा भोजनासुद्धां द्यावी.

नैवेद्य समर्पण करण्याची माहिती

१. श्रीदेव नागरेश्वर. एक मूद मोठी व दोन मुदा लहान श्रीगणेश व नंदीश्वर सुद्धा.

२. श्रीमहालक्ष्मी, श्रीरवळनाथ, श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती मिळून चार मुदा मोठ्या एकाच पात्रांत वाढाव्या.

३. श्रीदेव सत्येश्वर बाळेश्वर–एक पात्रावर दोन मुदा मोठ्या व तीन मुदा लहान. श्रीगणेश व नंदीश्वरसुद्धां.

४. श्रीशंकरेश्वर एक मूद मोठी व दोन लहान, श्रीगणेश व नंदीश्वरसुद्धा.

५. श्रीदेवी कालिका. दोन मुदा मोठ्या वाढाव्या.

६. श्रीदेव लक्ष्मीनारायण दोन मुदा मोठ्या वाढाव्या.

७. (पूर्वीचे तेथें राहणारे असल्यास) महापुरुष, ढिकाणदार यास एक मूद मोठी वाढावी.

८. सरित्पतिः एक मूद मोठी वाढावी. (समुद्र-जलदेवता).

९. सकल ग्रामदेवतांना मिळून एक मूद मोठी.

येणेंप्रमाणें नैवेद्य समर्पण करावे.

१. **राखण** सालाबाद राखण श्रीकडे अर्पण करावयाची असते, ती माहितीप्रमाणें किंवा यथाशक्ति अर्पण करावी.

२. सदरीं लिहिलेप्रमाणें **नैवेद्य** चैत्र शु॥ १ व मार्गशीर्ष शु॥ १ व लग्नकार्यादि प्रसंगीं समर्पण करावे.

कुलस्वामिनी- आडिवरें येथील श्रीमहाकाली व श्रीयोगेश्वरी ह्या ज्यांच्या कुलस्वामिनी आहेत अशीं घराणीं प्रसंगानुसार सांप्रत येथून देशांतरावर गेलीं आहेत. पण ह्याहून दुर्दैव हें कीं, आपला गांव सुटलेल्या ह्या घराण्यांना श्रीकुलदेवतांचेंहि विस्मरण झालें आहे. कांहीं घराणीं ह्या देवीऐवजीं इतर प्रसिद्ध देवतांनाच अज्ञानामुळें आपली कुलदेवता मानून चालतात. कुलदेवता ह्या नांवांत मूळ प्राचीन आपल्या घराण्यांत पूर्वजांनीं पूजिलेली जी देवता ती असा अर्थ आहे. अर्थात् प्रसिद्धीमुळें म्हणजे वैभवानुकूल प्रसिद्धीमुळें अन्य देवतास्वीकार हा कुलाचार-शास्त्रदृष्ट्या शाळाशुद्ध होणार नाहीं. एवढ्यासाठीं विनंति कीं, 'जुनें ठेवणें मीपणें तें विसरूं नका.'

प्रवासवर्णन

आडिवरें येथील श्रीमहाकाली हें महास्थान पश्चिमसमुद्रतीरावर, मुंबईचे दक्षिणेस १६३ मैल लांब आहे. येथें ऑक्टोबरपासून मेपर्यंत बोटीनें प्रवास करतां येतो. कोल्हापूरचे पश्चिमेस सुमारें १०० मैल मोटारीनें जावें लागतें. मोटारीचा हा प्रवास बाराही महिने करतां येतो. कोल्हापुराहून रत्नागिरीस किंवा राजापुरास मोटारसर्व्हिस आहे. तेथून पुढें जाण्यास थोडासा त्रास होतो. राजापुराहून बैलगाड्या रोज जाणाऱ्या-येणाऱ्या मिळतात. गाड्या श्रीमहाकालीचे महाद्वारांत येऊन उभ्या राहतात. श्रीचे आवारांतच एक खाणावळ आहे. चहा-फराळाचें सामान वगैरे तेथें योग्य मोबदल्यानें मिळतें. धर्मशाळा तेथें आहेत. स्वयंपाकाकरितां लागणारीं भांडीं वगैरे लागणारें सामान श्रीचे पुजारी गुरव यांस भेटून त्यांचेमार्फत मिळूं शकतें. येथें बाजार

जवळच आहे. पाणी उत्तम आहे. गांवांत पोस्ट आहे. डिलेवारी रोज एक वेळ होते. सहा मैलांवर जैतापूर येथें तारऑफिस आहें. गांवांत आयुर्वेदिक दवाखाना आहे. ब्राह्मणवस्ती श्रीचे मंदिरापासून दीड ते दोन मैल अंतरावर आहे. वैदिक ब्राह्मण, ज्योतिषी, शास्त्री, हरिदास, गवई, वैद्य वगैरे लोक आहेत. येथील कुंभार मातीचीं भांडीं उत्तम करतात. तसेंच वहाणा करणारे चर्मकार, वेळूचीं कामें करणारे महार, सुतार लोक उत्तम कारागीर येथें आहेत.

पाहण्यासारखीं स्थळें— तीन मैलांवर मौजे करोळी येथे श्रीकनकादित्याचें व श्रीलक्ष्मीनारायणाचें मंदिर आहे. बारा मैलांवर राजापूर येथें श्रीगंगेचें स्थान व उन्हाळें आहे. तेथेंच श्रीधूतपापेश्वराचें महास्थान आहे. सहा मैलांवर आंबूळगड व यशवंतगड आणि पूर्णगड असे डोंगरी किल्ले मोडकळीस आलेले आहेत.

स्थानिक माहिती

प्राचीन काळीं असलेलीं घराणीं– दांडेकर, नातू, गोवंडे, बापट, पाळंदे, साने, वैशंपायन, वैद्य, मराठे, गोखले, सोवनी, घारपुरे, मंडलीक, वत्सगोत्री काळे. हीं आज विद्यमान नाहींत.

अर्वाचीन जीं घराणीं नांदत आहेत तीं—

वाडा कोणसर येथें – परांजपे, वत्सगोत्री गोरे.

कुंभार, पोवार, रांबाडे, दळवी, घाणेकर, सपकाळ, मोगरकर, चिपटे, वारिशा, भालवलकर, सुकडा, दावडा, तांबे, खावडकर, गुरव, तळये, शिंदे, आंबेरकर, माटळ, म्हेतरे असे राहतात.

वाडा कोणसर खुर्द येथें – शहाबेदरकर, गोखले, दाते, काळे, रानडे, सोवनी, भट, हर्डीकर, जोशी.

शेडेकर, पावणाक, वारिशे, तळये, कामळे, वारीक, चौगुले, गोवळकर, नागले, गोठणकर, हलम, ठुकरूळ, हातसकर, जाधव, चिखडकर, गोराठे, गुळेकर, मोरये, परकर, परभू असे राहतात.

वाडा नवेदर येथें– जोशी (शांडिल्य गोत्री व वत्स गोत्री), काळे (शांडिल्य, व वत्स गोत्री), आपटे, लिमये, भिडे, दाते, फडके, वेलणकर.

फणशे, बावकर, घाणेकर, सोन्नाक, गोराठे, ठुकरूल, राडये, मौंवड, पडयार, भावळलकर, डांफळा, होतेकर, वारीक, दुदम, निचोरा, माजळकर, पेटावा, सांवरा असे राहतात. वाडा रुढें येथें – सोवनी, पाटकर, वांकडे.

कोरगांवकर, घरदंडा, मयेकर, रुकडा असे लोक राहतात.

वाडा पेठ येथें– गोडबोले.

आडिवरेकर, शेट्ये, सोनार, गुरव, सोरये, वांकेडकर, कोरगांवकर, रुमडे, तेली, न्हावी, परीट, भुते, महार, चांभार, पडेलकर, तानवडी, मयेकर, नावेंकर, जुनगरी असे राहतात.

शिवाय इतरत्र– देवस्थळी, हर्डीकर, जोशी, भाटे, कुळकर्णी, कामत, लोटलीकर, महाडदळकर.

भंडारी वगैरे अनेक आडनांवांचे लोक राहतात.

सदरी लिहिलेपैकीं पुष्कळ घराण्यांची कुलस्वामिनी श्रीयोगेश्वरी किंवा श्रीमहालक्ष्मी असल्याचें आढळून येतें.

मौजे आडिवरें येथील वाडेनिहाय विद्यमान खोतांचीं नांवें:—

१ वाडा कोंडसर बुद्रुक– केशव रामचंद्र परांजपे, २ कोंडसर खुर्द– दामोदर नारायण बेदरकर, ३ नवेदर– भिकाजी गणेश भिडे, ४ रुढें– शिवराम लक्ष्मण वांकडे, ५ पेठ– समशेट हरशेट शेट्ये, ६ कालिका-वाडी– गणेश कृष्ण भाटे, ७ वेत्यें– अनाजी नामाजी जाधव, ८ कोंभें– शिवराम मुरारी तोडणकर, ९ राजवाडी– भिकाजी यशवंत लोटलीकर, १० मोघरें– विठ्ठल रामकृष्ण महाडदळकर, ११ भराडें– शंकर यशवंत कामत, १२ पाणेरें– शिवराम विश्वनाथ कानविंदे, १३ तिवरें– विठोबा देऊ हळदणकर, १४ वाडी खुर्द– रामचंद्र गोपाळ कुळकर्णी. एकूण १४.

ह्या पुस्तकाविषयीं अधिकारी तज्ज्ञांचे कांहीं

अभिप्राय

आडिवऱ्याची श्रीमहाकाली हें पुस्तक मीं मधून मधून वाचून पाहिलें. त्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यापैकीं आडिवरें गांवांतील प्राचीन व प्रसिद्ध देवस्थान जें श्रीमहाकाली आणि त्याच गांवांतील इतर जीं सर्व देवस्थानें आहेत त्यांची व त्या अनुषंगानें संबंध गांवाची माहिती, जुने कागद, सनदापत्रें यांचे आधार घेऊन विषयवार कालानुक्रमानें एकत्र केलेली आहे. श्रीमहाकाली व त्या गांवांतील सर्व देवस्थानें यांतील होणारीं नित्य कृत्यें, मासिक कृत्यें व नैमित्तिक कृत्यें कोणतीं व कशा प्रकारें केलीं जातात यांची तपशीलवार माहिती यांत प्रारंभीं दिली आहे. ती श्रद्धाळु लोकांच्या उपयोगाची आहे.त्याचप्रमाणें उत्सव व इतर देवस्थानांची माहिती आणि तेथील प्राचीनपासून चालत आलेल्या रूढी व हक्कसंबंध वगैरेंची माहिती सविस्तर यांत दिली आहे ती समाजशास्त्राचा विचार करणाऱ्यांस संग्राह्य वाटेल. याशिवाय परिशिष्टरूपानें रा. दीक्षित यांनीं या देवस्थानासंबंधीं ज्या जुन्या ऐतिहासिक लेखांच्या आधारें हें पुस्तक लिहिलें ते अस्सल लेख उपलब्ध झाले तेवढे सर्व छापिले आहेत. त्यांतील कांहीं 'कोंकणच्या इतिहासाची मांडणी करण्यास उपयोगी पडतील.'

आडिवरें गांव व श्रीमहाकालीचे मंदिराचा प्राकार यांचे नकाशे व इतर फोटो व यात्रेकरूंचे उपयोगाची माहिती यांत असल्यामुळें हें पुस्तक सर्वांनाच संग्राह्य झालें आहे. रा. दीक्षित यांना इंग्रजी शिक्षणाचा लाभ मिळालेला नाहीं किंवा ऐतिहासिक बाबतींत त्यांचे बुद्धीस चिकित्सकपणाची धार आलेली नाहीं; तथापि त्यांच्या ठिकाणीं प्रशंसनीय अशी ऐतिहासिक जिज्ञासा जागृत असल्यामुळें, अविश्रांत परिश्रम करून आडिवरें व त्या आसपासचे गांव यांसंबंधींची विविध प्रकारची माहिती जमवून तिची मांडणी त्यांनीं चार भागांत केलेली आहे. ती छापून काढण्याचे कामीं त्यांना मदत मिळणें जरूर आहे; पण ती मिळेपर्यंत वाट पाहत न

बसतां सध्या आर्थिक परिस्थिति अनुकूल नसतांही, त्यापैकीं एक भाग या पुस्तकाच्या द्वारें प्रकाशित केला आहे. अर्थात् आणखी साहाय्य मिळतांच त्यांचेकडून एवढ्या परिश्रमानें संग्रहित केलेली बाकीची ऐतिहासिक सामुग्री प्रकाशित होईल. हें काम आडिवरें गांवांतून परठिकाणीं जाऊन भाग्योदयास चढलेल्या अनेक गृहस्थांनीं मनावर घेतल्यास सहज तडीस जाणार आहे. करितां 'कोंकणच्या इतिहासास उपयोगी पडणारी ही सामुग्री प्रकाशित होण्यास' इतिहासभक्त, आणि आडिवरें व इतरत्र राहणारे गृहस्थ हरएकप्रकारें मदत करतील अशी आशा आहे.

ता। ३-१-३६

द. वि. आपटे

वे. शा. सं. चिंतामण कृष्ण दीक्षित हे एक वैदिक गृहस्थ असून रत्नागिरी जिल्ह्यांतील आडिवरें गांवचे राहणारे आहेत. ह्यानीं आपल्या गांवाचा इतिहास लिहिला आहे. ह्या इतिहासाच्या कामीं सनदा, जुन्या कागदांचीं चिठोरीं, वृद्ध माणसें, प्रत्यक्ष अवलोकन, दंतकथा, आपल्या लिहिण्याला उपयोगी पडणारे इतरांचे लेख ह्यांचा त्यांनीं आधार घेतला आहे. परिश्रमपूर्वक जुळविलेली माहिती फार महत्त्वाची आहे. श्री. दीक्षित-भटजी यांस शाळाकॉलेजांतील पद्धतशीर शिक्षण मिळालें नसून त्यांच्या मनांत इतिहास लिहिण्याची कल्पना यावी व तदनुसार त्यांनीं निरलसपणें सामुग्रीची जमवाजमव करून ती लेखनिविष्ट करावी ही गोष्ट सध्याच्या काळांत आश्चर्यकारक व वे. शा. सं. दीक्षित यांस अत्यंत भूषणावह आहे. ह्या उद्योगी माणसाच्या उद्योगशीलतेचें चीज करण्यास सरकार, विद्यापीठ अगर जनता ह्यांपैकीं कोणीच पुढें येऊं नये ही निराशाजनक परिस्थिति मन उद्विग्न करते. रा. दीक्षित यांस प्रोत्साहन मिळालें असतां त्यांच्यासारखे इतर गृहस्थही अशा प्रकारचें काम करण्यास पुढें येतील. वास्तविक शिकलेल्या माणसांचीं हीं कामें आहेत; परंतु सुशिक्षितांत त्यांच्या शिक्षणानें खेड्यांबद्दल पराङ्मुखता उत्पन्न होत आहे असें दिसतें. ह्यांत सुधारणा होईपर्यंत दीक्षितांसारख्या माणसाचें कौतुक करणें भाग आहे.

ना. गो. चापेकर